b) project-based learning activities
c) research presentations and seminars
d) reading and analyzing sustainability-related articles
e) writing essays and reports on environmental and social issues

These activities help students develop both language skills and sustainability awareness simultaneously.

Conclusion:

The development of Listening, Speaking, Reading, and Writing skills is essential for undergraduate students in higher education. These language competencies play a crucial role in academic learning, communication, and knowledge dissemination. In the context of sustainable development, LSRW skills enable students to understand complex global issues, participate in discussions, and contribute to solutions for environmental and social challenges.

Higher education institutions have a significant responsibility to promote both sustainability education and language skill development. Integrating LSRW skills into sustainability-related courses can enhance

students' ability to communicate ideas, collaborate with others, and engage in meaningful academic and social activities.

Therefore, strengthening LSRW skills among undergraduate students can contribute significantly to achieving the broader goals of sustainable development and preparing students to become responsible global citizens.

Suggestions:

To promote the development of LSRW skills for sustainable development, the following measures are recommended:

1. **Integration of Language and Sustainability Education**: Universities should incorporate sustainability topics into language learning courses.
2. **Interactive Teaching Methods**: Teachers should use debates, discussions, and presentations to improve students' communication skills.
3. **Project-Based Learning**: Students should be encouraged to work on sustainability-related projects that involve research and communication.
4. **Use of Digital Resources**: Online platforms, educational videos, and digital libraries can help students improve their listening and reading skills.
5. **Language Support Programmes**: Universities should establish language laboratories and communication skill workshops for undergraduate students.
6. **Encouragement of Academic Writing**: Students should be motivated to write essays, reports, and research papers on sustainability topics.

These strategies can help students develop strong language competencies while also promoting awareness and engagement with sustainable development.

Citations:

1. Brown, H. Douglas. *Principles of Language Learning and Teaching*. 5th ed., Pearson Education, 2007.
2. Nunan, David. *Second Language Teaching and Learning*. Heinle & Heinle Publishers, 1999.
3. Richards, Jack C., and Theodore S. Rodgers. *Approaches and Methods in Language Teaching*. 2nd ed., Cambridge University Press, 2001.
4. United Nations. *Transforming Our World: The 2030 Agenda for Sustainable Development*. United Nations, 2015.
5. UNESCO. *Education for Sustainable Development Goals: Learning Objectives*. UNESCO Publishing, 2017.
6. Council of Europe. *Common European Framework of Reference for Languages: Learning, Teaching, Assessment*. Cambridge University Press, 2001.
7. Crystal, David. *The Cambridge Encyclopedia of Language*. 3rd ed., Cambridge University Press, 2010.
8. Harmer, Jeremy. *How to Teach English*. Longman, 2007.
9. Tilbury, Daniella. "Education for Sustainable Development: An Expert Review of Processes and Learning." UNESCO, 2011.

ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

March - 2026
Vol. 15 - No. S1

सामाजिक शास्त्रांची शाश्वत विकासातील भूमिका

धामणे सुवर्णा पंढरीनाथ[1], प्राचार्य डॉ. हेमलता अरविंद राठोड[2]

[1]संशोधक संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग, के. आर. टी. आर्टस्, बी. एच. कॉमर्स आणि ए. एम. सायन्स (केटीएचएम) महाविद्यालय, नाशिक

[2]संशोधक मार्गदर्शक, रमेश फिरोदिया आर्ट्स, कॉमर्स आणि, सायन्स महाविद्यालय, साकुर, संगमनेर

***Corresponding Author:** धामणे सुवर्णा पंढरीनाथ*

DOI - 10.5281/zenodo.19481833

सारांश:

आधुनिक काळात पर्यावरणाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. वर्तमानकालीन स्थितीत जर व्यवस्थित विकासाचे नियोजन केले नाही तर भविष्यकालीन परिस्थिती संकटात राहणार आहे. शाश्वत विकासाची संकल्पना मानवाच्या जीवनाला एक नवे रूप देऊ शकते. औद्योगिक क्रांतीनंतर मनुष्याने नैसर्गिक संसाधनाचा अनियंत्रित वापर केला. मनुष्य निसर्गापासून दुरावला. मनुष्याच्या दृष्टीने विकास म्हणजे भौतिक व आर्थिक लाभ आणि इंद्रियांचे समाधान आहे. यांना जीवनाचे मुख्य ध्येय मानल्यामुळे आणि इतर सामाजिक मूल्य आणि पर्यावरण याला कमी लेखल्यामुळे आज विकासाची परिणीती विनाशात झालेली दिसते. परंतु, व्यक्तीला पुन्हा पर्यावरणाशी जोडण्यासाठी पर्यावरणाशी सभ्येतेने आचरण करावे लागेल. म्हणूनच, शाश्वत विकास साध्य करण्यासाठी सामाजिक शास्त्राची भूमिका अत्यंत कळीची आहे.

मुख्य शब्द: शाश्वत, विकास, सामाजिक शास्त्र, उच्च शिक्षण

प्रस्तावना:

मानवी सभ्यतेच्या प्रारंभी जेव्हा लोकसंख्या कमी होती. लोक साधेपणाने जीवन जगत होते व निसर्गाच्या सान्निध्यात वास्तव्य करत असत. तेव्हा अगदी उत्पादनाची अल्प प्रमाणात गरज पडत होती. मानव आपल्या उपभोगासाठी जे नैसर्गिक संसाधने उपयोगात आणत होता, ते सर्व नैसर्गिक चक्राच्या माध्यमातून निर्माण होत होते; त्यामुळे व्यावहारिक पातळीवर माणसाच्या उपभोगामुळे निसर्गाला कोणत्याही प्रकारची हानी पोहोचत नव्हती. त्या दिवसांमध्ये नैसर्गिक संसाधनांचे भांडार एवढे मोठे होते आणि त्याचा वापर एवढा मर्यादित होता की ही संसाधने येणाऱ्या काळात मनुष्यासाठी कमी पडतील असा कुणी विचार देखील केला नाही. परंतु काळाच्या ओघात लोकसंख्या वाढत गेली, संस्कृती व तंत्रज्ञानाच्या विकासाबरोबर मनुष्याचा उपभोग स्तर सुद्धा उंचावत गेला व नैसर्गिक संसाधनाचे शोषण एवढे वाढले की, हळूहळू त्यांच्या साठ्यांमध्ये तुटवड्याची समस्या निर्माण झाली. एवढेच नव्हे, तर सामान्य जीवनामध्ये कृत्रिम साधनांचा वापर एवढा वाढला की, मनुष्य केवळ निसर्गापासून दुरावला नाही, तर तो निसर्गाला दूषितही करू लागला.

दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक पातळीवर आर्थिक आणि औद्योगिक विकसाने जोर पकडल्याने पृथ्वीचे तापमान झपाट्यानं वाढायला लागलेल आहे. १९८० नंतर जेव्हा जागतिकीकरणाने जगाला घेरल. तेव्हा सार जग जीडीपी वाढीमागे लागले. विकासाच्या हव्यासापोटी पृथ्वीवरील मर्यादित स्वरूपात उपलब्ध असलेल्या नैसर्गिक साधन संपत्तीची बेसुमार लूट केली. परिणामी, साधन संपत्तीचा तुटवडा निर्माण झाला. आजकाल आंतरराष्ट्रीय पातळीवर राष्ट्रांमध्ये पृथ्वीवरील उपलब्ध नैसर्गिक साधन संपत्तीच्या प्राप्तीसाठी, त्यावर नियंत्रण प्रस्थापित करण्यासाठी स्पर्धा निर्माण झाली आहे. विकसित देशांनी औद्योगिक आणि आर्थिक विकास करताना पर्यावरण संरक्षणाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. विकसित देशांशी स्पर्धा करताना विकसनशील आणि अविकसित देशांनी

देखील अंधानुकरण केले आणि पर्यावरणांएवजी स्पर्धेवर लक्ष केंद्रित झाले. औद्योगीकरणाच्या प्रक्रियेअंतर्गत पृथ्वीचे तापमान वाढविणाऱ्या कार्बनडाय ऑक्साइड, मिथेन, नायट्रस ऑक्साइड, हायड्रोफ्लोरोकार्बन, सल्फर हॅक्साफ्लोराईड यासारखे पृथ्वीचे तापमान वाढविणारे वायु हवेत मिसळले गेले. कृषि उत्पन्न वाढविण्यासाठी रासायनिक खतांचा भरमसाठ वापर केला गेला. पर्यावरणाची समस्या वैश्विक बनली आहे. अमेरिकेसारख्या मोठ्या राष्ट्रापासून तर भुतानसारख्या छोट्या, गरीब, अविकसित राष्ट्रांपर्यंत प्रत्येक राष्ट्राला पर्यावरण प्रदूषणाच्या संकटाला तोंड द्यावे लागते आहे. पर्यावरणाचा समतोल बिघडला. पर्यावरणाच्या प्रदूषणामधून विविध प्रकारच्या समस्या निर्माण झाल्या. पृथ्वीच्या पृष्ठभागाचे तापमान वाढले. समुद्रातील पाण्याची पातळी वाढली, आम्ल पर्जन्य, ओझोन थरांचा क्षय, जंगलतोड केल्यामुळे कृमि-कीटक आणि जीवजंतु असतात असे दलदलीचे भाग नष्ट होत जाणे, जमीनचे वाळवंटीकरण, पुर येणे, दुष्काळ पडणे, जमीनीखालचे पाणी आटणे, शेती उत्पादन आणि औद्योगीकरणावर परिणाम होणे अशा कितीतरी गोष्टी घडत आहे. यामुळे होणारे हानिकारक परिणाम केवळ मानवालाच नाही तर प्रत्येक सजीवाला भोगावे लागत आहेत.

अध्ययनाची आवश्यकता:

सध्या विकासाच्या नावाखाली दिल्लीतील अरवली पर्वतरांगा, मुंबईतील आरे जंगल, आदिवासी भागातील डोंगर नष्ट करणे अशी पर्यावरण विरोधी धोरणांमुळे जैवविविधतेला धोका निर्माण झाला आहे. याचबरोबर हवा, पाणी, भूमी प्रदूषण, वाढती लोकसंख्येच्या गरजा पूर्ण करण्यासाठी मर्यादित नैसर्गिक संसाधनाचा अतिवापर यासारख्या समस्या मानवी कृतीने निर्माण झाल्या आहेत. मानवी विकासासाठी निसर्गाला नष्ट करण्यासाठी आपण जराही संकोच केला नाही. पण हे करत असताना आपल्या हे लक्षात आले नाही निसर्गाचे झालेले नुकसान पुन्हा भरून नाही काढता येत नाही. नष्ट केलेले डोंगर, नद्या, जैवविविधता पुन्हा पुनर्जीवित अथवा व्यवस्थित करता येत नाही. जागतिक स्तरावर पर्यावरणाचे महत्त्व यावरून लक्षात येते कि, पर्यावरणाचे संरक्षण, संवर्धन, संतुलन, आणि पर्यावरण शिक्षण याचा मानवधिकारांच्या वैश्विक जाहीरनाम्यात समावेश करण्यात आलेला आहे. शाश्वत विकास ही संकल्पना पर्यावरणासोबत सामाजिक न्यायाशीदेखील संबंधित आहे. ती जाणीव व नैतिकता सामाजिक शास्त्रांचे शिक्षण व्यक्तीमध्ये निर्माण करू शकतात. सामाजिक शास्त्रे हा उच्च शिक्षणातील केवळ विषय नसून जगातील विविध समस्यांकडे टीकात्मक दृष्टी विकसित करण्याची खिडकी आहे. सामाजिक शास्त्रे मानवी परिस्थितीचा सखोल विचार करून सामाजिक रचनांमधील गुंतागुंत समजून घेण्यास मदत करतात आणि विविध संस्कृतीतील प्रभावी संवाद साधून उपाय योजना अमलांत आणण्यास उपयुक्त ठरतात.

संशोधन पद्धती:

सदर शोधनिबंध दुय्यम तथ्य संकलनावर आधारित असून वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

शोधनिबंधाची उद्दिष्टे:

१. शाश्वत विकासाची भूमिका आणि उद्देशांना भविष्यकालीन दृष्टीकोनातून समजून घेणे.
२. शाश्वत विकासाच्या वाटचालीत सामाजिक शास्त्रांची भूमिका लक्षात घेऊन त्याला प्रोत्साहन देणे.

शोधनिबंधाची गृहीतके:

१. शाश्वत विकासाची संकल्पना महत्त्वाची असूनही जागतिक पातळीवर दुर्लक्षित आहे.
२. शाश्वत विकास सक्षमपणे अवलंब करण्यास सामजिक शास्त्रांची भूमिका महत्त्वाची आहे.

शाश्वत विकास:

जागतिक पातळीवरील आर्थिक आणि औद्योगिक विकासाच्या गतिशील प्रक्रियेमुळे पर्यावरणाचे संकट निर्माण झाले. त्याला अनुसरून इ. स. १९८७ मध्ये "World Commission on Environment and Development" नार्वेचे माजी पंतप्रधान ब्रॅडलँड यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आला. या आयोगाने 'अवर कॉमन फ्युचर' या शीर्षकाने एक अहवाल प्रसिद्ध केला. यात त्यांनी म्हटले की, 'शाश्वत विकास म्हणजे भविष्यकालीन पिढीचा विचार करून वर्तमान कालीन गरजांचे नियोजन करणे होय.' १९८० च्या दशकात नैसर्गिक साधन संपत्तीचे दूरदृष्टी ठेऊन विवेकबुद्धीने वापर करण्याचा उद्देश शाश्वत विकास संकल्पनेचा आहे. परंतु, जागतिक पातळीवर त्याचा विसर पडल्याचे जाणवले. एवढ्या वर्षांनंतर देखील वर्तमान पिढी भविष्यकालीन पिढीचा विचार करताना दिसत नाही. जरी वाढत्या लोकसंख्येच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आणि आर्थिक विकासाच्या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी नैसर्गिक संसाधनाचे शोषण आवश्यक बनते तरी याचा अर्थ पृथ्वी कोणाची खाजगी संपत्ती नाही. ही आपल्याला आपल्या पूर्वजांकडून वारसाहक्काने मिळालेली नाही. पर्यावरणाचा ऱ्हास करून तिचा उपभोग घेणे म्हणजे पुढच्या पिढीच्या जीवनामध्ये अडथळे निर्माण करण्यासारखे आहे. तेव्हा सुरक्षित पर्यावरण, भविष्याचा गांभीर्याने विचार, नैसर्गिक साधनसंपत्तीचा काटकसरीने वापर, पर्यावरणांचे संरक्षण, विकासाचे विवेकपूर्ण व्यवस्थापन केल्यास आपली भविष्य आणि भावी पिढी दोन्हीही सुरक्षित होऊ शकेल.

आता प्रश्न निर्माण होतो की याची जबाबदारी घेईल कोण? पर्यावरणवाद्यांच्या मते, ही जबाबदारी प्रथम विकसित देशांनी घ्यावी. विकसनशील आणि अविकसित देशांपेक्षा जगातील उत्पादित वस्तु, उर्जेचा वापर, चंगळवाद हा विकसित देशात जास्त चालतो. नैसर्गिक संसाधन संपत्तीचे असमान वितरण झाल्याने मूठभर विकसित राष्ट्रे, आणि बहुसंख्यांक विकसनशील आणि अविकसित राष्ट्रे अशी जगाची विभागणी झालेली दिसते. विकसित राष्ट्रांचे राहणीमान, जीवनस्तर उच्च दर्जाचे असते तर अविकसित व विकसनशील राष्ट्रांना दारिद्र्य, उपासमार, बेरोजगारी, आरोग्य या समस्याना तोंड द्यावे लागते. परंतु, विकसित राष्ट्रे मात्र याची जबाबदारी विकसनशील राष्ट्रांची आहे असे मानतात. कारण त्यांनी अवलंबलेल्या चुकीच्या औद्योगीकरण आणि आर्थिक विकासामुळेच अशी गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे, असे त्यांचे मत आहे. यावर देशांनी खाजगी वाहनांचा वापर कमी करावा, सार्वजनिक परिवहन आणि सायकलीसारख्या साधनांचा वापर वाढवावा, याशिवाय कोळसा, वीज व अणुऊर्जा यांऐवजी पवन ऊर्जा व सौरऊर्जा यांच्या वापरला प्राधान्य दिले पाहिजे, असे उपाय सुचविले खरे. परंतु, "व्यवसाय क्षेत्र आणि राजकारणातले नेते विकासाच्या मुद्द्यावरून लोकांची दिशाभूल करीत आहेत. नेते वाटाघाटी करत आहेत मात्र त्यातून कोणतीही परिणामकारक कृती समोर येत नाही. हे दिशा देणारे नाही तर दिशाभूल करणारे आहे. राजकारणी आणि कंपन्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी वास्तवात कृती होत असल्याचे भासवत आहेत, हा खरा धोका आहे. १६ वर्षीय पर्यावरण कार्यकर्ती ग्रेटा थनबर्ग हिने म्हटले होते की, COP पर्यावरण परिषदेत समग्र उपाय शोधायला हवा मात्र त्याऐवजी पळवाटांवर वाटाघाटी करण्याचा प्रयत्न देश करत आहे." तर भारतातील माणिपूरची लिसिप्रिया कांगूजाम या ८ वर्षीय मुलीने माद्रीदच्या संयुक्त राष्ट्र हवामान चर्चेच्या भाषणात हवामान बदलामुळे बालकांच्या होणाऱ्या अकाली मृत्युकडे तिने लक्ष वेधले. "मतभेद बाजूला ठेवा, एकत्रित या आणि हवामान बदलाच्या संकटावर मात करा" असे आवाहन जगभरातील बालकांनी केले.

सामाजिक शास्त्रांची शाश्वत विकासातील भूमिका:

शिक्षण हे राष्ट्राचे भक्कम अधिष्ठान आहे आणि देशाच्या सर्वांगीण विकासासाठी ते अत्यंत आवश्यक आहे. शिक्षणासोबतच विविध क्षेत्रांतील ज्ञान प्राप्त केल्यास व्यक्ती समाजात सन्मानाने जीवन जगू शकते. शिक्षणामुळे उपलब्ध संसाधनांचा योग्य आणि प्रभावी उपयोग करण्याची क्षमता निर्माण होते. शिक्षण सातत्याने चालणारे ज्ञान आणि अनुभव प्राप्त करून देणारे माध्यम आहे. ज्यातून मानवी व्यक्तीमत्वाच्या विशिष्ट पैलूचा किंवा सर्वांगीण सुसंवादी विकास घडवून आणते. उच्च शिक्षण औपचारिक शिक्षणातील एक ऐच्छिक टप्पा आहे. या शिक्षणात पदवी आणि पदव्युत्तर शिक्षणाचा समावेश होतो. उच्च शिक्षणाने व्यक्तींमध्ये आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि वैज्ञानिक विकास घडून येतो. उच्च शिक्षणातील सामाजिक शास्त्रांचा अभ्यास करून गरिबी, निरक्षरता, बेरोजगारी, दहशतवाद, सामाजिक व आर्थिक असमतोल यासारख्या समस्यांतून बाहेर पडून प्रत्येकाला चांगल्या जीवनमानाची हमी देता येते. सामाजिक शास्त्रांतील विविध शाखांचा अभ्यास करून शाश्वत विकास साध्य करणे शक्य होणार आहे.

समकालीन सामाजिक शास्त्रांमध्ये विकासाची संकल्पना विकसनशील देशांना मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने विकसित केलेली आहे. विकसनशील देशांच्या सरकारची अधिमान्यता प्रामुख्याने जनकल्याण त्यांच्या सोयीसुविधा आणि इच्छा आकांक्षांची परिपूर्ती यांच्याशी जोडलेली आहे. वसाहतवादी राष्ट्रांनी आपल्या शासनकाळात विकसनशील देशांचे नैसर्गिक व मानवी संसाधनाचे मोठ्या प्रमाणावर शोषण केले. हेच खऱ्या अर्थाने त्यांचे मागासलेपणाचे कारण आहे. त्यामुळे आपल्या नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी हे देश विज्ञान, तंत्रज्ञान, आर्थिक आणि औद्योगिक विकासाचा मार्ग स्वीकारतात. यापासून त्यांना रोखू शकत नाही मात्र शाश्वत विकासाचा अवलंब करण्यास प्रवृत्त करू शकतो. त्यांचे कल्याण आजच्या निर्णय कृतीवर आधारित आहे त्यासाठी त्यांच्यात वर्तमान व भविष्यकालीन पिढीसाठी पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करणे, जबाबदारीचे भान राखून नैसर्गिक संसाधनाचा काटकसरीने वापर करून ती जतन करणे, त्याचे समान न्याय्य पुनर्वितरण करणे, नैसर्गिक संसाधनाचा विवेकपूर्ण व्यवस्थापन करून आपल्या विविध प्रदूषणावर नियंत्रण प्रस्थापित करणे, पर्यावरणाचा समतोल साधने यातूनच शाश्वत विकास साध्य करता येऊ शकतो, याची जाणीव निर्माण करण्यास सामाजिक शास्त्रे सक्षम आहेत.

शाश्वत विकासात सामाजिक शास्त्राची (Social Sciences) भूमिका अत्यंत महत्त्वाची महत्त्वाची आहे. सामाजिक शास्त्रे ही मानवी संस्कृती, समाज आणि वर्तन यांचा अभ्यास करणारी शाखा आहे. यात समाजशास्त्र, मानसशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र आणि मानवशास्त्र या विषयांचा समावेश होतो. व्यक्तीला टीकात्मक विचार, सामाजिक गुंतागुंत, मानवी वर्तन आणि सांस्कृतिक समज, जगाबद्दल सूक्ष्म व व्यापक समज विकसित करण्यास मदत करते. हे विषय मानवी वर्तन, समाज, अर्थव्यवस्था आणि राजकारणाचे विश्लेषण करून, व्यक्तीला जबाबदार, जागरूक आणि सर्जनशील नागरिक बनण्यासाठी सक्षम करतात. सामाजिक शास्त्रे विद्यार्थ्यांना सामाजिक, राजकीय, आर्थिक, जागतिक घटनांकडे गंभीरपणे पाहण्याची आणि विश्लेषणात्मक विचार करण्याची क्षमता देतात. सामजिक व सांस्कृतिक जाणीवेमुळे नैतिकतेला प्रोत्साहन देते. नागरिकांमध्ये लोकशाही मुल्ये आणि मानवी हक्कांबद्दल जागरुकता निर्माण होते. सार्वजनिक धोरण राबविणारे शासन, राजकीय व्यक्ती, प्रशासकीय अधिकारी, दबावगट संघटना, अशासकीय घटक, सर्वसामान्य जनता हे शाश्वत विकासाबाबत अधिकच जबाबदार बनू शकतात. शाश्वत विकासाला अडसर ठरणारी असमानता, गरिबी, पर्यावरण प्रश्न, सामाजिक व आर्थिक संघर्ष समजून घेणे आणि त्यावर उपाय सुचवून त्याची अंमलबजावणी करण्यास आधार ठरतात. सामाजिक शास्त्रे देशाच्या समाजकारण, राजकारण,

अर्थव्यवस्था, प्रशासन याला आकार देणारे धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी आवश्यक ज्ञानाचा आधार पुरवतात. सामाजिक शास्त्रांमुळे व्यक्तीच्या संवाद, सहकार्य व नेतृत्व ही कौशल्ये विकसित झाल्याने ती आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य आणि स्थानिक पातळीवर शाश्वत विकासाच्या अनुषंगाने धोरणांचे समर्थन व अंमलबजावणी अधिक स्पष्टपणे करू शकते, त्यामुळे जागतिक नागरिकत्वाच्या भावनेला बळकटी मिळते.

समग्र पातळीवर शाश्वत विकास राबविण्यासाठी विकसित देशांची भूमिका मोठ्या भावांप्रमाणे असावी. ज्याने स्वार्थाने आणि स्पर्धेने प्रेरित असे औद्योगीकरण, आर्थिक स्पर्धा, हितसंबंधाविषयी असुरक्षिततेची भावना याला नियंत्रित करता येईल. शिवाय विकासाच्या प्रवाहात पर्यावरणाला झळ तर बसतेच आणि नाहक गरीब आणि अविकसनशील राष्ट्रांचा बळी जातो. चुकीच्या पद्धतीने नियम धाब्यावर बसून विकासाची स्पर्धा करण्यापेक्षा जागतिक पातळीवर सहानुभूती आणि सहिष्णुता विकसित होणे गरजेचे आहे. सामाजिक शास्त्रे धोरण निर्माणकर्त्यांना सकारात्मक बदलाचे प्रतिनिधी बनण्यास मदत करते. यामुळे आधुनिक जगातील किचकट समस्यांना समजून घेण्यासाठी व त्यावर उपाय शोधण्यासाठी आवश्यक परिस्थिती निर्माण होते. थोडक्यात, उच्च शिक्षणातील सामाजिक शास्त्रे केवळ ज्ञान देत नाहीत, तर मानवी जीवनाला समस्या समृद्ध करून एक उन्नत समाज घडवण्यास आणि आजच्या जगातील हवामान बदल, राजकीय ध्रुवीकरण, सांस्कृतिक संघर्ष आणि नैतिक द्वंद्व यांचे गांभीर्य समजून केवळ बघ्याची भूमिका न घेता त्यावर महत्त्वाचे पाऊल उचलण्यास मदत करतील.

संदर्भ:

१. डॉ. शैलेंद्र देवळाणकर, समकालीन जागतिक राजकारण, २०१०, विद्याबुक्स पब्लिकेशन, औरंगाबाद.

२. बसू रुमकी, "आंतरराष्ट्रीय राजकारण", २०१७, नवी दिल्ली

३. कुलकर्णी शिल्पा, पर्यावरण आणि समाज, २००७, डायमंड प्रकाशन, पुणे.

४. फाडिया बी. एल. फाडिया कुलदीप: आन्तरराष्ट्रीय राजनीती: साहित्या भवन, आग्रा.

५. गाबा ओ. बी., (अनुवाद - जाधव तुकाराम), राजनीतिशास्त्र परिचय, २०१०, के सागर पब्लिकेशन, पुणे.

६. Singh Hoshiyar & Sachdeva Pradeep, Public Administration, 2011, Pearson, Delhi.

७. Jonathan Michie, Sir Cary L. Cooper, 2025, Springer Nature Switzerland AG, Switzerland

८. Edith Brown Weiss and Ahila Sornarajah, Good Governance, 2021, Max Planck Encyclopedia of Public International Law

९. डॉ. भारत अग्रवाल आणि डॉ. रविंद्रनाथ मुखर्जी, समाजशास्त्र का परिचय, २०२१, एसबीपीडी पब्लिकेशन, आग्रा.

ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

March - 2026
Vol. 15 - No. S1

उच्च शिक्षणात प्रभावी संवादासाठी प्रगत भाषिक कौशल्यांचा विकास

डॉ. मनोज बापुसाहेब तेलोर

लोकनेते रामदास पाटील धुमाळ, कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, राहुरी, ता. राहुरी, जि. अहिल्यानगर

Corresponding Author: ***डॉ. मनोज बापुसाहेब तेलोर***

DOI - 10.5281/zenodo.19481847

सारांश:

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात विविध भाषा आणि संस्कृतींशी संवाद साधण्याची गरज वाढली आहे. उच्च शिक्षण संस्थांमध्ये विविध प्रांतांतील आणि देशांतील विद्यार्थी एकत्र येतात. अशा परिस्थितीत स्पष्ट, अचूक आणि प्रभावी संवाद साधण्याची क्षमता ही केवळ शैक्षणिक गरज नसून व्यावसायिक आणि सामाजिक गरजही बनली आहे. म्हणूनच, उच्च शिक्षणात भाषिक कौशल्याचा विकास हा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी अत्यावश्यक घटक मानला जातो. भाषेवर प्रभुत्व मिळविल्यास ज्ञानार्जन अधिक प्रभावीपणे होते आणि व्यक्तिमत्त्वात आत्मविश्वास, नेतृत्वगुण व सर्जनशीलता विकसित होण्यास मदत होते.

मुख्य शब्द: विविध भाषा, श्रवण, संभाषण, वाचन, प्रभावी संवाद

प्रस्तावना:

उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात ज्ञानार्जन, संशोधन आणि व्यक्तिमत्त्व विकास या सर्व प्रक्रियांमध्ये भाषिक कौशल्याला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. शाळास्तरापेक्षा उच्च शिक्षणात विचारांची सखोल मांडणी, चिकित्सक दृष्टीकोन, संदर्भाधारित लेखन आणि प्रभावी संवाद यांची अपेक्षा अधिक असते. या सर्व अपेक्षा पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांकडे सक्षम भाषिक कौशल्य असणे आवश्यक ठरते. वाचन, लेखन, श्रवण आणि संभाषण या चारही घटकांचा समतोल विकास झाल्यास विद्यार्थी केवळ अभ्यासक्रम समजून घेण्यातच नव्हे तर संशोधन, सादरीकरणे आणि व्यावसायिक क्षेत्रातही यशस्वी होऊ शकतात.

प्रगत भाषिक कौशल्यांमध्ये सखोल वाचन, विश्लेषणात्मक लेखन, प्रभावी सादरीकरण, तर्कशुद्ध मांडणी आणि बहुभाषिक संवाद यांचा समावेश होतो. आधुनिक शिक्षण व्यवस्थेत डिजिटल माध्यमांचा वाढता वापर, आंतरराष्ट्रीय स्तरावरील ज्ञानसंपर्क आणि विविध सांस्कृतिक पार्श्वभूमीतील विद्यार्थ्यांचा सहभाग यामुळे भाषिक प्रावीण्याची गरज अधिक अधोरेखित होते.

आजच्या ज्ञानाधिष्ठित आणि तंत्रज्ञानप्रधान युगात शिक्षणाची व्याप्ती केवळ पाठ्यपुस्तकापुरती मर्यादित राहिलेली नाही. आधुनिक शिक्षण पद्धतीमध्ये चिकित्सक विचारसरणी, सर्जनशीलता, संशोधनक्षम वृत्ती आणि प्रभावी संवादकौशल्य यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या सर्व घटकांचा पाया म्हणजे प्रगत भाषिक कौशल्ये होय. भाषा ही केवळ अभिव्यक्तीचे साधन नसून ज्ञान आत्मसात करण्याचे, विचार मांडण्याचे आणि समाजाशी संवाद साधण्याचे प्रभावी माध्यम आहे. म्हणूनच, आधुनिक शिक्षणाच्या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी प्रगत भाषिक कौशल्यांचा विकास अत्यावश्यक ठरतो. अशा कौशल्यांमुळे विद्यार्थी केवळ शैक्षणिक यश मिळवत नाहीत, तर जागतिक पातळीवर स्पर्धा करण्यास आणि जबाबदार नागरिक म्हणून योगदान देण्यासही सक्षम होतात.

प्रगत भाषिक कौशल्यांचे स्वरूप:

कालानुरूप समाज, शिक्षणपद्धती आणि तंत्रज्ञानामध्ये झालेल्या बदलांमुळे भाषेच्या वापरातही लक्षणीय परिवर्तन झाले आहे. या पार्श्वभूमीवर केवळ मूलभूत वाचन-लेखनापुरते मर्यादित न राहता, सखोल आकलन, चिकित्सक विश्लेषण, सर्जनशील अभिव्यक्ती आणि प्रभावी सादरीकरण यांचा समावेश असलेली प्रगत भाषिक कौशल्ये आवश्यक ठरतात.

प्रगत भाषिक कौशल्यांचे स्वरूप बहुआयामी आहे. यात अर्थगर्भ वाचन, संदर्भाधारित लेखन, तर्कशुद्ध मांडणी, प्रभावी वक्तृत्व, संवादातील नेमकेपणा आणि विविध माध्यमांद्वारे अभिव्यक्त होण्याची क्षमता यांचा समावेश होतो. तसेच डिजिटल युगात ई-माध्यमांद्वारे संवाद साधण्याचे कौशल्य, माहितीचे विश्लेषण आणि योग्य शब्दप्रयोग यांनाही विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. म्हणूनच, प्रगत भाषिक कौशल्यांचे स्वरूप हे केवळ भाषिक ज्ञानापुरते मर्यादित नसून ते व्यक्तिमत्त्व विकास, सामाजिक सहभाग आणि शैक्षणिक प्रगती यांच्याशी निगडित आहे. या कौशल्यांचा सर्वांगीण विकास झाल्यास व्यक्ती अधिक सक्षम, आत्मविश्वासू आणि प्रभावी संवादक बनते.

प्रगत भाषिक कौशल्ये स्वरूप व प्रकार :

प्रगत वाचन कौशल्य :

प्रगत वाचन कौशल्य म्हणजे केवळ मजकूर वाचून त्याचा सरळ अर्थ समजून घेणे नव्हे, तर त्यामागील आशय, उद्देश, भावार्थ, तर्करचना आणि लेखकाची भूमिका यांचे सखोल आकलन करण्याची क्षमता होय. आधुनिक शिक्षणपद्धतीत माहितीची प्रचंड उपलब्धता असल्यामुळे विद्यार्थ्यांनी वाचलेल्या मजकुराचे चिकित्सक विश्लेषण करणे, त्यातील विश्वासार्हता तपासणे आणि विविध स्रोतांतील माहितीची तुलना करणे अत्यावश्यक झाले आहे.

१) सखोल आकलन: प्रगत वाचनात वाचक केवळ शब्दार्थ समजून घेत नाही, तर संदर्भ, प्रतीक, सूचक अर्थ आणि उपरोध यांचाही विचार करतो. साहित्य, संशोधनपर लेख किंवा वृत्तलेख वाचताना मजकुरातील सूक्ष्म अर्थ समजून घेणे हे प्रगत वाचनाचे लक्षण आहे.

२) चिकित्सक विचार: वाचक मजकुरातील मांडणी, तर्क, पुरावे आणि निष्कर्ष यांचे परीक्षण करतो. लेखकाची भूमिका योग्य आहे का, त्यामागील पूर्वग्रह काय असू शकतात, याचा विचार केला जातो. यामुळे वाचक स्वतंत्र व तर्कसंगत मत तयार करू शकतो.

३) विश्लेषण व तुलना: प्रगत वाचनात विविध लेखकांचे दृष्टिकोन, भिन्न मते किंवा संशोधन निष्कर्ष यांची तुलना केली जाते. यामुळे विषयाचे व्यापक आकलन होते आणि ज्ञान अधिक परिपूर्ण बनते.

४) अर्थनिर्मिती व चिंतन: वाचनानंतर वाचक स्वतःच्या अनुभवांशी आणि पूर्वज्ञानाशी मजकुराची सांगड घालतो. त्यातून नव्या कल्पना, प्रश्न किंवा निष्कर्ष निर्माण होतात. ही प्रक्रिया व्यक्तीच्या बौद्धिक विकासास चालना देते.

५) माहितीचे मूल्यमापन: डिजिटल युगात उपलब्ध असलेली माहिती सत्य, अर्धसत्य किंवा भ्रामक असू शकते. त्यामुळे स्रोतांची विश्वसनीयता तपासणे, लेखकाची पार्श्वभूमी जाणून घेणे आणि संदर्भांचा अभ्यास करणे हे प्रगत वाचनाचे महत्त्वाचे अंग आहे.

प्रगत वाचन कौशल्य विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी तसेच व्यावसायिक आयुष्यातील यशासाठी अत्यंत आवश्यक आहे. या कौशल्यामुळे व्यक्ती अधिक सजग, चिकित्सक आणि आत्मनिर्भर बनते. त्यामुळे उच्च

शिक्षणाच्या प्रक्रियेत प्रगत वाचन कौशल्यांचा विकास करण्यावर विशेष भर देणे गरजेचे आहे.

प्रगत लेखन कौशल्य :

प्रगत लेखन कौशल्य म्हणजे विचारांची सुसंगत, तर्कशुद्ध, प्रभावी आणि संदर्भाधारित मांडणी करण्याची क्षमता होय. केवळ व्याकरणशुद्ध लेखन पुरेसे नसून आशयाची सखोलता, भाषेची नेमकी निवड, शैलीची योग्य जुळवण आणि वाचकाभिमुखता यांचा समन्वय असणे आवश्यक असते. प्रगत लेखन हे शैक्षणिक, संशोधनात्मक, व्यावसायिक आणि सर्जनशील क्षेत्रात अत्यंत महत्त्वाचे ठरते.

१) विश्लेषणात्मक लेखन: या प्रकारात एखाद्या विषयाचे तर्कशुद्ध विश्लेषण केले जाते. मुद्द्यांची मांडणी पुराव्यांसह केली जाते आणि निष्कर्ष स्पष्टपणे मांडले जातात. **उदा.** निबंध, समीक्षण, अहवाल इ.

२) संशोधनपर लेखन: यात विविध स्रोतांचा अभ्यास करून संदर्भांसह लेखन केले जाते. तथ्य, आकडेवारी आणि संदर्भ यांचा अचूक वापर आवश्यक असतो. **उदा.** प्रबंध, संशोधन लेख, प्रकल्प अहवाल.

३) सर्जनशील लेखन: कल्पनाशक्ती, भावनिक अभिव्यक्ती आणि कलात्मक शैली यांचा वापर करून केलेले लेखन. यात भाषेची सौंदर्यपूर्ण मांडणी महत्त्वाची असते. **उदा.** कथा, कविता, ललित लेख, नाटक.

४) औपचारिक लेखन: शासकीय, शैक्षणिक किंवा व्यावसायिक संदर्भात केलेले नेमके, स्पष्ट आणि नियमबद्ध लेखन. **उदा.** अर्ज, पत्रव्यवहार, निवेदन, अधिकृत अहवाल.

५) चिंतनपर लेखन: वैयक्तिक अनुभव, विचार आणि निरीक्षणांवर आधारित लेखन. यात आत्मपरीक्षण आणि वैयक्तिक दृष्टिकोन महत्त्वाचा असतो. **उदा.** अनुभव लेखन, दिनदर्शिका लेखन.

प्रगत लेखन कौशल्यांचे विविध प्रकार व्यक्तीच्या बौद्धिक, सर्जनशील आणि व्यावसायिक विकासास चालना देतात. योग्य शब्दनिवड, तर्कशुद्धता, सुसंगती आणि प्रभावी अभिव्यक्ती या घटकांवर प्रभुत्व मिळवल्यास लेखन अधिक परिणामकारक आणि प्रभावी ठरते. त्यामुळे उच्च शिक्षणाच्या प्रक्रियेत प्रगत लेखन कौशल्यांचा विकास करण्यावर विशेष भर देणे गरजेचे आहे. म्हणूनच उच्च शिक्षणाच्या प्रक्रियेत प्रगत वाचन कौशल्यांचा विकास करण्यावर विशेष भर देणे गरजेचे आहे.

प्रगत श्रवण कौशल्य :

प्रगत श्रवण कौशल्य म्हणजे केवळ ऐकणे नव्हे, तर ऐकलेल्या माहितीचे सखोल आकलन, विश्लेषण, मूल्यमापन आणि योग्य प्रतिसाद देण्याची क्षमता होय. आधुनिक शिक्षणपद्धतीत व्याख्याने, चर्चासत्रे, सादरीकरणे, डिजिटल माध्यमे आणि संवाद यांचा मोठ्या प्रमाणावर वापर होत असल्याने प्रभावी श्रवण कौशल्य अत्यंत महत्त्वाचे ठरते. प्रगत श्रवणामुळे व्यक्तीचा बौद्धिक विकास, संवादकौशल्य आणि निर्णयक्षमता वृद्धिंगत होते.

प्रगत श्रवण कौशल्य म्हणजे केवळ आवाज ऐकणे नव्हे, तर समोरच्या व्यक्तीचा अर्थ, भावना, हेतू आणि संदर्भ समजून घेण्याची क्षमता होय. संवाद कौशल्यांमध्ये हे अत्यंत महत्त्वाचे मानले जाते.

१. सक्रिय श्रवण : प्रगत श्रवणात व्यक्ती फक्त ऐकत नाही तर पूर्ण लक्ष देऊन समजून घेण्याचा प्रयत्न करते. बोलणाऱ्याकडे लक्ष ठेवणे, मध्येच अडथळा न आणणे, डोळस संपर्क ठेवणे, मान हलवून किंवा शब्दांनी प्रतिसाद

देणे यामुळे बोलणाऱ्याला वाटते की त्याचे बोलणे महत्वाचे आहे.

२. अर्थ समजून घेणे : प्रगत श्रवणात शब्दांच्या मागील अर्थ समजून घेणे महत्वाचे असते. बोलणाऱ्याचा उद्देश काय आहे, तो काय सांगू इच्छितो, संदर्भ काय आहे यावर भर असतो त्यामुळे संवाद अधिक प्रभावी बनतो.

३. भावनिक समज : या प्रकारात बोलणाऱ्याच्या भावना समजून घेण्याचा प्रयत्न केला जातो. उदा. दु:ख, आनंद, राग, चिंता इत्यादी भावना ओळखणे, सहानुभूती दाखवणे यामुळे मानवी संबंध अधिक मजबूत होतात.

४. विश्लेषणात्मक श्रवण : प्रगत श्रवणात ऐकलेली माहिती तार्किक पद्धतीने तपासणे व विश्लेषण करणे आवश्यक असते. माहितीची सत्यता तपासणे, मुख्य मुद्दे ओळखणे, कारण-परिणाम संबंध समजणे हे विशेषतः शिक्षण, चर्चा आणि निर्णय प्रक्रियेत उपयोगी ठरते.

५. अभिप्राय देणे : प्रगत श्रवणात योग्य प्रतिसाद देणे महत्वाचे असते. प्रश्न विचारणे, मुद्दे स्पष्ट करणे, स्वतःची समज सांगणे यामुळे संवाद द्विपक्षीय होतो.

६. स्मरणशक्ती आणि एकाग्रता : प्रगत श्रवणासाठी एकाग्रता आणि माहिती लक्षात ठेवण्याची क्षमता आवश्यक असते. मुख्य मुद्दे लक्षात ठेवणे आवश्यक माहिती पुन्हा सांगणे यामुळे संभाषण अधिक परिणामकारक होते.

प्रगत श्रवण कौशल्य म्हणजे लक्षपूर्वक ऐकणे, अर्थ समजून घेणे, भावना ओळखणे, माहितीचे विश्लेषण करणे आणि योग्य अभिप्राय देणे या सर्वांचा समन्वय होय. हे कौशल्य शिक्षण, अध्यापन, नेतृत्व आणि दैनंदिन जीवनातील प्रभावी संवादासाठी अत्यंत आवश्यक आहे.

प्रगत श्रवण कौशल्याचे प्रकार:

१) सक्रिय श्रवण : वक्त्याच्या बोलण्याकडे पूर्ण लक्ष देऊन, मध्येच प्रतिक्रिया देत आणि समज स्पष्ट करत ऐकणे. चर्चासत्रे व संवादासाठी उपयुक्त.

२) चिकित्सक श्रवण : ऐकलेल्या माहितीचे विश्लेषण करून तिची सत्यता, तर्कसंगती आणि विश्वासार्हता तपासणे. वादविवाद किंवा व्याख्यानांसाठी आवश्यक.

३) सहानुभूतीपूर्ण श्रवण : वक्त्याच्या भावना, अनुभव आणि मनस्थिती समजून घेण्यासाठी केलेले संवेदनशील ऐकणे. समुपदेशन व सामाजिक संवादात महत्त्वाचे.

४) निवडक श्रवण : विशिष्ट माहिती किंवा मुद्दे शोधण्यासाठी उद्देशपूर्वक ऐकणे. शैक्षणिक संदर्भात उपयुक्त.

५) आनंदात्मक) श्रवण : संगीत, कविता, कथा किंवा प्रेरणादायी भाषणांचा आनंद घेण्यासाठी केलेले ऐकणे. प्रगत श्रवण कौशल्यामुळे व्यक्ती अधिक सजग, समजूतदार आणि प्रभावी संवादक बनते. शैक्षणिक, व्यावसायिक आणि सामाजिक क्षेत्रात यश मिळविण्यासाठी या कौशल्यांचा विकास करणे अत्यंत आवश्यक आहे.

प्रगत संभाषण कौशल्य :

उच्च शिक्षणामध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रगत संभाषण कौशल्य अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. शिक्षण प्रक्रियेत विचारांची देवाणघेवाण, चर्चा, सादरीकरण, संशोधन आणि समूहकार्य यासाठी प्रभावी संवाद आवश्यक असतो. प्रगत संभाषण कौशल्यामुळे विद्यार्थी आपले विचार स्पष्टपणे मांडू शकतात, इतरांचे विचार समजून घेऊ शकतात आणि शैक्षणिक तसेच व्यावसायिक क्षेत्रात आत्मविश्वासाने संवाद साधू शकतात. त्यामुळे उच्च शिक्षणात ज्ञानाच्या आदान-प्रदानासाठी आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी प्रगत संभाषण

कौशल्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. प्रगत संभाषण कौशल्य म्हणजे प्रभावी, स्पष्ट, सुसंगत आणि परिस्थितीनुसार योग्य पद्धतीने संवाद साधण्याची क्षमता. त्याचे स्वरूप पाहता येईल.

१. स्पष्टता: विचार नेमके व समजण्यास सोपे मांडणे.

२. सुसंगतता: संभाषणात तारतम्य व सलगता ठेवणे.

३. आत्मविश्वास: ठाम व सकारात्मक आवाजात बोलणे.

४. सक्रिय ऐकणे: समोरच्याचे लक्षपूर्वक ऐकून योग्य प्रतिसाद देणे.

५. भावनात्मक समज: समोरच्याच्या भावना ओळखून संवाद साधणे.

६. देहबोलीचा योग्य वापर: हावभाव, नजरेचा संपर्क, चेहऱ्यावरील भाव यांचा प्रभावी वापर.

७. परिस्थितीनुरूपता: प्रसंग, व्यक्ती व ठिकाणानुसार भाषा व शैली बदलणे.

प्रगत संभाषण कौशल्याचे प्रकार :

उच्च शिक्षणामध्ये विद्यार्थ्यांचा बौद्धिक, सामाजिक आणि व्यावसायिक विकास घडवून आणण्यासाठी प्रगत संभाषण कौशल्य अत्यंत आवश्यक असते. ज्ञानाची देवाणघेवाण, संशोधन, चर्चासत्रे, सादरीकरण आणि समूहकार्य यामध्ये प्रभावी संवाद महत्त्वाची भूमिका बजावतो. त्यामुळे उच्च शिक्षणात प्रगत संभाषण कौशल्याचे विविध प्रकार आढळून येतात. ते पुढीलप्रमाणे विस्ताराने समजून घेता येतील.

१. औपचारिक संभाषण : औपचारिक संभाषण म्हणजे ठराविक नियम, शिष्टाचार आणि शैक्षणिक पद्धतीनुसार केलेला संवाद होय. उच्च शिक्षणात हा प्रकार सर्वाधिक वापरला जातो.

वैशिष्ट्ये : शुद्ध व प्रमाण भाषा वापरली जाते. संभाषणामध्ये स्पष्टता आणि सुसूत्रता असते. विषयानुसार मर्यादा आणि शिस्त पाळली जाते.

उदा, प्राध्यापक व विद्यार्थी यांच्यातील शैक्षणिक चर्चा, सेमिनार, परिषद व कार्यशाळा, प्रकल्प सादरीकरण शैक्षणिक मुलाखती या प्रकारामुळे विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक संवाद कौशल्य आणि शिस्तबद्धता विकसित होते.

२. अनौपचारिक संभाषण : अनौपचारिक संभाषण म्हणजे औपचारिक नियमांशिवाय साध्या व मैत्रीपूर्ण वातावरणात होणारा संवाद होय.

वैशिष्ट्ये : साधी व सोपी भाषा वापरली जाते. संवाद अधिक मोकळेपणाने होतो. विचार मांडण्यावर कोणतेही औपचारिक बंधन नसते.

उदा. विद्यार्थ्यांमधील अभ्यासविषयक चर्चा, शिक्षकांशी वैयक्तिक मार्गदर्शनासाठी संवाद, समूह अभ्यास, कॅम्पसमधील मैत्रीपूर्ण चर्चा आदी. या प्रकारामुळे विद्यार्थ्यांमध्ये सहकार्याची भावना, समज आणि आत्मीयत वाढते.

३. मौखिक संभाषण : मौखिक संभाषण म्हणजे तोंडी पद्धतीने विचार, माहिती किंवा भावना व्यक्त करण्याची प्रक्रिया होय.

वैशिष्ट्ये : आवाज, उच्चार आणि बोलण्याची शैली महत्त्वाची असते. त्वरित प्रतिसाद मिळतो. संवाद अधिक प्रभावी आणि जिवंत वाटतो.

उदा. वर्गातील प्रश्नोत्तर सत्र, भाषण किंवा व्याख्यान सादरीकरण, मुलाखती आदी. मौखिक संभाषणामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, स्पष्टता आणि प्रभावी अभिव्यक्ती विकसित होते.

४. लिखित संभाषण : लिखित संभाषण म्हणजे लेखनाच्या माध्यमातून माहिती किंवा विचार व्यक्त करणे होय. उच्च शिक्षणात याला विशेष महत्त्व आहे.

वैशिष्ट्ये : भाषा स्पष्ट, अचूक आणि व्यवस्थित असावी. विचारांची मांडणी तार्किक पद्धतीने केली जाते. लेखनात शुद्धलेखन आणि रचना महत्त्वाची असते.

उदा. प्रकल्प अहवाल, संशोधन लेख, निबंध, असाइनमेंट ई-मेल आणि अर्ज.

या प्रकारामुळे विद्यार्थ्यांमध्ये तार्किक विचार, लेखन कौशल्य आणि संशोधनात्मक दृष्टिकोन विकसित होतो.

५. समूह संभाषण : समूह संभाषण म्हणजे एकापेक्षा अधिक व्यक्तींमध्ये एकत्रितपणे होणारा संवाद होय. उच्च शिक्षणात अनेक उपक्रम समूहाच्या स्वरूपात घेतले जातात.

वैशिष्ट्ये : सर्व सदस्यांना विचार मांडण्याची संधी मिळते. सामूहिक निर्णय घेण्यास मदत होते. सहकार्य आणि नेतृत्व कौशल्य विकसित होते.

उदा. समूह चर्चा, प्रकल्पासाठी टीमवर्क, विचारमंथन, वादविवाद आदी.

समूह संभाषणामुळे विद्यार्थ्यांमध्ये सहकार्य, नेतृत्व आणि समस्या सोडवण्याची क्षमता वाढते.

६. डिजिटल किंवा ऑनलाइन संभाषण :

वैशिष्ट्ये : इंटरनेट आणि डिजिटल साधनांचा वापर दूरस्थ शिक्षण शक्य होते जागतिक स्तरावर संवाद साधता येतो

उदा. ऑनलाइन वर्ग, व्हिडिओ कॉन्फरन्स, शैक्षणिक प्लॅटफॉर्मवरील चर्चा, ई-लर्निंग माध्यमे या प्रकारामुळे विद्यार्थ्यांना नवीन तंत्रज्ञानाचा वापर आणि जागतिक संवाद कौशल्य** विकसित करण्याची संधी मिळते.

उच्च शिक्षणासाठी प्रगत संभाषण कौशल्याचे विविध प्रकार विद्यार्थ्यांच्या ज्ञानवृद्धीसाठी आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरतात. औपचारिक, अनौपचारिक, मौखिक, लिखित, समूह आणि डिजिटल संभाषण या सर्व प्रकारांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो, विचारांची देवाणघेवाण प्रभावीपणे होते आणि भविष्यातील व्यावसायिक जीवनासाठी ते सक्षम बनतात.

निष्कर्ष :

१. श्रवण, संभाषण, वाचन आणि लेखन या प्रगत भाषिक कौशल्यांचा प्रभावी विकास झाल्यास विद्यार्थी स्वतःचे विचार स्पष्ट, तर्कसंगत व प्रभावीपणे मांडू शकतात. यामुळे संशोधन, सादरीकरण, चर्चासत्रे आणि शैक्षणिक लेखन अधिक गुणवत्तापूर्ण होते.

२. प्रगत भाषिक कौशल्यांमुळे विद्यार्थ्यांना आपले विचार स्पष्ट, प्रभावी आणि आत्मविश्वासाने मांडता येतात तसेच इतरांचे विचार समजून घेणे सुलभ होते.

३. प्रगत भाषिक कौशल्यांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, संवाद क्षमता आणि विश्लेषणात्मक विचारशक्ती विकसित होते. आधुनिक तंत्रज्ञान आणि जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर प्रभावी भाषिक कौशल्ये विद्यार्थ्यांना व्यापक संधी उपलब्ध करून देतात.

४. उच्च शिक्षणात प्रगत भाषिक कौशल्यांचा विकास हा केवळ शैक्षणिक यशासाठीच नव्हे तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी आणि भविष्यातील व्यावसायिक यशासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरतो.

संदर्भ ग्रंथसूची:

१. केळकर, अशोक रा., (२०११), भाषा, समाज आणि संस्कृती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

२. मालशे, मिलिंद, (२०१०), भाषा आणि भाषाविज्ञान, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.

३. वाळिंबे, मो. रा. ,(२०१४), मराठी व्याकरण, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

४. नेमाडे, भालचंद्र, (२००५), साहित्य आणि भाषा विचार, पॉप्युलर प्रकाशन, पुणे.

५. सरदार, गंगाधर बाळकृष्ण, (१९९५), अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठिका, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

६. मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, (२०१०), मराठी विश्वकोश, मराठी विश्वकोश मंडळ, वाई.

७. जोशी, प्र. ना. (२००८), भाषाविज्ञान परिचय, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

८. देशमुख, उ. म. (२०१६), भाषा शिक्षण आणि कौशल्य विकास, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.

९. पाटील, सुभाष. (२०१७), प्रभावी संवाद कौशल्य, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed
Refereed Research Journal

March - 2026
Vol. 15 - No. S1

नवीन शैक्षणिक धोरण आणि शाश्वत विकास

डॉ. विठ्ठल शंकर केदारी

सहयोगी प्राध्यापक व प्रमुख मराठी विभाग, राजमाता जिजाऊ महाविद्यालय, किल्लेधारूर, जिल्हा – बीड.

Corresponding Author: *डॉ. विठ्ठल शंकर केदारी*

DOI - 10.5281/zenodo.19481886

सारांश:

नवीन शैक्षणिक धोरण भारतीय शिक्षण व्यवस्थेच्या शाश्वत विकासामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका निभावत आहे. सर्वसामान्य व कोणते आहे परिस्थितीतील साहेबांनी विद्यार्थ्यांचे हित समोर ठेवून नवीन शैक्षणिक धोरण तयार करण्यात आले आहे. शिक्षण पद्धतीतील लवचिकता हे नवीन शैक्षणिक धोरणाचे मुख्य वैशिष्ट्य आहे. या शैक्षणिक धोरणामध्ये कोणत्याही प्रकारचे अडथळे असणार नाहीत. या अडथळ्यांना दूर ठेवत नवीन शिक्षणाधोरण सामान्यातील सामान्य विद्यार्थ्याला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेत आहे. भारतीय ज्ञान परंपरा म्हणजे वेद, उपनिषदे, आयुर्वेद, योग, गणित, आणि कला यांसारख्या प्राचीन भारतीय ज्ञानाचा आणि विज्ञानाचा सखोल वारसा होय. ही परंपरा, अनुभव, निरीक्षण आणि तत्त्वज्ञा

मुख्य शब्द: परंपरा, अनुभव, निरीक्षण, विज्ञान, परंपरा, अनुभव, निरीक्षण

प्रस्तावना:

भारतीय ज्ञान परंपरा मराठी मधील मुख्य घटक वेद, वेदांग, पुराणे, आणि उपनिषदे यांसारखे वैदिक साहित्य, प्राचीन आयुर्वेद (वैद्यकशास्त्र), खगोलशास्त्र, गणित (भास्कराचार्य), आणि वास्तुकला (स्थापत्य) आहे. षड्दर्शन (सांख्य, योग, न्याय, वैशेषिक, मीमांसा, वेदांत) आणि भारतीय तत्त्वज्ञानातील अद्वैतवाद, कला आणि संस्कृती, संगीत, नृत्य, नाट्य आणि नृत्यशास्त्र, तसेच भाषिक परंपरा आहे. शिक्षण पद्धती प्राचीन गुरुकुल परंपरा आणि मौखिक शिक्षण प्रणाली आहे. ही ज्ञान प्रणाली मानवी जीवनातील सर्व अंगांचा (लौकिक आणि पारलौकिक) समावेश करते आणि आधुनिक काळात विद्यार्थ्यांमध्ये भारताचा समृद्ध सांस्कृतिक वारसा रुजवण्यासाठी महत्त्वाची आहे. ही ज्ञान प्रणाली मानवी जीवनातील सर्व अंगांचा (लौकिक आणि पारलौकिक) समावेश करते आणि आधुनिक काळात विद्यार्थ्यांमध्ये भारताचा समृद्ध सांस्कृतिक वारसा रुजवण्यासाठी महत्त्वाची आहे. भारतीय ज्ञान परंपरा (Indian Knowledge System - IKS) ही हजारो वर्षांपासून चालत आलेली प्राचीन भारतीय संस्कृती, तत्त्वज्ञान, विज्ञान आणि जीवनपद्धतीचा एक संमिश्र वारसा आहे. वेद, उपनिषदे, आयुर्वेद, योग, गणित (शून्य शोध) आणि खगोल शास्त्रासारख्या अनेक शाखांमध्ये ती विभागली असून, त्यात भौतिक व आध्यात्मिक ज्ञानाचा अनोखा संगम आहे. ती केवळ ग्रंथ किंवा माहिती नसून, अनुभवाधारित जीवन जगण्याची पद्धत आहे.

भारतीय ज्ञान परंपरेची मुख्य अंगे:

वेद आणि उपनिषदे भारतीय ज्ञान व्यवस्थेचा पाया, ज्यात जीवन, ईश्वर आणि विश्वाचे ज्ञान आहे. आयुर्वेद आणि जीवन विज्ञान प्राचीन आरोग्य प्रणाली आणि निसर्गाशी सुसंगत जीवनशैली. गणित आणि खगोलशास्त्र आर्यभट्ट, भास्कराचार्य यांनी विकसित केलेली दशमान पद्धती, शून्याचा शोध आणि खगोलशास्त्रीय सिद्धांत. योग आणि तत्त्वज्ञान शरीर, मन आणि बुद्धीचा समतोल साधणारी योग विद्या. शिक्षा पद्धती: तक्षशिला,

नालंदा, विक्रमशिला यांसारखी प्राचीन विद्यापीठे आणि गुरुकुल परंपरा. कला आणि साहित्य नृत्यशास्त्र, संगीत, व्याकरण आणि नाट्यशास्त्रासारख्या विविध कला. भारतीय ज्ञान परंपरेचे महत्त्व वैज्ञानिक दृष्टिकोन केवळ कर्मकांड नसून प्राचीन भारताने विज्ञानावर आधारित ज्ञान विकसित केले होते, ज्याचा संदर्भ आजही मिळतो. सर्वांगीण विकास, भौतिक समृद्धी आणि आध्यात्मिक शांती यांचा समन्वय साधते.

आधुनिक उपयुक्तता: राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP 2020) मध्ये या परंपरेला पुनरुज्जीवित करण्यावर भर देण्यात आला आहे, जेणेकरून प्राचीन ज्ञानाचा उपयोग आजच्या समस्या सोडवण्यासाठी करता येईल. ही परंपरा आपल्याला 'वसुधैव कुटुंबकम्' (जग हेच कुटुंब) ही उदार मूल्ये शिकवते. भारतीय ज्ञान प्रणाली (IKS) ही हजारो वर्षांपासून विकसित झालेली, प्रयोग आणि अनुभवावर आधारित प्राचीन भारतीय परंपरा आहे. हे ज्ञान समग्र, नैतिक, शाश्वत आणि परस्पर जोडलेले आहे. वेद, उपनिषद, आयुर्वेद, योग, गणित आणि कला यांसारख्या विविध क्षेत्रांचा समावेश असलेली ही प्रणाली केवळ आध्यात्मिक नसून वैज्ञानिक दृष्टिकोनही देते.

भारतीय ज्ञान प्रणालीची मुख्य वैशिष्ट्ये:

ज्ञान मानवी जीवनातील शारीरिक, मानसिक, बौद्धिक आणि आध्यात्मिक पैलूंचा एकत्रित विचार करते. ज्ञान केवळ पुस्तकी नसून ते प्रत्यक्ष अनुभव, निरीक्षण आणि प्रयोगांवर आधारित आहे. संपूर्ण जग एक कुटुंब आहे, ही भावना आणि निसर्ग, प्राणी, वनस्पती यांच्याशी परस्पर संबंधांवर भर दिला जातो. धर्माचरणावर (नैतिकता) भर देऊन, मानवी मूल्ये आणि नैतिक आचरणास प्राधान्य दिले जाते. पर्यावरणाशी समतोल राखून जगण्याचे, निसर्गाचा आदर करण्याचे ज्ञान यामध्ये समाविष्ट आहे. तत्त्वज्ञान, खगोलशास्त्र, गणित, वास्तुकला, कला, संगीत आणि तंत्रज्ञान यांसारख्या अनेक शाखांचा यात समावेश आहे. प्राचीन काळापासून चालत आलेली असूनही, ही प्रणाली बदलत्या काळाशी जुळवून घेणारी आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) २०२० नुसार, आधुनिक विज्ञानासोबत या पारंपारिक ज्ञानाचा अभ्यास करणे महत्त्वाचे मानले गेले आहे.मूल्य-आधारित शिक्षण: भारतीय ज्ञान प्रणाली नैतिक शिक्षण, चरित्र निर्माण आणि आंतरिक परिवर्तनावर भर देते, जे आजच्या स्पर्धेच्या युगात गरजेचे आहे. NEP २०२० मध्ये समावेश: राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (NEP 2020) नुसार, या ज्ञानाचा अभ्यासक्रमात समावेश करून भारतीय शिक्षण पद्धतीला 'स्वदेशी' आणि प्रगल्भ बनवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. थोडक्यात, भारतीय ज्ञान प्रणाली ही केवळ जुन्या परंपरा नसून, ती मानवाच्या सुखी, शांततापूर्ण आणि संतुलित जीवनासाठी उपयुक्त अशी ज्ञानशाखा आहे.

प्राचीन काळापासून सुरू झालेली भारतीय ज्ञान परंपरा सर्वश्रेष्ठ होती. यावेळी गुरूच्या घरी राहून शिष्याला शिक्षण घ्यावे लागत होते. यालाच गुरुकुल शिक्षणप्रणाली म्हणतात. ब्रह्मचर्याचे पालन करीत शिष्य अठरा विद्या सहा वेदांग, चार वेद (ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद), चार उपवेद (आयुर्वेद, धनुर्वेद, गंधर्ववेद, शिल्पवेद), मीमांसा, न्याय, पुराण आणि धर्मशास्त्र असे सर्वप्रकारचे ज्ञान प्राप्त करीत होते. उदरनिर्वाहासाठी कोणतीही अडचण येत नसे आणि प्रौढावस्थेत पोचेपर्यंत ते आपल्या विषयात पारंगत झालेले असत. अशा भारतीय शिक्षण व्यवस्थेत अध्यापन करणारे आचार्य हे त्यागी, संपूर्ण कुशल आणि आर्थिक मोहापासून दूर असणारे असत. तेव्हा शिक्षण हे व्यवसायाचे आणि कमाईचे साधन मानले जात नव्हते. शिक्षणाकडे

पवित्र ज्ञानदान व ज्ञानग्रहण म्हणून पाहिले जात होते. यासंबंधी विविध प्रकारच्या लिखाणामध्ये आलेल्या संदर्भानुसार वायुपुराणात असा उल्लेख आढळतो की, गुरुरूपी तीर्थाचे दर्शन घेतल्याने यश मिळते आणि ते सर्व तीर्थक्षेत्रांत श्रेष्ठ आहे. प्राचीन भारतीय सनातन ज्ञान परंपरा खूप समृद्ध होती आणि धर्म, अर्थ, काम, मोक्ष यांचा समावेश असलेल्या व्यक्तीचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व विकसित करणे हा तिचा उद्देश होता. जेव्हा संपूर्ण जग अज्ञानाच्या अंधारात भरकटत होते, तेव्हा संपूर्ण भारतातील ऋषीमुनी सर्वोच्च ज्ञानाचा प्रसार करीत, मानवाला पशुत्वापासून मुक्त करून त्याला उत्तम संस्कारांनी सुसज्ज करून पूर्ण संस्कारी मानव बनवीत होते. असे ऋषीमुनींचे ज्ञानदानातील पवित्र कार्य अव्याहतपणे चालत असे.

एकूणच प्राचीन भारतीय शिक्षण प्रणालीत ज्ञान, परंपरा आणि प्रथा या मानवतेला पोषक होत्या. भारतातील तक्षशिला, नालंदा, विक्रमशिला, बल्लभी, उज्जयनी, काशी आदी ठिकाणे शिक्षण आणि संशोधनाची जगप्रसिद्ध केंद्रे होती. या ठिकाणी शिक्षण घेण्यासाठी अनेक देशांतून विद्यार्थी ज्ञान संपादन करण्यासाठी येथे येत असत. वैदिक कालखंडात स्त्रीशिक्षणाच्या क्षेत्रात भारताची कामगिरी उल्लेखनीय अशी होती. मैत्रेयी, ऋतंभरा, अपाला, गार्गी आणि लोपामुद्रा इत्यादी स्त्रियांची नावे त्यांच्या बुद्धिमत्तेमुळे जगप्रसिद्ध झाली होती. बोधायन, कात्यायन, आर्यभट्ट, चरक, कणाद, वराहमिहिर, नागार्जुन, अगस्त्य, भर्गीहरी, शंकराचार्य, स्वामी विवेकानंद इत्यादी अनेक महापुरुषांनी भारतभूमीवर जन्म घेऊन भारतीय जान परंपरा समृद्ध करण्यात अतुलनीय योगदान दिले आहे. यांच्या ज्ञान ग्रहण क्षेत्रातील कार्यामुळे भारतीय ज्ञानापरंपरेसमोर आदर्श निर्माण झालेला आहे.

निष्कर्ष:

भारतीय शिक्षण व्यवस्था 2040 पर्यंत कोणत्याही सामाजिक आणि आर्थिक पार्श्वभूमीच्या विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण उपलब्ध करून देईल. 21 व्या शतकातील हे पहिले शैक्षणिक धोरण आहे ज्याचे उद्दिष्ट आपल्या देशाच्या विकासासाठी आवश्यक गरजा पूर्ण करणे आणि 21 व्या शतकातील शिक्षणाची महत्त्वाकांक्षी उद्दिष्टे साध्य करणे, तसेच भारताच्या परंपरा आणि सांस्कृतिक मूल्यांचा पाया राखणे आहे. सुरुवातीला अध्यापन मुख्यतः तोंडी असायचे होते. विद्यार्थी वर्गात शिकवले जाणारे विषय लक्षात ठेवायचे आणि मनन करायचे. नम्रता, सत्यता, शिस्त, स्वावलंबन आणि सर्वांसाठी आदर या मूल्यांचे अधिष्ठान भारतीय जान परंपरेला आहे. त्याच पायावर आधारित ही नवी शिक्षण प्रणाली आहे. मानव, प्राणी आणि निसर्ग यांच्यातील समतोल राखण्याचा प्रयत्न करणारी भारतीय परंपरा विद्यार्थ्यांना शिकविली जाणे आवश्यक आहे. वेद आणि उपनिषदांमध्ये मांडण्यात आलेल्या तत्त्वांचे अध्यापन केल्यास व्यक्ती स्वतःसोबतच स्वतःचे कुटुंब आणि समाजाप्रती कर्तव्ये पार पाडू शकेल, अशी योजना आखण्यात आली आहे. भारतीय शिक्षण व्यवस्थेत आम्हाला आग्रह बदल होऊन शाश्वत विकास होण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका राष्ट्रीय शैक्षणिक धोरण बजावत असल्याचे दिसून येते.

संदर्भग्रंथ सूची:

१. प्राचीन भारतीय ज्ञान परंपरा - डॉ. सतीलाल कन्नोर व डॉ. दीपक पाटील.
२. Indian Knowledge system ebook - विठ्ठल गोरे.

ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

March - 2026
Vol. 15 - No. S1

उच्च शिक्षणातील आव्हाने

प्रा. डॉ. युवराज देवबा भामरे

एस. पी. एच. कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, नामपूर, ता. बागलाण जि. नाशिक

***Corresponding Author:* प्रा. डॉ. युवराज देवबा भामरे**

DOI - 10.5281/zenodo.19481915

प्रस्तावना:

भारतात ब्रिटिश राजवटीपूर्वी आणि नंतरच्या काळापासून शिक्षण पद्धतीत मोठा बदल दिसून येतो. सुरुवातीला मुलांना गुरुकुलमध्ये शिक्षण दिले जात असे, ज्यामध्ये नंतर सुधारणा करून आधुनिक शिक्षण पद्धती सुरू करण्यात आली. भारत स्वतंत्र झाल्यानंतर, संविधानाने सहा मूलभूत हक्क दिले, त्यापैकी एक शिक्षणाचा अधिकार होता. त्यात ६ ते १४ वर्षे वयोगटातील प्रत्येक मुलाला मोफत शिक्षणाची परवानगी देण्यात आली होती. शिक्षण व्यवस्था प्रामुख्याने पूर्व-प्राथमिक, प्राथमिक, प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणात विभागली गेली आहे, त्यानंतर उच्च शिक्षण घेतले जाते. तथापि, या व्यवस्थेत अनेक कमतरता आणि पळवाटा आहेत, ज्यांवर अंकुश ठेवल्यास देशाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण महत्वाचे योगदानाचे काम करू शकते.

भारतीय शिक्षण व्यवस्थेत अनेक समस्या आणि आव्हाने आहेत ज्यांचे निराकरण करणे आवश्यक आहे. जेणेकरून देशाचे भविष्य असलेल्या मुलांना चांगले आणि सुधारित शिक्षण मिळेल. गेल्या काही वर्षांत, भारतीय शिक्षण व्यवस्थेत बरेच बदल झाले आहेत परंतु तरीही, अनेक त्रुटी आणि समस्या आहेत ज्या सोडवणे आवश्यक आहे. उच्च शिक्षण हे कोणत्याही राष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व बौद्धिक प्रगतीचे मुख्य साधन मानले जाते. भारतासारख्या लोकसंख्येने मोठ्या व विविधतेने समृद्ध देशात उच्च शिक्षणाकडून कुशल मनुष्यबळ निर्मिती, संशोधनविकास, सामाजिक समता आणि जागतिक स्पर्धात्मकता या अपेक्षा आहेत. तथापि, भारतीय उच्च शिक्षण व्यवस्थेला अनेक गंभीर आव्हानांचा सामना करावा लागत आहे. सदर शोधनिबंधात भारतीय शिक्षण व्यवस्थेतील समस्या आणि आव्हाने या विषयावर तपशीलवार चर्चा करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

उच्च शिक्षणातील आव्हाने सविस्तर खालीलप्रमाणे आहेत:

गुणवत्ता आणि शैक्षणिक मानक: भारतीय उच्च शिक्षणातील सर्वांत गंभीर समस्या म्हणजे गुणवत्तेचा अभाव होय. अनेक महाविद्यालये व विद्यापीठांमध्ये अध्यापन, मूल्यमापन व संशोधन यांचा दर्जा समाधानकारक असलेला दिसून येत नाही. अनेक महाविद्यालयामध्ये किंवा विद्यापीठात मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी प्रवेश असूनही दर्जेदार सुविधा, प्रयोगशाळा, ग्रंथालये व शैक्षणिक वातावरणाचा अभाव आढळतो. अनेक ठिकाणी परीक्षा पद्धती केवळ स्मरणशक्तीवर आधारित असून विश्लेषणात्मक, चिकित्सक व सर्जनशील विचारांना प्रोत्साहन दिले जात नाही. परिणामी विद्यार्थी पदवीधर होतात, परंतु रोजगारक्षम होत नाहीत. ही परिस्थिती उच्च शिक्षणाच्या उद्दिष्टांनाच बाधा आणणारी आहे. अनेक विद्यापीठांमध्ये गुणवत्तेची कमतरता असून शिक्षण हे केवळ

परीक्षेपुरते मर्यादित राहिले आहे. जागतिक क्रमवारीत भारतीय विद्यापीठांची कामगिरी सुधारण्यासाठी अद्ययावत शिक्षणाची गरज आहे.

रोजगारक्षमतेचा अभाव: पदवीधर असूनही अनेक तरुण रोजगारासाठी अयोग्य ठरतात, कारण शिक्षण आणि उद्योग क्षेत्रात आवश्यक कौशल्ये यामध्ये मोठी तफावत आहे. अनेक विद्यापीठांमधील अभ्यासक्रम सैद्धांतिक स्वरूपाचे असून त्यामध्ये व्यावहारिक प्रशिक्षण, प्रकल्पकार्य, इंटर्नशिप व कौशल्याधारित शिक्षणाचा अभाव आढळतो. आज भारतात पदवीधर बेरोजगारांची संख्या ही दिवसेंदिवस वाढत आहे. एका बाजूला उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे, तर दुसऱ्या बाजूला योग्य रोजगाराच्या संधी मर्यादित आहेत. रोजगारक्षमता नसल्यामुळे अनेक तरुण कमी पात्रतेच्या नोकऱ्या स्वीकारत आहेत. शिक्षण घेवूनही अस्थिर व अल्प उत्पन्नाच्या कामात अडकतांना दिसतात. शिक्षण घेवूनही दीर्घकाळ बेरोजगार राहिल्याने त्याचा सामाजिक व मानसिक परिणाम तरुण पिढीवर होताना दिसतो. अभ्यासक्रम कालबाह्य असल्यामुळे विद्यार्थी आधुनिक तंत्रज्ञान, नव्या संकल्पना व बाजारातील बदल यांच्याशी जुळवून घेऊ शकत नाहीत. परिणामी पदवीधर असूनही ते रोजगारासाठी अपात्र ठरतात.

संशोधन आणि नवोपक्रमाचा अभाव: उच्च शिक्षण संस्थांमध्ये मूलभूत संशोधनाला आणि नाविन्यपूर्ण कल्पनांना प्रोत्साहन देण्याची कमतरता आहे. उच्च शिक्षणाचे एक प्रमुख उद्दिष्ट म्हणजे संशोधन व नवोपक्रम. तथापि, भारतीय उच्च शिक्षण व्यवस्थेत संशोधनाला अपेक्षित महत्त्व दिले जात नाही. संशोधनासाठी आवश्यक निधी, प्रयोगशाळा, मार्गदर्शन, वेळ यांचा अभाव अनेक ठिकाणी जाणवतो. अनेक संशोधन प्रबंध केवळ पदवी किंवा बढतीसाठी औपचारिक स्वरूपाचे असतात. मौलिक संशोधन, सामाजिक समस्यांवर आधारित अभ्यास व उद्योगाभिमुख संशोधनाचे प्रमाण कमी आहे.

पायाभूत सुविधा आणि तंत्रज्ञान: ग्रामीण भागातील संस्थांमध्ये अत्याधुनिक प्रयोगशाळा, ग्रंथालये आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा अभाव आहे. महामारीनंतर डिजिटल शिक्षणाकडे कल वाढला असला तरी सर्वांना समान संधी उपलब्ध होत नाही. अनेक शासकीय महाविद्यालये व विद्यापीठांमध्ये अपुऱ्या व जीर्ण पायाभूत सुविधा आढळतात. वर्गखोल्यांची कमतरता, जुनी व अकार्यक्षम प्रयोगशाळा, अद्ययावत ग्रंथसामग्रीचा अभाव आणि विद्यार्थ्यांसाठी अपुरी वसतिगृह व्यवस्था ही सामान्य समस्या आहे. या कमतरतेमुळे अध्यापन–अध्ययन ही प्रक्रिया प्रभावित होते, प्रयोगात्मक व संशोधनाधारित शिक्षण मर्यादित राहते, विद्यार्थ्यांचा शैक्षणिक अनुभव दर्जाहीन ठरतो.

आधुनिक काळात तंत्रज्ञान हे उच्च शिक्षणाचे अविभाज्य अंग बनले आहे. स्मार्ट वर्ग, ई-लर्निंग प्लॅटफॉर्म, डिजिटल ग्रंथालये, व्हर्च्युअल प्रयोगशाळा, लर्निंग मॅनेजमेंट सिस्टीम (LMS) यांचा प्रभावी वापर अपेक्षित असतो. तथापि, अनेक संस्थांमध्ये तंत्रज्ञानाचा वापर अपुरा व असमान स्वरूपात होताना दिसतो. तांत्रिक साधनसामग्रीचा अभाव, सॉफ्टवेअरचे कालबाह्य स्वरूप व तांत्रिक देखभालीचा अभाव यामुळे डिजिटल शिक्षण प्रभावी ठरत नाही.

आर्थिक मर्यादा आणि असमानता: खाजगी संस्थांमध्ये उच्चतम शुल्क असल्यामुळे गरिबांना उच्च शिक्षण परवडत नाही, तर सरकारी संस्थांमध्ये सुविधांचा अभाव आहे. भारतातील शिक्षण व्यवस्थेच्या विकासासाठी अधिक निधीची तरतूद केली पाहिजे. गेल्या काही वर्षांत या दिशेने

अनेक फायदेशीर पावले उचलली गेली आहेत आणि जर तीच पावले पुढे चालू ठेवली तर भारत लवकरच सध्याच्या आव्हानांवर मात करू शकेल. शिक्षण शुल्क, वसतिगृह खर्च, पुस्तके, प्रवास व इतर शैक्षणिक खर्च गरीब व मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांना परवडणारे नसतात. विशेषतः खासगी महाविद्यालयांमध्ये शुल्क प्रचंड वाढलेले दिसते. शिष्यवृत्ती योजना, शैक्षणिक कर्ज व आर्थिक सहाय्य उपलब्ध असले तरी माहितीचा अभाव, गुंतागुंतीची प्रक्रिया, अपुरी रक्कम यांमुळे अनेक विद्यार्थ्यांना त्याचा लाभ मिळत नाही. परिणामी आर्थिक कारणांमुळे विद्यार्थ्यांना शिक्षण अर्धवट सोडावे लागते. अशा काही सरकारी शाळा आणि शैक्षणिक संस्था आहेत ज्या परवडणाऱ्या आहेत परंतु पायाभूत सुविधा आणि गुणवत्तेच्या बाबतीत त्यांच्यात कमतरता आहे. दुसरीकडे, अशा अनेक खाजगी शिक्षण संस्था आहेत ज्या जास्त शुल्क आकारतात आणि त्यांच्याकडे शिक्षणासाठी चांगल्या पायाभूत सुविधा आणि उपकरणे आहेत. या असमानतेवर काम केले पाहिजे आणि सरकारने सर्वांसाठी शिक्षण परवडणारे आणि सुलभ बनवले पाहिजे.

अभ्यासक्रमातील कालबाह्यपणा: बदलत्या जागतिक गरजांनुसार अभ्यासक्रमात बदल न झाल्यामुळे विद्यार्थी सध्याच्या आव्हानांना तोंड देण्यास सक्षम ठरत नाहीत. या आव्हानांवर मात करण्यासाठी बहुविद्याशाखीय शिक्षण, कौशल्य-आधारित अभ्यासक्रम आणि संशोधनाला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. उच्च शिक्षणातील कालबाह्य अभ्यासक्रम हे एक महत्त्वाचे आव्हान आहे. अनेक विद्यापीठांतील अभ्यासक्रम उद्योग, तंत्रज्ञान व समाजातील वेगाने बदलणाऱ्या गरजांशी पाहिजे तसे सुसंगत असलेले दिसून येत नाही. आजच्या विद्यार्थ्यांना कौशल्याधारित शिक्षण, तांत्रिकज्ञान,आंतरविद्याशाखीय (interdisciplinary) दृष्टिकोन यांची आवश्यकता आहे, परंतु अभ्यासक्रमात सैद्धांतिक भागावरच अधिक भर दिला जातो. त्यामुळे शिक्षण व रोजगार यामध्ये दरी निर्माण होते. अभ्यासक्रमाचे नियमित अद्ययावतीकरण न होणे ही गंभीर समस्या ठरते.

१. समग्र दृष्टिकोन: बहुतेक प्रणाली एकमेकांशी संवाद साधणारे घटक असतात. कोणताही हस्तक्षेप रिमोट सिस्टममध्ये देखील, लहरी परिणामांना चालना देऊ शकतो. व्यापक पर्यावरण आणि जागतिक ट्रेंडच्या ज्ञानावर अवलंबून राहिल्याने स्थानिक आव्हानांना पुरेसे तोंड देता येते.

२. सामाजिक न्याय: पुरेशा राहणीमानाच्या अधिकाराची ओळख पटवली पाहिजे आणि मूलभूत मानवी हक्कांची हमी दिली पाहिजे. समाजाचे योग्य सदस्य बनण्यासाठी आवश्यक असलेले ज्ञान आणि कौशल्ये मिळविण्यासाठी सर्व लोकांना समान संधी मिळाल्या पाहिजेत.

३. आंतर- आणि आंतर-पिढी समता: शाश्वत विकासाचे हितसंबंध लोकांवर केंद्रित आहेत. भविष्यातील पिढ्यांच्या स्वतःच्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेशी तडजोड न करता वर्तमान पिढ्यांच्या विकास आणि पर्यावरणीय गरजा पूर्ण केल्या पाहिजेत.

४. शाश्वत संसाधन व्यवस्थापन: शाश्वत संसाधन व्यवस्थापनात पर्यावरणाच्या वहन क्षमतेच्या मर्यादांचा विचार केला पाहिजे. जैवविविधता देखील एक नैसर्गिक संसाधन आहे आणि आम्ही त्याच्या संवर्धनाला प्राधान्य देतो.

५. एकात्मता: क्षेत्रीय धोरणे, योजना आणि कार्यक्रम विस्तृत करण्यासाठी, मूल्यांकन करण्यासाठी आणि अंमलात आणण्यासाठी, आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय बाबी आणि त्यांचे संबंध एकमेकांना परस्पर बळकटी देण्यासाठी विचारात घेतले पाहिजेत. शिवाय, स्थानिक, प्रादेशिक आणि राष्ट्रीय क्रियाकलापांचे समन्वय साधले पाहिजे.

६. स्थानिक संसाधनांचा वापर: स्थानिक पातळीवर उपलब्ध संसाधनांचा वापर करून समुदायांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. स्थानिक वैशिष्ट्ये आणि विविधता जपली पाहिजे. मानवनिर्मित पर्यावरण आणि सांस्कृतिक वारशाचे जतन आणि शाश्वत वापर ही देखील आवश्यक कामे आहेत.

७. सामाजिक जबाबदारी: शाश्वत विकास सक्षम करण्यासाठी आणि उच्च दर्जाचे जीवनमान सुनिश्चित करण्यासाठी अस्थिर उत्पादन आणि उपभोग पद्धती बदलल्या पाहिजेत. व्यवसायांची सामाजिक जबाबदारी आणि खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्रांमधील सहकार्य देखील मजबूत केले पाहिजे.

८. सार्वजनिक सहभाग: सामाजिक आणि आर्थिक जीवन आणि पर्यावरणावर परिणाम करणारी माहिती सर्वांना पुरेशी उपलब्ध असली पाहिजे. याव्यतिरिक्त, निर्णय घेण्याच्या प्रक्रियेची माहिती जनतेला उपलब्ध करून दिली पाहिजे.

९. प्रदूषकांना पैसे देण्याचे तत्व: किमतींमध्ये उपभोग आणि उत्पादनाशी संबंधित क्रियाकलापांसाठी आणि नैसर्गिक संसाधनांच्या वापराच्या खर्चासह त्यांच्या परिणामांसाठी समाजाने दिलेला वास्तविक खर्च प्रतिबिंबित केला पाहिजे. पर्यावरणाचे नुकसान करणाऱ्या किंवा प्रदूषित करणाऱ्या क्रियाकलापांमध्ये गुंतलेल्यांना मानवी आरोग्याला किंवा पर्यावरणाला झालेल्या नुकसानाची भरपाई करावी लागेल.

१०. खबरदारी आणि प्रतिबंध: जिथे जिथे गंभीर किंवा अपरिवर्तनीय नुकसान होण्याची शक्यता आहे तिथे, पर्यावरणाचे नुकसान रोखण्यासाठी किंवा मानवी आरोग्य धोक्यात आणण्यासाठी प्रभावी कारवाई करण्यास विलंब करण्यासाठी पूर्ण वैज्ञानिक खात्रीचा अभाव हे निमित्त म्हणून वापरता कामा नये. धोक्याची गंभीरता लक्षात घेऊन कारवाई केली पाहिजे.

भारतातील शाश्वत विकास:

१. भारतातील शाश्वत विकासाची संकल्पना आर्थिक वाढ, सामाजिक समावेशन आणि पर्यावरण संरक्षणाचे त्रिपक्षीय संतुलन राखण्याचे उद्दिष्ट ठेवते.

२. भविष्यातील पिढ्यांच्या गरजांवर परिणाम न करता सध्याच्या गरजा पूर्ण करणे हा दृष्टिकोन आहे.

३. भारत गरिबी दूर करण्यात, आरोग्य आणि शिक्षण सुधारण्यात आणि स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यात यशस्वी झाला आहे.

४. अक्षय ऊर्जा क्षमता खूप वेगाने वाढत आहे आणि अधिकाधिक लोकांचे सामाजिक संरक्षण वास्तव बनत आहे. परंतु, तरीही, असमानता कमी करणे, नैसर्गिक संसाधनांचे शाश्वत व्यवस्थापन आणि हवामान बदल यासारख्या आव्हानांना तोंड द्यावे लागेल.

५. २०२५ च्या एसडीजी/ शाश्वत विकास परिषद निर्देशांकानुसार, भारत १९३ देशांपैकी ९९ व्या स्थानावर आहे, जो लक्षणीय प्रगती दर्शवितो परंतु २०३० पर्यंत संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी चालू असलेल्या प्रयत्नांची आवश्यकता देखील दर्शवितो.

शाश्वत विकासासाठी धोरणे:

१. शाश्वत विकासासाठी भारताच्या दृष्टिकोनात कार्बनीकरण कमी करणे, हरित ऊर्जा विस्तार आणि समावेशक आर्थिक विकासाला प्राधान्य दिले जाते.

२. मुख्य उपक्रमांमध्ये अक्षय ऊर्जेचा वापर (सौर, वारा आणि हिरवा हायड्रोजन), ऊर्जा कार्यक्षमता सुधारणे आणि कमी-कार्बन तंत्रज्ञानाचा वापर यांचा समावेश आहे.

३. पर्यावरणपूरक उद्योगांना ग्रीन क्रेडिट प्रोग्राम (२०२५), राष्ट्रीय सौर अभियान आणि स्वच्छ तंत्रज्ञानासाठी उत्पादन-संबंधित प्रोत्साहन यासारख्या सरकारी योजनांद्वारे प्रोत्साहन दिले जाते.

४. शाश्वत शेतीला प्रोत्साहन दिले जाते ज्यामुळे पीक विविधता, पुनरुत्पादक शेती आणि जलसंवर्धन होते, ज्यामुळे ग्रामीण भाग अधिक लवचिक बनतो.

५. हरित पायाभूत सुविधा, कचरा व्यवस्थापन आणि शहरी शाश्वतता यासारख्याच प्रयत्नांचे अनुसरण केले जाते.

६. या धोरणांमुळे भारताला २०७० पर्यंत निव्वळ शून्य उद्दिष्ट गाठण्याच्या प्रयत्नात मदत होते आणि संयुक्त राष्ट्रांच्या २०३० शाश्वत विकास अजेंडाच्या अंमलबजावणीत देखील मदत होते.

पर्यावरण आणि विकास:

१. पर्यावरण आणि विकास हे जवळचे संबंधित मुद्दे आहेत. पर्यावरण संरक्षणावर पुरेसा भर दिला तरच समावेशक विकास शक्य आहे. विकास आणि पर्यावरण हे परस्परविरोधी शब्द म्हणून नव्हे तर पूरक म्हणून पाहिले पाहिजे.

२. भारत महत्त्वाकांक्षी विकासाच्या मार्गावर असल्याने पर्यावरण आणि विकास यांच्यातील वाद आता अधिक तीव्र झाला आहे, ज्यामुळे लोकांच्या हक्कांबद्दल आणि विद्यमान नैसर्गिक संसाधनांबद्दल कमी आदर आहे.

३. अनेक देशांनी राष्ट्रीय उद्योग विकसित करून त्यांच्या अर्थव्यवस्थांना पुढे नेले आहे.तथापि, अशी चिंता आहे की आर्थिक उद्दिष्टे परिसंस्थांच्या खर्चावर साध्य केली जात आहेत. हे मान्य आहे की काही देश पर्यावरण संरक्षणापेक्षा आर्थिक विकासाला प्राधान्य देऊ शकतात, ज्यामुळे स्थानिक पर्यावरणाचा नाश होऊ शकतो.

४. या गरजू देशांकडे पुरेसे आर्थिक आणि मानवी संसाधने, प्रगत तंत्रज्ञान आणि अनुभव नसल्याने, त्यांना त्यांचे राहणीमान राखण्यासाठी नैसर्गिक संसाधनांवर अवलंबून राहावे लागते. शिवाय,

दारिद्र्यग्रस्त भागातील लोकांकडे परिसंस्था जपण्यासाठी ज्ञान असण्याची शक्यता कमी आहे.

५. परिणामी, स्थानिक कच्च्या मालाचा अनियंत्रित आणि बेपर्वा वापर होऊ शकतो, ज्यामुळे नैसर्गिक संसाधनांवर ताण येऊ शकतो. या दृष्टिकोनातून, आर्थिक विकास आणि पर्यावरण संरक्षण परस्परविरोधी असू शकतात.

६. १९८० च्या दशकापर्यंत आर्थिक विकास हा विकासाच्या प्रयत्नांचा केंद्रबिंदू मानला जात होता. हळूहळू, विकासाचा अर्थ बहुआयामी संकल्पना म्हणून लावला जाऊ लागला ज्यामध्ये भौतिक, सामाजिक, पर्यावरणीय, राजकीय आणि सांस्कृतिक घटकांचा समावेश असावा.

७. तथापि, विकास नेहमीच पर्यावरणाच्या किंमतीवरच होईल असे नाही. अनेक विकसित देशांनी पर्यावरणीय घटकांचा विचार करताना केलेल्या प्रगतीची परिपूर्ण उदाहरणे मांडली आहेत. उदाहरणार्थ, प्रदूषण नियंत्रण आणि निर्मूलनासाठी अमेरिकन उत्पादकांकडून होणारा अनुपालन खर्च जगात सर्वाधिक आहे.

८. पर्यावरण, अन्न सुरक्षा आणि विकासाच्या इतर पैलूंमध्ये सामान्यतः अनेक तडजोड असतात. काही तडजोड टाळता येण्याजोग्या असतात, तर काही नाहीत.

९. ब्रुंडलँड कमिशनने मूलभूत मुद्द्यांचे स्पष्टीकरण दिले आणि त्यांना महत्त्व दिले. त्यांच्या अहवालात अन्न आणि कृषी उत्पादन तसेच सध्याच्या पिढीसाठी उत्पन्न वाढवण्याच्या अल्पकालीन अत्यावश्यकतेला भविष्यातील पिढ्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी नैसर्गिक संसाधनांचे जतन करण्यासाठी दीर्घकालीन, परंतु जवळजवळ अस्पष्ट गरजेशी जुळवून घेण्याच्या कठीण कामावर भर देण्यात आला (वर्ल्ड कमिशन ऑन एन्व्हायर्नमेंट अँड डेव्हलपमेंट, १९८७).

अशाप्रकारे, दीर्घकालीन उद्दिष्ट शेती आणि संपूर्ण अर्थव्यवस्थेचा शाश्वत विकास असू शकते, परंतु त्यात समाविष्ट असलेले मार्ग किंवा प्रक्रिया अल्प ते मध्यम कालावधीत या उद्दिष्टाच्या पर्यावरणीय आवश्यकतांचे उल्लंघन करू शकतात. म्हणूनच, तडजोड कमी करणे अत्यंत महत्वाचे आहे.

निष्कर्ष:

आजच्या समाजात, पृथ्वीवरील संसाधनांवर आपले अवलंबित्व आहे. हे आपणास कळते परंतु, आपण अनेकदा अर्थव्यवस्था आणि पर्यावरण यांच्यातील खोल / परस्पर संबंधाकडे दुर्लक्ष करतो. या संसाधनांच्या मर्यादित स्वरूपामुळे अमर्यादित आर्थिक वाढ टिकाऊ नाही हे लक्षात आले आहे.आणि त्याकडे दुर्लक्ष केल्याने भविष्य धोक्यात येत आहे. भौतिक संपत्तीचा पाठलाग केल्याने पर्यावरणाचे नुकसान झाले आहे, परंतु सर्वच देश अल्पावधीत अक्षय ऊर्जेचा समतोल साधू शकतात. हवामान बदल कमी करण्यासाठी, शाश्वत विकासासाठी आणि शाश्वत तंत्रज्ञानासाठी अक्षय ऊर्जेचा वापर वाढविण्याबरोबरच, जागतिक युती देखील अत्यंत महत्त्वाची आहे. शेवटी, अधिक शाश्वत जग निर्माण करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे.

संदर्भ सूची:

१. प्रा. बर्वे सिद्धार्थ भागाजी, शाश्वत विकास आणि भारतीय शेती पुढील आव्हाने.

२. कुमार, सुरेंदर आणि मधु खन्ना (२०२३), " हवामान बदलाच्या परिणामांमध्ये आणि अनुकूलनात

वितरणात्मक विषमता: भारतीय शेतीतून पुरावा ", कृषी अर्थशास्त्र, ५४(२): १४७-१६०.

३. स्निग्धा त्रिपाठी शाश्वत विकास आणि पर्यावरण

४. डॉ. एस.व्ही. ढमढेरे- (२०२६) "शाश्वत विकास आणि भारत", डायमंड प्रकाशन, पुणे.

५. श्री निवास वडगबाळकर – (२०२१) शाश्वत विकास, मराठी विश्वकोश,

विविध वेबसाईट:

१. https:// www.maxwoman.in/news/

२. https://mpscdaily.wordpress.com/2015/09/26/%

३. https://circularecology.com/sustainability-and-sustainable-development.html

४. https://en.wikipedia.org/wiki/Sustainabledevelopment

५. https://www.iisd.org/-and-goals/sustainable-development

ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

March - 2026
Vol. 15 - No. S1

शाश्वत विकास आणि उच्च शिक्षणाची भूमिका

प्रा. योगिता रावसाहेब राहाणे

सह. प्रा लोकनेते बाळासाहेब थोरात कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय तळेगाव दिघे.,ता.संगमनेर जि.अहिल्यानगर

***Corresponding Author:* प्रा. योगिता रावसाहेब राहाणे**

DOI - 10.5281/zenodo.19482045

सारांश:

शाश्वत विकास म्हणजे सध्याच्या पिढीच्या गरजा पूर्ण करताना भविष्यातील पिढ्यांच्या गरजांवर परिणाम न होऊ देता आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय समतोल राखणे. संयुक्त राष्ट्रांच्या United Nations यांनी मांडलेली Sustainable Development Goals (SDGs) ही याच संकल्पनेवर आधारित आहेत.उच्च शिक्षण संस्थांची या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका आहे कारण त्या ज्ञाननिर्मिती, संशोधन, नवकल्पना आणि समाजजागृतीचे केंद्र असतात. उच्च शिक्षणाची मुख्य भूमिका ज्ञान आणि जागरूकता निर्माण करणे विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धन, सामाजिक न्याय आणि आर्थिक समता यांविषयी शिक्षण देऊन जबाबदार नागरिक घडवणे.संशोधन व हवामान बदल, प्रदूषण, ऊर्जा बचत, जैवविविधता यांसारख्या समस्यांवर उपाय शोधण्यासाठी संशोधन करणे.कौशल्य विकासहरित तंत्रज्ञान, नवीकरणीय ऊर्जा, शाश्वत शेती यांसाठी आवश्यक कौशल्ये विकसित करणे.धोरणनिर्मितीत योगदानतज्ञांचे मार्गदर्शन आणि अभ्यासांच्या आधारे शासनाला धोरणे तयार करण्यास मदत करणे.समाजाशी सहकार्य स्थानिक समुदाय, उद्योग आणि स्वयंसेवी संस्थांसोबत काम करून शाश्वत उपक्रम राबवणे. शाश्वत विकास (Sustainable Development)

मुख्य शब्द: त्रिसूत्री विकास, उच्च शिक्षण, ज्ञाननिर्मिती, संशोधन व नवोपक्रम, हरित तंत्रज्ञान, नवीकरणीय ऊर्जा, पर्यावरण संरक्षण, सामाजिक न्याय, लिंगसमता, कौशल्य विकास, हरित अर्थव्यवस्था, मूल्याधिष्ठित शिक्षण, बहुविषयक शिक्षण, डिजिटल शिक्षण, समुदाय सहभाग, धोरणनिर्मिती, समावेशकता, गुणवत्ता व मानांकन, शाश्वत कॅम्पस.

प्रस्तावना:

२१व्या शतकात विकासाच्या पारंपरिक संकल्पनेत मोठा बदल झाला आहे. केवळ आर्थिक वाढ म्हणजेच विकास असे न मानता सामाजिक समता, पर्यावरण संरक्षण आणि मानवी कल्याण यांचा समन्वय साधणारा विकास हा अधिक महत्त्वाचा मानला जातो. या व्यापक दृष्टीकोनातून शाश्वत विकास ही संकल्पना उदयास आली. 1987 मध्ये प्रकाशित झालेल्या Our Common Future या अहवालात शाश्वत विकासाची व्याख्या स्पष्ट करण्यात आली आणि 2015 मध्ये United Nations यांनी जाहीर केलेल्या Sustainable Development Goals (SDGs) द्वारे जागतिक स्तरावर 2030 पर्यंत साध्य करावयाची उद्दिष्टे निश्चित करण्यात आली.शाश्वत विकास ही केवळ पर्यावरणीय संकल्पना नसून आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक पैलूंना समाविष्ट करणारी सर्वसमावेशक प्रक्रिया आहे. भविष्यातील पिढ्यांच्या गरजा बाधित न करता वर्तमान पिढीच्या गरजा पूर्ण करणे हा या संकल्पनेचा मूलभूत आधार आहे. त्यामुळे विकास आणि संरक्षण यांचा संतुलित समन्वय साधणे अत्यावश्यक ठरते.याच पार्श्वभूमीवर उच्च शिक्षणाची संकल्पना अत्यंत महत्त्वाची ठरते. उच्च शिक्षण म्हणजे माध्यमिक शिक्षणानंतर दिले जाणारे सखोल, विशेषीकृत आणि संशोधनाधारित शिक्षण. हे केवळ ज्ञानप्रदानापुरते मर्यादित नसून व्यक्तिमत्त्व विकास, मूल्यसंवर्धन, वैज्ञानिक दृष्टीकोन, कौशल्यविकास आणि

सामाजिक जबाबदारी निर्माण करणारी प्रक्रिया आहे. उच्च शिक्षण संस्था समाजातील बौद्धिक नेतृत्व तयार करतात आणि राष्ट्रनिर्मितीत मोलाची भूमिका बजावतात.शाश्वत विकास साध्य करण्यासाठी उच्च शिक्षणाची भूमिका बहुआयामी आहे. अभ्यासक्रमामध्ये पर्यावरण शिक्षण, सामाजिक न्याय, लिंगसमता, हरित तंत्रज्ञान यांचा समावेश करून विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण केली जाते. संशोधन व नवोपक्रमाद्वारे हवामान बदल, ऊर्जा तुटवडा, जलसंकट, जैवविविधता संरक्षण यांसारख्या समस्यांवर उपाय शोधले जातात. कौशल्याधारित शिक्षणाद्वारे हरित अर्थव्यवस्थेसाठी आवश्यक मनुष्यबळ तयार केले जाते.भारतातील उच्च शिक्षण व्यवस्था जगातील सर्वात मोठ्या व्यवस्थांपैकी एक आहे. विस्ताराच्या दृष्टीने मोठी प्रगती झाली असली तरी गुणवत्ता, समावेशकता आणि संशोधन या बाबींमध्ये अजूनही सुधारणा आवश्यक आहे. National Education Policy 2020 (NEP 2020) ने बहुविषयक शिक्षण, संशोधन प्रोत्साहन, डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर आणि कौशल्यविकासावर भर देऊन शाश्वत विकासाशी सुसंगत दिशा दिली आहे. उच्च शिक्षणासमोरील आव्हानेही तितकीच गंभीर आहेत— गुणवत्तेतील असमानता, संशोधनासाठी अपुरा निधी, डिजिटल दरी, रोजगारकौशल्यातील तफावत आणि मेंदूपलायन. या समस्यांवर मात करण्यासाठी ठोस उपाययोजना, प्रभावी धोरणे, उद्योग-शिक्षण सहकार्य, हरित कॅम्पस उपक्रम आणि सामाजिक सहभाग आवश्यक आहे.

अशा प्रकारे, शाश्वत विकास आणि उच्च शिक्षण हे एकमेकांशी घट्ट जोडलेले घटक आहेत. दीर्घकालीन, संतुलित आणि सर्वसमावेशक विकास साध्य करण्यासाठी उच्च शिक्षण संस्थांनी ज्ञाननिर्मिती, संशोधन, नवोपक्रम आणि मूल्याधिष्ठित शिक्षणाच्या माध्यमातून सक्रिय योगदान देणे ही काळाची गरज आहे.

शाश्वत विकासाची संकल्पना:

1) शाश्वत विकास म्हणजे काय: शाश्वत विकास म्हणजे सध्याच्या पिढीच्या गरजा पूर्ण करताना भविष्यातील पिढ्यांच्या गरजांवर परिणाम न होऊ देता विकास करणे. ही व्याख्या 1987 मधील Our Common Future (ब्रुंटलँड अहवाल) मध्ये मांडण्यात आली. हा अहवाल World Commission on Environment and Development यांनी सादर केला होता.

2) शाश्वत विकासाचे तीन मूलभूत स्तंभ: शाश्वत विकास तीन परस्परपूरक घटकांवर आधारित आहे: आर्थिक विकास, दीर्घकालीन आर्थिक वाढ, रोजगारनिर्मिती आणि गरिबी निर्मूलन, परंतु संसाधनांचा अतिरेक टाळून.

सामाजिक विकास, शिक्षण, आरोग्य, लिंगसमता, सामाजिक न्याय, मानवी हक्क यांचा समावेश, समाजातील सर्व घटकांना समान संधी देणे,पर्यावरणीय संरक्षण ,नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन, प्रदूषण नियंत्रण, जैवविविधतेचे रक्षण आणि हवामान बदलावर उपाय.

हे तीन स्तंभ परस्परावलंबी आहेत; एका घटकाचा अतिरेक इतरांवर परिणाम करतो.

3) शाश्वत विकासाची ऐतिहासिक पार्श्वभूमी: १९७२: पर्यावरण विषयक पहिली जागतिक परिषद, १९८७: शाश्वत विकासाची औपचारिक व्याख्या,१९९२: स्वीकृत, २०१५: United Nations यांनी १७ Sustainable Development Goals (SDGs) जाहीर केले.

4) शाश्वत विकासाची तत्त्वे: आंतरपिढी समता- भविष्यातील पिढ्यांच्या हक्कांचे संरक्षण, संसाधनांचा

जबाबदारीने वापर- नूतनीकरणीय साधनांचा अधिक वापर, सहभागी निर्णयप्रक्रिया - लोकसहभाग व पारदर्शकता, पर्यावरणीय न्याय -पर्यावरणीय हानीचा भार सर्वांवर समान न पडणे.

5) शाश्वत विकासाची उद्दिष्टे: Sustainable Development Goals अंतर्गत 17 उद्दिष्टांमध्ये गरिबी निर्मूलन, दर्जेदार शिक्षण, स्वच्छ पाणी, परवडणारी व स्वच्छ ऊर्जा, हवामान कृती, लिंगसमता इत्यादींचा समावेश आहे. ही उद्दिष्टे 2030 पर्यंत साध्य करण्याचे लक्ष्य आहे.

6) भारतातील शाश्वत विकास: भारतामध्ये शाश्वत विकासासाठी विविध उपक्रम राबवले जातात, जसे की: स्वच्छ भारत अभियान, राष्ट्रीय सौर मिशन, जल जीवन मिशन. भारताने SDGs साध्य करण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर धोरणे आखली असून राज्य आणि स्थानिक पातळीवरही कार्यक्रम राबवले जात आहेत.

उच्च शिक्षणाची संकल्पना:

1) उच्च शिक्षण म्हणजे काय?: उच्च शिक्षण म्हणजे माध्यमिक शिक्षणानंतर दिले जाणारे औपचारिक, संरचित आणि विशिष्ट ज्ञानाधारित शिक्षण. यामध्ये पदवी, पदव्युत्तर, संशोधन (Ph.D.), व्यावसायिक व तांत्रिक अभ्यासक्रमांचा समावेश होतो. उच्च शिक्षणाचे उद्दिष्ट केवळ नोकरीसाठी पात्रता देणे नसून व्यक्तिमत्त्व विकास, बौद्धिक प्रगल्भता, संशोधनवृत्ती आणि सामाजिक जबाबदारी निर्माण करणे हे आहे.

2) उच्च शिक्षणाची उद्दिष्टे: ज्ञाननिर्मिती व प्रसार – नवीन ज्ञान निर्माण करणे आणि समाजापर्यंत पोहोचवणे, संशोधन व नवकल्पना – विज्ञान, तंत्रज्ञान, समाजशास्त्र, मानविकी या क्षेत्रांत संशोधन, कौशल्य विकास – उद्योग, सेवा, प्रशासन यांसाठी आवश्यक कौशल्ये विकसित करणे, राष्ट्रीय विकास – अर्थव्यवस्था, सामाजिक प्रगती आणि लोकशाही मूल्ये मजबूत करणे, मूल्य शिक्षण – नैतिकता, समता, सहिष्णुता आणि जबाबदारीची जाणीव निर्माण करणे.

3) उच्च शिक्षणाची वैशिष्ट्ये: विशिष्ट विषयात सखोल अभ्यास, संशोधनाभिमुखता - नवीन शोध आणि विश्लेषण, स्वायत्तता – विचारस्वातंत्र्य आणि अकादमिक स्वातंत्र्य. व्यावसायिकता – रोजगाराभिमुख अभ्यासक्रम,आंतरराष्ट्रीयीकरण – जागतिक स्तरावरील सहकार्य व देवाणघेवाण.

4) भारतातील उच्च शिक्षण व्यवस्था: भारतामध्ये उच्च शिक्षण व्यवस्थेचे नियमन व विकास विविध संस्थांमार्फत केले जाते, University Grants Commission (UGC) – विद्यापीठांचे समन्वय व अनुदान, All India Council for Technical Education (AICTE) – तांत्रिक शिक्षणाचे नियमन, National Assessment and Accreditation Council (NAAC) – गुणवत्ता मूल्यांकन,

National Education Policy 2020 (NEP 2020) – शिक्षण क्षेत्रातील सुधारणा व बहुविषयक शिक्षणावर भर.

5) उच्च शिक्षणाचे प्रकार: सामान्य शिक्षण (General Education) – कला, वाणिज्य, विज्ञान, व्यावसायिक शिक्षण (Professional Education) – अभियांत्रिकी, वैद्यकीय, कायदा, व्यवस्थापन. तांत्रिक शिक्षण (Technical Education) – तंत्रज्ञान व कौशल्याधारित अभ्यासक्रम. मुक्त व दूरस्थ शिक्षण (Open & Distance Learning) – ऑनलाइन व पत्रव्यवहाराद्वारे शिक्षण.

6) उच्च शिक्षणाचे महत्त्व: मानवी संपत्तीचा विकास (Human Capital Development), आर्थिक स्पर्धात्मकता वाढवणे, सामाजिक परिवर्तन व समता

प्रस्थापित करणे, लोकशाही मूल्यांचे संवर्धन, संशोधनाद्वारे समस्या निराकरण.

7) आव्हाने: गुणवत्तेतील असमानता, संशोधनासाठी अपुरी साधने, बेरोजगारी व कौशल्यांतील तफावत, डिजिटल दरी.

शाश्वत विकासात उच्च शिक्षणाची भूमिका:

शाश्वत विकास (Sustainable Development) म्हणजे आर्थिक प्रगती, सामाजिक समता आणि पर्यावरण संरक्षण यांचा समतोल राखून दीर्घकालीन विकास साधणे. 2015 मध्ये United Nations ने जाहीर केलेल्या Sustainable Development Goals (SDGs) अंतर्गत 2030 पर्यंत 17 उद्दिष्टे पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी उच्च शिक्षण अत्यंत महत्त्वाचे साधन मानले जाते.

1) ज्ञाननिर्मिती आणि जागरूकता: उच्च शिक्षण संस्था विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण, सामाजिक न्याय, लिंगसमता, मानवी हक्क आणि जबाबदार नागरिकत्व यांविषयी जागरूकता निर्माण करतात. अभ्यासक्रमात शाश्वत विकासाशी संबंधित विषयांचा समावेश करून विद्यार्थी संवेदनशील व सजग नागरिक बनतात.

2) संशोधन व नवोपक्रम (Research & Innovation): हवामान बदल, जलसंकट, ऊर्जा तुटवडा, जैवविविधता यांसारख्या समस्यांवर उपाय शोधणे, हरित तंत्रज्ञान, नवीकरणीय ऊर्जा, कचरा व्यवस्थापन यावर संशोधन करणे, उद्योग व शासनाला तांत्रिक सल्ला देणे. संशोधनाच्या माध्यमातून शाश्वत विकासासाठी ठोस उपाययोजना विकसित होतात.

3) कौशल्य विकास आणि मानव संसाधन निर्मिती: उच्च शिक्षण संस्था विद्यार्थ्यांना हरित अर्थव्यवस्था (Green Economy), शाश्वत शेती, स्वच्छ ऊर्जा, पर्यावरण व्यवस्थापन यांसाठी आवश्यक कौशल्ये प्रदान करतात. यामुळे रोजगारनिर्मिती वाढते आणि देशाची आर्थिक प्रगती साध्य होते.

4) धोरणनिर्मितीत योगदान: विद्यापीठांतील तज्ञ व संशोधक शासनाला शाश्वत धोरणे तयार करण्यासाठी मार्गदर्शन करतात. अभ्यास, सर्वेक्षण आणि अहवालांच्या आधारे प्रभावी निर्णयप्रक्रिया शक्य होते.

5) सामाजिक परिवर्तन आणि समुदाय सहभाग: उच्च शिक्षण संस्था ग्रामीण व शहरी भागात विविध शाश्वत उपक्रम राबवतात—जसे की जलसंवर्धन, स्वच्छता मोहिमा, पर्यावरण जागरूकता कार्यक्रम. यामुळे समाजात सकारात्मक बदल घडतो.

6) बहुविषयक शिक्षण (Multidisciplinary Approach): National Education Policy 2020 (NEP 2020) नुसार बहुविषयक शिक्षणावर भर देण्यात आला आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, समाजशास्त्र आणि मानविकी यांचा समन्वय करून शाश्वत विकासाच्या गुंतागुंतीच्या समस्यांचे निराकरण करता येते.

7) जागतिक सहकार्य: विद्यापीठे आंतरराष्ट्रीय पातळीवर सहकार्य करून संयुक्त संशोधन, विद्यार्थी देवाणघेवाण आणि जागतिक प्रकल्प राबवतात. यामुळे SDGs साध्य करण्यासाठी जागतिक स्तरावर समन्वय वाढतो.

भारतातील उच्च शिक्षण व शाश्वत विकास:

भारतामध्ये उच्च शिक्षण आणि शाश्वत विकास हे परस्परपूरक घटक आहेत. देशाच्या आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय प्रगतीसाठी उच्च शिक्षण संस्था (विद्यापीठे, महाविद्यालये, तांत्रिक संस्था) महत्त्वाची भूमिका बजावतात. 2015 मध्ये United Nations यांनी

जाहीर केलेल्या Sustainable Development Goals (SDGs) च्या पार्श्वभूमीवर भारतानेही 2030 पर्यंत शाश्वत विकास साध्य करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

1) भारतातील उच्च शिक्षणाची रचना:

भारताची उच्च शिक्षण व्यवस्था जगातील सर्वात मोठ्या व्यवस्थांपैकी एक आहे. तिचे नियमन आणि गुणवत्ता नियंत्रण पुढील संस्थांमार्फत केले जाते:University Grants Commission (UGC) – विद्यापीठांना अनुदान व मार्गदर्शन,All India Council for Technical Education (AICTE) – तांत्रिक शिक्षणाचे नियमन,National Assessment and Accreditation Council (NAAC) – गुणवत्ता मूल्यांकन,,National Education Policy 2020 (NEP 2020) – बहुविषयक व कौशल्याधारित शिक्षणावर भर, NEP 2020 नुसार शिक्षणात लवचिकता, संशोधनाला प्रोत्साहन, डिजिटल शिक्षण आणि मूल्याधिष्ठित शिक्षण यावर विशेष भर देण्यात आला आहे, जे शाश्वत विकासासाठी आवश्यक आहे.

2) शाश्वत विकासासाठी उच्च शिक्षणाची भूमिका:

(अ) शिक्षण आणि जागरूकता: उच्च शिक्षण संस्था विद्यार्थ्यांना पर्यावरण संरक्षण, सामाजिक समता, लिंगसमानता, हवामान बदल याविषयी जागरूक करतात. अभ्यासक्रमात SDGs संबंधित विषयांचा समावेश केला जात आहे.

(आ) संशोधन आणि नवोपक्रम: भारतामध्ये IITs, IIMs, केंद्रीय विद्यापीठे व संशोधन संस्था स्वच्छ ऊर्जा, जलव्यवस्थापन, जैवविविधता, शाश्वत शेती यावर संशोधन करत आहेत. यामुळे देशातील पर्यावरणीय आणि सामाजिक समस्यांवर उपाय सापडतात.

(इ) हरित कॅम्पस उपक्रम: अनेक विद्यापीठे सौरऊर्जा वापर, पावसाचे पाणी साठवण, कचरा व्यवस्थापन, प्लास्टिकमुक्त कॅम्पस यांसारखे उपक्रम राबवत आहेत.

(ई) कौशल्य विकास: शाश्वत अर्थव्यवस्थेसाठी आवश्यक असलेली हरित तंत्रज्ञान, नवीकरणीय ऊर्जा, पर्यावरण व्यवस्थापन यांसारखी कौशल्ये विद्यार्थ्यांना दिली जातात.

(उ) समाजाशी सहकार्य: विद्यापीठे ग्रामीण विकास, स्वच्छता अभियान, जलसंवर्धन, महिला सक्षमीकरण यांसाठी स्थानिक समुदायांसोबत काम करतात.

3) भारतातील प्रमुख शाश्वत विकास उपक्रम: भारत सरकारने शाश्वत विकासासाठी विविध योजना राबवल्या आहेत: स्वच्छ भारत अभियान, जल जीवन मिशन, राष्ट्रीय सौर मिशन, डिजिटल इंडिया. या योजनांमध्ये उच्च शिक्षण संस्थांचा संशोधन व अंमलबजावणीत सहभाग असतो.

4) आव्हाने: ग्रामीण-शहरी शिक्षणातील तफावत, संशोधनासाठी अपुरा निधी, कौशल्य व रोजगारातील दरी, पर्यावरणीय समस्यांची वाढ.

उच्च शिक्षणासमोरील आव्हाने

उच्च शिक्षण ही राष्ट्रनिर्मितीची कणा मानली जाते; परंतु बदलत्या सामाजिक-आर्थिक, तांत्रिक आणि जागतिक परिस्थितीत या क्षेत्रास अनेक गंभीर आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. विशेषतः भारतात विस्तार, गुणवत्ता आणि समता यांचा समतोल राखणे ही मोठी कसोटी ठरते.

1) प्रवेश आणि समावेशकता (Access & Equity): ग्रामीण-शहरी दरीमुळे सर्वांना समान संधी उपलब्ध होत नाही, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, महिलावर्ग, आदिवासी व मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा प्रवेश अजूनही मर्यादित आहे.

दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सुविधा सर्व संस्थांमध्ये उपलब्ध नाहीत. परिणाम: सामाजिक असमानता कायम राहते आणि उच्च शिक्षण सर्वसमावेशक होत नाही.

2) गुणवत्तेतील असमानता (Quality Issues): उच्च शिक्षण संस्थांची संख्या वाढली असली तरी गुणवत्तेत मोठी तफावत दिसते. गुणवत्ता तपासणीसाठी National Assessment and Accreditation Council (NAAC) कार्यरत असले तरी सर्व संस्थांमध्ये समान दर्जा राखणे कठीण ठरते. अभ्यासक्रम अद्ययावत नसणे,प्रात्यक्षिक व संशोधन सुविधांचा अभाव,गुणवत्तापूर्ण अध्यापकांची कमतरता.

3) संशोधन व नवोपक्रमातील मर्यादा: संशोधनासाठी अपुरा निधी, उद्योग-शिक्षण क्षेत्रातील कमी समन्वय, जागतिक दर्जाच्या संशोधनाची कमी संख्या. भारतामध्ये संशोधनाला चालना देण्यासाठी विविध धोरणे आखली जात आहेत; तरीही जागतिक क्रमवारीत भारतीय विद्यापीठांची संख्या मर्यादित आहे.

4) अभ्यासक्रम आणि कौशल्यांतील तफावत:उद्योगाच्या गरजा आणि विद्यापीठातील शिक्षण यामध्ये अंतर दिसते. रोजगाराभिमुख कौशल्यांचा अभाव,तांत्रिक व डिजिटल कौशल्यांमध्ये कमी प्राविण्य,उद्योजकतेला अपुरी प्रोत्साहन National Education Policy 2020 (NEP 2020) मध्ये बहुविषयक आणि कौशल्याधारित शिक्षणावर भर देऊन ही दरी कमी करण्याचा प्रयत्न आहे.

5) डिजिटल दरी (Digital Divide): कोविड-19 नंतर ऑनलाइन शिक्षणाचा विस्तार झाला, ग्रामीण भागात इंटरनेट सुविधा अपुरी, डिजिटल साधनांची कमतरता तांत्रिक प्रशिक्षणाचा अभाव, यामुळे शिक्षणात असमानता वाढण्याचा धोका निर्माण झाला.

6) आर्थिक व प्रशासकीय अडचणी: शासकीय अनुदानात घट, खाजगी संस्थांची वाढ व शुल्कवाढ, प्रशासकीय विलंब व धोरणात्मक अंमलबजावणीत अडथळे यामुळे उच्च शिक्षणाचा खर्च वाढतो आणि सर्वसामान्य विद्यार्थ्यांसाठी तो परवडणारा राहत नाही.

7) मेंदूपलायन (Brain Drain): गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि संशोधनाच्या संधींसाठी विद्यार्थी व संशोधक परदेशात जातात. त्यामुळे देशांतर्गत बौद्धिक संसाधनांची घट होते.

8) मूल्याधिष्ठित शिक्षणाचा अभाव: स्पर्धात्मक वातावरणात नैतिकता, सामाजिक जबाबदारी आणि नागरिकत्व मूल्यांकडे तुलनेने कमी लक्ष दिले जाते.

उपाययोजना:

शाश्वत विकास साध्य करण्यासाठी उच्च शिक्षण संस्था (विद्यापीठे, महाविद्यालये, संशोधन केंद्रे) केवळ ज्ञानदाते नसून परिवर्तनकर्ते म्हणून कार्य करणे आवश्यक आहे. United Nations यांनी जाहीर केलेल्या Sustainable Development Goals (SDGs) साध्य करण्यासाठी पुढील ठोस उपाययोजना राबवणे गरजेचे आहे.

1) अभ्यासक्रमामध्ये शाश्वत विकासाचा समावेश: सर्व शाखांमध्ये (कला, विज्ञान, वाणिज्य, अभियांत्रिकी) शाश्वत विकासाशी संबंधित विषयांचा समावेश करणे. पर्यावरण शिक्षण, हवामान बदल, जैवविविधता, सामाजिक न्याय यावर अनिवार्य अभ्यासक्रम ठेवणे,प्रकल्पाधारित (Project-based) आणि अनुभवाधारित (Experiential) शिक्षणावर भर देणे.

परिणाम: विद्यार्थ्यांमध्ये शाश्वत जीवनशैली व जबाबदार नागरिकत्व विकसित होते.

2) संशोधन व नवोपक्रमाला चालना: हरित तंत्रज्ञान, नवीकरणीय ऊर्जा, जलव्यवस्थापन, कचरा पुनर्वापर यावर संशोधन केंद्रे स्थापन करणे, उद्योग-विद्यापीठ सहकार्य वाढवणे, संशोधनासाठी पुरेसा निधी आणि प्रोत्साहन योजना उपलब्ध करणे, National Education Policy 2020 (NEP 2020) मध्ये संशोधनाला प्राधान्य देण्याची स्पष्ट तरतूद आहे.

3) हरित कॅम्पस उपक्रम (Green Campus Initiatives): सौरऊर्जा व इतर नवीकरणीय ऊर्जेचा वापर, पावसाचे पाणी साठवण (Rainwater Harvesting), कचरा व्यवस्थापन व प्लास्टिकमुक्त परिसर, वृक्षारोपण व जैवविविधतेचे संवर्धन. उद्दिष्ट: संस्था स्वतःच शाश्वततेचे आदर्श मॉडेल बनणे.

4) कौशल्य विकास आणि हरित रोजगार: हरित अर्थव्यवस्थेसाठी (Green Economy) आवश्यक कौशल्ये विकसित करणे, उद्योजकता विकास कार्यक्रम राबवणे, विद्यार्थ्यांना स्टार्टअप्स आणि सामाजिक उपक्रमांसाठी मार्गदर्शन करणे.

परिणाम: शाश्वत उद्योग आणि रोजगारनिर्मिती वाढते.

5) समाजाशी सहभाग (Community Engagement): ग्रामीण भागात जलसंवर्धन, स्वच्छता, ऊर्जा बचत मोहिमा राबवणे, स्वयंसेवी संस्था व स्थानिक प्रशासनाशी सहकार्य करणे, जनजागृती कार्यक्रम आणि कार्यशाळा आयोजित करणे.

6) डिजिटल व तांत्रिक साधनांचा वापर: ई-लर्निंग, ऑनलाइन कोर्सेस आणि डिजिटल प्लॅटफॉर्मचा वापर वाढवणे, पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा अवलंब करणे, डेटा विश्लेषणाद्वारे शाश्वत उपाय शोधणे.

7) धोरणात्मक सहकार्य व आंतरराष्ट्रीय भागीदारी: जागतिक विद्यापीठांशी संयुक्त संशोधन, SDGs संबंधित प्रकल्पांमध्ये सहभाग, शासनाला धोरणनिर्मितीत तांत्रिक सल्ला देणे.

निष्कर्ष:

शाश्वत विकास आणि उच्च शिक्षण हे आधुनिक समाजव्यवस्थेतील परस्परावलंबी आणि पूरक घटक आहेत. आर्थिक प्रगती, सामाजिक समता आणि पर्यावरणीय संतुलन राखत दीर्घकालीन विकास साधणे ही शाश्वत विकासाची मूलभूत संकल्पना आहे. 1987 मधील Our Common Future या अहवालात शाश्वत विकासाची व्याख्या स्पष्ट करण्यात आली आणि 2015 मध्ये United Nations यांनी जाहीर केलेल्या Sustainable Development Goals (SDGs) द्वारे 2030 पर्यंत जागतिक स्तरावर शाश्वत उद्दिष्टे निश्चित करण्यात आली.

उच्च शिक्षणाची संकल्पना केवळ पदवीप्राप्तीपुरती मर्यादित नसून ज्ञाननिर्मिती, संशोधन, कौशल्यविकास, मूल्यसंवर्धन आणि राष्ट्रीय बांधणी यांचा समन्वय साधणारी व्यापक प्रक्रिया आहे. उच्च शिक्षण संस्था समाजातील बौद्धिक आणि तांत्रिक नेतृत्व निर्माण करतात. त्यामुळे शाश्वत विकासाच्या प्रक्रियेत त्यांची भूमिका अत्यंत निर्णायक ठरते.

शाश्वत विकासात उच्च शिक्षणाची भूमिका बहुआयामी आहे. अभ्यासक्रमात पर्यावरण, सामाजिक न्याय, लिंगसमता, हरित तंत्रज्ञान यांचा समावेश करून विद्यार्थ्यांमध्ये जबाबदारीची जाणीव निर्माण केली जाते. संशोधन आणि नवोपक्रमाद्वारे हवामान बदल, जलसंकट, ऊर्जा तुटवडा, जैवविविधता संरक्षण यांसारख्या समस्यांवर उपाय शोधले जातात. हरित कॅम्पस, ऊर्जा बचत, कचरा

व्यवस्थापन, जलसंवर्धन यांसारखे उपक्रम राबवून संस्था स्वतः शाश्वततेचे आदर्श उदाहरण बनतात.

भारतातील उच्च शिक्षण व्यवस्था विस्ताराच्या टप्प्यावर असली तरी गुणवत्तेचा प्रश्न अजूनही महत्त्वाचा आहे. National Education Policy 2020 (NEP 2020) ने बहुविषयक शिक्षण, संशोधनाला चालना, कौशल्याधारित अभ्यासक्रम आणि डिजिटल शिक्षणावर भर देऊन शाश्वत विकासाशी सुसंगत धोरणात्मक दिशा दिली आहे. भारत सरकारच्या विविध योजना आणि उपक्रमांमध्ये उच्च शिक्षण संस्थांचा सहभाग वाढत आहे, ज्यामुळे SDGs साध्य करण्यास गती मिळू शकते.

शाश्वत विकास साध्य करण्यासाठी उच्च शिक्षण हे प्रभावी आणि दीर्घकालीन साधन आहे. ज्ञान, संशोधन, नवोपक्रम, कौशल्यविकास आणि मूल्याधिष्ठित शिक्षण यांच्या माध्यमातून उच्च शिक्षण संस्था समाजात सकारात्मक परिवर्तन घडवू शकतात. भारताने 2030 पर्यंत SDGs साध्य करण्यासाठी उच्च शिक्षण क्षेत्र अधिक सक्षम, समावेशक, संशोधनाभिमुख आणि हरित बनवणे अत्यावश्यक आहे.

अशा प्रकारे, शाश्वत विकास आणि उच्च शिक्षण यांचा समन्वय साधल्यासच देशाची सर्वांगीण, संतुलित आणि दीर्घकालीन प्रगती सुनिश्चित होऊ शकते.

संदर्भ:

1. National Education Policy 2020. (2020). Government of India. बहुविषयक शिक्षण, संशोधन व शाश्वत विकासाशी संबंधित धोरणात्मक बदल.
2. University Grants Commission (UGC).उच्च शिक्षणातील गुणवत्ता, संशोधन व अभ्यासक्रम विकासाबाबत दिशा.
3. National Assessment and Accreditation Council (NAAC).गुणवत्ता मूल्यांकन व संस्थात्मक विकास निकष.
4. NITI Aayog. (विविध वर्षे). SDG India Index Reports.भारतातील शाश्वत विकास उद्दिष्टांची प्रगती अहवाल.

ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

March - 2026
Vol. 15 - No. S1

उच्च शिक्षणातील आव्हाने आणि आजचा युवक

डॉ. राजेंद्र रामनाथ गायकवाड

मराठी विभाग, सहकारमहर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात महाविद्यालय, संगमनेर.

***Corresponding Author:** डॉ. राजेंद्र रामनाथ गायकवाड*

DOI - 10.5281/zenodo.19482064

सारांश:

उच्च शिक्षण हे राष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचे केंद्रबिंदू आहे. ज्ञाननिर्मिती, संशोधन, नवोन्मेष, मानवी संसाधन विकास आणि सामाजिक परिवर्तन या सर्व प्रक्रियांमध्ये उच्च शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. सरकारने उच्च शिक्षणावर किती खर्च करावा, उच्च शिक्षणावर जास्तीत जास्त लक्ष केंद्रित केल्यास आपोआप सर्व स्तरांपर्यंत सुधारणा होईल, भारतातील उच्च शिक्षण व्यवस्थेने संख्यात्मक वाढ साधली असली तरी गुणवत्तात्मक प्रगतीसमोर अनेक संरचनात्मक व धोरणात्मक आव्हाने आहेत. या संशोधन प्रबंधात उच्च शिक्षणातील गुणवत्ता, संशोधन, कौशल्यविकास, डिजिटल दरी आणि नियामक चौकट यांचे विश्लेषण करून व्यापक सुधारणा उपाय सुचविण्यात आले आहेत.

प्रस्तावना:

उच्च शिक्षणआणि आजचा युवक, उच्च शिक्षणाची वर्तमानस्थिती आजच्या युवकांसमोरील आव्हाने, उच्च शिक्षणाची वर्तमानस्थिती, आजच्या युवकांसमोरील आव्हाने या सर्व घटकांच्या आधारे परामर्श घेता येईल.

उच्च शिक्षण आणि आजचा युवक:

उच्च शिक्षण हे सामाजिक क्रांतीचे एक माध्यम आहे, केवळ उच्च शिक्षणाने माणसाचे वैचारिक परिवर्तन होते, असे गृहीतक मानले जाते, आणि सामाजिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक आदी क्षेत्रात मनवन्तर नक्की होईल, परंतु त्या उच्च शिक्षणाची गुणवत्ता सकस आणि सतत नाविन्यपूर्ण असेल तर, नाहीतर आजही आपण समाजामध्ये पाहतो, पदवी,पदव्युत्तर पर्यंतचे शिक्षण घेऊनही युवकांच्या विचारात परिवर्तन झाले, असे दिसत नाही, यात मनापासून केलेला अभ्यास, उच्च शिक्षण क्षेत्रातील बदलती रूपे, आणि त्याचा परिणाम त्याच्या व्यक्तिमत्त्वावरती कितपत होतो, उच्च शिक्षण क्षेत्रातील आव्हाने नाविन्यपूर्णता समजून घेण्यासाठी आर्थिक परिस्थिती आड येते, असे म्हणणे चुकीचे आहे, याला आजच्या युवकांची उदासीनताच कारणीभूत आहे हे मात्र नक्की, समाज माध्यमांमध्ये गुंतलेले मन, लेखन, वाचन, श्रवण,चिंतन या सर्व कौशल्यांपासून दुरावलेले आहे. आजही शाळा महाविद्यालय स्तरावर वाचन संस्कृती या उपक्रमांसारखे उपक्रम राबवली जातात. पण या उपक्रमांना आजच्या युवकांचा कितपत प्रतिसाद मिळतो? या मनवृत्तीवरही अलीकडच्या काळामध्ये संशोधन होणे गरजेचे आहे. वाचन संस्कृती मनामनामध्ये रुजावी हा विषय आजच्या युवकांच्या मनात सारखा का बिंबवावा लागतो. याचाही चिकित्सक दृष्टीने अभ्यास होणे परिहार्य आहे, 'वाढती बेकारी' हा विषय त्यांच्या कायम चिंतनाचा असतो. परंतु आपल्याकडे गुणवत्ता असेल तर या सर्व गोष्टींवर मात करता येणे शक्य आहे. काही अपवादात्मक युवक सोडले तर 60 ते 70 टक्के युवकांची मानसिकता कष्ट आणि संघर्ष करण्याची दिसत नाही. सरकारी,

निमसरकारी विभागात प्रमुख पदावर कार्यरत असलेल्या घटकांकडे विद्वत्ता आणि गुणवत्ता असेल तर आलेल्या आव्हानांना सामोरे जाण्याची त्यांच्यात प्रबळ इच्छाशक्ती असते, कारण त्यांनी उच्च शिक्षण क्षेत्रातील सर्व ध्येय आणि धोरणे यांचा चिंतनात्मक अभ्यास केलेला असतो, म्हणून अशा व्यक्ती कोणत्याही आपत्तीला आव्हानं न समजता संधी समजतात, आणि त्यावर मात करतात. अशा व्यक्तींना आजच्या युवकाने कायमच प्रेरणास्थानी ठेवायला हवे. ही एक मानवी उपायोजना आहे. "जागतिकीकरण, उदारीकरण आणि तंत्रज्ञानक्रांतीमुळे उच्च शिक्षण व्यवस्थेचे स्वरूप आमूलाग्र बदलले आहे. ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेमध्ये विद्यापीठे ही केवळ अध्यापनाची केंद्रे नसून संशोधन, नवोन्मेष आणि उद्योजकतेची केंद्रे बनली आहेत. भारतातील उच्च शिक्षण व्यवस्था जगातील सर्वात मोठ्या व्यवस्थांपैकी एक आहे; तथापि विस्तार आणि गुणवत्ता यामधील संतुलन राखणे हे मोठे आव्हान आहे." आजही शाळा (शक्यतो इंग्रजी माध्यमांच्या), महाविद्यालये, (जास्तीत जास्त व्यावसायिक) काढण्यासाठी प्रत्येक संस्थाचालक आग्रही असतो. परंतु विद्यार्थ्यांसाठी पायाभूत सोयी सुविधां उपलब्ध करून देणे ही मानसिकताही आहे तेवढ्याच क्षमतेची पाहिजे, अत्यल्प वेतनावर काम करणारा शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांची उदासीनता यावर कोणीही भाष्य करायला तयार नाही, अशी पिढी जर आजच्या युवकांचे भवितव्य घडवू पाहत असेल तर, युवकांनाही दोष देणे चुकीचे आहे. त्यामुळे उच्च शिक्षण घेऊनही आजच्या शिक्षकांना,युवकांना नेहमी आव्हानांना सामोरे जावे लागते, याला कारण सरकारची नेहमी उच्च शिक्षणाकडे असणारी उदासीन मानसिकता होय.

थोडक्यात, उच्च शिक्षण हे पदवी प्राप्तीचे साधन नसून स्वतःचा वैयक्तिक विकास कौशल्यनिर्मिती आणि राष्ट्रीय प्रगतीचे प्रभावी माध्यम आहे. आजचा युवक जागतिकीकरण, तंत्रज्ञानक्रांती आणि बदलत्या रोजगारसंरचनेच्या पार्श्वभूमीवर शिक्षण घेत आहे. त्यामुळे उच्च शिक्षणाच्या संधी वाढल्या आपल्या तरी आव्हानांचे स्वरूपातील दिवसापूर्वी झाली आहे. आजही राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या अंमलबजावणी प्रत्येक महाविद्यालयाने केलेले असली तरी विद्यार्थ्यांची महाविद्यालयांमध्ये असणारी अनुपस्थिती, नियमित अभ्यासक्रमांचे स्वरूप, प्रात्यक्षिक श्रेणी,याचा आजही अंदाज काही विद्यार्थ्यांना नाही. ही अनास्था आजच्या युवकांसमोर एक आव्हान आहे. असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

उच्च शिक्षणाची वर्तमानस्थिती:

भारतामध्ये उच्च शिक्षण क्षेत्रात प्रचंड प्रमाणात वाढ झाली आहे. विद्यापीठ अनुदान आयोग आणि ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन अंतर्गत महाविद्यालय तांत्रिक महाविद्यालये, संस्था कार्यरत आहे. अलीकडच्या काळात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये बहुपर्यायी विषय, संशोधन या विषयावर जास्तीत जास्त भर दिलेला दिसून येतो. परंतु या महाविद्यालयात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 ची अंमलबजावणी करत असताना पारंपरिक महाविद्यालय आणि तांत्रिक महाविद्यालयांनी पायाभूत सोयी सुविधांवर जास्त भर देणे अपेक्षित आहे. केवळ संख्यात्मक वाढ नको, गुणात्मक वाढीकडे ही विद्यापीठे महाविद्यालय आणि तांत्रिक महाविद्यालय यांनी लक्ष देणे गरजेचे आहे, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंतर्गत पारंपरिक विद्या शाखेचे अभ्यासक्रम आणि त्यातून निर्माण

होणाऱ्या रोजगाराच्या संधी यांचा समन्वय शिक्षण तज्ञांनी संबंधित अभ्यासक्रम तयार करताना केलेला आहे किंवा नाही. याबाबतीतही विचार मंथन होणे गरजेचे आहे. अध्ययन, अध्यापनाचे बदललेले स्वरूप, हा विषय ही तितकाच महत्त्वाचा आहे. कारण घड्याळी एक तासाचा एक तासिका नवीन शैक्षणिक धोरणात आलेली आहे. अलीकडच्या काळातील विद्यार्थ्यांची मानसिकता एक तास बसण्याची आहे किंवा नाही. हेही तितकेच महत्त्वाचे आहे.

आजच्या युवकांसमोरील आव्हाने:

1. रोजगार केंद्रित कौशल्यांचा अभाव.
2. डिजिटल दरी.
3. मानसिक आरोग्य व समस्या.
4. आर्थिक अडचण.
5. संशोधन व नवोन्मेषातील मर्यादा.
6. सामाजिक सांस्कृतिक आव्हाने.
7. सामाजिक सांस्कृतिक आव्हाने :
8. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची अडचण.
9. भाषेवर असणारे प्रभुत्व,
10. सामाजिक विषमता.

सुधारना व उपायोजना :

1. कौशल्य आधारित अभ्यासक्रम.
2. तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर.
3. संशोधनाचा वापर.
4. मानसिक आरोग्य समोपदेशन.
5. समान संधी धोरण.
6. बहुविषयक अभ्यासक्रम.
7. शिक्षक प्रशिक्षण.
8. संस्थात्मक स्वायत्तता.

इत्यादी सर्व घटकांच्या आधारे आजच्या युवकांच्या मानसिक प्रवृत्तीत सुधारणा व उपाययोजना करता येतील.

संशोधनाची उद्दिष्टे:

१. उच्च शिक्षणातील प्रमुख आव्हानांचे विश्लेषण करणे.
२. गुणवत्तेतील असमानता व संशोधनातील मर्यादा ओळखणे.
३. कौशल्यविकास आणि रोजगारक्षमतेतील दरी स्पष्ट करणे.
४. धोरणात्मक सुधारणा उपाय सुचविणे.

संशोधन पद्धती (Methodology):

हा अभ्यास गुणात्मक संशोधन पद्धतीवर आधारित आहे. विविध शैक्षणिक अहवाल, धोरण दस्तऐवज, शोध निबंध आणि अधिकृत प्रकाशनांचे विश्लेषण करण्यात आले आहे. तुलनात्मक व चिकित्सक दृष्टीकोन वापरून निष्कर्ष मांडले आहेत.

ग्रामीण व शहरी भागातील संस्थांमध्ये पायाभूत सुविधा, शिक्षकांची गुणवत्ता आणि संशोधन साधनांमध्ये मोठी तफावत आढळते.संशोधन निधी, प्रयोगशाळा सुविधा, आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि प्रकाशनांची गुणवत्ता वाढविण्याची गरज आहे.

प्राध्यापकांची रिक्त पदे आणि प्रशिक्षणाच्या अभावामुळे शिक्षणाच्या गुणवत्तेवर परिणाम होतो.अभ्यासक्रम आणि उद्योगक्षेत्राच्या अपेक्षा यामध्ये सुसंगती नसल्यामुळे विद्यार्थ्यांची रोजगारक्षमता कमी होते.ग्रामीण भागात इंटरनेट व डिजिटल साधनांची मर्यादित उपलब्धता असल्यामुळे ऑनलाइन शिक्षणात असमानता निर्माण होतो.

निष्कर्ष:

भारतीय उच्च शिक्षण व्यवस्था संक्रमणाच्या टप्प्यात आहे. विस्तारानंतर गुणवत्ता, संशोधन, डिजिटल समावेशकता आणि जागतिक स्पर्धात्मकता यांवर लक्ष केंद्रित करणे अत्यावश्यक आहे. योग्य धोरणात्मक सुधारणा व तंत्रज्ञानाच्या वापराने उच्च शिक्षण व्यवस्थेत गुणात्मक परिवर्तन घडवून आणणे शक्य आहे. महाविद्यालयांना शैक्षणिक व आर्थिक स्वायत्तता देताना गुणवत्ता निकष काटेकोरपणे लागू करणे गरजेचे आहे.

संदर्भसूची:

१. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० दैनिक लोकसता जानेवारी २०२४.

२. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० दैनिक सकाळ मार्च २०२५.

ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

March - 2026
Vol. 15 - No. S1

भारताची पारंपारिक शिक्षण व्यवस्था आणि नव शैक्षणिक धोरण

सुनील अंबादास आहिरे

मु. पांझणदेव पो. नागापूर ता. नांदगाव जि. नाशिक - ४२३१०४

***Corresponding Author:** सुनील अंबादास आहिरे*

DOI - 10.5281/zenodo.19482076

प्रस्तावना:

शिक्षण हे माणसाच्या जीवनाला आकार देणारे आणि प्रगतीच्या वाटेवर नेणारे महत्त्वपूर्ण साधन आहे. इतकेच नाहीतर ह्याच शिक्षणाने माणूस समृद्ध होत असतो. हा शिक्षणाचा सर्व सामान्यांना मिळालेला अधिकार यशाच्या वाटेवर नेणारा आहे. कारण सर्वांना आपापला विकास करण्याचा अधिकार भारतीय राज्यघटनेने दिलेला आहे. ह्याच अधिकारामार्फत समग्र भारतीय जनता आज बऱ्याच अवधाने शिक्षणाकडे वळलेले दिसून येतात. कोणत्याही राष्ट्राच्या उन्नतीसाठी शिक्षण हे एकमेव असे साधन आहे की, ते राष्ट्राच्या विकासाला बळ आणि दिशा देते. मुळात देण्यात येणारे शिक्षण हे अधिक सकस आणि दर्जेदार असेल तर राष्ट्रातील मनुष्यबळ हे प्रभावी आणि तितकेच सक्षम असते. भारत आज जगाच्या तुलनेत विकासाच्या विशिष्ट टप्प्यावर असून उद्या महासत्ता होण्यासाठी आपले सर्वस्व पणाला लावत आहे. निश्चितच महासत्ता होण्यासाठी आवश्यक ते पाऊल म्हणून लागू केलेले नवीन शैक्षणिक धोरण फायदेशीर आहे, हे नक्कीच.

भारतीय शिक्षण पद्धती:

जगात शिक्षणाची सुरुवात ही प्रागैतिहासिक काळापासून सुरु झालेली असून भारत देखील या काळात शिक्षणाचा प्रमुख केंद्र बिंदू होता. या काळात भारतात मिळणारे शिक्षण हे सर्वसमावेशक पद्धतीचे असल्याने जगातील अनेक विचारवंतांनी आणि अभ्यासकांनी येथे विद्या ग्रहण केलेली आढळते. त्याकाळी नालंदा, तक्षशीला हे प्रमुख शिक्षण केंद्रे होती. नालंदा हे सध्या भारतातील बिहार राज्यातील राजगीरजवळ स्थायिक आहे तर तक्षशीला हे पाकिस्थानमध्ये आहे. नालंदा हे मगध (आधुनिक बिहार) पूर्व भारतातील एक प्रसिद्ध महाविहार (बौद्ध मठ विद्यापीठ) होते. इतिहासकारांद्वारे जगातील पहिले निवासी विद्यापीठ मानले जाते आणि प्राचीन जगातील सर्वात मोठ्या शिक्षण केंद्रापैकी ते राजगृह (आताचे राजगीर) शहराजवळ होते. सुमारे ९० किलोमीटर (५६ मैल) पाटलीपुत्राच्या आग्नेयेकडे (आताचे पटना). इ. स. ४२७ ते इ. स. ११९७ पर्यत ते कार्यरत हेते. नालंदाने ५व्या आणि ६व्या शतकात कला आणि शैक्षणिक घटकांना प्रोत्साहन देण्यात महत्वाची भूमिका बजावली. ज्या कालखंडाचे वर्णन 'भारताचे सुवर्णयुग' म्हणून केले जाते.[१] ५व्या शतकात गुप्त साम्राजात ह्या विद्यापीठाची स्थापना झाली तर इ. स. १२०० व्या शतकात मुहम्मद बख्तियार खलजीने तोडफोड करून नष्ट केले. या विद्यापीठात वेद, व्याकरण, वैद्यकशास्त्र, गणित, खगोलशास्त्र आणि किमया यासारखे विषय शिकविले जात. एकूणच प्राचीन काळापासून भारत हा जगात शिक्षणाच्या बाबतीत आघाडीवर होता, असे दिसून येते. पैकी भारतात प्राचीन काळापासून ते आजपर्यंत मिळणाऱ्या शिक्षणाचा काही थोडक्यात मागोवा खालीलप्रमाणे मांडला आहे.

प्राचीन भारतीय शिक्षण:

मुळात 'धर्म' या संकल्पनेपासून प्राचीन भारतीय शिक्षणाची सुरुवात झालेली दिसून येते. यात प्रामुख्याने वेदांचा अभ्यास असायचा. केवळ ब्राह्मण अथवा उच्च वर्गीयांना ही संधी उपलब्ध होती. गुरुकुल पद्धत असल्याने विद्यार्थांना गुरुग्रही राहून ज्ञान ग्रहन करावे लागत. लहान वय असताना गुरुग्रही राहणारा बालक वयाची विशिष्ट अवस्था पूर्ण केल्यानंतरच आपल्या गृही परतत असे. मंत्र पठण, यज्ञविधी, शस्त्रविद्या असे अनेक विषय केवळ ग्रहण प्रक्रियेद्वारे शिकविले जात. मुळात हे जीवन आध्यात्म संस्कृतीशी जोडलेले असल्याने कालंतराने त्यात बदल घडत गेला.

स्वतंत्र पूर्व शिक्षण:

भारतात व्यापाराच्या दृष्टीकोनातून स्थायिक झालेल्या इंग्रजांनी सुमारे १५० वर्षे राज्य केले. तत्कालीन परीस्थितीत भारतात प्रामुख्याने कर्मकांडाचे स्रोत आधीच माजलेले असलेले समाजात दुही निर्माण झालेली होती. उच्च वर्गीयांकडून कनिष्ट वर्गावर अमानुष अत्याचार होत असायचा. या काळात जातीयभेदाने कळस गाठला होता. शिवाय यात शिक्षणाची मक्तेदारी ही केवळ उच्च वर्गीयांकडे असल्याने समाजातील अनेक बालके शिक्षणापासून वंचित असायची. यात एकोणिसाव्या शतकाचा इतिहास हा जगावर पाश्चात्य संस्कृतीच्या प्रभावाचा प्रारंभ होण्याचा इतिहास आहे. समाजसुधारणेची प्रेरणा या प्रभावाखाली निर्माण झाली. इंग्रजी भाषेच्या ज्ञान देणाऱ्या शाळा सुरु झाल्या त्यांचा हेतू जनता शिक्षित करणे हा नव्हता, तर इंग्रजांचे राज्य चालवायला उपयुक्त कर्मचारी मिळावे हा होता.[२] इंग्रजांनी सुरू केलेल्या शाळेत समाजातील सर्व स्तरातील बालकांना सक्तीचे व मोफत शिक्षण मिळत. इग्रजांनी सुरु केलेल्या शिक्षण पद्धतीत समाजशास्त्र, पाश्चात्य संस्कृती, गणित, भाषा आदी विषयाचा परिचय झाल्याने भारतीय समाजाला शिक्षणाचे महत्त्व अधिकरित्या उमजले. इतकेच नाहीतर भारतीयांना लोकशाही, समता, न्याय्य, आपले हक्क, जातीय धर्मनिरपेक्षता, विज्ञाननिष्ठा निर्माण होऊन मानवतावादी दृष्टीकोन तयार झाला. इतकेच नाहीतर भारतात स्त्री शिक्षणाची सुरुवात देखील याच काळात घडून आली. शिवाय इंग्रजांनी भारतात अनेक विद्यापीठांची स्थापना देखील केली. इंग्रजांनी भारतीय शिक्षण पद्धतीत वेळोवेळी सुधारणाही केल्या. त्यांनी सर्वात प्रथम

१) 'चार्लस वूडचा खलिता' (सन १९५४)

२) 'हंटर आयोग' (सन १८८२)

३) 'भारतीय विद्यापीठ आयोग' (१९०२)

४) कलकत्ता विद्यापीठ आयोग (१९१७)

या आयोगानुसार भारतीय शिक्षण क्षेत्रात महत्त्वपूर्ण बदल घडून आणले. इतकेच नाहीतर इंग्रजाच्या संपर्काने भारताला पाश्चात्य जगाचा आणि संस्कृतीचा आवाका लक्ष्यात आल्याने भारतीयांना देखील आपल्या ज्ञानाचा आवाका आणि शिक्षणाचे महत्त्व समजत गेलेले दिसून येते.

स्वातंत्र्योत्तर शिक्षण:

इंग्रजांनी निर्माण केलेल्या शिक्षण पद्धतीला फाटा देण्यासाठी भारताने स्वातंत्र्यानंतर आपले स्वतंत्र शैक्षणिक धोरण निर्माण करण्यासाठी यथोचित्त प्रयत्न केले आणि त्याला यश देखील मिळाले. पारंपारिक शिक्षण पद्धत आणि आधुनिक विषयाचा समावेश करून शिक्षणात प्रगती करण्यासाठी आवश्यक ते प्रयत्नही झालेले दिसून येतात. स्वातंत्र्यानंतर शिक्षण पद्धतीत बदल करण्यासाठी जे काही महत्त्वपूर्ण आयोग नेमले गेले ते पुढील प्रमाणे.

१) ताराचंद समिती (१९४८)

२) आ. नरेंद्रदेव समिती (१९५२)

३) मुदलियार आयोग (१९५२)

४) कोठारी आयोग (१९६४)

५) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (१९८६)

या सर्व आयोगांनी वेळोवेळी सुचवलेले बदल शिक्षण व्यवस्थेत केले गेले. त्यानुसार भारतीयांच्या शिक्षणाच्या ज्या काही अपेक्षा होत्या त्यात काळानुसार बदल घडून आलेला दिसून येतो.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० आणि होणारे बदल:

जगाच्या बाजारात भारताने आपले वर्चस्व निर्माण करण्यासाठी अनेक दशकांपासून प्रयत्न सुरु केले आहे. या आधीच्या शासनाने देखील जगाच्या बरोबरीने धावण्यासाठी अनेक बदल घडून आणले. त्यात संरक्षण साहित्यावर वाढीव खर्च असेल, दरडोई उत्पन्न वाढविण्यासाठी अनेक सुविधा उपलब्ध केल्या असतील अथवा अनेक प्रकारच्या नवनवीन सुविधा निर्माण केल्या असतील. पैकी यातून समाजाच्या भौतिक सुधारणांचा आणि समाजातील व्यक्तीचा पाहिजे तसा विकास होऊ शकत नाही. कारण शिक्षण हे माणसाच्या सर्वांगीण जीवनाचा विकास करणारे साधन असल्याने व्यक्ती विकासात शिक्षणाला अन्यसाधारण महत्त्व आहे. हे शिक्षण व्यक्तीला सहज आणि प्रभावी मिळावे या हेतूने सर्वप्रथम सन १९८६मध्ये लागू करण्यात आलेल्या राष्ट्रीय शैक्षणिक आयोगाच्या शिफारशीनुसार "गुणवत्तापूर्ण, सर्वांसाठी समान आणि व्यावसायिक कौशल्याधारित शिक्षण तसेच राष्ट्रीय विकासासाठी सक्षम तसेच चारित्र्यसंपन्न पिढी निर्माण करणे."[३] ही उद्दिष्ट्ये आजवर देखील साध्य होऊ शकलेली नाही. अर्थात ३५ वर्षे होऊन देखील ठरवलेली उद्दिष्ट्ये सध्या करू न शकल्याने नवीन धोरणात त्यावर अधिक जोर द्यावा लागणार हे, मात्र खरे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० हे २१व्या शतकातील पहिले महत्त्वाचे शैक्षणिक धोरण असून या धोरणाचे ध्येय हे भारतात वाढणाऱ्या विकासात्मक आवश्यकतांवर उपाय करणे हे देखील आहे. या धोरणाची विद्यार्थ्यांप्रती जे काही मुलभूत सिद्धांत मांडले आहे, ती पुढील प्रमाणे.

- प्रत्येक विद्यार्थ्यांच्या वैशिष्ट्येपूर्ण क्षमता शोधणे, ओळखणे आणि त्या विकसित करण्यासाठी शिक्षक व पालक दोघांनीही अभ्यास व अभ्यासेतर क्षेत्रांना चालना देणे.
- प्रत्येक विद्यार्थ्यासाठी मुलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान या गोष्टींना पूर्वप्राथमिक स्तरावर सर्वोच्च स्थान देणे.
- विद्यार्थ्यांना आपल्या आवडीचे विषय इयता ६वीनंतर निवडता येणार. यात एक व्यवसायाभिमुख विषयाची देखील निवड करता येणार.
- घोकंपट्टी ऐवजी किंवा परीक्षेसाठी शिकण्याऐवजी संकल्पना समजून घेण्यावर भर देणे.
- ज्ञानाची एकता आणि अखंडता सुनिश्चित करून एका बहुआयामी जगासाठी विज्ञान, समाजशास्त्र, कला, मानव्येशास्त्रे आणि खेळ यांच्यामध्ये बहु-शाखीय आणि समग्र शिक्षणाचा विकास करणे.
- तर्कशुद्ध निर्णय घेण्यासाठी आणि नाविण्यपूर्णतेला प्रोत्साहन देण्यासाठी कल्पकता आणि तार्किक विचार यांना प्राधान्य देणे.

- नैतिक, मानवी आणि घटनात्मक मूल्यांच्या निर्मितीसाठी योग्य निर्णय घेणे.
- अध्ययन-अध्यापनात बहुभाषिकत्व आणि भाषा शक्तींना प्रोत्साहन देणे.
- वर्षाच्या शेवटी होणाऱ्या परीक्षेतील मूल्यांकनाला अधिक महत्त्व न देता त्याऐवजी शिकण्यासाठी सातत्यपूर्ण मूल्यांकनावर भर देणे.
- अध्ययन-अध्यापनात तंत्रज्ञानाचा पुरेपूर वापर करणे, भाषेचे अडथळे काढून टाकणे, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी शिक्षण सुलभ बनवण्यासाठी शैक्षणिक नियोजन व व्यवस्थान संस्थांशी समन्वय साधून नवीन तंत्र व साहित्य निर्माण करणे.
- शिक्षण हा समवर्ती विषय आहे, हे लक्षात घेऊन सर्व अभ्यासक्रम, अध्यापनशास्त्र आणि धोरण यात विविधतेबद्दल आणि स्थानिक संदर्भासह आदर करणे.
- शिक्षण व्यवस्थेत सर्व विद्यार्थ्यांना प्रगती करता येईल हे सुनिश्चित करण्यासाठी सर्व शैक्षणिक निर्णयांमध्ये पूर्ण समानता आणि सर्वसमावेशकता ही पायाभूत गोष्ट म्हणून स्वीकारणे.
- बालकांचे प्रारंभीचे संगोपन आणि पूर्व प्राथमिक स्थरावरील शिक्षण ते शालेय शिक्षण ते उच्च शिक्षणापर्यंत सर्व पातळ्यावरील शिक्षणाच्या अभ्यासक्रमात सुसूत्रता आणणे.
- शिक्षक व प्राध्यापक यांना शिक्षण प्रक्रियेचे केंद्र मानने, त्याची भरती व तयारीची उत्कृष्ट व्यवस्था लावणे. त्यांचा सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास, कामकाजाचे वातावरण आणि सेवेची स्थिती साकात्मक ठेवण्यासाठी उपाय योजने.
- शिक्षण प्रणालीची अखंडता, पारदर्शकता आणि संसाधनाची कार्यक्षमता ऑडीट आणि सार्वजनिक प्रकटीकरणाच्या माध्यमातून सुनिश्चित करण्यासाठी एक 'सुलभ पण परिणामकारक' नियमांची चौकट देणे. त्याबरोबरच स्वायत्तता, सुशासन आणि सशक्तीकरणाच्या माध्यमातून नाविन्यपूर्णता आणि चौकटीबाहेरच्या विचारांना प्रोत्साहित करणे.
- गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि विकासासाठी सहआवश्यकता म्हणून उत्कृष्ट दर्जाचे संशोधन वाढविणे.
- शिक्षण तज्ज्ञांव्दारे सातत्यपूर्ण संशोधन आणि नियमित मूल्यांकनाव्दारे प्रगतीचा सातत्यपूर्ण आढावा घेणे.
- आपल्या भारतीय मुळांचा, भारताचा आणि भारताच्या समृद्ध, वैविध्यपूर्ण, प्राचीन आणि आधुनिक संस्कृती, ज्ञान व्यवस्था आणि परंपरा यांचा अभिमान असणे.
- शिक्षण ही एक सार्वजनिक सेवा आहे; गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध असणे हा प्रत्येक बालकाचा मुलभूत हक्क समाजाला पाहिजे.
- सशक्त, जिवंत सार्वजनिक शिक्षण व्यवस्थेत लक्षणीय गुंतवणूक तसेच देणगीदार, खाजगी आणि सामुदायिक संस्थांच्या भागीदारीला प्रोत्साहन आणि सुविधा देणे.[४]

वरील सर्व मुलभूत सिद्धांतांचा विचार करता बालक हा शिक्षणाच्या केंद्रस्थानी आहे. तर अध्यापक हा शिक्षण प्रक्रियेच्या केंद्रस्थानी आहे. तसेच बालक हा इयता ३रीपर्यंत आपल्या स्थानिक बोली भाषेत म्हणजेच मातृभाषेत नवीन ज्ञान ग्रहन करेल ते ही खेळातून अथवा प्रात्यक्षिकातून. त्याचबरोबर त्याला इयता ३री ते ५वी तो आपल्या मातृभाषेतून शिक्षण घेत इयत्ता ६वीत एक

व्यवसाय विषय निवडून त्यासह इतर विषयातूनही तो ज्ञान आत्मसात करेल. केवळ पाठांतर अथवा घोकंपट्टीवर भर न देता प्रात्यक्षिक अथवा खेळातून ते ज्ञान त्याला मिळत जाईल.

या शैक्षणिक धोरणातून होणारे संभाव्य बदल पुढील प्रमाणे.

- माहिती-तंत्रज्ञान, कौशल्ये आणि संशोधन यांना प्राधान्य दिल्याने यांच्या वाढीस चालना मिळेल.
- ५+३+३+४ अशी एकीकृत रचना असल्याने पूर्व प्राथमिक ते उच्च माध्यमिक शिक्षण एकीकृत होईल.
- अंगणवाड्या प्राथमिक शाळांना जोडल्या जातील. त्याचबरोबर पूर्व प्राथमिक व प्राथमिक शिक्षण व्यवस्था एकाच व्यवस्थापकाकडून हाताळल्या जातील.
- इयता ५वीपर्यंतचे शिक्षण मातृभाषेतून असल्याने विद्यार्थ्यांवरील बौद्धिक ताण कमी होऊन शिक्षण अधिक आनंददायी होणार.
- विद्यार्थ्याने इयत्ता ९वीत प्रवेश घेतल्यावर त्याला आपल्या आवडीनुसार शाखा निवडता येणार.
- कुशल, कार्यक्षम आणि प्रशिक्षित शिक्षकांची नेमणूक करण्यासाठी अगोदर शिक्षक प्रशिक्षण संस्थांवर नियंत्रण ठेवले जाणार.
- विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व व्यापक मूल्यमापनाला चालना मिळणार.
- शिक्षकांची बदली अपवादात्मक परीस्थिती वगळता न करण्याचे संकेत.
- RTE - वय वर्षे ३ ते १८ वर्षे सक्तीचे, मोफत शिक्षण दिले जाणार.
- इयत्ता १०वी व १२वीचे बोर्डस्थरावरील परीक्षा रद्द.
- महाविद्यालयीन शिक्षण ४ वर्षाचे पूर्ण केल्यावर पदवी तर ५ वर्षे पूर्ण केल्यावर पदव्युत्तर पदवी मिळणार.
- एम. फिल बंद.
- ५ वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर पीएच. डी.ला प्रवेश मिळणार.

वास्तविक खरे पाहता, आजच्या विज्ञान-तंत्र युगात नवीन आव्हाने पेलण्याची क्षमता लक्षात घेता शैक्षणिक धोरणात, शिक्षणाच्या संरचनेत आणि शिक्षणावर होणाऱ्या खर्चात काळाच्या ओघात वाढ आणि बदल होणे आवश्यक आहे. कारण महाराष्ट्र टाइम्स या वृत्तपत्रात २ फेब्रुवारी २०२२मध्ये प्रकाशित झालेल्या एका बातमीनुसार संपूर्ण भारतात सुमारे ११ लाख शिक्षकांची पदे रिक्त आहे. शिवाय १८% ग्रामीण तर ४३% शहरी भागातील शाळांत संगणकांची उपलब्धता आहे. तर ग्रामीण भागातील १४% तर शहरी भागातील ४२% शाळांत इंटरनेटची सोय आहे. असा अहवाल नो टीचर, नो स्कूल युनेस्कोने ऑक्टोंबर २०२१मध्ये जाहीर केला. भारत सरकारने शिक्षणावर २०१४-१५ ते २०१९-२० या काळात केंद्र व राज्य सरकार यांचा खर्च २.८% होता. २०२०-२१ आणि २०२१-२२मध्ये हा खर्च ३.१% होता.[५] एकंदरीत हा शिक्षणावर होणारा खर्च पाहता वास्तविक ठरवलेल्या उद्दीष्ट्यांच्याही पूर्ततेसाठी हे पुरेसे नाही. कारण आपल्याला प्रबळ आणि सशक्त भारत निर्माण करायचा असेल तर साहजिकच आजच्या शिक्षणावर होणाऱ्या खर्चात वाढ करून आवश्यक त्या सोयी-सुविधा आणि नव-नवे तंत्र, विविध प्रयोग आणि दर्जेदार साहित्याची आणि प्रभावी अध्यापकाची निर्मिती करून आजच्या बालकाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे.

समारोप:

अन्न, वस्त्र आणि निवारा या मुलभूत गरजांप्रमाणे शिक्षण ही देखील मुलभूत गरज बनली आहे. शिक्षणाने माणूस समृद्ध होतो. स्वत:चा आणि बरोबर समाजाचाही तो विकास करू लागतो. शिक्षण हे माणसाला आणि देशाला विकासाच्या टप्प्यावर नेणारा महत्त्वाचा घटक आहे. परंतु ह्याच घटकात काळाच्या बदलानुसार बदल नाही झाला तर साहजिकच अनेक प्रकारच्या अडचणी निर्माण होत असतात. कारण आजच्या जागतिकीकरणाच्या युगात जगात झपाट्याने नवनवीन बदल घडून येत आहे. ह्या बदलांचा प्रभाव इतर देशांवर देखील अधिक होत असतो. त्यामुळे आपल्या देशातील मनुष्यबळ हे समृद्ध आणि जगाच्या बदलांना तोंड देऊ शकेल असे निर्माण करण्यासाठी साहजिकच त्यांना त्या प्रकाचे शिक्षण आणि प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. कारण शिक्षण ही प्रदीर्घ प्रक्रिया असल्याने त्यासाठी योग्य ते बदल करून त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

सुमारे ३४ वर्षानंतर शैक्षणिक धोरणात बदल करण्यात आला आहे. कारण आज जागतिकीकरणात झालेला बदल आजच्या पिढीला खूप काही शिकवून जात असला तरी आजची पिढी त्याला निश्चितच सक्षमपणे तोंड देत आहे. हे जरी खरे असले तरी बदल हा काळाचा नियम आहे आणि या होणाऱ्या बदलांना तोंड देण्यासाठी आणि आपले वर्चस्व निर्माण करण्यासाठी शिक्षणात आवश्यक बदल होणे क्रमप्राप्त असल्याने त्याचा शिक्षणात समावेश होऊन अंमलबजावणी होणे आवश्यक असून त्यातून उद्याचा भारत आणि उद्याचे बालक उद्याच्या समृद्ध भारताचे प्रबळ नागरिक होतील यात शंका नाही.

संदर्भ सूची:

१. https://en.m.wikipedia.org/wiki/nalanda_mahavihara
२. जोशी लक्ष्मणशास्त्री तर्कतीर्थ, 'जोतिचरित्र', नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, दिल्ली, १९९१, पृ. ६.
३. आरगडे अंबादास(डॉ.), 'नवीन शैक्षणिक धोरण', एज्युकेशनल पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रिब्यूटर्स, औरंगाबाद, मे २०२२, पृ. ५६.
४. 'राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०' शिक्षण मंत्रालय, भारत सरकार (मराठी आवृत्ती), पृ. ५-६.
५. https://marathi.indiatimes.com/career/career-news/india-budget-2022-expeert-comment-on-education-budget/articleshow/89290493.cms

ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

March - 2026
Vol. 15 - No. S1

भारताचे नवीन शैक्षणिक धोरण (NEP) २०२० आणि शाश्वत विकासाची उद्दिष्टे: एक चिकित्सक अभ्यास

तुषार संजय कवडे

सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग,
सह्याद्री बहुजन विद्या प्रसारक समाज, सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात कला विज्ञान व वाणिज्य, महाविद्यालय संगमनेर.

Corresponding Author: तुषार संज य कवडे

DOI - 10.5281/zenodo.19482111

सारांश:

प्रस्तुत शोधनिबंध 'भारताचे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) २०२०' आणि 'शाश्वत विकास उद्दिष्टे' (SDGs) यांच्यातील परस्परसंबंधाचा चिकित्सक अभ्यास करतो. संयुक्त राष्ट्रांच्या अजेंडा २०३० मधील 'उद्दिष्ट ४' (गुणवत्तापूर्ण शिक्षण) साध्य करण्याच्या दृष्टीने भारताने आपल्या शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी NEP २०२० ची घोषणा केली आहे. उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण, बहुविद्याशाखीय दृष्टिकोन, व्यावसायिक कौशल्ये आणि संशोधनावर आधारित शिक्षण यांसारख्या तरतुदी शाश्वत भविष्यासाठी कशा प्रकारे दिशादर्शक ठरतात, याचे विश्लेषण या शोधनिबंधात करण्यात आले आहे.

या संशोधनासाठी वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला असून, माहिती संकलनासाठी शासकीय अहवाल आणि जागतिक निर्देशांकांचा (Secondary Data) आधार घेतला आहे. विश्लेषणातून असे दिसून येते की, हे धोरण केवळ शैक्षणिक प्रगतीसाठी नसून ते सामाजिक समता, आर्थिक स्वावलंबन आणि पर्यावरणीय शाश्वतता वाढवण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. तथापि, पायाभूत सुविधांची कमतरता आणि आर्थिक तरतूद ही या धोरणाच्या यशस्वी अंमलबजावणीतील प्रमुख आव्हाने आहेत. शेवटी, उच्च शिक्षण संस्थांनी शाश्वत विकासाचे 'हब' म्हणून विकसित होण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांवर हा निबंध प्रकाश टाकतो.

प्रस्तावना: (Introduction):

शिक्षण हा कोणत्याही राष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा पाया असतो. भारत सरकारने २९ जुलै २०२० रोजी जाहीर केलेले 'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) २०२०' हे २१ व्या शतकातील भारताच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी उचललेले एक महत्त्वाकांक्षी पाऊल आहे. हे धोरण केवळ साक्षरता वाढवण्यासाठी नसून, मानवी क्षमतांचा पूर्ण विकास करण्यासाठी आणि एक समान व न्याय्य समाज घडवण्यासाठी तयार करण्यात आले आहे.

जागतिक स्तरावर, संयुक्त राष्ट्रांनी (United Nations) २०१५ मध्ये २०१३ पर्यंत पूर्ण करण्यासाठी १७ शाश्वत विकास उद्दिष्टे (SDGs) निश्चित केली आहेत. यातील 'उद्दिष्ट क्र. ४' (SDG 4) हे सर्वांसाठी सर्वसमावेशक आणि दर्जेदार शिक्षण सुनिश्चित करण्यावर भर देते. भारताचे नवीन शैक्षणिक धोरण २०२० हे या जागतिक उद्दिष्टांशी थेट जोडलेले आहे. यामध्ये बहुविषयक शिक्षण, व्यावसायिक कौशल्ये आणि पर्यावरणीय जाणीव-जागृती यांवर विशेष भर देण्यात आला आहे, जेणेकरून विद्यार्थी केवळ ज्ञान संपादन करणार नाहीत तर ते जबाबदार जागतिक नागरिक बनून शाश्वत भविष्यासाठी योगदान देतील.

या संशोधन निबंधात, NEP २०२० मधील विविध तरतुदींचा शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांशी असलेला परस्परसंबंध तपासून, या धोरणाच्या अंमलबजावणीतील आव्हाने आणि संधींचा एक चिकित्सक अभ्यास मांडण्यात आला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे: (Research Objectives):

या विषयासाठी खालील उद्दिष्टे निश्चित केलेली आहेत:

१. NEP २०२० चा अभ्यास करणे: भारताच्या नवीन शैक्षणिक धोरण २०२० मधील उच्च शिक्षणाशी संबंधित मुख्य तरतुदी आणि उद्दिष्टांचे विश्लेषण करणे.

२. SDG 4 शी परस्परसंबंध तपासणे: संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास उद्दिष्टांपैकी 'उद्दिष्ट ४' (गुणवत्तापूर्ण शिक्षण) साध्य करण्यासाठी NEP २०२० मधील धोरणे कशी पूरक आहेत, याचा अभ्यास करणे.

३. कौशल्य विकासाचा आढावा: शाश्वत रोजगारासाठी NEP २०२० मध्ये अंतर्भूत असलेल्या व्यावसायिक आणि तांत्रिक कौशल्य विकासाच्या संधींचा शोध घेणे.

४. सर्वसमावेशकता आणि समानता: समाजातील वंचित आणि उपेक्षित घटकांसाठी शाश्वत आणि न्याय्य शिक्षण सुनिश्चित करण्याबाबतच्या तरतुदींचे परीक्षण करणे.

५. अंमलबजावणीतील आव्हाने ओळखणे: हे धोरण प्राथमिक स्तरावर राबवताना येणाऱ्या संभाव्य अडचणी आणि आव्हानांचे विश्लेषण करणे.

NEP २०२० आणि शाश्वत विकास यांचा थेट संबंध:

१. बहुविद्याशाखीय आणि आंतरविद्याशाखीय शिक्षण (Multidisciplinary Education): शाश्वत विकासाची आव्हाने (उदा. हवामान बदल, गरिबी) ही एका विषयापुरती मर्यादित नसतात. NEP २०२० ने कला, विज्ञान आणि वाणिज्य यांमधील भिंती पाडून विद्यार्थ्यांना व्यापक विचार करण्यास प्रवृत्त केले आहे. ही (सर्वांगीण) शिक्षण पद्धती शाश्वत भविष्यासाठी आवश्यक असणारे बहुआयामी नेतृत्व तयार करण्यास मदत करते.

२. कौशल्य विकास आणि आर्थिक स्वावलंबन (Skill Development): शाश्वत विकासाचे एक प्रमुख ध्येय म्हणजे 'सन्मानजनक काम आणि आर्थिक वाढ' (SDG 8). नवीन धोरणानुसार सहावीपासून व्यावसायिक शिक्षण अनिवार्य केल्याने आणि उच्च शिक्षणात 'इंटर्नशिप'वर भर दिल्याने विद्यार्थ्यांमध्ये रोजगाराची कौशल्ये विकसित होतील. हे केवळ पदवीधारक नाही, तर स्वावलंबी नागरिक घडवण्यावर भर देते.

३. सर्वसमावेशकता आणि सामाजिक न्याय (Inclusivity & Equity): शाश्वत विकासाचे 'कोणीही मागे राहू नये' (Leave No One Behind) हे तत्व NEP २०२० च्या 'सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या वंचित गट' (SEDGs) साठी असलेल्या विशेष तरतुदींमध्ये दिसून येते. शिष्यवृत्ती, लिंग समावेशन निधी (Gender Inclusion Fund) आणि प्रादेशिक भाषांमधील उच्च शिक्षण यामुळे शिक्षणातील विषमता कमी होण्यास मदत होईल.

४. पर्यावरणपूरक दृष्टीकोन आणि मूल्यशिक्षण (Environmental Education): नवीन धोरणात हवामान बदल, कचरा व्यवस्थापन आणि जैवविविधता या विषयांचा अभ्यासक्रमात समावेश करण्यावर भर दिला आहे. उच्च शिक्षण संस्थांनी केवळ कागदावर नाही, तर प्रत्यक्ष जीवनात 'शाश्वत जीवनशैली' (SDG 12) स्वीकारावी, यासाठी हे धोरण दिशा देते.

५. संशोधन आणि नावीन्य (Research & Innovation): 'नॅशनल रिसर्च फाउंडेशन' (NRF) ची

स्थापना करून शाश्वत तंत्रज्ञान (उदा. सौर ऊर्जा, पाणी शुद्धीकरण) विकसित करण्यावर भर दिला जाणार आहे. हे संशोधन भारताला जागतिक स्तरावर शाश्वत विकासाचा 'नॉलेज हब' बनवण्यासाठी उपयुक्त ठरेल.

६. तंत्रज्ञानाचा वापर आणि डिजिटल साक्षरता (SDG 9: Industry, Innovation, and Infrastructure): NEP २०२० मध्ये 'नॅशनल एज्युकेशनल टेक्नॉलॉजी फोरम' (NETF) ची स्थापना प्रस्तावित आहे. उच्च शिक्षणात ई-लर्निंग, आभासी प्रयोगशाळा (Virtual Labs) आणि डिजिटल संसाधनांचा वापर वाढल्याने कागदाचा वापर कमी होईल आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचेल. हे 'कमी संसाधनात अधिक शिक्षण' या शाश्वत तत्त्वावर आधारित आहे.

७. उच्च शिक्षण संस्थांची स्वायत्तता आणि उत्तरदायित्व: शाश्वत विकासासाठी शिक्षण संस्थांना स्वायत्तता (Autonomy) देणे आवश्यक आहे. NEP २०२० उच्च शिक्षण संस्थांना स्वतःचे अभ्यासक्रम ठरवण्याची मुभा देते. यामुळे संस्था स्थानिक पर्यावरणाशी संबंधित समस्यांवर (उदा. स्थानिक प्रदूषण किंवा शेतीविषयक समस्या) आधारित कोर्सेस सुरू करू शकतात, ज्यामुळे स्थानिक पातळीवर शाश्वत विकास साध्य होईल.

८. भारतीय ज्ञान परंपरा आणि शाश्वत जीवनपद्धती: भारतीय संस्कृतीने नेहमीच निसर्गाशी जुळवून घेण्याची शिकवण दिली आहे. नवीन धोरण 'प्राचीन भारतीय ज्ञान' आधुनिक विज्ञानाशी जोडते. आयुर्वेदाचा अभ्यास, शाश्वत शेती तंत्र आणि निसर्गपूजक संस्कृती यांचा शिक्षणात समावेश केल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये 'शाश्वत उपभोग' (Sustainable Consumption) या विषयाची नैसर्गिक समज निर्माण होईल.

९. जागतिक भागीदारी आणि उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण (SDG 17): NEP २०२० जागतिक दर्जाच्या विद्यापीठांना भारतात येण्यासाठी आणि भारतीय विद्यापीठांना परदेशात विस्तार करण्यासाठी प्रोत्साहन देते. या जागतिक देवाणघेवाणीमुळे 'शाश्वत विकास उद्दिष्टे' साध्य करण्यासाठी लागणारे जागतिक तंत्रज्ञान आणि संशोधनाची भागीदारी मजबूत होईल.

१०. शिक्षक प्रशिक्षण आणि क्षमता बांधणी: शिक्षक हा बदलाचा खरा वाहक असतो. NEP २०२० शिक्षकांच्या निरंतर व्यावसायिक विकासावर भर देते. जोपर्यंत शिक्षक स्वतः शाश्वत विकासाच्या मूल्यांनी प्रेरित होत नाहीत, तोपर्यंत ती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणार नाहीत. या धोरणामुळे शिक्षकांना शाश्वत विकासाचे 'मार्गदर्शक' (Facilitator) म्हणून घडवले जात आहे.

संशोधनातील मुख्य आव्हाने:- (Major Challenges):

१. पायाभूत सुविधांची कमतरता (Infrastructure Issues): NEP २०२० मध्ये डिजिटल शिक्षणावर भर दिला आहे, परंतु ग्रामीण भागातील अनेक उच्च शिक्षण संस्थांमध्ये अजूनही हाय-स्पीड इंटरनेट आणि अद्ययावत संगणक प्रयोगशाळांचा अभाव आहे. शाश्वत विकासासाठी ही दरी सांधणे मोठे आव्हान आहे.

२. आर्थिक तरतूद (Funding/Financial Constraints): धोरणानुसार जीडीपीच्या ६% खर्च शिक्षणावर होणे अपेक्षित आहे. शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधीची गरज आहे, जो सध्याच्या परिस्थितीत उपलब्ध करून देणे कठीण जात आहे.

३. शिक्षकांचे प्रशिक्षण (Teacher Training): पारंपारिक पद्धती सोडून शाश्वत विकासाभिमुख आणि बहुविद्याशाखीय पद्धतीने शिकवण्यासाठी शिक्षकांना मोठ्या प्रमाणावर प्रशिक्षणाची गरज आहे. मानसिकतेत बदल घडवून आणणे हे एक संथ प्रक्रियेचे आव्हान आहे.

४. अंमलबजावणीतील सुसूत्रता (Policy Coordination): भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. प्रत्येक राज्याची भौगोलिक आणि सामाजिक परिस्थिती वेगळी असल्याने, केंद्र आणि राज्य सरकारांमध्ये समन्वय राखून शाश्वत विकासाची उद्दिष्टे देशभर सारख्याच गतीने राबवणे कठीण आहे.

५. गुणवत्ता विरुद्ध संख्या (Quality vs. Quantity): उच्च शिक्षणात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या (GER) वाढवणे आणि त्याच वेळी शिक्षणाचा दर्जा शाश्वत मानकांनुसार राखणे यामध्ये संतुलन राखणे हे मोठे आव्हान आहे.

निष्कर्ष: (Conclusion):

भारताचे नवीन शैक्षणिक धोरण (NEP) २०२० हे केवळ एक धोरणात्मक दस्तऐवज नसून, ते भारतीय उच्च शिक्षण व्यवस्थेला शाश्वत विकासाच्या जागतिक प्रवाहात सामील करणारे एक महत्त्वाचे माध्यम आहे. या संशोधनावरून असे स्पष्ट होते की, हे धोरण संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास उद्दिष्टांशी (SDGs) सुसंगत असून, त्यातील 'बहुविद्याशाखीय शिक्षण' आणि 'कौशल्य विकास' यांसारख्या तरतुदी भविष्यातील आव्हानांना सामोरे जाणारी सक्षम पिढी घडवण्यास मदत करतील.

संशोधनाचा मुख्य निष्कर्ष असा आहे की, शिक्षणाचे उद्दिष्ट केवळ पदवी प्रदान करणे हे नसून, मानवी मूल्यांचे संवर्धन आणि पर्यावरणीय सजगता निर्माण करणे हे आहे. जरी पायाभूत सुविधा आणि निधीची उपलब्धता यांसारखी आव्हाने समोर असली, तरी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि शिक्षण संस्थांची स्वायत्तता यांद्वारे त्यावर मात करता येईल. अंतिमतः, जेव्हा उच्च शिक्षण संस्था स्थानिक समस्यांवर शाश्वत तोडगे शोधतील, तेव्हाच हे धोरण भारताला खऱ्या अर्थाने 'जागतिक ज्ञान महासत्ता' आणि शाश्वत विकासाचा आदर्श म्हणून प्रस्थापित करेल.

संदर्भ सूची (References):

- **अधिकृत सरकारी दस्तऐवज:**

१. शिक्षण मंत्रालय (२०२०). *राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०*. भारत सरकार. www.education.gov.in

२. युनेस्को (२०१७). *शाश्वत विकास उद्दिष्टांसाठी शिक्षण: शिकण्याचे उद्दिष्ट*. [UNESCO Digital Library].

- **पुस्तके आणि अहवाल:**

१. कस्तुरीरंगन, के. (२०१९). *नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा मसुदा*. भारत सरकार.

२. संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम (UNDP). *शाश्वत विकास उद्दिष्टे अहवाल २०२३*.

- **शैक्षणिक जर्नल्स आणि लेख:**

१. शर्मा, आर. (२०२१). "NEP 2020: भारताच्या उच्च शिक्षणातील शाश्वत विकासाचा मार्ग." *इंटरनॅशनल जर्नल ऑफ एज्युकेशनल रिसर्च*.

२. जोशी, ए. आणि कुलकर्णी, एस. (२०२२). "शाश्वत विकासासाठी कौशल्य आधारित शिक्षण आणि NEP २०२० चे योगदान." *भारतीय शिक्षण शास्त्र पत्रिका*.

- **वेब स्रोत:**

१. संयुक्त राष्ट्र (UN). "शाश्वत विकास उद्दिष्टे - मुख्य उद्दिष्ट ४: गुणवत्तापूर्ण शिक्षण." sdgs.un.org

२. नीती आयोग (NITI Aayog). "SDG इंडिया इंडेक्स आणि अहवाल."

ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

March - 2026
Vol. 15 - No. S1

उच्च शिक्षणात भाषिक कौशल्यांचे महत्त्व

श्री.दत्तात्रय तुकाराम आसवले

सहायक प्राध्यापक, रमेश फिरोदिया कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय साकूर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर

***Corresponding Author:** श्री.दत्तात्रय तुकाराम आसवले*

DOI - 10.5281/zenodo.19482133

सारांश:

आजच्या युगात उच्च शिक्षणामध्ये भाषिक कौशल्यांना अत्यंत महत्त्व प्राप्त झाले आहे. शिक्षण, संशोधन, संवाद आणि रोजगाराच्या विविध संधींचा लाभ घेण्यासाठी प्रभावी भाषिक कौशल्य आवश्यक ठरतात. भाषिक कौशल्यांमध्ये ऐकणे, बोलणे, वाचन आणि लेखन या चार मूलभूत कौशल्यांचा समावेश होतो. या कौशल्यांच्या विकासामुळे विद्यार्थ्यांना ज्ञानार्जन सुलभ होते, आत्मविश्वास वाढतो आणि व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते.उच्च शिक्षणामध्ये विद्यार्थी विविध विषयांचा सखोल अभ्यास करतात. त्या वेळी विषयाचे आकलन, संशोधन लेखन, सादरीकरण आणि संवाद यासाठी भाषेवर प्रभुत्व असणे गरजेचे असते. भाषिक कौशल्ये विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाबरोबरच त्यांच्या सामाजिक आणि व्यावसायिक प्रगतीलाही मदत करतात. त्यामुळे उच्च शिक्षणामध्ये भाषिक कौशल्यांचा विकास हा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यावश्यक मानला जातो.

मुख्य शब्द: भाषिक कौशल्ये, संवाद कौशल्य, व्यक्तिमत्त्व विकास, ज्ञानार्जन, रोजगार क्षमता, शैक्षणिक संवाद

प्रस्तावना:

भाषेची भूमिका मानवाच्या सर्वांगीण विकासात अत्यंत महत्त्वाची आहे. भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून ती ज्ञानप्राप्ती, विचारमंथन आणि व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रभावी माध्यम आहे. विशेषतः उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात भाषिक कौशल्यांना अत्यंत महत्त्व प्राप्त झाले आहे. आजच्या जागतिकीकरणाच्या युगात माहितीचे आदान-प्रदान, संशोधन, सादरीकरण आणि संवाद यासाठी प्रभावी भाषिक कौशल्ये आवश्यक ठरतात.उच्च शिक्षणात विद्यार्थ्यांना विविध विषयांचे सखोल अध्ययन करावे लागते. यासाठी वाचन, लेखन, ऐकणे आणि बोलणे या चार मूलभूत भाषिक कौशल्यांचा प्रभावी वापर आवश्यक असतो. जर विद्यार्थ्यांकडे उत्तम भाषिक कौशल्ये असतील तर ते ज्ञान अधिक चांगल्या प्रकारे समजून घेऊ शकतात, आपले विचार प्रभावीपणे मांडू शकतात आणि संशोधन क्षेत्रातही प्रगती करू शकतात. भाषिक कौशल्यामुळे प्रत्येक क्षेत्रात कुशल मनुष्यबळ मिळण्यास मदत होते.त्यामुळे उच्च शिक्षणात भाषिक कौशल्यांचा विकास करणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणून प्रस्तुत शोधनिबंधात उच्च शिक्षणात विशेषता मराठी भाषिक कौशल्ये विकासाचे महत्त्व मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

उद्दिष्टे:

१. उच्च शिक्षणामध्ये भाषिक कौशल्यांचे महत्त्व स्पष्ट करणे.
२. विद्यार्थ्यांच्या ज्ञानार्जनात भाषिक कौशल्यांची भूमिका अभ्यासणे.
३. भाषिक कौशल्यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचा अभ्यास करणे.
४. रोजगाराच्या संधी वाढविण्यामध्ये भाषिक कौशल्यांचे योगदान समजून घेणे.

५. संशोधन आणि शैक्षणिक संवादामध्ये भाषिक कौशल्यांचे महत्त्व स्पष्ट करणे.

गृहीतके:

१. उच्च शिक्षणामध्ये भाषिक कौशल्यांचा विकास झाल्यास विद्यार्थ्यांचे ज्ञानार्जन अधिक प्रभावी होते.

२. प्रभावी भाषिक कौशल्यांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास आणि व्यक्तिमत्त्व विकास घडतो.

३. भाषिक कौशल्ये विकसित झाल्यास विद्यार्थ्यांना रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध होतात.

४. संशोधन कार्यासाठी उत्तम भाषिक कौशल्ये आवश्यक असतात.

उच्च शिक्षण संकल्पना:

उच्च शिक्षण म्हणजे माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणानंतर महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये दिले जाणारे पुढील स्तरावरील शिक्षण होय. या शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विशिष्ट विषयाचे सखोल आणि व्यापक ज्ञान मिळते तसेच त्यांची बौद्धिक क्षमता, विचारशक्ती आणि संशोधनवृत्ती विकसित होते. उच्च शिक्षणामध्ये पदवी, पदव्युत्तर आणि संशोधन अभ्यासक्रमांचा समावेश असतो. या शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञानच मिळत नाही तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा, संवादकौशल्यांचा आणि विविध कौशल्यांचा विकास होतो. समाजातील बदलत्या गरजांनुसार विद्यार्थ्यांना सक्षम, जबाबदार आणि कुशल नागरिक बनविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य उच्च शिक्षणाच्या माध्यमातून केले जाते.

भाषिक कौशल्यांची संकल्पना व प्रकार:

भाषिक कौशल्ये म्हणजे भाषेचा योग्य, प्रभावी आणि सुसंवादी वापर करण्याची क्षमता होय. ही कौशल्ये चार प्रमुख घटकांवर आधारित असतात. भाषा व्यवहार हा कोणत्याही प्रकारचा असो तो परिणामकारकपणे करता यावा यासाठी खालील भाषिक कौशल्य संबंधित केलेली असावीत.

१. ऐकणे– माहिती ग्रहण करण्याची क्षमता. म्हणजेच श्रवण कौशल्य

२. बोलणे– विचार स्पष्टपणे आणि प्रभावीपणे व्यक्त करण्याची क्षमता.

३. वाचन – मजकूर समजून घेण्याची क्षमता.

४. लेखन– विचार लेखी स्वरूपात मांडण्याची क्षमता.

ही चारही कौशल्ये एकमेकांशी संबंधित असून विद्यार्थ्यांच्या बौद्धिक आणि शैक्षणिक विकासासाठी अत्यंत आवश्यक आहेत.आजच्या काळात केवळ आपली मातृभाषाच नाही, तर इंग्रजी किंवा इतर व्यावसायिक भाषांमध्येही ही चारही कौशल्ये असणे 'रोजगारक्षम' होण्यासाठी आवश्यक आहे. सध्याच्या काळात साहित्य, कला, क्रीडा, विज्ञान, वाणिज्य ,संज्ञापन पत्रकारिता, संख्याशास्त्र, इंजिनिअरिंग कोणत्याही शाखेचा विषयाचा विद्यार्थी असो त्याला विविध भाषिक कौशल्य अवगत करावी लागणार आहेत. ज्याचे संवाद कौशल्य उत्तम, तोच स्पर्धेत टिकणार आहे.

उच्च शिक्षणात भाषिक कौशल्ये विकास अभ्यासक्रमांचा समावेश:

विद्यापीठे विविध अभ्यासक्रमांमध्ये संवाद कौशल्य आणि लेखन कौशल्य यांचा समावेश करतात.

१. **भाषा प्रयोगशाळा:** विद्यार्थ्यांच्या उच्चार आणि संवाद कौशल्य विकासासाठी भाषा प्रयोगशाळा उपयोगी ठरतात.

२. **कार्यशाळा आणि प्रशिक्षण कार्यक्रम:** वादविवाद, वक्तृत्व स्पर्धा, सादरीकरण, गटचर्चा इत्यादी उपक्रम आयोजित केले जातात.

३. **संशोधन लेखन प्रशिक्षण:** प्रबंध लेखन, संशोधन लेखन आणि अहवाल लेखनासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते.

४. **डिजिटल साधनांचा वापर:** ऑनलाइन शिक्षण, ई-लर्निंग आणि डिजिटल साधनांचा वापर वाढवला जातो.

उच्च शिक्षणातील विविध अभ्यासक्रमांमध्ये भाषिक कौशल्यांचा समावेश केला जातो.

उदाहरणार्थ: सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा अभ्यासक्रम

बी.ए. – भाषिक कौशल्ये विकास, संवाद कौशल्य, व्यावहारिक मराठी, कार्यक्रम संयोजनातील भाषिक कौशल्य, उपयोजित लेखन कौशल्ये, skill Enhancement course Marathi (SEC) व्यक्तिमत्व विकास आणि भाषा, भाषेची प्राथमिक कौशल्ये, व्यवहारिक व उपयोजित मराठी,

बी.कॉम, बी.एस्सी, बी.बी.ए ,बी.सी.ए – AEC/MIL भाषा जीवनव्यवहार आणि संवाद कौशल्ये

एम.ए. – भाषाविज्ञान, सर्जनशील लेखन, उपयोजित लेखन कौशल्ये

उच्च शिक्षणात भाषिक कौशल्यांचे महत्त्व:

१. ज्ञानार्जन सुलभ होते: उच्च शिक्षणामध्ये विद्यार्थ्यांना विविध विषयांची पुस्तके, संशोधन लेख आणि संदर्भग्रंथ वाचावे लागतात. वाचन आणि ऐकण्याची चांगली क्षमता असल्यास विद्यार्थ्यांना विषय अधिक चांगल्या प्रकारे समजतो. त्याचबरोबर त्यांची आकलन क्षमता वाढते. त्यामुळे ज्ञानार्जनाची प्रक्रिया सुलभ होते.

२. संशोधन कार्यासाठी मदत होते: संशोधन प्रक्रियेत माहिती गोळा करणे, तिचे विश्लेषण करणे आणि निष्कर्ष मांडणे यासाठी लेखन आणि वाचन कौशल्यांची आवश्यकता असते. प्रभावी भाषिक कौशल्ये संशोधन कार्य अधिक स्पष्ट आणि परिणामकारक बनवतात.

३. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो: भाषिक कौशल्ये चांगली असल्यास विद्यार्थ्यांना वर्गात चर्चेत सहभागी होणे, सादरीकरण करणे आणि प्रश्न विचारणे सोपे जाते. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि ते शैक्षणिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतात. करिअरच्या दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांमध्ये भाषिक कौशल्य विकसित झालेली असेल तर विविध मुलाखती देण्यासाठी विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वास वाढतो व विद्यार्थी आत्मविश्वासाने मुलाखतींना सामोरे जातो.

४. रोजगाराच्या संधी वाढतात: आजच्या स्पर्धात्मक युगात संवादकौशल्यांना मोठे महत्त्व आहे. मुलाखत, सादरीकरण आणि कार्यालयीन संवाद यासाठी भाषिक कौशल्ये आवश्यक असतात. त्यामुळे उत्तम भाषिक कौशल्ये असलेल्या विद्यार्थ्यांना रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध होतात.भाषिक कौशल्यांचा विकास झाल्यास विद्यार्थ्यांच्या रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात वाढतात. आजच्या स्पर्धात्मक आणि जागतिकीकरणाच्या युगात केवळ शैक्षणिक ज्ञान पुरेसे नसून प्रभावी संवादकौशल्यही अत्यंत आवश्यक मानले जाते. कोणत्याही क्षेत्रात नोकरी मिळवताना मुलाखत, सादरीकरण, अहवाल लेखन आणि सहकाऱ्यांशी संवाद साधणे या सर्व गोष्टींसाठी चांगल्या

भाषिक कौशल्यांची गरज असते. ज्यांना स्पष्टपणे बोलता येते, योग्य प्रकारे लिहिता येते आणि इतरांचे विचार समजून घेता येतात अशा व्यक्तींना विविध क्षेत्रांमध्ये अधिक संधी मिळतात. प्रशासन, शिक्षण, पत्रकारिता, बँकिंग, उद्योग, सेवा क्षेत्र आणि माहिती तंत्रज्ञान यांसारख्या अनेक क्षेत्रांमध्ये प्रभावी संवादकौशल्याला विशेष महत्त्व दिले जाते. भाषिक कौशल्यांमुळे व्यक्तीला आपल्या कल्पना आणि कामाचे सादरीकरण प्रभावीपणे करता येते, त्यामुळे तिची कार्यक्षमता वाढते आणि नोकरीच्या संधी अधिक उपलब्ध होतात. तसेच बहुभाषिक ज्ञान असल्यास राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरही रोजगाराच्या अधिक संधी निर्माण होतात. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी भाषिक कौशल्यांचा विकास अत्यंत महत्त्वाचा ठरतो.

५. व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते: भाषिक कौशल्ये व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाला अधिक प्रभावी बनवतात. स्पष्ट विचार मांडण्याची क्षमता, योग्य शब्दप्रयोग आणि प्रभावी संवाद यामुळे विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक समृद्ध होते.भाषिक कौशल्यांचा विकास हा व्यक्तिमत्त्व विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा घटक मानला जातो. व्यक्तीचे विचार, भावना आणि अनुभव प्रभावीपणे व्यक्त करण्यासाठी भाषेचे योग्य ज्ञान आणि वापर आवश्यक असतो. एखाद्या व्यक्तीला आपले विचार स्पष्ट, सुसंगत आणि आत्मविश्वासाने मांडता आले तर त्याच्या व्यक्तिमत्त्वात आपोआप प्रभावीपणा निर्माण होतो. चांगली भाषिक कौशल्ये असलेल्या विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक आणि सामाजिक प्रसंगांमध्ये आत्मविश्वासाने संवाद साधता येतो. वर्गातील चर्चा, सादरीकरण, भाषण, वादविवाद किंवा गटचर्चा यांसारख्या उपक्रमांमध्ये ते सक्रियपणे सहभागी होऊ शकतात. यामुळे त्यांच्या विचारशक्तीचा विकास होतो तसेच इतरांच्या मतांचा आदर करून संवाद साधण्याची सवय लागते. वाचन आणि लेखनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे ज्ञान वाढते, शब्दसंपत्ती समृद्ध होते आणि विचारांची मांडणी अधिक प्रभावी होते. त्यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढून त्यांचे सामाजिक आणि शैक्षणिक व्यक्तिमत्त्व अधिक विकसित होते.

निष्कर्ष:

उच्च शिक्षणात विद्यार्थ्यांच्या बौद्धिक, शैक्षणिक आणि व्यावसायिक विकासासाठी भाषिक कौशल्यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. प्रभावी भाषिक कौशल्यांमुळे ज्ञानार्जन सुलभ होते, संशोधन कार्य अधिक परिणामकारक होते आणि विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो. तसेच रोजगाराच्या संधी वाढून व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते. त्यामुळे महाविद्यालय आणि विद्यापीठ स्तरावर भाषिक कौशल्यांच्या विकासासाठी विविध उपक्रम राबविणे आवश्यक आहे.

संदर्भसूची:

१. व्यासपीठ, प्रा.डॉ.महादेव वाळूंज, अक्षर मानव प्रकाशन पुणे, मे २०११
२. मराठी भाषिक कौशल्ये विकास, (संपादक) डॉ. पृथ्वीराज तौर, अथर्व पब्लिकेशन धुळे,१३ जुलै २०१८
३. अक्षर गाथा, (मराठी भाषा विशेषांक)संपादक मा.मा. जाधव, ऑक्टोबर २०२३.
४. व्यक्तिमत्व विकास आणि भाषिक कौशल्ये, (संपादक) नीला जोशी, दर्या प्रकाशन, फेब्रुवारी २०२०
५. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे वेबसाईट. https://www.unipune.ac.in/

ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

March - 2026
Vol. 15 - No. S1

शाश्वत विकासात युवकांची प्रमुख भूमिका

म्हतू तात्याबा खेमनर

सहाय्यक प्राध्यापक, रमेश फिरोदिया कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, साकुर, संगमनेर जि-अहिल्यानगर

***Corresponding Author:** म्हतू तात्याबा खेमनर*

DOI - 10.5281/zenodo.19482159

सारांश:

शाश्वत विकास (Sustainable Development) हा आजच्या काळातील अत्यंत महत्त्वाचा जागतिक विषय आहे. सध्याच्या पिढीच्या गरजा पूर्ण करताना भविष्यातील पिढ्यांच्या गरजांवर परिणाम होणार नाही अशा प्रकारे विकास करणे ही शाश्वत विकासाची मूलभूत संकल्पना आहे. या प्रक्रियेत युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. युवक हे समाजातील सर्वात ऊर्जावान, सर्जनशील आणि परिवर्तनशील घटक असल्यामुळे ते पर्यावरण संरक्षण, सामाजिक समता आणि आर्थिक विकास या तिन्ही क्षेत्रांमध्ये सकारात्मक बदल घडवू शकतात.

या संशोधन लेखाचा उद्देश युवकांमध्ये शाश्वत विकासाबाबत जागरूकता निर्माण करणे, तसेच शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि महिलांच्या सक्षमीकरणाच्या माध्यमातून युवकांचे योगदान अभ्यासणे हा आहे. यामध्ये युवकांची पर्यावरण संरक्षण, जलसंधारण, कचरा व्यवस्थापन, नवीकरणीय ऊर्जा, हरित तंत्रज्ञान आणि नवकल्पना यामधील भूमिका स्पष्ट करण्यात आली आहे. तसेच शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी युवकांची नेतृत्व क्षमता, डिजिटल साक्षरता आणि धोरणनिर्मितीतील सहभाग यांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले आहे.

याशिवाय युवकांच्या भूमिकेसमोरील आव्हाने जसे की बेरोजगारी, गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा अभाव, जागरूकतेची कमतरता, संसाधनांची कमतरता आणि डिजिटल दरी यांचा देखील अभ्यास करण्यात आला आहे. या आव्हानांवर मात करण्यासाठी शिक्षण, प्रशिक्षण, तंत्रज्ञानाचा वापर, शासनाच्या योजना आणि सामाजिक सहभाग यांसारख्या उपाययोजना सुचविण्यात आल्या आहेत. निष्कर्षतः असे दिसून येते की योग्य शिक्षण, कौशल्य विकास आणि संधी उपलब्ध झाल्यास युवक शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांच्या पूर्ततेत महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकतात. त्यामुळे युवकांना सक्षम करून त्यांना विकास प्रक्रियेत सक्रिय सहभाग देणे हे शाश्वत भवितव्य घडवण्यासाठी अत्यावश्यक आहे.

मुख्य शब्द: शाश्वत विकास, युवकांची भूमिका, पर्यावरण संरक्षण, सामाजिक समता, आर्थिक विकास, हवामान बदल, हरित तंत्रज्ञान, हरित अर्थव्यवस्था, जलसंधारण, कचरा व्यवस्थापन, डिजिटल साक्षरता

प्रस्तावना:

शाश्वत विकासात (Sustainable Development) युवा शक्तीची भूमिका निर्णायक आहेकारण ते नाविन्यपूर्ण कल्पना तंत्रज्ञान आणि उत्साहाद्वारे पर्यावरणीय स्थिरता, सामाजिक समानता आणि आर्थिक वाढ साध्य करू शकतात. शिक्षण हरित उपक्रम डिजिटल साक्षरता आणि धोरण निर्मितीतील सहभागातून युवक शाश्वत भवितव्य घडवू शकतात.*भारतासारख्या विकासशील देशात युवकांच्या शाश्वत विकास प्रक्रियेत सहभागाच्या संभावनांची तपासणी करणे, त्याचे परिणाम आणि शैक्षणिक पद्धतीचे महत्त्व याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. शाश्वत विकासाचे तीन मुख्य घटक - पर्यावरणीय स्थिरता, सामाजिक समावेश, आणि आर्थिक विकास हे युवकांना एकत्रितपणे मार्गदर्शन करतात. भारतीय युवकांना या तिन्ही क्षेत्रांमध्ये आपला प्रभाव कसा वाढवता येईल याचा अभ्यास केला आहे. शैक्षणिक पद्धतींमध्ये*

शाश्वत विकासामध्ये तत्त्वज्ञानाच्या समावेशाने युवकांची भूमिका वाढवू शकते म्हणून युवकांना शाश्वत विकासाचे शिक्षण देणे आवश्यक आहे. भारतीय युवकांनी शाश्वत विकासाच्या प्रक्रियेत एक सक्रिय भूमिका घ्यावी, यासाठी शैक्षणिक संस्थांना मार्गदर्शन व संसाधन प्रदान करणं महत्त्वाचे आहे. शाश्वत विकासात तरुण हे बदलाचे अग्रदूत आणि नाविन्यपूर्ण कल्पनांचे वाहक आहेत.गरिबी, असमानता आणि पर्यावरणीय समस्यांवर डिजिटल साधने व तंत्रज्ञानाचा वापर करून व्यावहारिक उपाय शोधण्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकतात.ते स्थानिक आणि जागतिक स्तरावर हरित उपक्रम धोरण निर्मिती आणि शाश्वत जीवनशैलीचा प्रसार करून शाश्वत भवितव्य घडवू शकतात.

उद्दिष्टे:

1. युवकांमध्ये पर्यावरणीय, सामाजिक आणि आर्थिक दृष्टिकोनातून शाश्वत विकासाबद्दल जागरूकता निर्माण करणे.
2. युवकांचा शाश्वत विकासाच्या उद्देशांमध्ये शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि महिलांच्या सक्षमीकरणासाठी योगदान अभ्यासणे.
3. पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी युवकांना एकत्र करून विविध पर्यावरणीय कार्य आणि उपाय योजनांचे प्रमोचन करणे.
4. युवकांमध्ये नेतृत्व क्षमता निर्माण करणे, जेणेकरून ते शाश्वत विकासाच्या दृष्टीने समाजातील इतर घटकांना प्रेरित करू शकतील हे पाहणे .
5. भविष्यात शाश्वत विकास साधण्यासाठी युवकांची अत्यावश्यक भूमिका काय असू शकते यावर विचार करणे.

गृहीतके:

1. पर्यावरण संरक्षणाबाबत जागरूक असलेले युवक शाश्वत विकासासाठी अधिक सकारात्मक उपक्रम राबवतात.
2. शिक्षण आणि तंत्रज्ञानाचा वापर युवकांना शाश्वत विकासाशी संबंधित समस्यांचे समाधान शोधण्यास मदत करतो.
3. युवकांमध्ये पर्यावरण व सामाजिक जबाबदारीबद्दलची जाणीव वाढल्यास शाश्वत विकासाच्या उपक्रमांना अधिक बळ मिळते.
4. सामाजिक आणि स्वयंसेवी संस्थांमध्ये सहभागी होणारे युवक शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांना अधिक प्रभावीपणे पुढे नेतात.

शाश्वत विकास:

शाश्वत विकास (Sustainable Development) म्हणजे सध्याच्या पिढीच्या गरजा पूर्ण करताना भविष्यातील पिढ्यांच्या गरजांवर परिणाम होणार नाही अशा प्रकारे विकास करणे.यामध्ये तीन मुख्य घटक असतात

- पर्यावरण संरक्षण
- आर्थिक विकास
- सामाजिक समता

शाश्वत विकासात युवकांची प्रमुख भूमिका:

1. **पर्यावरण संरक्षण आणि जलव्यवस्थापन:** हवामान बदलाचा मुकाबला करण्यासाठी युवक 'क्लायमेट ॲक्शन' मध्ये (Climate Action) अग्रेसर आहेत. वृक्षारोपण पाणी बचत आणि पुनर्वापर यांसारख्या स्थानिक पातळीवरील उपायांद्वारे ते पर्यावरण संरक्षणात योगदान देत आहेत.

2. **नाविन्यपूर्ण उपाय आणि तंत्रज्ञान (Innovation & Tech):** तरुण पिढी तंत्रज्ञानाचा वापर करून हरित ऊर्जा (Green Energy) स्मार्ट कृषी आणि शाश्वत व्यवसायांना प्रोत्साहन देत आहे.
3. **आर्थिक शाश्वतता आणि स्टार्टअप्स:** स्टार्टअप इंडिया सारख्या योजनांचा वापर करूनयुवक शाश्वत उत्पादने आणि सेवा विकसित करून 'हरित अर्थव्यवस्था' (Green Economy) वाढवण्यास मदत करत आहेत.
4. **धोरण निर्मिती आणि राजकीय सहभाग:** राष्ट्रीय युवा धोरणांतर्गत निर्णय प्रक्रियेत आणि धोरण निर्मितीत युवकांचा सहभाग वाढल्याने समावेशक विकासाला चालना मिळत आहे.
5. **बदलाचे वाहक (Agents of Change):** तरुण हे सामाजिक बदलाचे अग्रदूत आहेत. ते पर्यावरणाचे रक्षण, जैवविविधता संवर्धन आणि हरित तंत्रज्ञान यांसारख्या विषयांवर सक्रियपणे काम करतात .
6. **नाविन्यपूर्ण कल्पना आणि तंत्रज्ञान (Innovation & Technology):** तरुण डिजिटल साधनांचा वापर करून शाश्वत विकासासाठी (SDGs) नवीन उपाय शोधतात. ते हवामान बदलाच्या परिणामांना तोंड देण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करून उपाययोजना करतात
7. **धोरणनिर्मिती आणि जबाबदारी (Policy and Accountability):** तरुण हे सरकारला पर्यावरणाशी संबंधित आश्वासने पूर्ण करण्यासाठी जबाबदार धरतात. ते स्थानिक आणि राष्ट्रीय धोरणांमध्ये तरुणांचे विचार मांडून बदल घडवू शकतात
8. **शिक्षण आणि सक्षमीकरण (Education and Empowerment):** शिक्षण आणि माहिती साक्षरतेद्वारे तरुण हरित कौशल्ये (Green Skills) जोपासतात ज्यामुळे ते शाश्वत विकासात नेतृत्व करण्यास सक्षम बनतात
9. **शाश्वत जीवनशैली (Sustainable Lifestyles):** तरुण स्वतःच्या दैनंदिन सवयींमध्ये बदल करूनजसे की ऊर्जा बचत आणि शाश्वत उत्पादनांचा वापर सामाजिक जबाबदारीचे भान ठेवतात .

शाश्वत विकासातील युवकांची पाऊले:

शाश्वत विकासात आपली भूमिका ही आहे की पृथ्वीवरील संसाधनांचा जबाबदारीने वापर केला जाईल आणि आपल्या कृतींचा पर्यावरणावर नकारात्मक परिणाम होणार नाही याची खात्री करणे. याचा अर्थ आपला स्वतःचा कचरा कमी करणे, ऊर्जा आणि पाणी वाचवणे व आपल्या पर्यावरणाच्या आरोग्याला चालना देणाऱ्या उपक्रमांमध्ये सहभागी होणे. शाश्वत विकास म्हणजे भविष्यातील पिढ्यांसाठी संसाधनांचा अशा प्रकारे वापर करण्याची प्रक्रिया आहे जी त्यांचे जतन करते.

शाश्वत विकासातील पहिले पाऊल म्हणजे स्वतःचा कचरा कमी करणे. आपण कमीत कमी वस्तू खरेदी करून, पुनर्वापर करून आणि अन्नाचे कचऱ्याचे कंपोस्टिंग करून करू शकतो. आपण हे देखील सुनिश्चित करू शकतो की, आपली उत्पादने जैवविघटनशील किंवा पुनर्वापर करण्यायोग्य सामग्रीपासून बनविली जातात. आपला स्वतःचा कचरा कमी केल्याने केवळ संसाधनांचे जतन होण्यास मदत होत नाही तर प्रदूषण कमी होण्यास देखील मदत होते.

शाश्वत विकासातील दुसरे पाऊल म्हणजे ऊर्जा आणि पाणी वाचवणे. आपण ऊर्जा कार्यक्षम उपकरणे वापरून, वापरात नसताना दिवे आणि इलेक्ट्रॉनिक्स बंद

करून आणि पाण्याचा काटकसरीने वापर करून हे करू शकतो. आपण सौर आणि पवन ऊर्जा सारख्या अक्षय ऊर्जा स्रोतांकडे देखील वळू शकतो. ऊर्जा आणि पाणी वाचवल्याने प्रदूषण कमी होण्यास मदत होते आणि पृथ्वीवरील संसाधने टिकवून ठेवण्यास मदत होते.

शाश्वत विकासातील तिसरी पायरी म्हणजे पर्यावरणाच्या आरोग्याला चालना देणाऱ्या उपक्रमांमध्ये सहभागी होणे. यामध्ये स्वच्छता प्रयत्नांमध्ये सहभागी होणे, संवर्धन उपक्रमांना पाठिंबा देणे आणि पर्यावरणपूरक धोरणांना पाठिंबा देणे समाविष्ट आहे. आपण कार्बन डायऑक्साइड शोषण्यास मदत करण्यासाठी आणि आपल्या वातावरणातील ऑक्सिजनचे प्रमाण वाढवण्यासाठी झाडे आणि इतर वनस्पती देखील लावू शकतो.

भविष्यातील पिढ्यांसाठी पृथ्वीवरील संसाधनांचे जतन करण्याचा शाश्वत विकास हा एक महत्त्वाचा भाग आहे. आपल्या कृतींचा पर्यावरणावर नकारात्मक परिणाम होणार नाही आणि आपल्या संसाधनांचा जबाबदारीने वापर केला जाईल याची खात्री करण्यात आपल्या सर्वांची भूमिका आहे. आपला स्वतःचा कचरा कमी करून, ऊर्जा आणि पाणी वाचवून आणि आपल्या पर्यावरणाच्या आरोग्याला चालना देणाऱ्या उपक्रमांमध्ये सहभागी होऊन, आपण भविष्यातील पिढ्यांसाठी पृथ्वीवरील संसाधने उपलब्ध आहेत याची खात्री करण्यास मदत करू शकतो.

शाश्वत विकासात युवकांच्या प्रमुख भूमिकेचे महत्त्व:

1. सामाजिक परिवर्तनाचे नेतृत्व: युवक हे समाजातील सर्वात ऊर्जावान आणि नवोन्मेषी घटक असतात. ते सामाजिक समस्यांबाबत जागरूकता निर्माण करून पर्यावरण संरक्षण, शिक्षण, आरोग्य आणि समानता यांसारख्या क्षेत्रात सकारात्मक बदल घडवू शकतात.

2. पर्यावरण संरक्षणासाठी योगदान: शाश्वत विकासामध्ये पर्यावरणाचे संरक्षण हा मुख्य घटक आहे. युवक वृक्षारोपण, पाणी संवर्धन, कचरा व्यवस्थापन, आणि प्रदूषण कमी करण्यासाठी विविध मोहिमा राबवू शकतात त्यामुळे पर्यावरण संतुलन राखण्यास मदत होते.

3. तंत्रज्ञान व नवकल्पना: युवक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून शाश्वत उपाय शोधू शकतात. डिजिटल तंत्रज्ञान, नवीकरणीय ऊर्जा, स्मार्ट शेती आणि पर्यावरणपूरक उद्योग यामध्ये युवक नवकल्पना करून विकास अधिक टिकाऊ बनवू शकतात.

4. जनजागृती आणि सहभाग: युवक समाजातील इतर घटकांना शाश्वत विकासाचे महत्त्व पटवून देऊ शकतात. शाळा, महाविद्यालये आणि सामाजिक माध्यमांद्वारे जनजागृती करून लोकांचा सहभाग वाढवणे हे युवकांच्या माध्यमातून अधिक प्रभावीपणे घडते.

5. भविष्यातील नेतृत्व: आजचे युवक हे उद्याचे नेते आहेत. जर युवकांना शाश्वत विकासाची जाणीव असेल तर भविष्यातील धोरणे आणि विकास योजना अधिक पर्यावरणपूरक आणि सामाजिकदृष्ट्या न्याय्य बनतील.

युवकांच्या भूमिकेसमोरील प्रमुख आव्हाने:

1. **बेरोजगारी व आर्थिक अस्थिरता:** युवकांमध्ये वाढती बेरोजगारी, अपुरी कौशल्ये आणि अस्थिर रोजगाराच्या संधी यामुळे त्यांची सामाजिक व आर्थिक सहभागिता मर्यादित होते.
2. **गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा अभाव:** ग्रामीण व शहरी भागांतील शैक्षणिक असमानता, कौशल्याधारित

शिक्षणाचा अभाव आणि पर्यावरणीय शिक्षणाची कमतरता ही मोठी अडचण आहे.

3. **जागरूकतेचा अभाव:**शाश्वत विकास, पर्यावरण संरक्षण, हवामान बदल, सामाजिक न्याय यांसारख्या मुद्द्यांविषयी पुरेशी माहिती नसणे.
4. **संसाधनांची कमतरता:** नवकल्पना राबवण्यासाठी निधी, तांत्रिक साधने आणि मार्गदर्शन यांचा अभाव दिसून येतो.
5. **राजकीय व सामाजिक सहभागातील मर्यादा:** धोरणनिर्मिती प्रक्रियेत युवकांचा मर्यादित सहभाग असल्यामुळे निर्णय प्रक्रियेत त्यांचा आवाज कमी प्रमाणात ऐकला जातो.
6. **डिजिटल दरी:** तंत्रज्ञान आणि इंटरनेट सुविधा सर्व युवकांपर्यंत समान रीतीने उपलब्ध नसल्यामुळे माहिती व संधींची असमानता वाढते.
7. **पर्यावरणीय व सामाजिक संकटे:** हवामान बदल, प्रदूषण, सामाजिक विषमता यांसारख्या समस्यांचा थेट परिणाम युवकांच्या भविष्यातील संधींवर होतो.
8. **मानसिक आरोग्याच्या समस्या:** स्पर्धा, बेरोजगारी, सामाजिक दडपण यांमुळे मानसिक तणाव वाढतो ज्याचा त्यांच्या सहभागावर परिणाम होतो.
9. **लैंगिक व सामाजिक भेदभाव:** काही समाज घटकांतील युवक विशेषतः मुली व वंचित घटक यांना समान संधी मिळत नाहीत.
10. **कौशल्य-विकासातील तफावत:** उद्योग व शिक्षण यांच्यातील विसंगतीमुळे आवश्यक कौशल्यांचा अभाव निर्माण होतो.

उपाययोजना:

युवकांची भूमिका अधिक प्रभावी करण्यासाठी काही उपाय पुढीलप्रमाणे आहेत

1. शाश्वत विकास विषयक शिक्षण वाढवणे.
2. युवकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे.
3. पर्यावरणीय प्रकल्पांना आर्थिक मदत देणे.
4. युवकांना धोरणनिर्मितीत सहभागी करणे.
5. तंत्रज्ञान आणि संशोधनाला प्रोत्साहन देणे.

शिपारशी:

1. शिक्षण आणि जनजागृती: शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये शाश्वत विकासाविषयी विशेष अभ्यासक्रम सुरू करणे आवश्यक आहे. युवकांना पर्यावरण संरक्षण, ऊर्जा बचत, जलसंधारण याबाबत प्रशिक्षण देऊन सोशल मीडिया आणि डिजिटल माध्यमांचा वापर करून युवकांनी समाजात जनजागृती करणे गरजेचे आहे.

2. पर्यावरणपूरक उपक्रमात सहभाग: युवकांनी वृक्षारोपण, स्वच्छता मोहीम, प्लास्टिकमुक्त उपक्रम यामध्ये सक्रिय सहभाग घेऊन स्थानिक पातळीवर जलसंधारण, कचरा व्यवस्थापन आणि जैवविविधतेचे संरक्षण यासाठी युवकांचे स्वयंसेवी गट तयार करावेत.

3. तंत्रज्ञानाचा सकारात्मक वापर: युवकांनी हरित तंत्रज्ञान (Green Technology) आणि नवीकरणीय ऊर्जा (सौर ऊर्जा, पवन ऊर्जा) यांचा प्रसार समाजात करून शाश्वत विकासासाठी डिजिटल उपाय, ॲप्स आणि नवकल्पना विकसित करणे आवश्यक आहे.

4. सामाजिक आणि आर्थिक जबाबदारी: युवकांनी स्थानिक उद्योग, स्वदेशी उत्पादने आणि पर्यावरणपूरक व्यवसायांना प्रोत्साहन देऊन रोजगार निर्मिती आणि कौशल्य विकासावर भर देणे गरजेचे आहे.

5. शासन आणि धोरणांमध्ये सहभाग: युवकांनी शाश्वत विकासाशी संबंधित सरकारी योजनांमध्ये सहभागी होऊन स्थानिक स्वराज्य संस्था आणि सामाजिक संघटनांसोबत काम करून विकास प्रक्रियेत सहभाग घेणे गरजेचे आहे.

6. नेतृत्व आणि स्वयंसेवा: युवकांनी नेतृत्व गुण विकसित करून समाजात सकारात्मक बदल घडवून आणावा तसेच स्वयंसेवी संस्था आणि युवक संघटनांमार्फत शाश्वत विकासाचे कार्यक्रम राबविले जावेत.

निष्कर्ष:

युवकांची भूमिका केवळ लाभार्थी म्हणून नाहीतर ते बदलाचे प्रतिनिधी म्हणून काम करत आहेत. योग्य शिक्षण कौशल्यांचा विकास आणि संधी मिळाल्यास युवक भारताला शाश्वत विकासाच्या ध्येयांपर्यंत वेगाने पोहोचवू शकतात. जगासमोर शाश्वत विकासाला चालना देण्याचे अभूतपूर्व आव्हान आहे आणि तरुणांची भूमिका दिवसेंदिवस महत्त्वाची बनत चालली आहे. ज्यामुळे शाश्वत विकास प्रयत्नांमध्ये त्यांचा सहभाग महत्त्वाचा बनेल. यामुळे शाश्वत विकासात तरुणांची भूमिका आणि संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास उद्दिष्टांच्या साध्यतेमध्ये ते कसे योगदान देऊ शकतात याचा अभ्यास करता येईल. तरुणांना बदलाचे प्रतिनिधी बनण्यासाठी सक्षम करण्याचे महत्त्व आणि त्यांच्या कृतींचा त्यांच्या सभोवतालच्या जगावर कसा परिणाम होऊ शकतो याचा अभ्यास करता येऊ शकतो.

संदर्भ सूची:

1. United Nations. (2015). transforming our world- The 2030 agenda for sustainable development.
2. UNESCO. (2017). Education for sustainable development goals- Learning objectives.
3. United Nations Development Programme. (2020).Youth and the SDGs.
4. NITI Aayog. (2021).SDG India Index.
5. Ministry ofYouth Affairs and Sports. (2014).National Youth Policy.

ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

March - 2026
Vol. 15 - No. S1

उच्च शिक्षण आणि शाश्वत विकास : आव्हाने, संधी व भारतीय परिप्रेक्ष्य

प्रा. कासार हर्षद सुहास

सहाय्यक प्राध्यापक, इतिहास,

एकता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सावेडी अहिल्यानगर, महाराष्ट्र

***Corresponding Author:* प्रा. कासार हर्षद सुहास**

DOI - 10.5281/zenodo.19482187

सारांश:

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात उच्च शिक्षण ही केवळ पदवी देणारी व्यवस्था न राहता समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन बनली आहे. शाश्वत विकासाच्या संकल्पनेला चालना देण्यासाठी उच्च शिक्षण संस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. पर्यावरणीय संतुलन, सामाजिक समता आणि आर्थिक विकास या तीन आधारस्तंभांवर आधारित शाश्वत विकास साध्य करण्यासाठी उच्च शिक्षण व्यवस्थेचा पुनर्विचार आवश्यक आहे. प्रस्तुत संशोधन निबंधात उच्च शिक्षण आणि शाश्वत विकास यांमधील परस्परसंबंध, भारतातील उच्च शिक्षण संस्थांची भूमिका, धोरणात्मक पातळीवरील प्रयत्न, तसेच त्यातील आव्हाने आणि संधी यांचा अभ्यास करण्यात आलेला आहे

प्रस्तावना:

२१ व्या शतकात मानवजातीसमोरील सर्वात मोठे आव्हान म्हणजे विकास आणि पर्यावरण यामधील संतुलन राखणे. औद्योगिकीकरण, नागरीकरण आणि तंत्रज्ञानाच्या अतिवापरामुळे नैसर्गिक संसाधनांचा ऱ्हास होत आहे. या पार्श्वभूमीवर शाश्वत विकास ही संकल्पना उदयास आली.उच्च शिक्षण संस्था या ज्ञाननिर्मितीचे केंद्र असल्याने, शाश्वत विकासाची मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याची जबाबदारी त्यांच्यावर येते. म्हणूनच उच्च शिक्षण आणि शाश्वत विकास यांचा अभ्यास करणे काळाची गरज आहे.

शाश्वत विकास : संकल्पना आणि अर्थ

शाश्वत विकास म्हणजे असा विकास जो वर्तमान पिढीच्या गरजा पूर्ण करताना भविष्यातील पिढ्यांच्या गरजांवर गदा आणत नाही.

शाश्वत विकासाचे तीन मुख्य आधारस्तंभ आहेत :

पर्यावरणीय शाश्वतता:

पर्यावरणीय शाश्वतता म्हणजे नैसर्गिक संसाधनांचा विवेकपूर्ण आणि मर्यादित वापर करून पर्यावरणाचा समतोल राखणे होय. यामध्ये हवा, पाणी, जमीन, वनसंपदा आणि जैवविविधतेचे संरक्षण महत्त्वाचे मानले जाते. उच्च शिक्षण संस्थांमार्फत पर्यावरणीय शिक्षण, वृक्षारोपण, जलसंधारण, ऊर्जा बचत आणि कचरा व्यवस्थापन यांसारख्या उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणपूरक दृष्टिकोन विकसित करता येतो. अशा उपक्रमांमुळे पर्यावरण संवर्धनास चालना मिळून शाश्वत विकासाची उद्दिष्टे साध्य होण्यास मदत होते.

सामाजिक शाश्वतता:

सामाजिक शाश्वतता म्हणजे समाजातील सर्व घटकांना समान संधी, न्याय आणि सन्मान मिळेल अशी व्यवस्था निर्माण करणे होय. यामध्ये सामाजिक समता, समावेशक शिक्षण, लैंगिक समानता, दुर्बल घटकांचे सक्षमीकरण आणि मानवी हक्कांचे संरक्षण यांचा समावेश

होतो. उच्च शिक्षण संस्थांद्वारे मूल्याधिष्ठित शिक्षण, समाजाभिमुख उपक्रम आणि सामुदायिक सहभाग वाढवून सामाजिक जाणीव निर्माण करता येते. त्यामुळे सामाजिक सलोखा टिकून राहून दीर्घकालीन शाश्वत विकास साध्य होण्यास मदत होते.

आर्थिक शाश्वतता:

आर्थिक शाश्वतता म्हणजे उपलब्ध आर्थिक संसाधनांचा कार्यक्षम आणि संतुलित वापर करून दीर्घकालीन विकास साधणे होय. यामध्ये रोजगारनिर्मिती, कौशल्यविकास, उत्पन्नवाढ आणि आर्थिक स्थैर्य यांवर भर दिला जातो. उच्च शिक्षण संस्थांद्वारे कौशल्याधारित शिक्षण, उद्योजकता विकास आणि संशोधन–नवोपक्रमांना प्रोत्साहन देऊन आर्थिक शाश्वतता साध्य करता येते. ही तीनही परिमाणे समन्वयाने विकसित झाल्यासच शाश्वत विकास साध्य होऊ शकतो.

उच्च शिक्षणाची भूमिका उच्च शिक्षण संस्थांची भूमिका खालीलप्रमाणे महत्त्वाची ठरते:

१. अभ्यासक्रम विकास पर्यावरण अध्ययन, हवामान बदल, शाश्वत विकास उद्दिष्टे (SDGs) यांचा समावेश अभ्यासक्रमात केल्यास विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण होते.

२. संशोधन आणि नवोपक्रम ऊर्जा संवर्धन, जलव्यवस्थापन, सेंद्रिय शेती, हरित तंत्रज्ञान यासंबंधी संशोधनातून समाजोपयोगी उपाय सुचविता येतात.

३. सामाजिक जबाबदारी NSS, NCC, विस्तार उपक्रम, ग्रामस्वच्छता, वृक्षारोपण, जलसंधारण अशा उपक्रमांद्वारे विद्यार्थी समाजाशी जोडले जातात.

भारतीय उच्च शिक्षण आणि शाश्वत विकास:

भारतामध्ये राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० अंतर्गत बहुविषयक शिक्षण, कौशल्याधारित शिक्षण आणि मूल्याधिष्ठित शिक्षणावर भर देण्यात आला आहे.उच्च शिक्षण संस्थांनी पर्यावरणपूरक कॅम्पस, डिजिटल शिक्षण, ऊर्जा बचत, प्लास्टिकमुक्त परिसर यांसारखे उपक्रम राबविणे अपेक्षित आहे.

उच्च शिक्षणातील आव्हाने:

उच्च शिक्षणातून शाश्वत विकास साध्य करताना पुढील अडचणी येतात

१. आर्थिक संसाधनांची कमतरता: उच्च शिक्षण संस्थांमध्ये आर्थिक संसाधनांची कमतरता ही शाश्वत विकासाच्या उपक्रमांमधील एक महत्त्वाची अडचण आहे. अपुरा निधी, मर्यादित अनुदाने आणि पायाभूत सुविधांचा अभाव यामुळे संशोधन, नवोपक्रम तसेच पर्यावरणपूरक उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात अडथळे निर्माण होतात.

२. संशोधन संस्कृतीचा अभाव: उच्च शिक्षण संस्थांमध्ये संशोधन संस्कृतीचा अभाव ही शाश्वत विकासाच्या दृष्टीने एक गंभीर समस्या आहे. अध्यापनावर अधिक आणि संशोधनावर तुलनेने कमी भर दिला जात असल्यामुळे नावीन्यपूर्ण संशोधनाची गती मंदावते. संशोधनासाठी आवश्यक मार्गदर्शन, आर्थिक सहाय्य, संशोधन सुविधा आणि प्रोत्साहन यांचा अभाव असल्याने शिक्षक व विद्यार्थी संशोधनाकडे कमी प्रमाणात वळतात. परिणामी, समाजोपयोगी आणि शाश्वत विकासास पूरक संशोधन निर्मिती मर्यादित राहते

३. ग्रामीण व शहरी शिक्षणातील दरी: ग्रामीण आणि शहरी भागातील उच्च शिक्षण संस्थांमध्ये उपलब्ध सुविधा, तंत्रज्ञान, अनुभवी मनुष्यबळ आणि शैक्षणिक संधी यामध्ये

मोठी तफावत आढळते. शहरी संस्थांमध्ये संशोधन सुविधा, डिजिटल साधने आणि औद्योगिक सहकार्य अधिक प्रमाणात उपलब्ध असते, तर ग्रामीण संस्थांमध्ये या घटकांचा अभाव जाणवतो. या असमानतेमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षण व संशोधनाच्या संधी मर्यादित राहतात. परिणामी, शाश्वत आणि समतोल शैक्षणिक विकास साधण्यात अडथळे निर्माण होतात.

४. शिक्षक प्रशिक्षणाचा अभाव: उच्च शिक्षण संस्थांमध्ये शिक्षक प्रशिक्षणाचा अभाव ही शाश्वत विकासाच्या अंमलबजावणीतील एक महत्त्वाची अडचण आहे. नवीन अध्यापन पद्धती, संशोधन तंत्रे, माहिती-तंत्रज्ञानाचा वापर आणि शाश्वत विकासाशी संबंधित संकल्पना यांचे नियमित प्रशिक्षण शिक्षकांना मिळत नाही. परिणामी, अध्यापन–संशोधनाची गुणवत्ता प्रभावित होते आणि शाश्वत विकासाचे उद्दिष्ट अभ्यासक्रम व प्रत्यक्ष उपक्रमांमध्ये प्रभावीपणे समाविष्ट करता येत नाही.

५. धोरणांची अंमलबजावणी मर्यादित: उच्च शिक्षणाशी संबंधित विविध शैक्षणिक आणि शाश्वत विकास धोरणे अस्तित्वात असली तरी त्यांची प्रभावी अंमलबजावणी अनेकदा मर्यादित राहते. प्रशासनिक अडथळे, समन्वयाचा अभाव, निधीची कमतरता आणि निरीक्षण यंत्रणेची कमजोरी यामुळे धोरणांचे अपेक्षित परिणाम साध्य होत नाहीत. परिणामी, शाश्वत विकासाशी संबंधित उद्दिष्टे कागदावरच मर्यादित राहून प्रत्यक्ष शिक्षण व्यवस्थेत पूर्णतः उतरू शकत नाहीत

संधी आणि उपाययोजना:

उच्च शिक्षण संस्थांसाठी पुढील संधी उपलब्ध आहेत:

१. आंतरशाखीय संशोधन: उच्च शिक्षण संस्थांमध्ये आंतरशाखीय संशोधनाचा अभाव ही शाश्वत विकासाशी संबंधित एक महत्त्वाची समस्या आहे. विविध विषयांमधील समन्वयाचा अभाव, विभागीय मर्यादा आणि स्वतंत्र विषयकेंद्रित दृष्टीकोन यामुळे संयुक्त संशोधनास अडथळे निर्माण होतात. तसेच, आंतरशाखीय संशोधनासाठी आवश्यक धोरणात्मक पाठबळ, मार्गदर्शन आणि संसाधने अपुरी असल्याने संशोधकांचा सहभाग मर्यादित राहतो. परिणामी, बहुआयामी सामाजिक व पर्यावरणीय समस्यांवर समग्र आणि प्रभावी उपाय सुचविणे कठीण होते

२. स्थानिक समस्या – स्थानिक उपाय: शाश्वत विकासाच्या दृष्टीने स्थानिक समस्या ओळखून त्यावर स्थानिक पातळीवर आधारित उपाययोजना करणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. पाणीटंचाई, कचरा व्यवस्थापन, शेतीविषयक अडचणी किंवा रोजगारनिर्मिती यांसारख्या स्थानिक समस्यांचा अभ्यास करून उच्च शिक्षण संस्थांद्वारे संशोधन व विस्तार उपक्रम राबविता येतात. स्थानिक गरजा, संसाधने आणि सामाजिक परिस्थिती लक्षात घेऊन विकसित केलेले उपाय अधिक व्यवहार्य आणि दीर्घकालीन ठरतात. परिणामी, उच्च शिक्षणातून समाजोपयोगी आणि शाश्वत विकासास पूरक परिणाम साध्य होतात.

३. इंडस्ट्री-अकॅडेमिया सहकार्य: इंडस्ट्री–अकॅडेमिया सहकार्य म्हणजे उच्च शिक्षण संस्था आणि उद्योगक्षेत्र यांच्यातील परस्पर सहभाग व समन्वय होय. या सहकार्यामुळे अभ्यासक्रम अधिक रोजगाराभिमुख बनतो तसेच विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव व कौशल्ये प्राप्त होतात. संशोधन, नवोपक्रम आणि तंत्रज्ञान हस्तांतरणाच्या

माध्यमातून उद्योगांच्या गरजा आणि शैक्षणिक संशोधन यांचा मेळ साधता येतो. परिणामी, आर्थिक शाश्वतता आणि कौशल्याधारित मानवी संसाधन विकासाला चालना मिळते.

४. डिजिटल आणि ओपन लर्निंग: इंडस्ट्री–अकॅडेमिया सहकार्य म्हणजे उच्च शिक्षण संस्था आणि उद्योगक्षेत्र यांच्यातील परस्पर सहभाग व समन्वय होय. या सहकार्यामुळे अभ्यासक्रम अधिक रोजगाराभिमुख बनतो तसेच विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव व कौशल्ये प्राप्त होतात. संशोधन, नवोपक्रम आणि तंत्रज्ञान हस्तांतरणाच्या माध्यमातून उद्योगांच्या गरजा आणि शैक्षणिक संशोधन यांचा मेळ साधता येतो. परिणामी, आर्थिक शाश्वतता आणि कौशल्याधारित मानवी संसाधन विकासाला चालना मिळते.

५. शिक्षक व विद्यार्थी यांची सक्रिय भागीदारी: शाश्वत विकासाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी शिक्षक आणि विद्यार्थी यांची सक्रिय व समन्वयात्मक भागीदारी अत्यंत आवश्यक आहे. संशोधन, विस्तार उपक्रम, सामाजिक प्रकल्प आणि नवोपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष सहभाग वाढविल्यास शिक्षण अधिक व्यवहार्य व परिणामकारक ठरते. शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी समाजाभिमुख उपक्रम राबवितात, ज्यातून नेतृत्वगुण, जबाबदारीची भावना आणि शाश्वत मूल्यांची जाणीव विकसित होते. परिणामी, उच्च शिक्षणातून समाजपरिवर्तनास चालना मिळते.

निष्कर्ष:

उच्च शिक्षण आणि शाश्वत विकास यांचा परस्परसंबंध अतूट आहे. उच्च शिक्षण संस्था जर ज्ञान, कौशल्य आणि मूल्ये यांचा समन्वय साधून विद्यार्थ्यांना घडवतील, तरच शाश्वत विकासाची उद्दिष्टे साध्य होऊ शकतील. त्यामुळे उच्च शिक्षण व्यवस्थेने शाश्वत विकासाला केंद्रस्थानी ठेवून धोरणात्मक आणि व्यावहारिक पातळीवर काम करणे आवश्यक आहे.

संदर्भसूची:

1. राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020
2. UGC – Higher Education for Sustainable Development
3. UNESCO – Education for Sustainable Development
4. भारतीय पर्यावरण धोरणे – केंद्र सरकार
5. शैक्षणिक नियतकालिके व संशोधन लेख
6. National Education Policy 2020. Ministry of Education, New Delhi.
7. Education for Sustainable Development Goals: Learning Objectives. Paris. United Nations (2015)
8. Education Research, Vol. 16 (5–6). Government of India (2019). Quality and Sustainability in Higher Education. Ministry of Education, New Delhi.

ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

March - 2026
Vol. 15 - No. S1

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार उच्च शिक्षणातील बदल आणि शाश्वत विकासातील भूमिका

डॉ. हेमलता अरविंद राठोड[1], भिमराज पोपट गायकवाड[2]

[1]संशोधक मार्गदर्शक, राज्यशास्त्र विभाग व संशोधन केंद्र, हिंद सेवा मंडळ संचलित, पेमराज सारडा महाविद्यालय, अहिल्यानगर, संलग्न सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

[2]संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग व संशोधन केंद्र, हिंद सेवा मंडळ संचलित, पेमराज सारडा महाविद्यालय, अहिल्यानगर, संलग्न सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

***Corresponding Author:** डॉ. हेमलता अरविंद राठोड*

DOI - 10.5281/zenodo.19482280

सारांश:

मनुष्य हा इतर प्राण्यांपेक्षा वेगळा मानला जातो, कारण त्याच्याकडे विचार करण्याची क्षमता आहे. या क्षमतेच्या जोरावरच मानवाने निसर्गाच्या नियमांवर मात करून आपला विकास साधला आहे. या विकास प्रक्रियेत उच्च शिक्षणाचा महत्त्वपूर्ण वाटा आहे. आज विकासाची संकल्पना केवळ भौतिक प्रगतीपुरती मर्यादित न राहता 'शाश्वत विकास' या व्यापक अर्थाने मांडली जाते. म्हणजेच सध्याच्या गरजा पूर्ण करताना भावी पिढ्यांच्या गरजांचा विचार करून नैसर्गिक साधनसंपत्तीचा विवेकपूर्ण वापर करणे, असा याचा अर्थ होय. या उद्देशाने भारत सरकारने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० तयार करून उच्च शिक्षण प्रक्रियेत आमूलाग्र बदल घडवून आणले आहेत. या धोरणामुळे भावी पिढ्यांना शाश्वत विकासाची फळे प्राप्त होतील. तसेच सैद्धांतिक शिक्षणाकडून व्यावहारिक आणि कौशल्याधारित शिक्षणाकडे भारतीय शिक्षण व्यवस्थेला नेण्याचे कार्य या धोरणातून साध्य होईल. परिणामी देशाची वाटचाल भविष्यात शाश्वत विकासाच्या दिशेने निश्चितपणे होईल.

मुख्य शब्द: राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, उच्च शिक्षण, शाश्वत विकास, पर्यावरण संवर्धन.

प्रस्तावना:

मानवाची क्षमता विकसित करणे, समान व न्याय्य समाज घडवणे आणि देशाचा विकास साधणे यासाठी शिक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. भारताच्या प्रगतीसाठी सर्वांना दर्जेदार शिक्षण मिळणे तितकेच गरजेचे आहे. यामुळे सामाजिक न्याय, समानता, वैज्ञानिक प्रगती आणि राष्ट्रीय एकात्मता बळकट होईल. पुढील काळात भारतात युवकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढणार असल्याने, त्यांना चांगल्या दर्जाचे शिक्षण देणे हे देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी अत्यावश्यक आहे.

आज शाश्वत विकास हाही एक महत्त्वाचा विषय बनला आहे, कारण विकासाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात नैसर्गिक साधनसंपत्तीचा ऱ्हास होत आहे. हा ऱ्हास थांबवण्यासाठी आणि पर्यावरणाचे संवर्धन करण्यासाठी शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. याच उद्देशाने भारतात शिक्षण व्यवस्थेत अनेक सुधारणा करण्यात आल्या असून, त्यापैकी एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण होय.

विषयाचे महत्व:

आधुनिक काळातील मानवी विकास हा शाश्वत पद्धतीने झाला पाहिजे. या विकासात शिक्षण हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. म्हणूनच अन्न, वस्त्र व निवारा यांनंतर शिक्षण ही मानवाची मूलभूत गरज बनली आहे. म्हणूनच 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार उच्च शिक्षणातील बदल आणि शाश्वत विकासातील भूमिका' या विषयाचे महत्त्व पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१) उच्च शिक्षणातील मूलभूत सुधारणा समजून घेण्यासाठी या विषयाचा अभ्यास होणे गरजेचा आहे.

२) शाश्वत विकासामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची भूमिका समजून घेण्यासाठी या विषयाचा अभ्यास होणे गरजेचा आहे.

३) शाश्वत पर्यावरण संरक्षण व संवर्धनासाठी जनजागृती मधील उच्च शिक्षणातील भूमिका समजून घेण्यासाठी या विषयाचा अभ्यास होणे गरजेचा आहे.

उद्दिष्टे:

अभ्यासकाने 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार उच्च शिक्षणातील बदल आणि शाश्वत विकासातील भूमिका' या विषयाचा अभ्यास करण्यासाठी काही ठरावीक उद्दिष्टे निश्चित करून अभ्यास केला आहे. ती उद्दिष्टे पुढीलप्रमाणे मांडता येतील.

१) उच्च शिक्षणातील मूलभूत सुधारणा अथवा बदल समजून घेणे.

२) शाश्वत विकासामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची भूमिका समजून घेणे.

३) शाश्वत पर्यावरण संरक्षण व संवर्धनासाठी जनजागृती मधील उच्च शिक्षणातील भूमिका समजून घेणे.

गृहीतके:

अभ्यासकाने 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार उच्च शिक्षणातील बदल आणि शाश्वत विकासातील भूमिका' या विषयाचा अभ्यास करण्यासाठी काही गृहीतके निश्चित करून अभ्यास केला आहे. ती गृहीतके पुढीलप्रमाणे मांडता येतील.

१) राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे उच्च शिक्षण क्षेत्रात मूलभूत आणि व्यापक बदल घडून आले आहेत.

२) शाश्वत विकास साध्य करण्यामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

३) शाश्वत पर्यावरण संरक्षण व संवर्धनासाठी जनजागृती निर्माण करण्यात उच्च शिक्षणाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे.

संशोधन पद्धती:

अभ्यासकाने प्रस्तुत अभ्यासासाठी ऐतिहासिक व वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे. तसेच माहिती संकलनासाठी दुय्यम स्रोतांमधील आंतरजाळ (इंटरनेट) यांची मदत घेतली आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण:

आपल्या भारत देशातील शिक्षण क्षेत्रात बदल घडवून आणण्यासाठी अनेक प्रयत्न झाले असून, त्यातून आमूलाग्र स्वरूपाचे बदल शिक्षण क्षेत्रात घडून आले आहेत. याला उच्च शिक्षण क्षेत्रही अपवाद नाही. शासनाने यासाठी विविध नवीन धोरणे आखून त्यांची प्रभावी अंमलबजावणी केली आहे. स्वातंत्र्यानंतर शिक्षण क्षेत्रात कोणकोणते बदल झाले, याची सविस्तर माहिती पुढील तक्त्याच्या आधारे समजून घेता येईल.



भारतीय उच्चशिक्षण प्रणालीतील प्रमुख समस्या:

भारत हा जगातील प्राचीन काळापासून उच्च शिक्षण क्षेत्रात समृद्ध असा देश आहे. पूर्वीच्या काळात तक्षशिला आणि नालंदा यांसारखी महान विद्यापीठे अस्तित्वात होती आणि परदेशातील अनेक विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी भारतात येत असत. मात्र, कालांतराने या शैक्षणिक व्यवस्थेत अनेक समस्या निर्माण झाल्या असून, त्या आजच्या काळात अधिक ठळकपणे दिसून येतात. या समस्या पुढीलप्रमाणे मांडता येतील.

१) उच्च शिक्षण व्यवस्था अत्यंत विखंडित व असंघटित स्वरूपाची आहे.

२) विद्यार्थ्यांच्या आकलन क्षमतेच्या विकासावर आणि अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यावर अपेक्षित भर दिला जात नाही.

३) शैक्षणिक शाखांची विभागणी अत्यंत साचेबंद असून, विद्यार्थ्यांना लवकरच एका ठराविक विषयाची निवड करावी लागते, ज्यामुळे त्यांचे अध्ययन संकुचित क्षेत्रापुरते मर्यादित राहते.

४) विशेषतः सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागास भागांमध्ये उच्च शिक्षणाच्या संधी मर्यादित असून, स्थानिक भाषेत अध्यापन करणाऱ्या संस्थांचा मोठ्या प्रमाणात अभाव आहे.

५) शिक्षकांना तसेच संस्थांना अपेक्षित शैक्षणिक व प्रशासकीय स्वायत्तता प्राप्त नाही.

६) गुणवत्तेवर आधारित करिअर व्यवस्थापन व शिक्षक तसेच संस्थाप्रमुखांच्या पदोन्नतीसाठी प्रभावी यंत्रणा उपलब्ध नाही.

७) बहुतेक विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये संशोधनावर पुरेसा भर दिला जात नाही तसेच विविध शाखांमध्ये स्पर्धात्मक व सहाध्यायी-परीक्षणाधारित संशोधन निधीचा अभाव आहे.

८) उच्च शिक्षण संस्थांमध्ये सक्षम शासन व्यवस्था आणि परिणामकारक नेतृत्वाची कमतरता आहे.

९) उच्च शिक्षणासाठी अस्तित्वात असलेली नियामक व्यवस्था अकार्यक्षम व अप्रभावी ठरत आहे.

१०) अनेक संलग्न विद्यापीठांच्या अस्तित्वामुळे पदवीपूर्व शिक्षणाच्या गुणवत्तेवर प्रतिकूल परिणाम होऊन त्याचा दर्जा खालावलेला आहे.

या आव्हानांवर व समस्यांवर प्रभावीपणे मात करण्यासाठी, उच्च शिक्षण व्यवस्थेचे नूतनीकरण करून तिला नवी दिशा व ऊर्जा देणे, तसेच समता व सर्वसमावेशकतेच्या तत्त्वांवर आधारित उच्च दर्जाचे शिक्षण उपलब्ध करून देणे, हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० चे प्रमुख उद्दिष्ट आहे. या धोरणाच्या दूरदृष्टीत सध्याच्या उच्च शिक्षण व्यवस्थेमध्ये मूलभूत आणि व्यापक स्वरूपाचे बदल सुचविण्यात आले आहेत.

२०२० च्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार उच्च शिक्षणातील बदल:

देशातील शिक्षण क्षेत्रात सर्वांगीण परिवर्तन घडवून आणण्याचे कार्य राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० करते. या धोरणामध्ये अनेक महत्त्वपूर्ण तरतुदी करण्यात आल्या आहेत. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० हे २१ व्या शतकातील पहिले शैक्षणिक धोरण असून, देशातील वाढत्या विकासात्मक गरजांना उत्तर देणे हे त्याचे मुख्य उद्दिष्ट आहे. या धोरणाद्वारे भारताच्या परंपरा व मूल्यांवर आधारित आणि SDG-4 शी सुसंगत अशी आधुनिक शैक्षणिक प्रणाली उभारण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. शैक्षणिक रचना, नियमन आणि व्यवस्थापन या सर्व

बाबींमध्ये व्यापक सुधारणा सुचविण्यात आल्या आहेत. हे धोरण विशेषतः प्रत्येक व्यक्तीच्या सुप्त क्षमतांच्या विकासावर भर देते. शिक्षणाने केवळ बौद्धिक क्षमता विकसित कराव्यात असे नाही, तर साक्षरता, संख्याज्ञान, तार्किक विचार, समस्या निराकरण तसेच सामाजिक, नैतिक आणि भावनिक विकास घडवून आणावा, हा या धोरणामागील मुख्य हेतू आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार उच्च शिक्षण क्षेत्रात खालीलप्रमाणे महत्त्वपूर्ण सुधारणा घडवून आणण्याचा मानस व्यक्त करण्यात आला आहे.

१) अशी उच्च शिक्षण व्यवस्था उभारण्याच्या दिशेने वाटचाल करणे की, ज्यामध्ये प्रत्येक जिल्ह्यात किंवा त्याच्या आसपास किमान एक मोठे बहुविषयक विद्यापीठ व महाविद्यालय उपलब्ध असेल, तसेच देशभरात अनेक अशा उच्च शिक्षण संस्था (HEIs) असतील जिथे अध्यापन व अभ्यासक्रमाचे माध्यम स्थानिक किंवा भारतीय भाषा असेल.

२) अधिक सर्वसमावेशक आणि बहुविषयक पदवीपूर्व शिक्षण पद्धती विकसित करण्याकडे भर देणे.

३) अध्यापन व संस्थात्मक स्वायत्तता वाढविण्यासाठी आवश्यक सुधारणा करणे.

४) विद्यार्थ्यांचा शैक्षणिक अनुभव अधिक समृद्ध करण्यासाठी अभ्यासक्रम, अध्यापन पद्धती, मूल्यमापन प्रक्रिया आणि विद्यार्थी सहाय्य सेवांमध्ये सुधारणा करणे.

५) अध्यापन, संशोधन व सामाजिक योगदानाच्या आधारे शिक्षकांची नियुक्ती व करिअर प्रगती सुनिश्चित करून शिक्षक आणि संस्थात्मक नेतृत्वाची गुणवत्ता व सचोटी टिकवून ठेवणे.

६) सहाध्यायी-परीक्षणाधारित संशोधनाला आर्थिक सहाय्य देण्यासाठी तसेच विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये संशोधन संस्कृती रुजविण्यासाठी राष्ट्रीय संशोधन प्रतिष्ठान (National Research Foundation) स्थापन करणे.

७) शैक्षणिक व प्रशासकीय स्वायत्तता असलेल्या उच्च पात्रताधारक स्वतंत्र मंडळांमार्फत उच्च शिक्षण संस्थांचे प्रभावी शासन व व्यवस्थापन करणे.

८) उच्च शिक्षणासाठी एका एकात्मिक नियामक संस्थेमार्फत *"सुलभ पण परिणामकारक"* अशी नियमन व्यवस्था निर्माण करणे.

९) उत्कृष्ट सार्वजनिक शिक्षणाच्या संधी, खासगी व धर्मादाय विद्यापीठांद्वारे शिष्यवृत्ती, ऑनलाईन व मुक्त-दूरस्थ शिक्षण (ODL), तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सुलभ पायाभूत सुविधा व अध्ययन साहित्य उपलब्ध करून देऊन उपलब्धता, समानता व सर्वसमावेशकता वाढविणे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार उच्च शिक्षणातील बदल आणि शाश्वत विकासातील भूमिका:

"सध्याच्या पिढ्यांच्या गरजा पूर्ण करताना भविष्यातील पिढ्यांच्या गरजांवर विपरीत परिणाम होऊ न देणारा विकास म्हणजे शाश्वत विकास," अशी व्याख्या संयुक्त राष्ट्र संघटनेच्या जागतिक पर्यावरण व विकास आयोगाने (ब्रंटलँड आयोग, १९८७) केली आहे. सप्टेंबर २०१५ मध्ये न्यूयॉर्क येथे आयोजित संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास शिखर परिषदेत सर्व सदस्य राष्ट्रांनी १७ शाश्वत विकास उद्दिष्टे (SDGs) स्वीकारली असून, ही उद्दिष्टे २०३० पर्यंत साध्य करण्याचा अधिकृत संकल्प करण्यात आला आहे. ही उद्दिष्टे पुढीलप्रमाणे मांडता येतील.

वरील शाश्वत विकासाची १७ ध्येये साध्य करण्यासाठी भारत सरकारने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२० तयार केले आहे. या धोरणाची योग्य, प्रभावी व सर्वसमावेशक अंमलबजावणी झाल्यास भारतीय शिक्षण व्यवस्थेमध्ये आमूलाग्र आणि व्यापक परिवर्तन घडून येऊ शकते. तसेच शासनाचे कोणतेही धोरण यशस्वीरीत्या राबवायचे असल्यास समाजात जनजागृती निर्माण करणे अत्यावश्यक ठरते. हे कार्य उच्च शिक्षणाच्या माध्यमातून अधिक परिणामकारकपणे साध्य करता येते. म्हणूनच राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार उच्च शिक्षणात करण्यात येणाऱ्या सुधारणांमुळे शाश्वत विकासाच्या प्रक्रियेत कोणती व कितपत भूमिका बजावली जाणार आहे, हे अभ्यासणे व स्पष्ट करणे आवश्यक ठरते. त्या अनुषंगाने पुढील मुद्द्यांद्वारे ही भूमिका सविस्तरपणे मांडण्यात आली आहे.

१) **सामाजिक प्रगती:** राष्ट्रीय शैक्षणिक धोरनानुसार उच्च शिक्षणात करण्यात येणाऱ्या सुधारणांमुळे शिक्षणाच्या माध्यमातून शाश्वत विकासाची मजबूत पायाभरणी केली जाईल. दर्जेदार, सर्वसमावेशक आणि बहुविषयक शिक्षणामुळे व्यक्तींमध्ये ज्ञान, कौशल्ये, मूल्यबोध, विवेकशीलता आणि चिकित्सक विचार करण्याची क्षमता विकसित होईल. यामुळे समाजातील अंधश्रद्धा कमी होतील, वैज्ञानिक दृष्टिकोन अधिक बळकट होईल, सामाजिक जाणीव वाढेल तसेच कर्तव्यदक्ष व जबाबदार नागरिक घडतील. परिणामी शिक्षित समाज अधिक प्रगत, सुसंस्कृत आणि सशक्त बनेल व त्यातून सामाजिक उन्नती आणि शाश्वत विकास साध्य होईल

२) **स्त्री शिक्षणाचा विस्तार:** राष्ट्रीय शैक्षणिक धोरनानुसार उच्च शिक्षणात करण्यात येणाऱ्या सुधारणांमुळे महिलांना शिक्षण, रोजगार, नेतृत्व तसेच निर्णय प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेण्याच्या अधिक व्यापक संधी उपलब्ध होतील, ज्यामुळे शाश्वत विकासाला बळकटी मिळेल. परिणामी बालविवाहाचे प्रमाण घटेल, महिलांचे आर्थिक स्वावलंबन वाढेल, कुटुंब व समाजातील त्यांचा सामाजिक दर्जा उंचावेल आणि लिंगभेद कमी होईल. यामुळे सामाजिक समता प्रस्थापित होऊन समावेशक व संतुलित विकास साध्य होईल. तसेच स्त्री शिक्षणामुळे आरोग्य, पोषण, कुटुंब नियोजन, बालशिक्षण आणि सामाजिक स्थैर्य या क्षेत्रांमध्ये लक्षणीय सकारात्मक बदल घडून येतील, जे दीर्घकालीन व शाश्वत सामाजिक प्रगतीस पोषक ठरतील.

३) **दुर्बल घटकांचे सक्षमीकरण:** राष्ट्रीय शैक्षणिक धोरनानुसार उच्च शिक्षणात राबविण्यात येणाऱ्या सुधारणा व उपाययोजनांमुळे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्पसंख्याक, दिव्यांग तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी शिष्यवृत्ती, आरक्षण, वसतिगृह सुविधा आणि विशेष प्रशिक्षण योजनांच्या माध्यमातून समान शैक्षणिक संधी अधिक

प्रभावीपणे उपलब्ध होतील. यामुळे शाश्वत विकासाच्या प्रक्रियेला गती मिळेल. परिणामी सामाजिक असमानता कमी होईल, दुर्बल घटक सक्षम व आत्मनिर्भर बनतील आणि सामाजिक न्यायाची प्रभावी अंमलबजावणी घडून येईल. त्यामुळे समावेशक, समताधिष्ठित आणि संतुलित समाजनिर्मितीस हातभार लागेल, जो शाश्वत विकासाचा मूलभूत आधार ठरेल.

४) **शाश्वत आर्थिक प्रगती:** राष्ट्रीय शैक्षणिक धोरनानुसार उच्च शिक्षणात कौशल्याधारित अभ्यासक्रम, प्रत्यक्ष प्रशिक्षण (इंटर्नशिप), उद्योगांशी सहकार्य आणि कौशल्य विकास कार्यक्रमांचा अधिक व्यापक समावेश करण्यात येईल. यामुळे विद्यार्थ्यांची रोजगारक्षमता वाढेल, बेरोजगारी कमी होईल आणि स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण होतील. तसेच स्टार्टअप केंद्रे, नवोन्मेष केंद्रे आणि संशोधन प्रयोगशाळांच्या माध्यमातून तरुणांमध्ये उद्योजकता विकसित होईल व नवीन उद्योगांची निर्मिती होईल. संशोधनामुळे तंत्रज्ञानात प्रगती होईल, उत्पादन खर्चात बचत होईल व कार्यक्षमता वाढेल, ज्यामुळे औद्योगिक क्षेत्राचा वेगाने विकास होऊन शाश्वत आर्थिक प्रगतीला चालना मिळेल.

५) **शाश्वत पर्यावरणीय संवर्धन:** राष्ट्रीय शैक्षणिक धोरनानुसार उच्च शिक्षण संस्थांमध्ये पर्यावरण विषयक अभ्यासक्रम, जैवविविधता संरक्षण, हवामान बदल अभ्यास आणि शाश्वत जीवनशैलीविषयी अधिक प्रभावी जागृती निर्माण केली जाईल, ज्यामुळे पर्यावरण संवर्धनाची जाणीव वाढेल आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचा विवेकपूर्ण वापर होईल. तसेच सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, जैवइंधन व हरित बांधकाम तंत्र यांवरील संशोधनाला चालना देण्यात येईल, ज्यामुळे पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा विकास साध्य होईल. याशिवाय विद्यार्थ्यांमध्ये कचरा व्यवस्थापन, पुनर्वापर, ऊर्जा बचत आणि पाणी संवर्धनाबाबत अधिक सजगता निर्माण होऊन शाश्वत उपभोग व उत्पादन पद्धतींचा व्यापक प्रसार होईल.

६) **मूल्याधिष्ठित नागरिक:** राष्ट्रीय शैक्षणिक धोरनानुसार उच्च शिक्षणाच्या माध्यमातून स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय ही संविधानिक मूल्ये अधिक प्रभावीपणे रुजवली जातील, ज्यामुळे शाश्वत विकासासाठी आवश्यक सामाजिक समता व न्याय प्रस्थापित होईल. लोकशाही जाणीव, नागरिक कर्तव्ये आणि सामाजिक उत्तरदायित्व यांमुळे सहभागी, जागरूक व जबाबदार नागरिक घडतील, जे शाश्वत समाजनिर्मितीस सक्रिय योगदान देतील. तसेच समाजसेवा, स्वयंसेवी उपक्रम, पर्यावरण संरक्षण आणि जनजागृती कार्यक्रमांद्वारे सामाजिक एकात्मता वाढेल व नैतिक मूल्याधिष्ठित विकास घडून येईल, जो दीर्घकालीन आणि सर्वसमावेशक शाश्वत विकासाचा मजबूत पाया ठरेल.

निष्कर्ष:

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मुळे उच्च शिक्षण क्षेत्रात मूलभूत आणि व्यापक स्वरूपाचे परिवर्तन घडून आले आहे. या धोरणाद्वारे शैक्षणिक रचना, अभ्यासक्रम, अध्यापन पद्धती, संशोधन, कौशल्य विकास आणि प्रशासन या सर्व क्षेत्रांमध्ये व्यापक सुधारणा करण्यात आल्या आहेत. परिणामी उच्च शिक्षण अधिक सर्वसमावेशक, गुणवत्ताधिष्ठित आणि समाजाभिमुख बनले आहे. शाश्वत

विकास साध्य करण्यामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, या धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे सामाजिक प्रगती, आर्थिक सक्षमीकरण, स्त्री शिक्षणाचा विस्तार आणि दुर्बल घटकांचे सशक्तीकरण साध्य होईल. तसेच शाश्वत पर्यावरण संरक्षण व संवर्धनासाठी जनजागृती निर्माण करण्यात उच्च शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण ठरेल. पर्यावरणीय शिक्षण, संशोधन आणि सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून पर्यावरणाविषयी जागरूकता वाढून नैसर्गिक साधनसंपत्तीचा विवेकपूर्ण वापर होईल. परिणामी समताधिष्ठित, समावेशक आणि सुसंस्कृत समाजनिर्मितीस बळ मिळून १७ शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य होण्यास मोठी मदत होईल.

संदर्भ:

१. https://www.education.gov.in/sites/upload_files/mhrd/files/nep/2020/MARATHI.pdf
२. https://www.un.org/sustainabledevelopment/
३. https://en.wikipedia.org/wiki/Sustainable_development
४. https://www.pib.gov.in/PressReleasePage.aspx?PRID=1823575&reg=3&lang=2
५. https://www.pib.gov.in/PressReleaseIframePage.aspx?PRID=1847066&reg=3&lang=2
६. https://dhepune.gov.in/mr/nep-mr/

ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

March - 2026
Vol. 15 - No. S1

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंतर्गत उच्च शिक्षणातील बदल आणि शाश्वत विकासात त्याची भूमिका

प्रा. नवनाथ नागरे

सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग,
सहकारमहर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, संगमनेर
***Corresponding Author:* प्रा. नवनाथ नागरे**

DOI - 10.5281/zenodo.19482304

प्रस्तावना :

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० हे भारताच्या शिक्षण व्यवस्थेतील व्यापक आणि दूरगामी परिवर्तन घडवून आणणारे धोरण आहे. या धोरणाने उच्च शिक्षण अधिक लवचिक, बहुविषयक, कौशल्याधारित आणि संशोधनाभिमुख करण्यावर भर दिला आहे. २१ व्या शतकातील बदलत्या सामाजिक-आर्थिक गरजा लक्षात घेऊन तयार करण्यात आलेले हे धोरण केवळ साक्षरता वाढवण्यापुरते मर्यादित नसून मानवी क्षमतांचा सर्वांगीण विकास साधण्याचे ध्येय बाळगते. भारताला जागतिक स्तरावर 'ज्ञान महासत्ता' (Knowledge Superpower) बनवणे हे शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यासाठी उच्च शिक्षणातील संरचनात्मक बदल अनिवार्य आहेत. बहुविषयक शिक्षण, संशोधन प्रोत्साहन, तंत्रज्ञान एकत्रीकरण आणि कौशल्य विकास यांच्या माध्यमातून शाश्वत विकास साध्य करण्यासाठी हे धोरण महत्त्वपूर्ण ठरते.

मुख्य शब्द: राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०, शाश्वत विकास, बहुविषयक शिक्षण, मानव संसाधन विकास

उच्च शिक्षणातील प्रमुख बदल:

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मुळे उच्च शिक्षणाच्या पारंपरिक चौकटीत खालील महत्त्वाचे बदल झाले आहेत:

बहुशाखीय दृष्टीकोन (Multidisciplinary Education):

भारतीय शिक्षण व्यवस्थेतील कला, विज्ञान आणि वाणिज्य या विद्याशाखांमधील पारंपारिक आणि कठोर तटबंदी (Rigid Silos) नष्ट करणारा एक क्रांतिकारी व संशोधनात्मक बदल आहे. या धोरणानुसार, आता विद्यार्थी 'मेजर' (Major) आणि 'मायनर' (Minor) क्रेडिट सिस्टीमच्या लवचिक रचनेतून एकाच वेळी 'भौतिकशास्त्र' (विज्ञान) आणि 'संगीत' (कला) यांसारखे पूर्णतः भिन्न विषय शिकू शकतात. न्यूरोसायन्स (Neuroscience) संशोधनानुसार, विज्ञानातून तार्किक विचारांना (Logic) आणि कलेतून सर्जनशीलतेला (Creativity) एकाच वेळी चालना मिळाल्याने विद्यार्थ्यांची नाविन्यपूर्ण विचार क्षमता (Innovation) अनेक पटींनी वाढते; ज्याला जागतिक स्तरावर 'STEM' ऐवजी 'STEAM' (Science, Technology, Engineering, Arts, Mathematics) मॉडेल म्हटले जाते. एमआयटी (MIT) किंवा हार्वर्डसारख्या जागतिक विद्यापीठांच्या धर्तीवर राबवला जाणारा हा एकात्मिक (Holistic) दृष्टीकोन शाश्वत विकासासाठी अत्यंत गरजेचा आहे; कारण गुंतागुंतीचे जागतिक प्रश्न सोडवण्यासाठी केवळ एकाच विषयाचे ज्ञान अपुरे पडते, त्यासाठी विज्ञान, अर्थशास्त्र आणि समाजशास्त्र अशा सर्व अंगांनी विचार करू शकणाऱ्या प्रॉब्लेम-

सॉल्व्हर्सची देशाला गरज आहे, जी या बहुशाखीय रचनेतून पूर्ण होईल.

बहुविध प्रवेश आणि निर्गमन (Multiple Entry and Exit):

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामधील 'बहुविध प्रवेश आणि निर्गमन' ही संकल्पना उच्च शिक्षण व्यवस्थेला कमालीची लवचिकता प्रदान करणारी एक विद्यार्थी-केंद्रित प्रणाली आहे, जी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाण्यापासून वाचवते. या प्रणालीनुसार, जर एखाद्या विद्यार्थ्याला आर्थिक, सामाजिक किंवा वैयक्तिक कारणांमुळे आपले शिक्षण मध्यंतरी सोडावे लागले, तर त्याला त्याने पूर्ण केलेल्या कालावधीनुसार योग्य ते श्रेय (Credits) आणि प्रमाणपत्र दिले जाते;

प्रमाणपत्र संरचना:

१ वर्ष: प्रमाणपत्र

२ वर्षे: डिप्लोमा

३ वर्षे: पदवी

४ वर्षे: संशोधनासह ऑनर्स पदवी

ही व्यवस्था केवळ औपचारिक शिक्षण आणि कौशल्य विकास यांमधील दरी सांधत नाही, तर ती शाश्वत विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे, कारण यामुळे उच्च शिक्षणातील गळतीचे प्रमाण कमी होऊन 'आजीवन अध्ययन' (Lifelong Learning) संस्कृतीला चालना मिळते आणि प्रत्येक युवकाला त्याच्या गतीने व सोयीने ज्ञानार्जन करण्याची संधी प्राप्त होते.

अकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट (ABC):

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामधील 'अकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट' (ABC) ही उच्च शिक्षणाचे खऱ्या अर्थाने 'लोकशाहीकरण' (Democratization) करणारी एक अत्यंत नाविन्यपूर्ण आणि डिजिटल व्यवस्था आहे. आर्थिक व्यवहारांसाठी जशी कमर्शियल बँक असते, अगदी त्याच धर्तीवर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामगिरीचा (Credits) सुरक्षित आणि पारदर्शक साठा करण्यासाठी ही 'अकॅडमिक बँक' कार्य करते. या प्रणालीमुळे विद्यार्थ्याला एकाच विद्यापीठाशी बांधून न राहता, देशातील विविध उच्च शिक्षण संस्थांमधून (HEIs) किंवा 'स्वयम' (SWAYAM) सारख्या ऑनलाइन प्लॅटफॉर्मवरून आपल्या आवडीचे विषय पूर्ण करून त्याचे 'क्रेडिट्स' एकाच डिजिटल खात्यात जमा करण्याची अभूतपूर्व संस्थात्मक लवचिकता प्राप्त होते. यामागील सर्वात मोठा संशोधनात्मक फायदा असा आहे की, जर एखाद्या विद्यार्थ्याला परिस्थितीअभावी मध्येच शिक्षण सोडावे लागले, तर त्याचे कमावलेले क्रेडिट्स या डिजिटल लॉकरमध्ये ७ वर्षांपर्यंत अबाधित राहतात; ज्यामुळे 'शिक्षण गळती' ही संकल्पनाच संपुष्टात येऊन 'आजीवन अध्ययन' (Lifelong Learning) संस्कृतीला भक्कम चालना मिळते.

संशोधनावर भर (Focus on Research) :

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP २०२०) चा आत्मा केवळ ज्ञानदानात नसून नवीन ज्ञाननिर्मितीत दडलेला आहे, ज्याला चालना देण्यासाठी 'नॅशनल रिसर्च फाउंडेशन' ची स्थापना हा एक ऐतिहासिक आणि दूरगामी निर्णय ठरतो. अनेक दशके भारतातील संशोधनावरील खर्च विकसित देशांच्या तुलनेत अत्यंत नगण्य राहिला आहे; ही दरी भरून काढण्यासाठी आणि सर्वसामान्य विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये संशोधनाची प्रबळ संस्कृती रुजवण्यासाठी NRF एक सर्वोच्च शिखर संस्था म्हणून

कार्य करेल. या प्रणालीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, ती केवळ विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रालाच नव्हे, तर समाजशास्त्र, कला आणि मानवशास्त्र यांसारख्या सर्व ज्ञानशाखांमधील उत्कृष्ट आणि नाविन्यपूर्ण प्रकल्पांना 'स्पर्धात्मक निधी' पुरवते. याव्यतिरिक्त, शैक्षणिक संस्था, उद्योग जगत आणि सरकार यांच्यात समन्वय प्रस्थापित करून 'संशोधन आणि विकास' परिसंस्थेला बळकटी देण्याचे महत्त्वपूर्ण काम याद्वारे केले जाईल. शाश्वत विकासाच्या परिप्रेक्ष्यातून पाहिल्यास, हवामान बदल, स्वच्छ ऊर्जा, आरोग्य आणि जलसंवर्धन यांसारख्या गुंतागुंतीच्या स्थानिक आणि जागतिक समस्यांवर स्वदेशी उपाय शोधण्यासाठी ही संस्था अत्यंत कळीची भूमिका बजावेल. परिणामी, 'अनुसंधान' आणि 'नावीन्य' यांच्या बळावर भारत केवळ तंत्रज्ञानाचा ग्राहक न राहता, भविष्यात एक जागतिक 'ज्ञान महासत्ता' म्हणून उदयास येईल.

प्रादेशिक भाषांतून शिक्षण:

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामधील 'प्रादेशिक भाषांतून शिक्षण' हा केवळ भाषिक बदल नसून तो शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचा आणि 'बौद्धिक समावेशकतेचा' एक क्रांतिकारी मार्ग आहे. अनेक दशकांपासून उच्च शिक्षणात, विशेषतः तांत्रिक आणि वैद्यकीय क्षेत्रांत इंग्रजी भाषेच्या वर्चस्वामुळे ग्रामीण आणि निमशहरी भागातील गुणवंत विद्यार्थी केवळ भाषेच्या अडथळ्यामुळे मुख्य प्रवाहातून बाहेर पडत होते; ही दरी मिटवण्यासाठी धोरणाने मातृभाषेतून शिक्षणावर विशेष भर दिला आहे. संशोधनानुसार, विद्यार्थी जेव्हा आपल्या मातृभाषेतून क्लिष्ट संकल्पना शिकतात, तेव्हा त्यांची ग्रहणक्षमता' आणि 'सर्जनशीलता' अधिक प्रगल्भ होते, कारण विचार करण्याची प्रक्रिया ही मुळात मातृभाषेतूनच घडत असते. यामुळे केवळ ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा उच्च शिक्षणातील सहभाग (GER) वाढणार नाही, तर स्थानिक ज्ञान आणि आधुनिक विज्ञान यांचा संगम होऊन खऱ्या अर्थाने 'तळागाळातील नवसंशोधन' (Grassroot Innovation) घडून येईल. शाश्वत विकासाच्या (SDG 10 - Reduced Inequalities) दृष्टिकोनातून पाहिले तर, हे पाऊल 'ज्ञानाचे लोकशाहीकरण' करणारे आहे, कारण यामुळे उच्च शिक्षण आता केवळ एका विशिष्ट वर्गाची मक्तेदारी न राहता ते सामान्य विद्यार्थ्यांसाठी आत्मविश्वासाचे आणि प्रगतीचे साधन ठरेल.

शाश्वत विकासात उच्च शिक्षणाची भूमिका (Role in Sustainable Development):

अ. आर्थिक सक्षमीकरण आणि कौशल्य विकास (Economic Empowerment & Skill Development): राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० हे उच्च शिक्षणाला केवळ पदवी मिळवण्याचे साधन न ठेवता, त्याला थेट 'आर्थिक स्वावलंबना'शी जोडते. धोरणामधील व्यावसायिक शिक्षणाचे (Vocational Education) एकत्रीकरण हे साध्य करण्याच्या दृष्टीने उचललेले एक प्रभावी पाऊल आहे. जेव्हा उच्च शिक्षणामध्ये इंटर्नशिप, प्रत्यक्ष प्रकल्प आणि तांत्रिक कौशल्यांचा अंतर्भाव होतो, तेव्हा विद्यार्थ्यांची उत्पादकता वाढते आणि ते केवळ 'नोकरी शोधणारे' न राहता 'नोकरी देणारे' (Entrepreneurship) बनतात. संशोधनानुसार, कौशल्यावर आधारित शिक्षण हे देशातील बेरोजगारीचा दर कमी करण्यास आणि मानवी संसाधनांचा पुरेपूर वापर करण्यास मदत करते. यामुळे तळागाळातील लोकांचे उत्पन्न वाढून गरिबी निर्मूलनास गती मिळते, जे शाश्वत आर्थिक विकासाचे मुख्य लक्षण आहे.

ब. सामाजिक समता आणि समावेशकता (Social Equality & Inclusivity) : शाश्वत विकासाचा मूळ मंत्र 'सामाजिक समता'हा आहे आणि NEP २०२० हेच उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या वंचित गटांच्या शिक्षणावर विशेष भर देते. उच्च शिक्षण संस्थांमध्ये शिष्यवृत्ती, आर्थिक सवलती आणि सर्वसमावेशक पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्याने समाजातील उपेक्षित घटकांना मुख्य प्रवाहात येण्याची संधी मिळते. हे धोरण लैंगिक समानता आणि विषमता कमी करणे यांच्याशी थेट निगडीत आहे. जेव्हा शिक्षणामध्ये भौगोलिक, आर्थिक किंवा सामाजिक अडथळे दूर होतात, तेव्हा समाजात समता प्रस्थापित होते. सामाजिक न्याय आणि सर्वसमावेशकता हे केवळ नैतिक मूल्य नसून ते कोणत्याही देशाच्या शाश्वत आणि स्थिर प्रगतीसाठी आवश्यक असणारे पायाभूत घटक आहेत.

क. पर्यावरण आणि जागतिक नागरिकत्व (Environment & Global Citizenship) : २१ व्या शतकात हवामान बदल (Climate Change) हे जागतिक संकट आहे आणि त्याविरुद्ध लढण्यासाठी उच्च शिक्षणामध्ये पर्यावरणीय जाणीव जागृत करणे अनिवार्य आहे. NEP २०२० अंतर्गत अभ्यासक्रमात पर्यावरणीय शाश्वतता, नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन आणि नैतिक मूल्यांचा समावेश केल्यामुळे विद्यार्थी केवळ सुशिक्षितच नाही तर जबाबदार 'जागतिक नागरिक' म्हणून घडतील. "वसुधैव कुटुंबकम्" या भारतीय विचारधारेचा पुरस्कार करून हे धोरण जागतिक शांतता, मानवाधिकार आणि निसर्गाप्रती आदर निर्माण करण्याचे कार्य करते. हवामान कृती आणि शांतता व न्याय साध्य करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. जेव्हा तरुण पिढीमध्ये वैश्विक जाणीव निर्माण होते, तेव्हा ती शाश्वत जीवनशैलीचा स्वीकार करते, ज्यामुळे पृथ्वीच्या भविष्याचे रक्षण करणे शक्य होते.

आव्हाने आणि संधी (Challenges and Opportunities) :

घटक	संधी (Opportunities)	आव्हाने (Challenges)
तंत्रज्ञान	डिजिटल लर्निंग आणि स्वयम (SWAYAM) मुळे पोहोच वाढली.	ग्रामीण भागात इंटरनेट आणि पायाभूत सुविधांचा अभाव.
संशोधन	NRF मुळे नाविन्यपूर्ण प्रयोगांना चालना.	संशोधनासाठी लागणाऱ्या जीडीपीच्या (GDP) ६% निधीची प्रत्यक्ष अंमलबजावणी.
संस्थात्मक स्वायत्तता	महाविद्यालयांना स्वायत्तता मिळाल्याने दर्जा सुधारण्याची संधी.	उच्च दर्जाच्या प्राध्यापकांची कमतरता.

निष्कर्ष:

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० हे भारताच्या उज्ज्वल भविष्याची पायाभरणी आहे. उच्च शिक्षणातील लवचिकता, संशोधनाभिमुखता आणि कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम भारताला शाश्वत विकासाच्या मार्गावर नेण्याची क्षमता बाळगते. तथापि, अपेक्षित परिणाम साध्य करण्यासाठी प्रभावी अंमलबजावणी, पायाभूत सुविधा विकास आणि शिक्षक प्रशिक्षण यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. जर याची अंमलबजावणी प्रभावीपणे

झाली, तर भारत २०४७ पर्यंत एक 'विकसित राष्ट्र' आणि 'विश्वगुरू' म्हणून नक्कीच नावारूपास येईल.

संदर्भसूची:

1. B. C. Sarkar, Education for Sustainable Development: Goals, Policies, Programs.
2. Dr. Suman Kumar Burnwal, National Education Policy 2020: Challenges and Opportunities, Adhyyan Publication, 2024.
3. K. Subramanian, The National Education Policy 2020: A Review.
4. UGC Guidelines (2022). Curriculum and Credit Framework for Undergraduate Programmes.
5. NEP 2020. "National Education Policy 2020." Ministry of Education, Government of India.
6. UGC Guidelines (2021). "Guidelines for Transforming Higher Education Institutions into Multidisciplinary Institutions."
7. NCTE (2021). "Integrated Teacher Education Programme (ITEP) Guidelines."

ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

March - 2026
Vol. 15 - No. S1

शाश्वत कृषी विकासामध्ये शेतकरी उत्पादक कंपन्यांची भूमिका : उत्तर महाराष्ट्राचा चिकित्सक अभ्यास

श्री. सचिन रामदास कोल्हे[1], प्रा. डॉ. गणेश रावसाहेब पाटील[2]

[1]संशोधक विद्यार्थी, म. वि. प्र. समाजाचे, जी.एम.डी. आर्ट्स, बी.डब्ल्यू. कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, सिन्नर, जि. नाशिक,संलग्नता- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

[2]संशोधन मार्गदर्शक, के.आर.टी. कला, बी.एच. वाणिज्य आणि ए.एम. विज्ञान (केटीएचएम) महाविद्यालय, नाशिक

Corresponding Author: श्री. सचिन रामदास कोल्हे

DOI - 10.5281/zenodo.19482327

सारांश:

भारत हा कृषीप्रधान देश असून देशातील मोठा लोकसंख्या वर्ग कृषी व्यवसायावर अवलंबून आहे. कृषी क्षेत्राचा शाश्वत विकास साधणे, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देणे ही आजची प्रमुख गरज बनली आहे. या पार्श्वभूमीवर शेतकरी उत्पादक कंपन्या (Farmer Producer Companies – FPCs) ही संकल्पना शेतकऱ्यांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी प्रभावी साधन म्हणून उदयास आली आहे.

उत्तर महाराष्ट्रातील नाशिक, अहिल्यानगर, जळगाव, धुळे आणि नंदुरबार या जिल्ह्यांमध्ये कृषी उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतले जाते. या भागातील लघु व सीमांत शेतकऱ्यांना बाजारपेठ, तांत्रिक मार्गदर्शन आणि वित्तीय सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शेतकरी उत्पादक कंपन्या महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत.

या संशोधनामध्ये उत्तर महाराष्ट्रातील शेतकरी उत्पादक कंपन्यांची भूमिका शाश्वत कृषी विकासाच्या संदर्भात अभ्यासण्यात आली आहे. संशोधनासाठी प्राथमिक व द्वितीयक माहितीचा वापर करण्यात आला आहे. अभ्यासातून असे दिसून आले की शेतकरी उत्पादक कंपन्या सामूहिक खरेदी, मूल्यवर्धन, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि बाजाराशी थेट जोडणी यांद्वारे शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीस हातभार लावतात.

मुख्य शब्द: शेतकरी उत्पादक कंपन्या, शाश्वत विकास, कृषी व्यवस्थापन, ग्रामीण विकास, उत्तर महाराष्ट्र

प्रस्तावना:

भारत हा कृषीप्रधान देश असून देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये कृषी क्षेत्राचा अत्यंत महत्त्वपूर्ण वाटा आहे. देशातील सुमारे अर्ध्याहून अधिक लोकसंख्या थेट किंवा अप्रत्यक्षपणे कृषी आणि कृषी संबंधित व्यवसायावर अवलंबून आहे. ग्रामीण भागातील आर्थिक विकास, रोजगार निर्मिती आणि अन्नसुरक्षा यांसाठी कृषी क्षेत्र अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. तथापि, कृषी क्षेत्राला अनेक संरचनात्मक व आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. लहान व विखुरलेली जमीनधारणा, उत्पादन खर्चात सातत्याने होणारी वाढ, बाजारपेठेतील किंमत अस्थिरता, मध्यस्थांची भूमिका आणि कृषी उत्पादनांच्या विपणनातील मर्यादा यांमुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न अपेक्षित प्रमाणात वाढलेले नाही.

भारतातील बहुतांश शेतकरी हे लघु व सीमांत गटातील आहेत. या शेतकऱ्यांकडे आधुनिक तंत्रज्ञान, वित्तीय साधने आणि बाजारपेठेची माहिती यांचा अभाव आढळतो. परिणामी, कृषी उत्पादनाचे योग्य नियोजन, प्रक्रिया, साठवण आणि विपणन या बाबींमध्ये अनेक अडचणी निर्माण होतात. यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा योग्य मोबदला मिळत नाही. या समस्यांवर मात करण्यासाठी शेतकऱ्यांना संघटित करून सामूहिक व्यवसाय

पद्धती विकसित करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

याच पार्श्वभूमीवर भारत सरकारने शेतकरी उत्पादक कंपन्या (Farmer Producer Companies – FPCs) ही संकल्पना पुढे आणली. कंपनी कायद्यामध्ये २००२ साली करण्यात आलेल्या दुरुस्तीद्वारे शेतकरी उत्पादक कंपन्यांना कायदेशीर मान्यता देण्यात आली. या कंपन्या सहकारी तत्वे आणि कॉर्पोरेट व्यवस्थापन यांचा समन्वय साधणाऱ्या संस्था आहेत. शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या माध्यमातून शेतकरी उत्पादन, प्रक्रिया, साठवण, मूल्यवर्धन आणि विपणन या सर्व टप्प्यांमध्ये सामूहिक पद्धतीने सहभागी होऊ शकतात.

शेतकरी उत्पादक कंपन्यांचे प्रमुख उद्दिष्ट शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे, कृषी उत्पादनांचे मूल्यवर्धन करणे, बाजारपेठेपर्यंत थेट पोहोच निर्माण करणे आणि कृषी क्षेत्राचा शाश्वत विकास साधणे हे आहे. सामूहिक खरेदीमुळे बियाणे, खते आणि कीटकनाशके कमी दरात उपलब्ध होतात, तर सामूहिक विक्रीमुळे शेतकऱ्यांना बाजारपेठेत चांगला दर मिळण्यास मदत होते. याशिवाय, प्रक्रिया उद्योग, पॅकेजिंग, ब्रँडिंग आणि निर्यात यांसारख्या उपक्रमांद्वारे कृषी उत्पादनांचे मूल्यवर्धन करता येते.

उत्तर महाराष्ट्र हा प्रदेश कृषी उत्पादनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. या प्रदेशामध्ये नाशिक, अहिल्यानगर, जळगाव, धुळे आणि नंदुरबार हे जिल्हे समाविष्ट होतात. या भागात विविध प्रकारची पिके घेतली जातात. नाशिक जिल्हा द्राक्ष आणि कांदा उत्पादनासाठी प्रसिद्ध आहे, तर जळगाव जिल्हा केळी उत्पादनासाठी ओळखला जातो. धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यांमध्ये कापूस, मका आणि कडधान्ये यांसारख्या पिकांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतले जाते. या कृषी उत्पादनांच्या व्यवस्थापनासाठी आणि विपणनासाठी शेतकरी उत्पादक कंपन्यांची भूमिका दिवसेंदिवस वाढत आहे.

उत्तर महाराष्ट्रातील अनेक शेतकरी उत्पादक कंपन्या कृषी उत्पादनांच्या सामूहिक खरेदी-विक्री, प्रक्रिया उद्योग आणि निर्यात व्यवस्थापनामध्ये सक्रियपणे कार्यरत आहेत. या कंपन्यांमुळे शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञान, वित्तीय सहाय्य आणि बाजारपेठेची माहिती उपलब्ध होते. परिणामी, शेतकऱ्यांचे उत्पादन खर्च कमी होतो आणि उत्पन्न वाढण्यास मदत होते.

तथापि, शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या कार्यामध्ये काही मर्यादा आणि अडचणीही आढळतात. व्यवस्थापन कौशल्यांचा अभाव, वित्तीय मर्यादा, विपणनातील अडचणी आणि सदस्यांचा मर्यादित सहभाग यांसारख्या समस्या अनेक ठिकाणी दिसून येतात. त्यामुळे या कंपन्यांच्या कार्यपद्धतीचा आणि शाश्वत कृषी विकासामधील त्यांच्या भूमिकेचा सखोल अभ्यास करणे आवश्यक ठरते.

प्रस्तुत संशोधनामध्ये उत्तर महाराष्ट्रातील शेतकरी उत्पादक कंपन्यांची भूमिका शाश्वत कृषी विकासाच्या संदर्भात चिकित्सक पद्धतीने अभ्यासण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. या अभ्यासाद्वारे शेतकरी उत्पादक कंपन्यांची कार्यपद्धती, आर्थिक परिणाम, व्यवस्थापन रचना आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर होणारा परिणाम यांचा सविस्तर अभ्यास करण्यात येणार आहे.

शेतकरी उत्पादक कंपनी संकल्पना:

शेतकरी उत्पादक कंपनी ही कंपनी कायद्याअंतर्गत नोंदणीकृत संस्था असून ती सहकारी तत्वे आणि कॉर्पोरेट व्यवस्थापन यांचा समन्वय साधणारी संस्था आहे. या संस्थेमध्ये शेतकरी सदस्य म्हणून सहभागी होतात आणि

सामूहिक पद्धतीने कृषी व्यवसायाशी संबंधित विविध उपक्रम राबवितात.

या कंपन्यांचे मुख्य उद्दिष्ट शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे आणि कृषी क्षेत्राचा शाश्वत विकास साधणे हे आहे. या कंपन्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना सामूहिक खरेदी, उत्पादन प्रक्रिया, साठवण, पॅकेजिंग, ब्रँडिंग आणि विपणन यासारख्या सुविधा उपलब्ध होतात.

अभ्यासाचे महत्त्व:

या संशोधनामुळे उत्तर महाराष्ट्रातील शेतकरी उत्पादक कंपन्यांची भूमिका आणि त्यांचा ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम स्पष्ट होतो. तसेच शाश्वत कृषी विकासासाठी या कंपन्यांचे महत्त्व अधोरेखित होते.

हा अभ्यास धोरणकर्ते, कृषी विस्तार संस्था, संशोधक आणि शेतकरी यांच्यासाठी उपयुक्त ठरतो.

साहित्याचा आढावा:

शेतकरी उत्पादक कंपन्या (Farmer Producer Companies – FPCs) या संकल्पनेवर भारतात आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक संशोधन अभ्यास झालेले आहेत. कृषी क्षेत्रातील लघु व सीमांत शेतकऱ्यांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी सामूहिक संस्थात्मक रचना विकसित करण्याची गरज लक्षात घेऊन या संकल्पनेचा विकास झाला आहे.

Trebbin आणि Hassler (2012) यांनी भारतातील शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या कार्यपद्धतीचा अभ्यास केला असून त्यांच्या मते शेतकरी उत्पादक कंपन्या या सामूहिक कृतीचे एक प्रभावी साधन आहेत. या कंपन्यांद्वारे लघु शेतकऱ्यांना बाजारपेठेशी थेट जोडणी मिळते आणि कृषी उत्पादनांच्या विक्रीतून त्यांना अधिक चांगला मोबदला मिळू शकतो. संशोधकांच्या मते, शेतकरी उत्पादक कंपन्यांमुळे शेतकऱ्यांचे सौदेबाजी सामर्थ्य वाढते आणि मध्यस्थांची भूमिका कमी होते.

Singh (2012) यांनी लघु शेतकऱ्यांसाठी नवीन बाजारपेठांच्या संधींचा अभ्यास करताना असे नमूद केले आहे की सामूहिक विपणन प्रणालीमुळे शेतकऱ्यांना बाजारपेठेतील जोखमी कमी करता येतात. त्यांच्या अभ्यासानुसार शेतकरी उत्पादक कंपन्या शेतकऱ्यांना उत्पादनाचे नियोजन, गुणवत्ता नियंत्रण आणि बाजारपेठेची माहिती उपलब्ध करून देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात.

NABARD (2015) च्या अहवालानुसार भारतात शेतकरी उत्पादक संस्थांचा विकास हा कृषी क्षेत्राच्या शाश्वत विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. NABARD च्या अभ्यासामध्ये असे आढळून आले आहे की शेतकरी उत्पादक कंपन्यांमुळे कृषी उत्पादनांचे मूल्यवर्धन, प्रक्रिया उद्योग आणि निर्यात संधी वाढतात. यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नामध्ये लक्षणीय वाढ होऊ शकते.

SFAC (2014) च्या धोरणात्मक मार्गदर्शक सूचनांमध्ये शेतकरी उत्पादक संस्थांच्या विकासासाठी शासनाने विविध आर्थिक आणि तांत्रिक सहाय्य कार्यक्रम राबविले आहेत. या कार्यक्रमांमुळे शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या स्थापनेस आणि कार्यक्षमतेस चालना मिळाली आहे. तथापि, व्यवस्थापन कौशल्यांचा अभाव, वित्तीय मर्यादा आणि विपणनातील अडचणी या समस्या अनेक शेतकरी उत्पादक कंपन्यांसमोर अजूनही अस्तित्वात आहेत.

FAO (2016) च्या अहवालानुसार शेतकरी उत्पादक संस्थांमुळे ग्रामीण भागातील आर्थिक विकासाला

चालना मिळते. या संस्थांमुळे कृषी उत्पादनांचे मूल्यवर्धन, ग्रामीण रोजगार निर्मिती आणि सामाजिक सक्षमीकरण यांसारखे सकारात्मक परिणाम दिसून येतात. त्यामुळे शाश्वत कृषी विकासासाठी या संस्थांचे महत्त्व अधोरेखित होते.

महाराष्ट्राच्या संदर्भात महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ (MSAMB) यांच्या अहवालांमध्ये कृषी उत्पादनांच्या विपणनामध्ये शेतकरी उत्पादक कंपन्यांची भूमिका वाढत असल्याचे दिसून येते. विशेषतः द्राक्ष, केळी, कांदा आणि भाजीपाला उत्पादनाच्या क्षेत्रामध्ये शेतकरी उत्पादक कंपन्या सक्रियपणे कार्यरत आहेत.

उत्तर महाराष्ट्रातील परिस्थितीचा विचार करता, नाशिक जिल्ह्यात द्राक्ष आणि कांदा उत्पादनाशी संबंधित शेतकरी उत्पादक कंपन्या मोठ्या प्रमाणात कार्यरत आहेत. जळगाव जिल्ह्यात केळी उत्पादनाशी संबंधित कंपन्या सक्रिय आहेत. धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यांमध्ये कापूस, मका आणि कडधान्ये यांसारख्या पिकांशी संबंधित शेतकरी उत्पादक कंपन्या कार्यरत आहेत. या कंपन्यांमुळे शेतकऱ्यांना सामूहिक विपणन, साठवण आणि प्रक्रिया सुविधा उपलब्ध होत आहेत.

वरील सर्व अभ्यासांच्या आधारे असे स्पष्ट होते की शेतकरी उत्पादक कंपन्या या कृषी क्षेत्राच्या विकासासाठी आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरू शकतात. तथापि, विविध प्रदेशांमध्ये शेतकरी उत्पादक कंपन्यांची कार्यपद्धती, व्यवस्थापन रचना आणि आर्थिक परिणाम यामध्ये फरक आढळतो. त्यामुळे प्रादेशिक पातळीवर शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या कार्याचा अभ्यास करणे आवश्यक ठरते.

प्रस्तुत संशोधनामध्ये उत्तर महाराष्ट्रातील शेतकरी उत्पादक कंपन्यांची भूमिका शाश्वत कृषी विकासाच्या संदर्भात अभ्यासण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. हा अभ्यास शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या कार्यपद्धती, आर्थिक परिणाम आणि शाश्वत कृषी विकासामधील त्यांच्या योगदानाचे विश्लेषण करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल.

उद्दिष्टे:

1. उत्तर महाराष्ट्रातील शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करणे.
2. शाश्वत कृषी विकासामध्ये शेतकरी उत्पादक कंपन्यांची भूमिका विश्लेषित करणे.
3. शेतकरी उत्पादक कंपन्यांसमोरील समस्या व आव्हाने ओळखणे.
4. शाश्वत कृषी विकासासाठी धोरणात्मक सूचना देणे.

परिकल्पना:

H_1: शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या कार्यपद्धती आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीमध्ये सकारात्मक संबंध आहे.

H_2: सामूहिक विपणन आणि मूल्यवर्धन उपक्रम शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासास चालना देतात.

संशोधन पद्धती:

प्रस्तुत संशोधन हे वर्णनात्मक (Descriptive) व विश्लेषणात्मक (Analytical) स्वरूपाचे आहे. या संशोधनाचा मुख्य उद्देश उत्तर महाराष्ट्रातील शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या व्यवसाय प्रशासन पद्धतींचा अभ्यास करून त्यांची आर्थिक, सामाजिक व व्यवस्थापकीय शाश्वतता तपासणे हा आहे. अभ्यासासाठी उत्तर महाराष्ट्रातील नाशिक, अहिल्यानगर, जळगाव, धुळे आणि नंदुरबार या जिल्ह्यांची निवड करण्यात आली आहे. या जिल्ह्यांची निवड करताना कृषी उत्पादनाचे प्रमाण, शेतकरी

उत्पादक कंपन्यांची वाढती संख्या तसेच भौगोलिक व सामाजिक विविधता हे घटक विचारात घेण्यात आले आहेत.

या संशोधनासाठी उद्देशपूर्ण नमुना पद्धत (Purposive Sampling Method) वापरण्यात आली आहे. अभ्यासासाठी किमान तीन वर्षे कार्यरत असलेल्या शेतकरी उत्पादक कंपन्यांची निवड करण्यात आली, जेणेकरून त्यांच्या व्यवसाय प्रशासनाची कार्यपद्धती आणि शाश्वततेशी संबंधित अनुभवांचा सखोल अभ्यास करता येईल. या अभ्यासासाठी पाच जिल्ह्यांतील एकूण 14 शेतकरी उत्पादक कंपन्यांची निवड करण्यात आली असून त्यामधून 100 सदस्य शेतकरी तसेच 28 संचालक किंवा व्यवस्थापक यांच्याकडून माहिती संकलित करण्यात आली आहे.

संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी वर्णनात्मक व तुलनात्मक सांख्यिकीय पद्धतींचा वापर करण्यात आला आहे. टक्केवारी विश्लेषण, सरासरी (Mean), तसेच पूर्व-उत्तर तुलना (Before–After Comparison) यांसारख्या साध्या सांख्यिकीय तंत्रांचा वापर करून माहितीचे विश्लेषण करण्यात आले आहे. या विश्लेषणाच्या आधारे शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या व्यवसाय प्रशासनातील शाश्वततेशी संबंधित निष्कर्ष मांडण्यात आले आहेत.

माहिती संकलन:

या संशोधनासाठी माहिती संकलन प्राथमिक (Primary Data) आणि द्वितीयक (Secondary Data) या दोन्ही स्रोतांद्वारे करण्यात आले आहे. संशोधनाचा विषय क्षेत्रीय स्वरूपाचा असल्यामुळे प्राथमिक माहितीला विशेष महत्त्व देण्यात आले आहे.

अ) प्राथमिक माहिती: प्राथमिक माहिती उत्तर महाराष्ट्रातील नाशिक, अहिल्यानगर, जळगाव, धुळे आणि नंदुरबार या जिल्ह्यांतील निवडक शेतकरी उत्पादक कंपन्यांकडून संकलित करण्यात आली आहे. यासाठी शेतकरी उत्पादक कंपन्यांचे संचालक, व्यवस्थापक तसेच सदस्य शेतकरी यांच्याशी प्रत्यक्ष संपर्क साधून माहिती गोळा करण्यात आली.

प्राथमिक माहिती संकलनासाठी पुढील साधनांचा वापर करण्यात आला :

- संरचित प्रश्नावली (Structured Questionnaire)
- प्रत्यक्ष मुलाखती (Personal Interview)
- मर्यादित स्वरूपातील गटचर्चा (Group Discussion)

प्रश्नावलीत शेतकरी उत्पादक कंपनीची स्थापना, उद्दिष्टे, व्यवसाय प्रशासन रचना, आर्थिक व्यवस्थापन, बाजाराशी जोडणी, मूल्यवर्धन उपक्रम तसेच शाश्वततेशी संबंधित अडचणी व संधी या बाबींचा समावेश करण्यात आला आहे.

ब) द्वितीयक माहिती: द्वितीयक माहिती विविध शासकीय व संशोधन संस्थांच्या प्रकाशित अहवालांमधून संकलित करण्यात आली आहे. या माहितीमुळे संशोधनाला सैद्धांतिक आधार मिळाला असून प्राथमिक माहितीच्या निष्कर्षांना तुलनात्मक संदर्भ मिळाला आहे.

द्वितीयक माहितीचे प्रमुख स्रोत पुढीलप्रमाणे आहेत :

- NABARD चे अहवाल व प्रकाशने
- SFAC चे मार्गदर्शक दस्तऐवज
- महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ (MSAMB) अहवाल
- जिल्हा सामाजिक-आर्थिक पाहणी अहवाल
- संशोधन जर्नल्स व परिषद लेख

- कृषी व ग्रामीण विकासाशी संबंधित शासकीय प्रकाशने

संकलित माहितीचे विश्लेषण करून शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या व्यवसाय प्रशासनातील शाश्वततेचे मूल्यमापन करण्यात आले आहे.

सांख्यिकीय विश्लेषण: नमुना वितरण

जिल्हा	FPC	सदस्य शेतकरी	संचालक
नाशिक	4	30	8
अहिल्यानगर	3	22	6
जळगाव	3	24	6
धुळे	2	14	4
नंदुरबार	2	10	4
एकूण	14	100	28

आर्थिक परिणामांचे विश्लेषण:

तक्ता : FPC सहभागानंतर आर्थिक बदल:

घटक	सहभागापूर्वी (%)	सहभागानंतर (%)
वार्षिक उत्पन्न वाढ	—	20–30
उत्पादन खर्च घट	—	15–20
थेट बाजार जोडणी	35	70
घाऊक निविष्ठा	40	75
मूल्यवर्धन	18	45
वित्तीय सुविधा	25	60

उत्तर महाराष्ट्रातील शेतकरी उत्पादक कंपन्यांचे प्रकरण अभ्यास (Case Studies):

उत्तर महाराष्ट्रामध्ये अनेक शेतकरी उत्पादक कंपन्या कृषी उत्पादन, प्रक्रिया आणि विपणन क्षेत्रात कार्यरत आहेत. या कंपन्यांमुळे शेतकऱ्यांना सामूहिक व्यवसायाची संधी उपलब्ध झाली आहे. पुढील काही महत्त्वाच्या शेतकरी उत्पादक कंपन्यांचे प्रकरण अभ्यास खालीलप्रमाणे आहेत.

1. सह्याद्री फार्म्स (Sahyadri Farms), नाशिक: सह्याद्री फार्म्स ही भारतातील सर्वात यशस्वी शेतकरी उत्पादक कंपन्यांपैकी एक मानली जाते. ही कंपनी नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी स्थापन केली असून द्राक्ष, टोमॅटो, डाळिंब आणि भाजीपाला उत्पादनामध्ये कार्यरत आहे.

या कंपनीमध्ये हजारो शेतकरी सदस्य सहभागी आहेत. सह्याद्री फार्म्स कृषी उत्पादनांचे प्रक्रिया उद्योग, पॅकेजिंग आणि निर्यात यामध्ये कार्यरत आहे. या कंपनीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध झाली आहे.

यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत झाली असून ग्रामीण भागामध्ये रोजगार निर्मिती झाली आहे.

2. जळगाव केळी उत्पादक कंपनी: जळगाव जिल्हा केळी उत्पादनासाठी संपूर्ण देशामध्ये प्रसिद्ध आहे. या भागातील काही शेतकरी उत्पादक कंपन्या केळी उत्पादन, प्रक्रिया आणि विपणन यामध्ये कार्यरत आहेत.

या कंपन्यांद्वारे शेतकऱ्यांना केळीचे साठवण, पॅकेजिंग आणि निर्यात सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. तसेच केळीपासून विविध प्रक्रिया उत्पादने तयार करण्याचे प्रयत्न देखील केले जात आहेत.

3. नाशिक कांदा उत्पादक कंपनी: नाशिक जिल्हा हा कांदा उत्पादनासाठी ओळखला जातो. या भागातील शेतकरी उत्पादक कंपन्या कांदा उत्पादन, साठवण आणि विपणन क्षेत्रात कार्यरत आहेत.

या कंपन्यांमुळे शेतकऱ्यांना बाजारपेठेची माहिती मिळते आणि सामूहिक विक्रीमुळे त्यांना अधिक चांगला बाजारभाव मिळतो.

4. धुळे कृषी उत्पादक कंपनी: धुळे जिल्ह्यामध्ये कापूस, ज्वारी आणि कडधान्य पिकांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतले जाते. येथील शेतकरी उत्पादक कंपन्या सामूहिक खरेदी आणि सामूहिक विक्रीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आर्थिक लाभ मिळवून देतात.या कंपन्यांमुळे कृषी उत्पादनांचे साठवण आणि विपणन अधिक प्रभावी पद्धतीने केले जाते.

5. नंदुरबार आदिवासी कृषी उत्पादक कंपनी: नंदुरबार जिल्हा हा आदिवासी भाग असल्यामुळे येथे लघु आणि सीमांत शेतकरी मोठ्या प्रमाणात आहेत. या भागातील शेतकरी उत्पादक कंपन्या मका, कडधान्ये आणि भाजीपाला पिकांच्या उत्पादनामध्ये कार्यरत आहेत.या कंपन्यांमुळे आदिवासी शेतकऱ्यांना बाजारपेठ आणि तांत्रिक मार्गदर्शन उपलब्ध झाले आहे.

चर्चा:

प्रस्तुत संशोधनातून असे दिसून येते की शेतकरी उत्पादक कंपन्या शाश्वत कृषी विकासासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. विशेषतः लघु व सीमांत शेतकऱ्यांना सामूहिक व्यवसायाच्या माध्यमातून बाजारपेठेशी थेट जोडणी मिळत आहे.

सामूहिक खरेदीमुळे बियाणे, खते आणि कीटकनाशके कमी दरात उपलब्ध होतात. त्यामुळे उत्पादन खर्च कमी होतो. तसेच सामूहिक विक्रीमुळे शेतकऱ्यांना बाजारपेठेत अधिक चांगला दर मिळतो.

शेतकरी उत्पादक कंपन्यांमुळे कृषी उत्पादनांचे मूल्यवर्धन आणि प्रक्रिया उद्योग विकसित होत आहेत. यामुळे ग्रामीण भागामध्ये रोजगार निर्मिती होते आणि ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत होते.

तथापि, काही शेतकरी उत्पादक कंपन्यांसमोर व्यवस्थापन कौशल्यांचा अभाव, वित्तीय मर्यादा आणि विपणनातील अडचणी या समस्या दिसून येतात. त्यामुळे या कंपन्यांच्या दीर्घकालीन यशासाठी प्रशिक्षण कार्यक्रम, वित्तीय सहाय्य आणि तांत्रिक मार्गदर्शन आवश्यक आहे.

उत्तर महाराष्ट्रातील यशस्वी शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या अनुभवावरून असे दिसून येते की योग्य व्यवस्थापन, बाजारपेठेची माहिती आणि सदस्यांचा सक्रिय सहभाग असल्यास शेतकरी उत्पादक कंपन्या शाश्वत कृषी विकासासाठी प्रभावी साधन ठरू शकतात.

निष्कर्ष:

शेतकरी उत्पादक कंपन्या शाश्वत कृषी विकासासाठी प्रभावी साधन ठरतात. सामूहिक व्यवस्थापन, मूल्यवर्धन आणि बाजाराशी थेट जोडणी यांमुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होते.

अभ्यासाच्या मर्यादा:

1. अभ्यास उत्तर महाराष्ट्रातील निवडक जिल्ह्यांपुरता मर्यादित आहे.
2. माहिती संकलनासाठी प्रश्नावली आणि मुलाखतींचा वापर करण्यात आला आहे.

भविष्यातील अभ्यासाची गरज:

भविष्यात या अभ्यासाचा विस्तार करून महाराष्ट्रातील इतर विभागांतील किंवा राष्ट्रीय पातळीवरील शेतकरी उत्पादक कंपन्यांचा अभ्यास करता येऊ शकतो.

संदर्भ:

1. बैरागी, प्रिती मुरलीधर, व सोनवणे, आशालता. (2025).सिन्नर तालुक्यातील शेतकरी उत्पादक कंपन्यांचे शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासातील योगदान. *यंग रिसर्चर*, 14(विशेषांक 1), 294–296.
2. भारत सरकार. (2002).*कंपनी कायदा, 1956 : उत्पादक कंपनी संकल्पना समाविष्ट करणारी दुरुस्ती.* कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय, भारत सरकार. https://www.mca.gov.in
3. नाबार्ड. (2015). *शेतकरी उत्पादक संस्था (FPOs) : वारंवार विचारले जाणारे प्रश्न.* नाबार्ड, मुंबई. https://www.nabard.org
4. नाबार्ड. (2018). *Farmer Producer Organisations in India : Status and Policy Recommendations.* National Bank for Agriculture and Rural Development, Mumbai.
5. SFAC. (2014). *शेतकरी उत्पादक संस्थांसाठी धोरण व कार्यपद्धती मार्गदर्शक सूचना.* कृषी मंत्रालय, भारत सरकार. https://www.sfacindia.com
6. SFAC. (2019). *Formation and Promotion of Farmer Producer Organisations (FPOs).* Small Farmers Agribusiness Consortium, New Delhi.
7. Trebbin, A., & Hassler, M. (2012). Farmers' producer companies in India: A new concept for collective action? *Environment and Planning A*, 44(2), 411–427.
8. Singh, S. (2012). New markets for smallholders in India: Exclusion, policy and mechanisms. *Economic and Political Weekly*, 47(52), 95–105. https://www.epw.in
9. FAO. (2016). *Farmer producer organizations for sustainable agriculture.* Food and Agriculture Organization, Rome. https://www.fao.org
10. FAO. (2019). *Farmer Producer Organizations: Policy and Institutional Support.* Food and Agriculture Organization, Rome.
11. NITI Aayog. (2018). *Doubling Farmers' Income: Strategy and Prospects.* Government of India. https://www.niti.gov.in
12. महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ. (2020). *वार्षिक अहवाल.* पुणे. https://www.msamb.com
13. महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ. (2022). *Farmer Producer Companies in Maharashtra: Status Report.* MSAMB, Pune.
14. जिल्हा सांख्यिकी कार्यालय. (2021). *जिल्हा सामाजिक-आर्थिक पाहणी अहवाल (नाशिक, अहिल्यानगर, जळगाव, धुळे व नंदुरबार).* महाराष्ट्र शासन.
15. Deshmukh, P., & Kulkarni, S. (2019). Role of Farmer Producer Organizations in Agricultural Development in Maharashtra.

Indian Journal of Agricultural Economics, 74(3), 365–372.

16. Sharma, V., & Singh, R. (2020). Farmer Producer Organizations and Sustainable Agricultural Development in India. *Journal of Rural Development*, 39(2), 215–230.
17. Patil, G. R., & Jadhav, S. (2021). Collective Farming and Farmer Producer Companies in Maharashtra. *International Journal of Agricultural Management*, 10(4), 148–156.
18. Kumar, A., & Joshi, P. (2017). Institutional Innovations in Indian Agriculture: Farmer Producer Companies. *Agricultural Economics Research Review*, 30(1), 89–98.
19. Government of Maharashtra. (2020). *Agriculture Department Annual Report.* Government of Maharashtra, Mumbai.
20. Planning Commission. (2014). *Report on Farmer Producer Organisations.* Government of India.

ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed
Refereed Research Journal

March - 2026
Vol. 15 - No. S1

शाश्वत विकासाचे सामाजिक विज्ञानात्मक विश्लेषण : संधी व आव्हाने

प्रा. अशोक रामचंद्र शेळके

सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग,

शांतारामभाऊ घोलप कला, विज्ञान व गोटीरामभाऊ पवार वाणिज्य महाविद्यालय, शिवळे. तालुका- मुरबाड. जिल्हा-ठाणे.

***Corresponding Author:* प्रा. अशोक रामचंद्र शेळके**

DOI - 10.5281/zenodo.19482407

सारांश:

या शोधनिबंधाचे लेखन करताना सर्वसाधारणपणे शाश्वत विकास ही संकल्पना समकालीन समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्रस्थानी मानली जाते. आर्थिक प्रगती साधताना सामाजिक समता, पर्यावरणीय संरक्षण आणि मानवी कल्याण यांचा समन्वय साधणे हा शाश्वत विकासाचा मूलभूत उद्देश आहे. प्रस्तुत संशोधन लेखाचा हेतू शाश्वत विकासाचे सामाजिक विज्ञानात्मक दृष्टिकोनातून विश्लेषण करणे तसेच त्यामधील संधी व आव्हाने स्पष्ट करणे हा आहे.

सामाजिक विज्ञानाच्या शाखा—समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र व मानवशास्त्र—या शाश्वत विकास प्रक्रियेतील सामाजिक संरचना, विषमता, सत्तासंबंध, धोरण अंमलबजावणी आणि लोकसहभाग यांचा अभ्यास करतात. शाश्वत विकासामुळे दारिद्र्यनिर्मूलन, सामाजिक न्याय, स्त्रीसशक्तीकरण, शिक्षण व आरोग्य सुविधा विस्तार, रोजगारनिर्मिती आणि पर्यावरण संवर्धन यांसारख्या महत्त्वपूर्ण संधी उपलब्ध होतात. संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास उद्दिष्टांमुळे जागतिक तसेच स्थानिक पातळीवर विकासासाठी मार्गदर्शक चौकट प्राप्त झाली आहे.

मात्र, शाश्वत विकासाच्या अंमलबजावणीत अनेक सामाजिक व संरचनात्मक आव्हाने निर्माण होतात. वाढती लोकसंख्या, आर्थिक व सामाजिक विषमता, नैसर्गिक संसाधनांचा अति वापर, औद्योगिकीकरणामुळे होणारे पर्यावरणीय प्रदूषण, तसेच धोरणांची अपुरी अंमलबजावणी ही प्रमुख आव्हाने आहेत. अनेक वेळा विकास प्रक्रिया केवळ आर्थिक वाढीपुरती मर्यादित राहिल्यामुळे सामाजिक व पर्यावरणीय समतोल बिघडतो.

हा संशोधन लेख दुय्यम माहितीवर आधारित असून वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. सामाजिक विज्ञानात्मक दृष्टिकोनातून शाश्वत विकासासाठी समग्र, समतावादी आणि लोककेंद्रित धोरणांची आवश्यकता असल्याचे या अभ्यासातून अधोरेखित होते.

मुख्य शब्द: शाश्वत विकास, आर्थिक समावेशन, पर्यावरणीय समतोल, दारिद्र्य निर्मूलन, सामाजिक विषमता, हवामान बदल, शाश्वतता निर्देशक

प्रस्तावना:

शाश्वत विकास ही संकल्पना "भविष्यातील पिढ्यांच्या गरजा बाधित न करता वर्तमान पिढीच्या गरजा पूर्ण करणे" या तत्त्वावर आधारित आहे. १९८७ च्या ब्रंटलँड अहवालानंतर या संकल्पनेला जागतिक स्तरावर मान्यता मिळाली. पुढे राष्ट्रीय संघाने २०१५ मध्ये १७ शाश्वत विकास उद्दिष्टे जाहीर करून जागतिक विकासाची नवी चौकट निश्चित केली. भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये आर्थिक वाढ वेगाने होत असली तरी सामाजिक विषमता, पर्यावरणीय ऱ्हास, शहरीकरणाचा ताण, बेरोजगारी आणि संसाधनांचा असमतोल वापर यांसारखी आव्हाने तीव्र आहेत. त्यामुळे शाश्वत विकासाचा अभ्यास केवळ आर्थिक दृष्टीकोनातून नव्हे तर सामाजिक विज्ञानात्मक दृष्टिकोनातून करणे आवश्यक आहे.

शाश्वत विकासाची संकल्पना:

शाश्वत विकास ही आधुनिक विकासविचारातील एक सर्वसमावेशक आणि दीर्घकालीन संकल्पना असून ती आर्थिक प्रगती, सामाजिक न्याय आणि पर्यावरणीय संरक्षण यांचा समतोल साधण्यावर भर देते. विकासाच्या प्रक्रियेत सध्याच्या पिढीच्या गरजा पूर्ण करताना भविष्यातील पिढ्यांच्या गरजांवर परिणाम होऊ नये, हा शाश्वत विकासाचा मूलभूत गाभा आहे. ही संकल्पना केवळ आर्थिक वाढीपुरती मर्यादित नसून मानवी जीवनमानाचा दर्जा उंचावणे, सामाजिक समावेशन साधणे आणि नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन करणे यांवर आधारित आहे.

शाश्वत विकासाची संकल्पना १९८७ साली ब्रुंडलँड आयोगाच्या Our Common Future या अहवालातून आंतरराष्ट्रीय स्तरावर अधोरेखित झाली. या अहवालात शाश्वत विकासाची व्याख्या अशी करण्यात आली की, "वर्तमानाच्या गरजा पूर्ण करताना भविष्यातील पिढ्यांच्या गरजांची क्षमता कमी न करणारा विकास म्हणजे शाश्वत विकास होय." या व्याख्येमुळे विकासाच्या आर्थिक, सामाजिक व पर्यावरणीय परिमाणांचा समन्वय साधण्याची गरज स्पष्ट झाली.

शाश्वत विकास तीन प्रमुख स्तंभांवर आधारलेला आहे—आर्थिक शाश्वतता, सामाजिक शाश्वतता आणि पर्यावरणीय शाश्वतता. आर्थिक शाश्वतता म्हणजे संसाधनांचा कार्यक्षम वापर, रोजगारनिर्मिती आणि समतावादी आर्थिक वाढ साधणे होय. सामाजिक शाश्वतता ही सामाजिक न्याय, समानता, लोकसहभाग, शिक्षण, आरोग्य आणि मानवी हक्कांच्या संरक्षणाशी संबंधित आहे. पर्यावरणीय शाश्वतता ही नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन, जैवविविधतेचे संरक्षण आणि पर्यावरणीय समतोल राखण्यावर भर देते.

समकालीन काळात संयुक्त राष्ट्र संघाने स्वीकारलेली शाश्वत विकास उद्दिष्टे ही शाश्वत विकासाच्या संकल्पनेला जागतिक पातळीवर व्यावहारिक स्वरूप देतात. त्यामुळे शाश्वत विकास ही संकल्पना आज धोरणनिर्मिती, सामाजिक संशोधन आणि विकास प्रक्रियेचा अविभाज्य घटक बनली असून मानवकेंद्रित व दीर्घकालीन विकासासाठी तिचे महत्त्व अधिकच वाढले आहे.

शाश्वत विकासाच्या संधी:

शाश्वत विकास ही संकल्पना समकालीन जागतिक विकास प्रक्रियेत अनेक बहुआयामी संधी निर्माण करते. पारंपरिक विकास मॉडेलमुळे निर्माण झालेल्या सामाजिक विषमता, पर्यावरणीय ऱ्हास आणि आर्थिक असमतोल या समस्यांवर उपाय शोधण्यासाठी शाश्वत विकास एक प्रभावी आणि दीर्घकालीन दृष्टिकोन म्हणून उदयास आला आहे. सामाजिक विज्ञानाच्या दृष्टिकोनातून पाहता, शाश्वत विकास समाजातील सर्व घटकांना विकासाच्या प्रक्रियेत सहभागी करून घेण्याची व्यापक संधी प्रदान करतो.

आर्थिक पातळीवर शाश्वत विकासामुळे समतावादी आर्थिक वाढ, दारिद्र्यनिर्मूलन आणि रोजगारनिर्मिती साध्य होऊ शकते. हरित अर्थव्यवस्था, नवीकरणीय ऊर्जा स्रोत, पर्यावरणपूरक उद्योग आणि टिकाऊ उत्पादन पद्धती यांच्या माध्यमातून दीर्घकालीन आर्थिक स्थैर्य निर्माण होते. स्थानिक संसाधनांचा कार्यक्षम वापर केल्यामुळे ग्रामीण व शहरी अर्थव्यवस्थांना बळकटी मिळते तसेच उत्पन्नातील विषमता कमी करण्यास मदत होते.

सामाजिक दृष्टिकोनातून शाश्वत विकासामुळे सामाजिक न्याय, समानता आणि समावेशन यांना चालना मिळते. शिक्षण, आरोग्य, स्वच्छ पाणी, स्वच्छता,

स्त्रीसशक्तीकरण आणि दुर्बल घटकांच्या सक्षमीकरणासाठी शाश्वत विकास धोरणे महत्त्वपूर्ण ठरतात. लोकसहभाग आणि समुदायाधारित विकास प्रक्रियांमुळे विकास अधिक लोककेंद्रित व जबाबदार बनतो.

पर्यावरणीय पातळीवर शाश्वत विकास ही नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन, जैवविविधतेचे संरक्षण आणि हवामान बदलाच्या परिणामांना सामोरे जाण्याची संधी उपलब्ध करून देतो. प्रदूषण नियंत्रण, पर्यावरणपूरक तंत्रज्ञान आणि संसाधनांचा जबाबदार वापर यांमुळे पर्यावरणीय समतोल राखला जाऊ शकतो.

याशिवाय, संयुक्त राष्ट्र संघाने स्वीकारलेली शाश्वत विकास उद्दिष्टे ही जागतिक सहकार्य, धोरणात्मक समन्वय आणि दीर्घकालीन विकास नियोजनासाठी एक सुसंगत चौकट प्रदान करतात. त्यामुळे शाश्वत विकासाच्या संधी या आर्थिक प्रगतीपुरत्या मर्यादित न राहता सामाजिक स्थैर्य, मानवी विकास आणि पर्यावरणीय सुरक्षितता यांचा समग्र विकास साधण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरतात.

शाश्वत विकासाचे उद्दिष्टे:

१) शाश्वत विकासाच्या संकल्पनेचे सामाजिक विज्ञानात्मक विश्लेषण करणे.

२) ग्रामीण व शहरी भागातील शाश्वत विकासातील तफावत तपासणे.

३) सामाजिक समता, शिक्षण, लोकसहभाग आणि गरिबी यांचा शाश्वत विकासावर होणारा परिणाम अभ्यासणे.

४) शाश्वत विकासाच्या अंमलबजावणीतील प्रमुख आव्हाने ओळखणे.

५) धोरणात्मक शिफारसी सुचवणे.

संशोधनातील गृहीतकृत्ये:

१) सामाजिक समता वाढल्यास शाश्वत विकास निर्देशांक सुधारतो.

२) लोकसहभाग वाढल्यास शाश्वत विकास प्रकल्पांची कार्यक्षमता वाढते.

३) शिक्षणाची पातळी आणि पर्यावरणीय जाणीव यामध्ये सकारात्मक सहसंबंध आहे.

४) ग्रामीण व शहरी भागांमध्ये शाश्वत विकासाच्या अंमलबजावणीत लक्षणीय फरक आहे.

संशोधन पद्धती:

शाश्वत विकास ही बहुआयामी आणि गुंतागुंतीची संकल्पना असल्यामुळे तिच्या अभ्यासासाठी गुणात्मक आणि मिश्र संशोधन, लोककेंद्रित विश्लेषण, वर्णनात्मक संशोधन, विश्लेषणात्मक संशोधन,परिमाणात्मक संशोधन,गुणात्मक पद्धती, सर्वेक्षण, प्रश्नावली, जनगणना अहवाल, केस स्टडी, सहभागी निरीक्षण, दुय्यम माहितीचा, संशोधन अहवाल, शासकीय दस्तऐवज, संयुक्त राष्ट्रांचे अहवाल, जर्नल लेख आणि पुस्तके या महत्त्वाच्या स्त्रोतातून अभ्यास करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे.एकूणच सामाजिक विज्ञानातील संशोधन पद्धती शाश्वत विकासाच्या संकल्पना, संधी, आव्हाने आणि धोरणात्मक परिणाम यांचे समग्र आकलन करून देतात. त्यामुळे शाश्वत विकासासाठी प्रभावी, समतावादी आणि लोककेंद्रित धोरणे आखण्यासाठी सामाजिक विज्ञानात्मक संशोधन अत्यंत उपयुक्त ठरते.

शाश्वत विकासाची आव्हाने:

शाश्वत विकास ही संकल्पना समकालीन विकास प्रक्रियेसाठी अत्यंत महत्त्वाची असली तरी तिच्या

अंमलबजावणीत अनेक संरचनात्मक, सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय आव्हाने निर्माण होतात. पारंपरिक विकास मॉडेल, वाढती लोकसंख्या आणि संसाधनांवरील वाढता ताण यांमुळे शाश्वत विकास साध्य करणे अधिक गुंतागुंतीचे बनले आहे. सामाजिक विज्ञानाच्या दृष्टिकोनातून पाहता, ही आव्हाने केवळ तांत्रिक नसून सामाजिक संरचना, सत्तासंबंध आणि धोरणात्मक मर्यादांशी निगडित आहेत.

आर्थिक पातळीवर दारिद्र्य, बेरोजगारी आणि उत्पन्नातील विषमता ही शाश्वत विकासासमोरील प्रमुख आव्हाने आहेत. अल्पकालीन आर्थिक वाढीवर आधारित धोरणांमुळे संसाधनांचा अतिरेक होतो आणि दीर्घकालीन शाश्वततेकडे दुर्लक्ष केले जाते. विकसनशील देशांमध्ये मर्यादित आर्थिक साधने, कर्जबाजारीपणा आणि असमतोल आर्थिक विकासामुळे शाश्वत विकासाच्या प्रयत्नांवर परिणाम होतो.

सामाजिक पातळीवर सामाजिक विषमता, भेदभाव, शिक्षण व आरोग्य सुविधांचा अभाव आणि लोकसहभागाची कमतरता ही गंभीर आव्हाने आहेत. विकास प्रक्रियेत दुर्बल व वंचित घटकांचा सहभाग मर्यादित राहिल्यास शाश्वत विकासाचे उद्दिष्ट साध्य होऊ शकत नाही. तसेच, जनजागृतीचा अभाव आणि सामाजिक मूल्यांतील विसंगती यांमुळे शाश्वत विकासाच्या संकल्पनेची प्रभावी अंमलबजावणी अडचणीत येते.

पर्यावरणीय दृष्टिकोनातून नैसर्गिक संसाधनांचा अति वापर, प्रदूषण, जंगलतोड, जैवविविधतेचा ऱ्हास आणि हवामान बदल ही अत्यंत गंभीर आव्हाने आहेत. औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि उपभोगप्रधान जीवनशैली यांमुळे पर्यावरणीय समतोल बिघडत असून शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांना धोका निर्माण झाला आहे.

धोरणात्मक व प्रशासकीय पातळीवर धोरणांची अपुरी अंमलबजावणी, समन्वयाचा अभाव, राजकीय इच्छाशक्तीची कमतरता आणि प्रभावी निरीक्षण यंत्रणेचा अभाव ही आव्हाने प्रकर्षाने दिसून येतात. अनेक वेळा शाश्वत विकास धोरणे कागदावरच मर्यादित राहतात.

एकूणच, शाश्वत विकासाची आव्हाने बहुआयामी असून त्यावर मात करण्यासाठी समग्र, लोककेंद्रित आणि सामाजिक न्यायाधिष्ठित दृष्टिकोन स्वीकारणे आवश्यक आहे. सामाजिक विज्ञानात्मक विश्लेषणातूनच शाश्वत विकासाच्या अडचणी समजून घेऊन प्रभावी उपाययोजना आखता येतील.

शाश्वत विकासात सामाजिक विज्ञानाची भूमिका:

शाश्वत विकास ही केवळ आर्थिक किंवा तांत्रिक प्रक्रिया नसून ती मूलतः सामाजिक प्रक्रिया आहे. विकासाच्या प्रत्येक टप्प्यावर समाजरचना, मूल्यव्यवस्था, सत्तासंबंध, लोकसहभाग आणि धोरण अंमलबजावणी यांचा निर्णायक प्रभाव असतो. या पार्श्वभूमीवर शाश्वत विकासाच्या संकल्पना समजून घेण्यासाठी आणि प्रभावीपणे अंमलात आणण्यासाठी सामाजिक विज्ञानाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते.

समाजशास्त्र शाश्वत विकासाच्या प्रक्रियेत सामाजिक संरचना, वर्ग, जात, लिंग, विषमता आणि सामाजिक समावेशन यांचा अभ्यास करते. विकास धोरणांचा विविध सामाजिक घटकांवर होणारा परिणाम समजून घेणे आणि दुर्बल व वंचित समूहांच्या गरजांचा विचार करणे समाजशास्त्रीय अभ्यासातून शक्य होते. त्यामुळे विकास अधिक समतावादी व लोककेंद्रित बनवण्यास मदत होते.

अर्थशास्त्र शाश्वत विकासाच्या आर्थिक परिमाणावर भर देते. संसाधनांचे वितरण, दारिद्र्यनिर्मूलन, रोजगारनिर्मिती, हरित अर्थव्यवस्था आणि दीर्घकालीन आर्थिक स्थैर्य यांचा अभ्यास करून अर्थशास्त्र शाश्वत विकासासाठी धोरणात्मक दिशा देते. अल्पकालीन नफ्याऐवजी दीर्घकालीन शाश्वततेचा विचार अर्थशास्त्रीय विश्लेषणातून पुढे येतो.

राज्यशास्त्र शाश्वत विकासाशी संबंधित शासन व्यवस्था, धोरणनिर्मिती, कायदे, प्रशासन आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य यांचा अभ्यास करते. प्रभावी धोरण अंमलबजावणी, पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि लोकशाही सहभाग यांमुळे शाश्वत विकासाची उद्दिष्टे साध्य होऊ शकतात.

मानवशास्त्र स्थानिक संस्कृती, परंपरा, जीवनशैली आणि स्थानिक ज्ञान यांचा अभ्यास करून समुदायाधारित शाश्वत विकासाला प्रोत्साहन देते. स्थानिक गरजा आणि पर्यावरणीय संदर्भ लक्षात घेऊन विकास आराखडे तयार करण्यास मानवशास्त्रीय दृष्टिकोन उपयुक्त ठरतो.

एकूणच, सामाजिक विज्ञान शाश्वत विकासाला सैद्धांतिक आधार, समालोचनात्मक दृष्टी आणि व्यावहारिक दिशा प्रदान करते. सामाजिक न्याय, समता, लोकसहभाग आणि दीर्घकालीन पर्यावरणीय संरक्षण साध्य करण्यासाठी सामाजिक विज्ञानाची भूमिका अनिवार्य असून शाश्वत विकासाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी ती केंद्रस्थानी आहे.

शाश्वत विकासाचे सामाजिक विज्ञानात्मक महत्त्व:

१) सामाजिक न्याय व समतेचा आधार: सामाजिक विज्ञान शाश्वत विकासाकडे सामाजिक न्यायाच्या चौकटीतून पाहते. समाजातील वंचित, दलित, आदिवासी, महिला आणि ग्रामीण समुदाय यांच्या विकासाविना शाश्वतता साध्य होऊ शकत नाही. उत्पन्नातील विषमता, संसाधनांचे असमान वितरण आणि सामाजिक बहिष्कार यांचे विश्लेषण करून सामाजिक विज्ञान शाश्वत विकास अधिक न्याय्य कसा होईल याचा मार्ग दाखवते.

२) दारिद्र्य निर्मूलन व मानवी विकास: दारिद्र्य हे शाश्वत विकासातील मुख्य आव्हान आहे. अर्थशास्त्र, समाजशास्त्र आणि लोकसंख्याशास्त्र या शाखा दारिद्र्याच्या सामाजिक कारणांचा अभ्यास करतात. शिक्षण, आरोग्य, रोजगार, पोषण आणि सामाजिक सुरक्षा या घटकांचा परस्परसंबंध समजून घेतल्याशिवाय शाश्वत विकासाची अंमलबजावणी प्रभावी ठरत नाही.

३) लोकशाही, शासन व धोरणनिर्मिती: राज्यशास्त्राच्या दृष्टीने सुशासन, पारदर्शकता, जबाबदारी आणि लोकसहभाग हे शाश्वत विकासाचे मूलभूत घटक आहेत. स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था आणि नागरी समाज यांच्या सहभागामुळे विकास अधिक सर्वसमावेशक व टिकाऊ बनतो.

भारतातील धोरणनिर्मितीत यांनी SDGs च्या अंमलबजावणीसाठी राष्ट्रीय निर्देशांक तयार केला आहे, ज्यातून सामाजिक घटकांचा समावेश स्पष्ट होतो.

४) पर्यावरण व समाज यांचा परस्परसंबंध: पर्यावरणशास्त्र आणि समाजशास्त्र यांचा संगम म्हणजे पर्यावरणीय समाजशास्त्र. जंगलतोड, जलसंकट, प्रदूषण, हवामानबदल यांचा परिणाम सर्वाधिक गरीब आणि वंचित समुदायांवर होतो. त्यामुळे पर्यावरणीय समस्या या सामाजिक समस्या बनतात.

यांच्या अहवालानुसार हवामानबदलामुळे सामाजिक विषमता वाढण्याची शक्यता आहे. सामाजिक

विज्ञान या परिणामांचे विश्लेषण करून धोरणात्मक उपाय सुचवते.

५) लिंग-समानता व महिला सक्षमीकरण: महिला सक्षमीकरणाशिवाय शाश्वत विकास अपूर्ण आहे. समाजशास्त्र व स्त्री-अभ्यास महिलांच्या शिक्षण, आरोग्य, आर्थिक सहभाग आणि निर्णयप्रक्रियेतल्या भूमिकेचा अभ्यास करतात. हे याचे प्रत्यक्ष उदाहरण आहे.

महिलांच्या सहभागामुळे पर्यावरण संरक्षण, जलव्यवस्थापन व ग्रामविकास अधिक प्रभावी ठरतो, हे अनेक संशोधनांतून स्पष्ट झाले आहे.

६) सांस्कृतिक व मूल्यात्मक परिवर्तन: शाश्वत विकासासाठी केवळ तांत्रिक उपाय पुरेसे नसून सामाजिक मूल्यांमध्ये बदल आवश्यक आहे. उपभोगवादी संस्कृतीऐवजी जबाबदार वापर, पुनर्वापर व पुनर्निर्मिती यांसारख्या मूल्यांचा प्रसार करणे गरजेचे आहे. सामाजिक विज्ञान समाजातील वृत्ती, विश्वास व संस्कृती यांचा अभ्यास करून परिवर्तनाची दिशा दर्शवते.

७) ग्रामीण व शहरी विकासाचा अभ्यास: ग्रामीण-शहरी स्थलांतर, झोपडपट्ट्या, बेरोजगारी, जलटंचाई, कचरा व्यवस्थापन या समस्या शाश्वत विकासाशी संबंधित आहेत. मानव भूगोल व समाजशास्त्र या समस्यांचे क्षेत्रीय विश्लेषण करून शाश्वत शहर संकल्पनेला आधार देतात.

शाश्वत विकासासाठी उपाययोजना:

शाश्वत विकासाची अंमलबजावणी करताना सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय स्तरांवर आढळणाऱ्या आव्हानांच्या पार्श्वभूमीवर पुढील उपाययोजना सुचविण्यात येतात.

१) समावेशक धोरणनिर्मिती: शाश्वत विकासाच्या धोरणांमध्ये वंचित, ग्रामीण आणि दुर्बल घटकांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करणे आवश्यक आहे. राष्ट्रीय संघ द्वारा निर्धारित केलेल्या शाश्वत विकासाच्या चौकटीत स्थानिक गरजांनुसार धोरणांची आखणी करावी.

२) स्थानिक स्वराज्य संस्थांचे सक्षमीकरण: ग्रामीण व शहरी भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांना आर्थिक व प्रशासकीय स्वायत्तता देणे गरजेचे आहे. विकेंद्रीकरणाच्या माध्यमातून निर्णयप्रक्रिया लोकाभिमुख करणे शाश्वत विकासासाठी महत्त्वाचे ठरेल.

३) शालेय व उच्च शिक्षण स्तरावर अभ्यासक्रम राबवणे: शालेय व उच्च शिक्षण पातळीवर शाश्वत विकासाशी संबंधित अभ्यासक्रमांचा समावेश करणे आवश्यक आहे. पर्यावरणीय मूल्ये, सामाजिक समता आणि नैतिक जबाबदारी यांबाबत जनजागृती कार्यक्रम राबविणे गरजेचे आहे.

४) तंत्रज्ञानाचा समन्वित वापर: हरित तंत्रज्ञान, अक्षय ऊर्जा, जलसंधारण व कचरा व्यवस्थापन यांसारख्या क्षेत्रांत तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे आवश्यक आहे. तंत्रज्ञानाचा वापर सामाजिक न्यायाच्या तत्त्वांशी सुसंगत असावा.

५) सामाजिक समतेस प्राधान्य: आर्थिक विकासासोबत सामाजिक विषमता कमी करण्यावर भर देणे गरजेचे आहे. लिंगसमता, शिक्षण, आरोग्य आणि रोजगाराच्या संधी सर्वांसाठी उपलब्ध करणे आवश्यक आहे.

६) पर्यावरणीय कायद्यांची काटेकोर अंमलबजावणी: पर्यावरण संरक्षणाशी संबंधित कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे आणि औद्योगिक विकास व पर्यावरणीय संतुलन यामध्ये समतोल राखणे आवश्यक आहे.

७) सार्वजनिक-खाजगी भागीदारी:शाश्वत विकासाच्या प्रकल्पांमध्ये शासन, खाजगी क्षेत्र आणि नागरी समाज यांच्यात समन्वय वाढविणे आवश्यक आहे. आर्थिक

संसाधनांचे कार्यक्षम व्यवस्थापन या माध्यमातून शक्य होईल.

निष्कर्ष:

प्रस्तुत अभ्यासातून असे स्पष्ट होते की शाश्वत विकास ही केवळ आर्थिक वाढीवर आधारित प्रक्रिया नसून ती मूलतः सामाजिक, समतावादी आणि लोककेंद्रित विकासाची संकल्पना आहे. सामाजिक विज्ञानात्मक विश्लेषणाच्या आधारे असे आढळते की विकास प्रक्रियेचे यश समाजातील विविध घटकांचा सक्रिय सहभाग, सामाजिक न्याय आणि समावेशन यांवर अवलंबून असते.

या संशोधनातून **प्रथम** निष्कर्ष असा निघतो की शाश्वत विकासामुळे सामाजिक विषमता कमी करण्याची क्षमता निर्माण होते. शिक्षण, आरोग्य, रोजगार, स्त्रीसशक्तीकरण आणि दुर्बल घटकांच्या सक्षमीकरणावर भर दिल्यास समाजातील वर्ग, जात व लिंगाधारित तफावत कमी होऊ शकते. तथापि, ही प्रक्रिया प्रभावी होण्यासाठी धोरणांची समतावादी अंमलबजावणी आवश्यक आहे.

दुसरा महत्त्वाचा सामाजिक निष्कर्ष म्हणजे लोकसहभाग आणि समुदायाधारित विकासाचे महत्त्व. स्थानिक समुदायांचा सहभाग, स्थानिक स्वराज्य संस्था आणि नागरी समाज संघटनांचा सक्रिय सहभाग असल्यास शाश्वत विकास अधिक प्रभावी आणि दीर्घकालीन ठरतो. वरून-खाली दृष्टिकोनापेक्षा खालून-वर दृष्टिकोन अधिक यशस्वी ठरतो.

तिसरा निष्कर्ष असा की सामाजिक जागरूकता आणि मूल्यपरिवर्तन हे शाश्वत विकासाचे महत्त्वाचे घटक आहेत. पर्यावरण संवर्धन, संसाधनांचा जबाबदार वापर आणि सामूहिक जबाबदारी यांविषयी समाजात सकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाल्यास विकास अधिक टिकाऊ बनतो.

अभ्यासातून असेही दिसून येते की धोरणात्मक अपयश, सामाजिक बहिष्करण आणि लोकसहभागाचा अभाव असल्यास शाश्वत विकासाची उद्दिष्टे साध्य होण्यात अडथळे निर्माण होतात. त्यामुळे सामाजिक विज्ञानात्मक दृष्टिकोनातून धोरणनिर्मिती, अंमलबजावणी आणि मूल्यमापन करणे अत्यावश्यक आहे.

एकूणच, शाश्वत विकासातील सामाजिक निष्कर्ष हे स्पष्ट करतात की समतावादी समाजरचना, लोकसहभाग, सामाजिक न्याय आणि दीर्घकालीन दृष्टीकोन यांशिवाय शाश्वत विकास साध्य होऊ शकत नाही. सामाजिक विज्ञान शाश्वत विकासाला मानवी केंद्रबिंदू प्रदान करून त्याला सामाजिक अर्थ आणि स्थैर्य देते.

संदर्भसूची:

१. Sustainable DevelopmentAuthor: World Commission on Environment and Development Publisher: Oxford University PressYear: 1987

२. Development as FreedomAuthor: Amartya SenPublisher: Oxford University Press Year: 1999

३. The Age of Sustainable DevelopmentAuthor: Jeffrey D. SachsPublisher: Columbia University PressYear: 2015

४. शाश्वत विकास : संकल्पना आणि आव्हाने लेखक: डॉ. आर. एस. देशमुख प्रकाशक : विद्या प्रकाशन, नागपूर प्रकाशन वर्ष : २०१८

५. पर्यावरण आणि समाज लेखक: डॉ. शरद जोशी प्रकाशक : कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे प्रकाशन वर्ष : २०१६

६. समाजशास्त्राची मूलतत्त्वे लेखक : डॉ. जी. एस. घुर्ये प्रकाशक : पॉप्युलर प्रकाशन, मुंबई प्रकाशन वर्ष : २०१०

७. सामाजिक परिवर्तन आणि विकास लेखक : डॉ. योगेश सोमण प्रकाशक : साईनाथ प्रकाशन, औरंगाबाद प्रकाशन वर्ष : २०१७

८. भारतातील विकास प्रक्रिया लेखक : डॉ. व्ही. एम. कुलकर्णी प्रकाशक : प्रशांत पब्लिकेशन्स, पुणे प्रकाशन वर्ष : २०१५

९. पर्यावरणीय समाजशास्त्र लेखक : डॉ. संजय पाटील प्रकाशक : नीलकमल प्रकाशन, मुंबई प्रकाशन वर्ष : २०१९

१०. शाश्वत विकास आणि सामाजिक न्याय लेखक : डॉ. कल्पना देशपांडे प्रकाशक : विद्यानिकेतन प्रकाशन, कोल्हापूर प्रकाशन वर्ष : २०२०

११. सामाजिक संशोधन पद्धती लेखक : डॉ. बी. एन. गायकवाड प्रकाशक : फडके प्रकाशन, पुणे प्रकाशन वर्ष : २०१४

१२. विकासाचे समाजशास्त्र लेखक : डॉ. अनिल जाधव प्रकाशक : मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे प्रकाशन वर्ष: २०१३

१३. पर्यावरण संरक्षण आणि मानवी समाज लेखक : डॉ. प्रभाकर देशमुख प्रकाशक : डायमंड पब्लिकेशन्स, मुंबई प्रकाशन वर्ष : २०१८

१४. समकालीन सामाजिक प्रश्न लेखक : डॉ. संजीवनी कुलकर्णी प्रकाशक : श्रीसाई पब्लिकेशन, नाशिक प्रकाशन वर्ष : २०१६

१५. शाश्वत विकास उद्दिष्टे आणि भारत लेखक : डॉ. राहुल पवार प्रकाशक : ॲकॅडमिक प्रकाशन पुणे प्रकाशन वर्ष : २०२१

ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

March - 2026
Vol. 15 - No. S1

शाश्वत विकासात वाणिज्य आणि व्यवस्थापनाची भूमिका

प्रा. सिमा राहुल भागवत

लोकनेते बाळासाहेब थोरात कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय तळेगाव दिघे, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर- ४२२६११

Corresponding Author: ***प्रा. सिमा राहुल भागवत***

DOI - 10.5281/zenodo.19491661

सारांश:

शाश्वत विकास म्हणजे असा विकास जो वर्तमान पिढीच्या गरजा पूर्ण करताना भविष्यातील पिढ्यांच्या गरजांवर परिणाम होणार नाही याची काळजी घेतो. आधुनिक औद्योगिकीकरण, वाढती लोकसंख्या आणि नैसर्गिक संसाधनांचा अतिरेक वापर यामुळे पर्यावरणावर गंभीर परिणाम होत आहेत. त्यामुळे आर्थिक विकासाबरोबर पर्यावरण संरक्षण आणि सामाजिक समता राखणे आवश्यक बनले आहे.

वाणिज्य क्षेत्र उत्पादन, वितरण आणि व्यापाराच्या माध्यमातून आर्थिक विकासाला चालना देते. पर्यावरणपूरक उत्पादन, हरित विपणन पुनर्वापरयोग्य वस्तूंचा वापर, ऊर्जा आणि पाणी बचत तसेच प्रदूषण कमी करण्याच्या उपाय योजनांमुळे शाश्वत विकासाला मदत होते. उद्योग आणि व्यापार संस्था नैसर्गिक संसाधनांचा योग्य वापर करून पर्यावरणाचे संरक्षण करू शकतात.

व्यवस्थापन क्षेत्र योग्य नियोजन, संघटन आणि नियंत्रण यांच्या माध्यमातून शाश्वत विकासाला प्रोत्साहन देते. प्रभावी व्यवस्थापनामुळे उत्पादन प्रक्रियेत संसाधनांचा अपव्यय कमी करता येतो तसेच पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा वापर वाढवता येतो. मानव संसाधन विकास, सुरक्षित कामाचे वातावरण, सामाजिक जबाबदारी (CSR) आणि नव कल्पना यामुळे उद्योग समाजाच्या प्रगतीत महत्त्वपूर्ण योगदान देतात.

या संशोधन पेपरमध्ये शाश्वत विकासामध्ये वाणिज्य आणि व्यवस्थापनाची भूमिका, त्यांचे महत्त्व, अडचणी आणि उपाययोजना यांचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. आर्थिक विकास आणि पर्यावरण संरक्षण यामध्ये संतुलन राखण्यासाठी वाणिज्य आणि व्यवस्थापन क्षेत्राचे योगदान अत्यावश्यक आहे.

प्रस्तावना:

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात आर्थिक विकासासोबत पर्यावरणाचे संरक्षण आणि सामाजिक न्याय यांना महत्त्व देणे आवश्यक झाले आहे. वाढती औद्योगिकीकरण, नैसर्गिक संसाधनांचा अतिवापर, प्रदूषण आणि हवामान बदल या समस्यांमुळे शाश्वत विकासाची संकल्पना महत्त्वाची ठरली आहे. शाश्वत विकास म्हणजे असा विकास जो वर्तमान पिढीच्या गरजा पूर्ण करताना भविष्यातील पिढ्यांच्या गरजांवर परिणाम करीत नाही.

शाश्वत विकासामध्ये वाणिज्य आणि व्यवस्थापन यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. उद्योग, व्यापार आणि व्यवसाय व्यवस्थापनाच्या माध्यमातून संसाधनांचा योग्य वापर, पर्यावरणपूरक उत्पादन, सामाजिक जबाबदारी आणि आर्थिक स्थिरता साध्य करता येते.

आजच्या आधुनिक युगात औद्योगिकीकरण, नागरीकरण आणि तंत्रज्ञानाच्या झपाट्याने वाढणाऱ्या वापरामुळे आर्थिक विकास जलद गतीने होत आहे. परंतु या विकासामुळे नैसर्गिक संसाधनांचा अतिवापर, पर्यावरण प्रदूषण, हवामान बदल आणि सामाजिक विषमता यांसारख्या गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे आर्थिक प्रगतीसोबत पर्यावरण संरक्षण आणि सामाजिक समतोल राखणे अत्यावश्यक झाले आहे. या संकल्पनेलाच

शाश्वत विकास (Sustainable Development) असे म्हणतात. शाश्वत विकास म्हणजे वर्तमान पिढीच्या गरजा पूर्ण करताना भविष्यातील पिढ्यांच्या गरजांवर कोणताही प्रतिकूल परिणाम होऊ न देणे.

शाश्वत विकासाची संकल्पना जागतिक स्तरावर महत्त्वाची मानली जाते. आज प्रत्येक देश आर्थिक प्रगतीसोबत पर्यावरण संरक्षण आणि सामाजिक विकास साधण्याचा प्रयत्न करत आहे. उद्योग, व्यापार आणि सेवा क्षेत्र हे आर्थिक विकासाचे मुख्य आधार आहेत. त्यामुळे वाणिज्य आणि व्यवस्थापन क्षेत्राचा शाश्वत विकासामध्ये मोठा वाटा आहे. उद्योग-व्यवसाय योग्य नियोजन आणि व्यवस्थापनाद्वारे संसाधनांचा योग्य वापर करून पर्यावरणावर होणारा नकारात्मक परिणाम कमी करू शकतात.

वाणिज्य क्षेत्र उत्पादन, वितरण आणि विनिमय या प्रक्रियांद्वारे समाजाच्या गरजा पूर्ण करते. पर्यावरणपूरक उत्पादने तयार करणे, नैतिक व्यापार पद्धतींचा अवलंब करणे, पुनर्वापर आणि पुनर्निर्मिती यांसारख्या उपायांद्वारे वाणिज्य क्षेत्र शाश्वत विकासाला प्रोत्साहन देऊ शकते. तसेच उद्योगांमुळे रोजगार निर्मिती होते, ज्यामुळे आर्थिक स्थैर्य वाढते आणि समाजाचा विकास होतो.

व्यवस्थापन हे उद्योगाचे प्रमुख घटक असून संसाधनांचे योग्य नियोजन, संघटन, नेतृत्व आणि नियंत्रण या प्रक्रियांद्वारे संस्थेची उद्दिष्टे साध्य केली जातात. व्यवस्थापनाच्या प्रभावी धोरणांमुळे ऊर्जा बचत, कच्चा मालाचा योग्य वापर, कचरा व्यवस्थापन आणि प्रदूषण नियंत्रण शक्य होते. यामुळे पर्यावरण संरक्षणास मदत होते. तसेच व्यवस्थापन कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी विविध उपाययोजना राबवून सामाजिक विकासालाही चालना देते.

आजच्या स्पर्धात्मक व्यवसाय वातावरणात उद्योगांनी फक्त नफा मिळविण्यावर लक्ष केंद्रित न करता सामाजिक जबाबदारी पार पाडणे आवश्यक झाले आहे. कंपन्यांनी पर्यावरण संरक्षण, शिक्षण, आरोग्य आणि ग्रामीण विकास यांसारख्या क्षेत्रांमध्ये योगदान देणे आवश्यक आहे. या सर्व बाबींमध्ये व्यवस्थापनाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते.

शाश्वत विकासाची संकल्पना:

शाश्वत विकास ही संकल्पना आर्थिक विकास, सामाजिक विकास आणि पर्यावरण संरक्षण या तीन घटकांवर आधारित आहे.

शाश्वत विकासाचे प्रमुख घटक:

1) आर्थिक विकास:

- उद्योग आणि व्यापार वाढ.
- रोजगार निर्मिती.
- आर्थिक स्थैर्य.

2) सामाजिक विकास:

- शिक्षण आणि आरोग्य सुधारणा
- सामाजिक समानता
- गरिबी कमी करणे.

3) पर्यावरण संरक्षण:

- नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन
- प्रदूषण नियंत्रण
- जैवविविधतेचे संरक्षण

वाणिज्याची संकल्पना:

वाणिज्य म्हणजे वस्तू आणि सेवांचे उत्पादन, वितरण आणि विनिमय यांचा अभ्यास होय. वाणिज्यामध्ये

व्यापार, बँकिंग, विमा, वाहतूक, जाहिरात आणि गोदाम व्यवस्था यांचा समावेश होतो. वाणिज्यामुळे उत्पादक आणि ग्राहक यांच्यातील अंतर कमी होते आणि आर्थिक विकासाला चालना मिळते.

व्यवस्थापनाची संकल्पना:

व्यवस्थापन म्हणजे संस्थेची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी संसाधनांचे नियोजन, संघटन, मार्गदर्शन आणि नियंत्रण करण्याची प्रक्रिया होय. व्यवस्थापनामुळे संसाधनांचा योग्य वापर होतो आणि उत्पादनक्षमता वाढते.

शाश्वत विकासामध्ये वाणिज्याची भूमिका:

शाश्वत विकास म्हणजे असा विकास जो वर्तमान पिढीच्या गरजा पूर्ण करताना भविष्यातील पिढ्यांच्या गरजांवर परिणाम करत नाही. शाश्वत विकास साध्य करण्यासाठी वाणिज्य (Commerce) महत्त्वाची भूमिका बजावते. उत्पादन, वितरण, व्यापार, बँकिंग, विमा आणि वाहतूक या माध्यमातून वाणिज्य आर्थिक विकासाबरोबर पर्यावरण संरक्षण आणि सामाजिक विकास साध्य करण्यास मदत करते.

1. पर्यावरणपूरक उत्पादनाला प्रोत्साहन: वाणिज्यामुळे उद्योगांना पर्यावरणपूरक उत्पादन करण्यास प्रोत्साहन मिळते. व्यापारी आणि उत्पादक पर्यावरणाला कमी हानी पोहोचवणाऱ्या वस्तूंचे उत्पादन करतात. कापडी किंवा कागदी पिशव्या, सेंद्रिय शेती उत्पादने, पुनर्वापर करता येणाऱ्या वस्तू.यामुळे प्रदूषण कमी होते आणि पर्यावरणाचे संरक्षण होते.

2. हरित व्यापार (Green Trade): हरित व्यापार म्हणजे पर्यावरणपूरक वस्तू आणि सेवांचा व्यापार होय. आज ग्राहक पर्यावरणपूरक वस्तूंना जास्त प्राधान्य देत आहेत. सौर ऊर्जा उत्पादने, जैवविघटनशील वस्तू, ऊर्जा बचत करणारी उपकरणे.यामुळे नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण होते.

3. संसाधनांचा योग्य वापर: वाणिज्यामुळे नैसर्गिक संसाधनांचा योग्य आणि नियोजनबद्ध वापर करता येतो. पाण्याची बचत, ऊर्जेची बचत, कच्च्या मालाचा पुनर्वापर यामुळे संसाधने दीर्घकाळ टिकून राहतात.

4. रोजगार निर्मिती: वाणिज्यामुळे विविध उद्योग आणि व्यवसाय निर्माण होतात, ज्यामुळे रोजगाराच्या संधी वाढतात. लघुउद्योग,कुटीर उद्योग,सेवा उद्योग. यामुळे आर्थिक विकास होतो आणि गरिबी कमी होते.

5. सामाजिक विकास: वाणिज्यामुळे समाजाच्या विकासाला मदत होते. अनेक उद्योग समाजासाठी विविध योजना राबवतात. शैक्षणिक मदत,आरोग्य सेवा, स्वच्छता कार्यक्रम यामुळे समाजाचा विकास होतो.

6. वाहतूक आणि वितरण व्यवस्था: वाणिज्यामुळे वस्तू योग्य ठिकाणी आणि योग्य वेळी पोहोचतात. यामुळे संसाधनांचा अपव्यय कमी होतो. साठवण व्यवस्था, वाहतूक सेवा,पुरवठा साखळी व्यवस्थापन.

7. ग्राहक जागरूकता: वाणिज्यामुळे ग्राहकांमध्ये पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण होते. पर्यावरणपूरक वस्तूंची जाहिरात, प्लास्टिक वापर कमी करण्याचे संदेश, ऊर्जा बचतीची माहिती.

8. आर्थिक विकास: वाणिज्यामुळे देशाच्या आर्थिक विकासाला चालना मिळते. आर्थिक विकासामुळे शाश्वत विकासासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध होतात.

शाश्वत विकासामध्ये व्यवस्थापनाची भूमिका:

शाश्वत विकास साध्य करण्यासाठी व्यवस्थापनाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. व्यवस्थापनाच्या योग्य नियोजनामुळे संसाधनांचा कार्यक्षम वापर, पर्यावरणाचे

संरक्षण आणि सामाजिक विकास साध्य होऊ शकतो. उद्योग आणि व्यवसाय संस्थांनी शाश्वत धोरणे स्वीकारल्यास आर्थिक विकासासोबत पर्यावरण संरक्षणही साध्य होते.

1. नियोजनाची भूमिका (Planning): व्यवस्थापनाचे पहिले कार्य म्हणजे नियोजन होय. शाश्वत विकासासाठी पर्यावरणपूरक धोरणे तयार करणे आवश्यक आहे. ऊर्जा बचत योजना तयार करणे, पर्यावरणपूरक उत्पादन प्रक्रिया वापरणे, संसाधनांचा योग्य वापर करणे,दीर्घकालीन विकासाचे नियोजन करणे.

2. संघटनाची भूमिका (Organizing): संस्थेमध्ये उपलब्ध संसाधनांचे योग्य वाटप करणे हे व्यवस्थापनाचे महत्त्वाचे कार्य आहे. कामाचे योग्य विभाजन करणे, मनुष्यबळाचा योग्य वापर करणे, कच्च्या मालाचा अपव्यय टाळणे,पर्यावरणपूरक तंत्रज्ञान वापरणे.

3. नेतृत्वाची भूमिका (Leadership): शाश्वत विकासासाठी कर्मचाऱ्यांना प्रेरणा देणे आवश्यक आहे. कर्मचाऱ्यांमध्ये पर्यावरण संरक्षणाची जाणीव निर्माण करणे, ऊर्जा बचतीसाठी प्रोत्साहन देणे, स्वच्छता आणि हरित उपक्रम राबवणे, सामाजिक जबाबदारीची भावना निर्माण करणे.

4. नियंत्रणाची भूमिका (Controlling) व्यवस्थापनाचे नियंत्रण कार्य संस्थेतील कामकाज योग्य प्रकारे चालते का हे तपासते. प्रदूषणावर नियंत्रण ठेवणे, उत्पादन प्रक्रियेवर लक्ष ठेवणे, ऊर्जा वापर कमी करणे, कचरा व्यवस्थापन करणे.

5. संसाधन व्यवस्थापन: शाश्वत विकासासाठी नैसर्गिक संसाधनांचा योग्य वापर आवश्यक आहे. पाणी बचत करणे, वीज बचत करणे,कच्च्या मालाचा योग्य वापर करणे,पुनर्वापर (Recycling) करणे.

6. सामाजिक जबाबदारी (Social Responsibility): व्यवस्थापनाने समाजाच्या विकासासाठी योगदान देणे आवश्यक आहे. शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात मदत करणे, वृक्षारोपण कार्यक्रम राबवणे,पर्यावरण संरक्षण कार्यक्रम आयोजित करणे.

7. हरित व्यवस्थापन (Green Management): हरित व्यवस्थापन म्हणजे पर्यावरणपूरक पद्धतींचा वापर करून उद्योग चालवणे. प्रदूषण कमी करणे, हरित तंत्रज्ञान वापरणे, पर्यावरणपूरक उत्पादने तयार करणे,

भारतामधील शाश्वत विकास:

भारतामध्ये शाश्वत विकास ही अत्यंत महत्त्वाची संकल्पना आहे. वाढती लोकसंख्या, औद्योगिकीकरण आणि शहरीकरण यामुळे नैसर्गिक संसाधनांवर ताण वाढत आहे. त्यामुळे आर्थिक विकासासोबत पर्यावरण संरक्षण आणि सामाजिक विकास साधणे आवश्यक झाले आहे. भारत सरकार विविध योजना आणि कार्यक्रमांच्या माध्यमातून शाश्वत विकास साध्य करण्याचा प्रयत्न करत आहे.

1. भारतामधील शाश्वत विकासाची गरज: भारतामध्ये शाश्वत विकासाची गरज पुढील कारणांमुळे आहे. लोकसंख्या वाढ, नैसर्गिक संसाधनांची कमतरता,पर्यावरण प्रदूषण, जंगलतोड, हवामान बदल.

2. भारतातील शाश्वत विकासाचे उद्दिष्टे: पर्यावरण संरक्षण करणे, आर्थिक विकास साधणे, गरिबी कमी करणे, रोजगार निर्माण करणे, संसाधनांचा योग्य वापर करणे.

3. भारत सरकारच्या शाश्वत विकास योजना:

- **स्वच्छ भारत अभियान:** देश स्वच्छ ठेवण्याचा कार्यक्रम, कचरा व्यवस्थापन सुधारणा,स्वच्छतेबाबत जनजागृती.
- **हरित ऊर्जा कार्यक्रम:** सौर ऊर्जा वापर वाढवणे,पवन ऊर्जा प्रकल्प, जलविद्युत प्रकल्प.
- **जल संवर्धन योजना:** पाणी बचत कार्यक्रम, जलसंधारण प्रकल्प,पावसाचे पाणी साठवणे.
- **वृक्षारोपण कार्यक्रम:** जंगल वाढवणे,पर्यावरण संरक्षण, जैवविविधता संरक्षण.

4. भारतामधील शाश्वत विकासाची क्षेत्रे:

- **कृषी क्षेत्र:** सेंद्रिय शेती, पाणी बचत तंत्रज्ञान,माती संरक्षण,
- **उद्योग क्षेत्र:** प्रदूषण कमी करणे, हरित तंत्रज्ञान वापरणे, ऊर्जा बचत करणे.
- **वाहतूक क्षेत्र:** सार्वजनिक वाहतूक वापर, इंधन बचत, प्रदूषण कमी करणे.

5. भारतातील शाश्वत विकासातील अडचणी- गरिबी, लोकसंख्या वाढ, औद्योगिक प्रदूषण, जागरूकतेचा अभाव, नैसर्गिक संसाधनांचा जास्त वापर.

आव्हाने:

शाश्वत विकास म्हणजे आर्थिक प्रगती करताना पर्यावरणाचे संरक्षण आणि सामाजिक न्याय राखणे. वाणिज्य आणि व्यवस्थापन क्षेत्र शाश्वत विकासासाठी महत्त्वाचे असले तरी त्यांना अनेक गंभीर आव्हानांना सामोरे जावे लागते. ही आव्हाने खालील प्रमाणे सखोलपणे स्पष्ट करता येतात:

1. आर्थिक मर्यादा (Financial Constraints):

शाश्वत विकासासाठी हरित तंत्रज्ञान, ऊर्जा बचत उपकरणे, प्रदूषण नियंत्रण प्रणाली यासाठी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक आवश्यक असते.

- लहान व मध्यम उद्योगांकडे (SMEs) पुरेसे भांडवल नसते.
- पर्यावरणपूरक उत्पादन खर्चिक असल्यामुळे नफा कमी होऊ शकतो.
- दीर्घकालीन लाभ असूनही तात्काळ आर्थिक फायदा कमी दिसतो.
- सौरऊर्जा किंवा पुनर्नवीनीकरण प्रक्रियेवर खर्च जास्त असतो.

2. तांत्रिक अडचणी (Technological Challenges):

- पर्यावरणपूरक तंत्रज्ञान सर्व उद्योगांमध्ये उपलब्ध नसते.
- नवीन तंत्रज्ञान वापरण्यासाठी प्रशिक्षण आवश्यक असते.
- आधुनिक यंत्रसामग्री महाग असते. यामुळे उद्योगांना शाश्वत तंत्रज्ञान स्वीकारणे कठीण जाते.

3. जागरूकतेचा अभाव (Lack of Awareness):

- अनेक व्यावसायिकांना शाश्वत विकासाचे महत्त्व पूर्णपणे समजलेले नसते.
- पर्यावरणपूरक पद्धतींबद्दल माहिती कमी असते.
- ग्राहकांमध्येही जागरूकता कमी असल्यामुळे मागणी कमी असते.

4. कायदे आणि नियमांचे पालन (Regulatory Challenges):

- पर्यावरणीय कायदे कठोर असतात.

- नियम वारंवार बदलत असतात.
- परवानग्या मिळवण्यासाठी वेळ आणि खर्च वाढतो. यामुळे उद्योगांना व्यवस्थापन करणे कठीण जाते.

5. स्पर्धात्मक बाजारपेठ (Market Competition):

- अनेक कंपन्या कमी किमतीत उत्पादने देतात.
- पर्यावरणपूरक उत्पादने तुलनेने महाग असतात.
- ग्राहक स्वस्त वस्तूंना प्राधान्य देतात. यामुळे शाश्वत व्यवसाय टिकवणे अवघड होते.

6. संसाधनांची कमतरता (Resource Scarcity):

- नैसर्गिक संसाधने मर्यादित आहेत.
- पाणी, ऊर्जा, कच्चा माल यांची उपलब्धता कमी होत आहे.
- संसाधनांचा वाढता वापर उद्योगांसाठी आव्हान ठरतो.

7. व्यवस्थापनातील अडचणी (Managerial Challenges):

- दीर्घकालीन नियोजन आवश्यक असते.
- कर्मचारी प्रशिक्षण आवश्यक असते.
- शाश्वत धोरणांची अंमलबजावणी कठीण असते.

8. सामाजिक जबाबदारीचे प्रश्न (Social Responsibility Issues):

- कामगारांचे हक्क, वेतन आणि सुरक्षितता राखणे आवश्यक आहे.
- स्थानिक समाजाशी चांगले संबंध ठेवावे लागतात.
- सामाजिक जबाबदारी (CSR) खर्च वाढवते.

9. मापन आणि अहवाल (Measurement & Reporting Problems):

- शाश्वत विकासाचे परिणाम मोजणे कठीण असते.
- पर्यावरणीय परिणामांचे अचूक मापन कठीण असते.

उपाययोजना:

शाश्वत विकास (Sustainable Development) म्हणजे वर्तमान पिढीच्या गरजा पूर्ण करताना भविष्यातील पिढ्यांच्या गरजांवर परिणाम होणार नाही याची काळजी घेणे. वाणिज्य आणि व्यवस्थापन क्षेत्र शाश्वत विकासासाठी विविध ठोस उपाययोजना राबवू शकतात. या उपाययोजनांमध्ये आर्थिक, पर्यावरणीय आणि सामाजिक घटकांचा समावेश असतो.

पर्यावरणीय उपाययोजना (Environmental Measures):

(1) हरित उत्पादन प्रणाली: वाणिज्य आणि उद्योगांनी उत्पादन प्रक्रियेत पर्यावरणाचे संरक्षण करण्यावर भर दिला पाहिजे.

पर्यावरणपूरक कच्चा माल वापरणे, कमी प्रदूषण करणारी यंत्रसामग्री वापरणे, ऊर्जा बचत करणारी तंत्रज्ञान वापरणे, उत्पादन प्रक्रियेत कार्बन उत्सर्जन कमी करणे, नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण होते, प्रदूषण कमी होते, उत्पादन टिकाऊ बनते.

(2) कचरा व्यवस्थापन (Waste Management): उद्योगांमधून निर्माण होणारा कचरा योग्य पद्धतीने हाताळणे आवश्यक आहे.

Reduce – कचरा कमी निर्माण करणे, Reuse – वस्तूंचा पुनर्वापर करणे, Recycle – कचऱ्याचे पुनर्प्रक्रिया करणे, जैविक कचऱ्याचे खत बनवणे, पर्यावरणाचे संरक्षण होते, खर्च कमी होतो, संसाधनांचा योग्य वापर होतो.

(3) अक्षय ऊर्जा वापर (Renewable Energy): ऊर्जा बचत आणि पर्यावरण संरक्षणासाठी अक्षय ऊर्जा वापरणे आवश्यक आहे. सौरऊर्जा वापरणे, पवनऊर्जा वापरणे, जैवऊर्जा वापरणे, ऊर्जा कार्यक्षम उपकरणे वापरणे, इंधन

खर्च कमी होतो, प्रदूषण कमी होते, दीर्घकालीन विकास साध्य होतो.

(4) हरित कार्यालय संकल्पना (Green Office Concept): कार्यालयीन व्यवस्थापनात पर्यावरणपूरक पद्धतींचा वापर करणे. पेपरलेस ऑफिस (Paperless Office),ई-मेल आणि डिजिटल कागदपत्रे वापरणे, LED दिवे वापरणे, पाणी बचत करणे, संसाधनांची बचत होते, खर्च कमी होतो.

आर्थिक उपाययोजना (Economic Measures):

(1) हरित गुंतवणूक (Green Investment): व्यवसायांनी पर्यावरणपूरक प्रकल्पांमध्ये गुंतवणूक करणे आवश्यक आहे. सौर ऊर्जा प्रकल्पांमध्ये गुंतवणूक, पर्यावरणपूरक उद्योगांना कर्ज देणे, टिकाऊ व्यवसायांना प्रोत्साहन देणे, आर्थिक विकास साध्य होतो, रोजगार निर्माण होतो.

(2) शाश्वत वित्त व्यवस्थापन (Sustainable Financial Management): वित्तीय संसाधनांचा योग्य वापर करणे आवश्यक आहे. खर्च नियंत्रण, दीर्घकालीन गुंतवणूक, संसाधनांचे योग्य नियोजन, जोखीम व्यवस्थापन, व्यवसाय स्थिर राहतो, आर्थिक विकास टिकाऊ होतो.

(3) लघु आणि मध्यम उद्योगांना प्रोत्साहन (MSME Development): लघु उद्योग शाश्वत विकासात महत्त्वाची भूमिका बजावतात. स्थानिक उद्योगांना मदत, स्वावलंबन वाढवणे, स्थानिक उत्पादनाला प्रोत्साहन, ग्रामीण विकास होतो, बेरोजगारी कमी होते.

सामाजिक उपाययोजना (Social Measures):

(1) सामाजिक जबाबदारी (CSR): व्यवसायांनी समाजासाठी कार्य करणे आवश्यक आहे. शिक्षणासाठी मदत, आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे, वृक्षारोपण कार्यक्रम, स्वच्छता अभियान, समाजाचा विकास होतो, कंपनीची प्रतिमा सुधारते.

(2) रोजगार निर्मिती (Employment Generation): व्यवसायांनी रोजगार निर्माण करणे आवश्यक आहे. स्थानिक लोकांना रोजगार देणे, कौशल्य विकास प्रशिक्षण देणे, महिला रोजगार वाढवणे, आर्थिक विकास होतो, गरिबी कमी होते.

(3) कर्मचारी कल्याण (Employee Welfare): कर्मचारी हा व्यवसायाचा महत्त्वाचा घटक आहे. सुरक्षित कार्यस्थळ, आरोग्य सुविधा, योग्य वेतन, प्रशिक्षण कार्यक्रम, उत्पादनक्षमता वाढते, कर्मचारी समाधान वाढते.

व्यवस्थापनाशी संबंधित उपाययोजना (Managerial Measures):

(1) शाश्वत नियोजन (Sustainable Planning): व्यवस्थापनाने दीर्घकालीन नियोजन करणे आवश्यक आहे. संसाधनांचे नियोजन, पर्यावरण संरक्षणाचे धोरण, जोखीम विश्लेषण, दीर्घकालीन उद्दिष्टे निश्चित करणे.

(2) शाश्वत पुरवठा साखळी (Sustainable Supply Chain): पुरवठा साखळी पर्यावरणपूरक असावी. स्थानिक पुरवठादार निवडणे, कमी प्रदूषण करणारी वाहतूकपर्यावरणपूरक पॅकेजिंग.

(3) तंत्रज्ञानाचा वापर (Use of Modern Technology): आधुनिक तंत्रज्ञान शाश्वत विकासासाठी महत्त्वाचे आहे. ई-कॉमर्स, ई-बँकिंग, डिजिटल व्यवहार, ऑटोमेशन, वेळ वाचतो,खर्च कमी होतो, संसाधनांची बचत होते.

ग्राहकाभिमुख उपाययोजना (Customer-Oriented Measures):

(1) हरित विपणन (Green Marketing): पर्यावरणपूरक उत्पादन विक्र, पुनर्वापर करता येणारे पॅकेजिंग, ग्राहक जागरूकता कार्यक्रम.

(2) ग्राहक शिक्षण (Consumer Education): पर्यावरणपूरक वस्तूंचा वापर शिकवणे, प्लास्टिक कमी वापरण्याचा संदेश देणे.

निष्कर्ष:

शाश्वत विकास साध्य करण्यासाठी वाणिज्य आणि व्यवस्थापन या दोन्ही क्षेत्रांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. आर्थिक प्रगती, पर्यावरण संरक्षण आणि सामाजिक विकास या तिन्ही घटकांचा समतोल राखणे ही आजच्या काळातील सर्वात मोठी गरज आहे. वाणिज्य क्षेत्र उत्पादन, व्यापार, वित्त आणि बाजारपेठ यांद्वारे आर्थिक वाढ घडवून आणते, तर व्यवस्थापन क्षेत्र उपलब्ध संसाधनांचा योग्य आणि कार्यक्षम वापर करून दीर्घकालीन विकास साध्य करण्यास मदत करते.

वाणिज्य क्षेत्रामुळे उद्योग, व्यापार आणि सेवा क्षेत्राचा विस्तार होतो, रोजगारनिर्मिती वाढते आणि देशाची आर्थिक प्रगती होते. परंतु या आर्थिक विकासासोबत पर्यावरणाचे संरक्षण करणे आवश्यक आहे. म्हणूनच हरित उत्पादन, कचरा व्यवस्थापन, अक्षय ऊर्जा वापर आणि पर्यावरणपूरक उत्पादन यांसारख्या उपाययोजनांमुळे वाणिज्य क्षेत्र शाश्वत विकासाला चालना देऊ शकते.

व्यवस्थापन क्षेत्र शाश्वत विकासासाठी नियोजन, संघटन, नियंत्रण आणि नेतृत्व या व्यवस्थापनाच्या कार्यांद्वारे महत्त्वपूर्ण योगदान देते. योग्य नियोजन आणि संसाधनांचे प्रभावी व्यवस्थापन केल्यास उत्पादन खर्च कमी होतो, नैसर्गिक संसाधनांची बचत होते आणि उद्योग अधिक टिकाऊ बनतात. व्यवस्थापनामुळे उद्योगांमध्ये पर्यावरणपूरक धोरणे राबविणे, कर्मचारी जागरूकता वाढविणे आणि सामाजिक जबाबदारी पार पाडणे शक्य होते.

शाश्वत विकासामध्ये सामाजिक घटकही तितकेच महत्त्वाचे आहेत. उद्योगांनी समाजासाठी शिक्षण, आरोग्य, रोजगारनिर्मिती आणि ग्रामीण विकास यांसारख्या उपक्रमांवर भर दिल्यास सामाजिक प्रगती साध्य होते. ग्राहकांना पर्यावरणपूरक उत्पादनांचा वापर करण्यास प्रोत्साहन देणे ही देखील वाणिज्य आणि व्यवस्थापनाची महत्त्वाची जबाबदारी आहे.

शाश्वत विकास साध्य करण्यासाठी वाणिज्य आणि व्यवस्थापन यांचा परस्पर समन्वय आवश्यक आहे. पर्यावरणपूरक उत्पादन, शाश्वत वित्त व्यवस्थापन, सामाजिक जबाबदारी, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि दीर्घकालीन नियोजन या घटकांद्वारे शाश्वत विकासाची उद्दिष्टे साध्य होऊ शकतात. योग्य धोरणे आणि प्रभावी व्यवस्थापन पद्धती अवलंबल्यास आर्थिक विकासासोबत पर्यावरण संरक्षण आणि सामाजिक कल्याण साध्य होईल.

संदर्भ:

१. व्यवस्थापनाची मुलतत्त्वे, लेखक- Stephen P. Rabbins & Mory coulter. पर्यावरणाचे पुस्तक
२. पर्यावरणाचा अभ्यास लेखक : Dr. Erach Bharucka.
३. पर्यावरण अभ्यासाची मुलतत्वे, लेखक - Mahua Basu & S. xavico.
४. Internet Source. Wikipedia.

ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

March - 2026
Vol. 15 - No. S1

उच्च शिक्षण आणि शाश्वत विकास: पश्चिम घाटातील आदिवासी महिला व युवक सक्षमीकरणाचा अभ्यास

ईश्वर अ. डुबे[1], डी. एल. खोकले[2]

[1]विदयार्थी, पॉलिटिकल सायन्स, मॉडर्न कॉलेज ऑफ आर्ट्स कॉमर्स आणि सायन्स, शिवाजीनगर, पुणे 05.
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
[2]विभाग प्रमुख, पॉलिटिकल सायन्स, मॉडर्न कॉलेज ऑफ आर्ट्स कॉमर्स आणि सायन्स, शिवाजीनगर, पुणे 05.
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे,
***Corresponding Author:** ईश्वर अ. डुबे*

DOI - 10.5281/zenodo.19491680

सारांश:

शाश्वत विकास ही आधुनिक विकास प्रक्रियेतील एक महत्त्वपूर्ण संकल्पना आहे. पर्यावरण संरक्षण, सामाजिक न्याय आणि आर्थिक प्रगती या तीन घटकांच्या संतुलित समन्वयातून शाश्वत विकास साध्य होतो. संयुक्त राष्ट्र संघाने मांडलेल्या शाश्वत विकास उद्दिष्टांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणाला अत्यंत महत्त्वाचे स्थान दिले असून शिक्षणामुळे सामाजिक समता, आर्थिक संधी आणि पर्यावरणीय जाणीव विकसित होते (United Nations, 2015).UNESCO (2017) च्या अहवालानुसार शिक्षण हे शाश्वत विकासाचे प्रभावी साधन असून शिक्षणाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये पर्यावरण संरक्षण, सामाजिक जबाबदारी आणि लोकशाही मूल्यांची जाणीव निर्माण होते. Amartya Sen (1999) यांनी Development as Freedom या ग्रंथामध्ये विकासाची संकल्पना मानवी क्षमतांच्या विस्ताराशी जोडली असून शिक्षणामुळे व्यक्तीचे स्वातंत्र्य आणि सामाजिक संधी वाढतात असे स्पष्ट केले आहे. Martha Nussbaum (2011) यांनी Creating Capabilities या ग्रंथामध्ये महिलांच्या सक्षमीकरणासाठी शिक्षण हे प्रभावी साधन असल्याचे नमूद केले आहे. भारतीय संदर्भात Tilak (2015) यांनी उच्च शिक्षण सामाजिक आणि आर्थिक प्रगतीसाठी महत्त्वाचे असल्याचे नमूद केले आहे. तसेच Virginius Xaxa (2014) यांच्या अभ्यासानुसार भारतातील आदिवासी समाज अजूनही शिक्षण आणि विकासाच्या बाबतीत मागे असून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाचा प्रसार आवश्यक आहे. Thomas आणि Pandey (2024) यांनी पश्चिम घाटातील आदिवासी समुदायाच्या जीवनमानावर केलेल्या संशोधनात शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक सुविधांच्या अभावामुळे आदिवासी समाज विकासाच्या प्रक्रियेत मागे राहतो असे आढळून आले आहे.

प्रस्तुत संशोधन पत्रात पश्चिम घाटातील आदिवासी समुदायातील महिला आणि युवकांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक सक्षमीकरणावर उच्च शिक्षणाचा कसा परिणाम होतो याचा अभ्यास करण्यात आला आहे. या अभ्यासासाठी "Mission Setubandhan" या उपक्रमाच्या माध्यमातून सह्याद्री पर्वतरांगांतील आदिवासी भागात क्षेत्रीय सर्वेक्षण, प्रत्यक्ष संवाद आणि निरीक्षण पद्धतींचा वापर करण्यात आला. या उपक्रमांतर्गत सुमारे ६०० आदिवासी महिला आणि युवकांशी संवाद साधून त्यांच्या शिक्षणाची पातळी, आरोग्यविषयक जागरूकता, सरकारी योजनांची माहिती आणि सामाजिक सहभाग यांचा अभ्यास करण्यात आला.

या अभ्यासातून असे आढळून आले की शिक्षण आणि सामाजिक जागरूकता कार्यक्रमांमुळे आदिवासी महिलांमध्ये आत्मविश्वास वाढतो, युवकांमध्ये नेतृत्वगुण विकसित होतात आणि पर्यावरण संवर्धन व सामाजिक विकासाबाबत सकारात्मक दृष्टीकोन निर्माण होतो. त्यामुळे उच्च शिक्षण आणि सामाजिक जागरूकता उपक्रम यांचा समन्वय आदिवासी समाजाच्या शाश्वत विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरतो.

मुख्य शब्द: उच्च शिक्षण, शाश्वत विकास, आदिवासी महिला सक्षमीकरण, युवक सक्षमीकरण, पश्चिम घाट, सामाजिक विकास, मिशन सेतूबंधन.

प्रस्तावना:

शाश्वत विकास ही संकल्पना आधुनिक विकासाच्या चर्चेमध्ये अत्यंत महत्त्वपूर्ण ठरली आहे. शाश्वत विकास म्हणजे असा विकास जो वर्तमान पिढीच्या गरजा पूर्ण करतो आणि भविष्यातील पिढ्यांच्या गरजांवर परिणाम न करता सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय संतुलन राखतो (United Nations, 2015). या संकल्पनेमध्ये सामाजिक समता, आर्थिक प्रगती आणि पर्यावरण संरक्षण या तीन घटकांचा समतोल राखणे आवश्यक मानले जाते. संयुक्त राष्ट्र संघाने मांडलेल्या शाश्वत विकास उद्दिष्टांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणाला (SDG-4) विशेष महत्त्व देण्यात आले आहे. शिक्षणामुळे व्यक्तींमध्ये ज्ञान, कौशल्य आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव विकसित होते तसेच सामाजिक आणि आर्थिक विकासाला चालना मिळते (UNESCO, 2017).

उच्च शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन मानले जाते. Amartya Sen (1999) यांनी त्यांच्या Development as Freedom या ग्रंथामध्ये विकासाची संकल्पना मानवी क्षमतांच्या विस्ताराशी जोडली आहे. त्यांच्या मते शिक्षणामुळे व्यक्तीच्या क्षमतांचा विकास होतो आणि सामाजिक, आर्थिक तसेच राजकीय प्रक्रियेमध्ये सक्रिय सहभाग घेण्याची संधी निर्माण होते. Martha Nussbaum (2011) यांनी देखील मानवी विकासाच्या प्रक्रियेत शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले असून महिलांच्या सक्षमीकरणासाठी शिक्षण अत्यंत महत्त्वाचे असल्याचे नमूद केले आहे. शिक्षणामुळे महिलांमध्ये आत्मविश्वास वाढतो आणि त्या कुटुंब तसेच समाजाच्या निर्णय प्रक्रियेत सक्रिय भूमिका बजावतात.

भारतीय संदर्भात आदिवासी समाज हा सामाजिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाचा घटक असला तरी अनेक आदिवासी समुदाय अजूनही शिक्षण, आरोग्य आणि आर्थिक संधींच्या बाबतीत मागे आहेत. Virginius Xaxa (2014) यांच्या अभ्यासानुसार आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाचा प्रसार अत्यंत आवश्यक आहे. Thomas आणि Pandey (2024) यांनी पश्चिम घाटातील आदिवासी समुदायाच्या जीवनमानावर केलेल्या संशोधनात शिक्षणाच्या अभावामुळे सामाजिक आणि आर्थिक विकासावर परिणाम होत असल्याचे नमूद केले आहे.

पश्चिम घाट हा जैवविविधतेने समृद्ध प्रदेश असून येथे अनेक आदिवासी समुदाय राहतात. या भागातील सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी शिक्षण आणि सामाजिक जागरूकता महत्त्वाची भूमिका बजावतात. या पार्श्वभूमीवर प्रस्तुत संशोधनामध्ये पश्चिम घाटातील आदिवासी महिला आणि युवकांच्या सक्षमीकरणामध्ये उच्च शिक्षणाची भूमिका अभ्यासण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. Mission Setubandhan या सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून क्षेत्रीय अभ्यास करून सुमारे ६०० आदिवासी महिला आणि युवकांशी संवाद साधण्यात आला. या अभ्यासातून शिक्षण, सामाजिक सहभाग आणि शाश्वत विकास यांमधील संबंध समजून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

अभ्यासाची उद्दिष्टे:

प्रस्तुत संशोधनाचा मुख्य उद्देश पश्चिम घाटातील आदिवासी समाजाच्या संदर्भात उच्च शिक्षण, सामाजिक सक्षमीकरण आणि शाश्वत विकास यांमधील संबंधाचा अभ्यास करणे हा आहे. या संशोधनाची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत:

- ✓ पश्चिम घाटातील आदिवासी समाजाच्या शैक्षणिक आणि सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.
- ✓ आदिवासी महिला आणि युवकांच्या सक्षमीकरणामध्ये उच्च शिक्षणाची भूमिका समजून घेणे.
- ✓ आदिवासी भागातील साक्षरता दर आणि महिला साक्षरतेच्या आधारे सामाजिक विकासाचे विश्लेषण करणे.
- ✓ Mission Setubandhan या सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून आदिवासी समाजामध्ये निर्माण झालेल्या शैक्षणिक आणि सामाजिक जागरूकतेचा अभ्यास करणे.
- ✓ शाश्वत विकासाच्या दृष्टीने आदिवासी समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार किती महत्त्वाचा आहे हे स्पष्ट करणे.

साहित्य समीक्षा:

शाश्वत विकास, शिक्षण आणि सामाजिक सक्षमीकरण या विषयांवर अनेक संशोधकांनी अभ्यास केलेला आहे. विविध संशोधनांमधून असे दिसून येते की शिक्षण हे सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे साधन आहे.

Amartya Sen (1999) यांनी त्यांच्या प्रसिद्ध ग्रंथ **Development as Freedom** मध्ये विकासाची संकल्पना मानवी क्षमतांच्या विस्ताराशी जोडली आहे. त्यांच्या मते विकास हा केवळ आर्थिक वाढ नसून व्यक्तीच्या स्वातंत्र्य, संधी आणि क्षमतांच्या विस्ताराशी संबंधित असतो. शिक्षण हे या क्षमतांच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे साधन आहे. शिक्षणामुळे व्यक्तींना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय प्रक्रियेमध्ये सक्रिय सहभाग घेण्याची संधी मिळते. Sen यांच्या मते शिक्षणामुळे व्यक्तीच्या निर्णयक्षमतेत वाढ होते आणि समाजातील असमानता कमी करण्यास मदत होते.

Martha Nussbaum (2011) यांनी त्यांच्या Creating Capabilities: The Human Development Approach या ग्रंथामध्ये मानवी विकासाच्या प्रक्रियेत शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट केले आहे. त्यांच्या मते महिलांच्या सक्षमीकरणासाठी शिक्षण हा अत्यंत प्रभावी मार्ग आहे. शिक्षणामुळे महिलांमध्ये आत्मविश्वास वाढतो, सामाजिक सहभाग वाढतो आणि त्या कुटुंब तसेच समाजाच्या निर्णय प्रक्रियेत सक्रिय भूमिका बजावू लागतात. त्यामुळे महिला शिक्षणाचा प्रसार हा सामाजिक न्याय आणि शाश्वत विकासासाठी अत्यंत आवश्यक आहे.

Tilak (2015) यांनी भारतातील उच्च शिक्षण व्यवस्थेवर सखोल अभ्यास केला आहे. त्यांच्या संशोधनानुसार उच्च शिक्षण हे सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी महत्त्वपूर्ण साधन आहे. शिक्षणामुळे कौशल्य विकास, रोजगाराच्या संधी आणि सामाजिक गतिशीलता वाढते. Tilak यांच्या मते उच्च शिक्षणामुळे समाजातील वंचित घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात सहभागी होण्याची संधी मिळते. त्यामुळे शिक्षणाचा प्रसार हा सामाजिक समता निर्माण करण्यासाठी आवश्यक आहे.

Virginius Xaxa (2014) यांनी भारतातील आदिवासी समाजाच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीचा अभ्यास केला आहे. त्यांच्या संशोधनानुसार आदिवासी समाज अजूनही शिक्षण, आरोग्य आणि आर्थिक संधींच्या बाबतीत मागे आहे. अनेक आदिवासी भागांमध्ये शिक्षणाच्या सुविधा कमी असल्यामुळे सामाजिक विकासावर परिणाम होतो. Xaxa यांच्या मते

आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाचा प्रसार अत्यंत आवश्यक आहे.

Thomas आणि Pandey (2024) यांनी पश्चिम घाटातील आदिवासी समुदायाच्या जीवनमानावर संशोधन केले आहे. त्यांच्या अभ्यासात आदिवासी समाजाच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करण्यात आला आहे. या संशोधनातून असे दिसून आले की शिक्षणाच्या अभावामुळे आदिवासी समुदाय आर्थिक आणि सामाजिक विकासाच्या प्रक्रियेत मागे राहतो. शिक्षणाची उपलब्धता वाढल्यास आदिवासी समाजाच्या जीवनमानात सुधारणा होऊ शकते.

वरील सर्व अभ्यासांमधून असे स्पष्ट होते की शिक्षण हे सामाजिक परिवर्तन आणि शाश्वत विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे साधन आहे. विशेषतः आदिवासी समाजाच्या संदर्भात शिक्षणाचा प्रसार केल्यास सामाजिक समता, आर्थिक विकास आणि महिला सक्षमीकरणाला चालना मिळू शकते. प्रस्तुत संशोधनामध्ये पश्चिम घाटातील आदिवासी महिला आणि युवकांच्या सक्षमीकरणावर शिक्षणाचा प्रभाव अभ्यासण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

संकल्पनात्मक चौकट Conceptual Framework:

शाश्वत विकास, उच्च शिक्षण आणि सामाजिक सक्षमीकरण या संकल्पना एकमेकांशी निकट संबंध ठेवतात. शाश्वत विकास ही संकल्पना सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय विकासाचा समतोल साधण्यावर आधारित आहे. संयुक्त राष्ट्र संघाने मांडलेल्या शाश्वत विकास उद्दिष्टांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणाला (SDG-4) महत्त्वाचे स्थान दिले आहे (United Nations, 2015). शिक्षणामुळे सामाजिक समता, आर्थिक संधी आणि पर्यावरणीय जागरूकता वाढण्यास मदत होते.

उच्च शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन मानले जाते. Amartya Sen (1999) यांच्या मते शिक्षणामुळे व्यक्तीच्या क्षमतांचा विकास होतो आणि समाजातील विकास प्रक्रियेत सक्रिय सहभाग वाढतो. Martha Nussbaum (2011) यांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले असून शिक्षणामुळे महिलांचा सामाजिक आणि आर्थिक सहभाग वाढतो असे नमूद केले आहे.

आदिवासी समाजाच्या संदर्भात शिक्षणाचा अभाव हा विकासासाठी मोठा अडथळा ठरतो. Virginius Xaxa (2014) यांच्या मते आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाचा प्रसार अत्यंत आवश्यक आहे. प्रस्तुत संशोधनामध्ये Mission Setubandhan या उपक्रमाच्या माध्यमातून पश्चिम घाटातील आदिवासी भागात सुमारे ६०० महिला आणि युवकांशी संवाद साधून शिक्षण, सामाजिक सहभाग आणि सक्षमीकरण यांचा संबंध अभ्यासण्यात आला आहे.

या संकल्पनात्मक चौकटीत उच्च शिक्षण हे मुख्य घटक मानले असून त्यातून महिला सक्षमीकरण, युवक नेतृत्व आणि सामाजिक जागरूकता निर्माण होऊन शाश्वत विकासाला चालना मिळते असे गृहित धरले आहे.

संशोधन पद्धती:

Qualitative + Quantitative Method, Field Study,600 Respondents, Primary + Secondary Data, Comparative Analysis

प्रस्तुत संशोधनामध्ये पश्चिम घाटातील आदिवासी समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक स्थितीचा

अभ्यास करण्यासाठी गुणात्मक (Qualitative) आणि परिमाणात्मक (Quantitative) या दोन्ही संशोधन पद्धतींचा वापर करण्यात आला आहे. या अभ्यासाचा मुख्य उद्देश उच्च शिक्षण आणि सामाजिक जागरूकतेच्या माध्यमातून आदिवासी महिला आणि युवकांच्या सक्षमीकरणाचा अभ्यास करणे हा आहे.

या संशोधनासाठी क्षेत्रीय अभ्यास (Field Study) पद्धतीचा वापर करण्यात आला. Mission Setubandhan या सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून सह्याद्री पर्वतरांगांतील विविध आदिवासी गावांमध्ये प्रत्यक्ष भेट देऊन माहिती संकलित करण्यात आली. या अभ्यासात उडदावणे, रंधा खुर्द, रंधा बुद्रुक, कोलटेंबे, साम्रद, रतनवाडी, भंडारदरा, वाकी, मुतखेल, गुहिरे, घाटघर आणि शिंगणवाडी या गावांचा समावेश करण्यात आला.

डेटा संकलनासाठी प्राथमिक (Primary Data) आणि द्वितीयक (Secondary Data) या दोन्ही प्रकारच्या स्रोतांचा वापर करण्यात आला. प्राथमिक माहिती संकलित करण्यासाठी प्रत्यक्ष संवाद, मुलाखती, प्रश्नावली पद्धत आणि निरीक्षण पद्धतींचा वापर करण्यात आला. Mission Setubandhan या उपक्रमाच्या माध्यमातून सुमारे ६०० आदिवासी महिला आणि युवकांशी संवाद साधून त्यांच्या शिक्षणाची पातळी, सामाजिक सहभाग, रोजगाराच्या संधी आणि सरकारी योजनांविषयी जागरूकता यांची माहिती संकलित करण्यात आली.

द्वितीयक माहिती संकलनासाठी विविध संशोधन लेख, पुस्तके, सरकारी अहवाल आणि आंतरराष्ट्रीय संस्थांचे अहवाल यांचा वापर करण्यात आला. Amartya Sen, Martha Nussbaum, Tilak, Virginius Xaxa यांसारख्या संशोधकांच्या अभ्यासांचा संदर्भ घेऊन शिक्षण आणि सामाजिक विकास यांमधील संबंध समजून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला.

तसेच पश्चिम घाटातील निवडक गावांच्या लोकसंख्या, साक्षरता दर आणि महिला साक्षरतेच्या आकडेवारीचा वापर करून डेटा विश्लेषण करण्यात आले. या आकडेवारीच्या आधारे शिक्षणाची स्थिती, महिला सक्षमीकरण आणि सामाजिक विकास यांच्यामधील संबंध स्पष्ट करण्यात आले.

या संपूर्ण अभ्यासामध्ये तुलनात्मक विश्लेषण (Comparative Analysis) आणि वर्णनात्मक पद्धत (Descriptive Method) यांचा वापर करून निष्कर्ष मांडण्यात आले. त्यामुळे प्रस्तुत संशोधनामध्ये क्षेत्रीय अभ्यास आणि आकडेवारीच्या आधारे आदिवासी समाजाच्या शाश्वत विकासामध्ये शिक्षणाची भूमिका स्पष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

संशोधनातील पोकळी:

आदिवासी समाजाच्या सामाजिक आणि आर्थिक विकासावर अनेक संशोधकांनी अभ्यास केला आहे. Amartya Sen (1999), Tilak (2015) आणि Virginius Xaxa (2014) यांनी शिक्षण आणि सामाजिक विकास यामधील संबंध स्पष्ट केला आहे. तसेच Thomas आणि Pandey (2024) यांनी पश्चिम घाटातील आदिवासी समुदायाच्या जीवनमानावर संशोधन करून शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक सुविधांच्या अभावामुळे आदिवासी समाज विकासाच्या प्रक्रियेत मागे राहतो असे नमूद केले आहे.

मात्र या आधीच्या अभ्यासांमध्ये आदिवासी समाजाच्या शाश्वत विकासाच्या संदर्भात उच्च शिक्षण, महिला सक्षमीकरण आणि युवकांच्या सामाजिक सहभाग

यांचा एकत्रित अभ्यास तुलनेने कमी प्रमाणात झालेला दिसतो. विशेषतः पश्चिम घाटातील आदिवासी भागामध्ये क्षेत्रीय स्तरावर प्रत्यक्ष संवाद आणि सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून शिक्षणाचा प्रभाव अभ्यासणारे संशोधन मर्यादित आहे.

याच पार्श्वभूमीवर प्रस्तुत संशोधनामध्ये Mission Setubandhan या सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून पश्चिम घाटातील आदिवासी गावांमध्ये क्षेत्रीय अभ्यास करून महिला आणि युवकांच्या सक्षमीकरणावर शिक्षणाचा प्रभाव समजून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. त्यामुळे हे संशोधन आदिवासी समाजाच्या शाश्वत विकासाच्या अभ्यासामध्ये नवीन दृष्टिकोन प्रदान करते.

धोरणात्मक सूचना Policy Recommendations:

या संशोधनाच्या आधारे आदिवासी समाजाच्या शाश्वत विकासासाठी पुढील उपाययोजना महत्त्वाच्या ठरू शकतात.

१. शिक्षणाच्या सुविधांचा विस्तार: आदिवासी भागामध्ये शाळा, महाविद्यालये आणि डिजिटल शिक्षण सुविधा वाढवणे अत्यंत आवश्यक आहे. शिक्षणामुळे सामाजिक व आर्थिक प्रगतीला चालना मिळते.भारतीय संविधानातील कलम 21A नुसार शिक्षण हा मूलभूत अधिकार आहे आणि शिक्षणाचा हक्क कायदा, 2009 (Right to Education Act) सर्व मुलांना मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण देण्याची हमी देतो.तसेच केंद्र सरकारच्या एकलव्य मॉडेल निवासी विद्यालय (EMRS) योजना, राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 (NEP 2020) आणि समग्र शिक्षा अभियान यांसारख्या योजनांच्या माध्यमातून आदिवासी भागात शिक्षणाची गुणवत्ता आणि उपलब्धता वाढवता येऊ शकते. (MHRD, 2020; Government of India, 2009)

२. महिला शिक्षणावर विशेष भर: अनेक आदिवासी गावांमध्ये महिला साक्षरतेचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे महिलांसाठी विशेष शैक्षणिक कार्यक्रम, प्रौढ शिक्षण आणि कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे. भारतीय संविधानातील कलम 15(3) सरकारला महिलांसाठी विशेष तरतुदी करण्याचा अधिकार देते. त्याचप्रमाणे राष्ट्रीय महिला धोरण (National Policy for Women, 2016) आणि बेटी बचाओ बेटी पढाओ योजना यांसारख्या कार्यक्रमांद्वारे महिलांच्या शिक्षणाला चालना दिली जाते. यामुळे महिलांचा सामाजिक सहभाग वाढतो आणि त्यांचे आर्थिक सक्षमीकरण शक्य होते. (Government of India, 2016; Ministry of Women and Child Development, 2015)

३. कौशल्य विकास कार्यक्रम: आदिवासी युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी कौशल्य विकास आणि व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे अत्यंत आवश्यक आहे. कौशल्य भारत अभियान (Skill India Mission), प्रधानमंत्री कौशल विकास योजना (PMKVY) आणि दीनदयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना (DDU-GKY) या योजनांच्या माध्यमातून युवकांना रोजगाराभिमुख प्रशिक्षण देता येते. यामुळे स्थानिक संसाधनांवर आधारित उद्योग, हस्तकला, शेतीपूरक व्यवसाय आणि पर्यटन क्षेत्रात रोजगारनिर्मिती होऊ शकते. (Ministry of Skill Development and Entrepreneurship, 2015)

४. सामाजिक जागरूकता कार्यक्रम: Mission Setubandhan सारख्या सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून शिक्षण, आरोग्य, स्वच्छता आणि पर्यावरण संरक्षणाबाबत जागरूकता निर्माण करणे आवश्यक आहे.

यासाठी राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (NRHM), स्वच्छ भारत अभियान, तसेच वनहक्क कायदा 2006 (Forest Rights Act) यांसारख्या कार्यक्रमांबाबत आदिवासी समाजात माहिती पोहोचवणे महत्त्वाचे आहे. यामुळे आदिवासी समाजाला त्यांच्या हक्कांची जाणीव होते आणि सामाजिक विकासाच्या प्रक्रियेत त्यांचा सक्रिय सहभाग वाढतो. (Ministry of Tribal Affairs, 2006)

५. सरकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी: आदिवासी समाजासाठी उपलब्ध असलेल्या सरकारी योजनांची माहिती आणि त्यांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करणे आवश्यक आहे. भारतीय संविधानातील पंचवीसावी अनुसूची (Fifth Schedule) आदिवासी भागांच्या प्रशासनासाठी विशेष तरतुदी करते. तसेच पेसा कायदा 1996 (PESA Act) ग्रामसभेला स्थानिक संसाधनांवर नियंत्रण देतो. या कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी केल्यास आदिवासी समाजाच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय सक्षमीकरणाला मोठी चालना मिळू शकते. (Ministry of Tribal Affairs, 1996; Constitution of India)

सर्वेक्षण केलेल्या आदिवासी गावांतील लोकसंख्या व महिला साक्षरता व लिंग गुणोत्तर दर्शवणारा तक्ता:

	गावाचे नाव	घरांची संख्या	गावातील एकूण लोकसंख्या	महिला लोकसंख्या	एकूण साक्षरता प्रमाण(%)	महिला साक्षरता (%)	लिंग गुणोत्तर(महिल
1	उडदावणे	241	1539	789	47.91	38.90	1052
2	रंधा खुर्द	64	239	107	64.32	50.50	811
3	रंधा बुद्रुक	214	1123	559	69.16	44.38	991
4	कोलटेंबे	97	505	252	61.03	47.39	996
5	साम्रद	130	789	344	70.92	62.10	892
6	रतनवाडी	256	1118	546	60.86	50.32	955
7	भंडारदरा	393	1765	882	71.40	32.60	999
8	वाकी	200	951	482	71.41	58.81	1028
9	मुतखेल	252	1417	716	64.44	60.85	929
10	गुहिरे	178	932	470	71.55	57.45	904
11	घाटघर	197	1176	488	42.93	30.38	929
12	शिंगणवाडी	134	936	482	58.37	48.30	843

Map of Aerea:



Mission Setubandhan Case Study:

शाश्वत विकास आणि शिक्षण: पश्चिम घाटातील आदिवासी गावांचा अभ्यास:

शाश्वत विकासाच्या संकल्पनेमध्ये सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय विकास यांचा संतुलित समन्वय महत्त्वाचा मानला जातो. संयुक्त राष्ट्र संघाने मांडलेल्या शाश्वत विकास उद्दिष्टांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण (Quality Education – SDG 4) हे अत्यंत महत्त्वाचे उद्दिष्ट मानले गेले आहे (United Nations, 2015). शिक्षणामुळे व्यक्तीमध्ये सामाजिक जागरूकता, आर्थिक स्वावलंबन आणि पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण होते.

या पार्श्वभूमीवर पश्चिम घाटातील आदिवासी समाजाच्या सामाजिक व शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी Mission Setubandhan या उपक्रमाच्या माध्यमातून काही गावांमध्ये क्षेत्रीय अभ्यास करण्यात आला. या अभ्यासात उडदावणे, रंधा खुर्द, रंधा बुद्रुक, कोलटेंबे, साम्रद, रतनवाडी, भंडारदरा, वाकी, मुतखेल, गुहिरे, घाटघर आणि शिंगणवाडी या गावांचा समावेश करण्यात आला. या गावांच्या आकडेवारीवरून असे दिसून येते की या भागातील साक्षरतेचे प्रमाण गावागावांमध्ये वेगवेगळे आहे. उदाहरणार्थ, उडदावणे गावामध्ये एकूण साक्षरता दर ४७.९१ टक्के असून महिला साक्षरता दर ३८.९० टक्के आहे. घाटघर गावामध्ये साक्षरता दर केवळ ४२.९३ टक्के असून महिला साक्षरता दर ३०.३८ टक्के आहे. या आकडेवारीवरून काही गावांमध्ये शिक्षणाची पातळी अजूनही कमी असल्याचे दिसून येते.

दुसरीकडे साम्रद, वाकी आणि गुहिरे या गावांमध्ये साक्षरता दर तुलनेने जास्त असल्याचे दिसते. साम्रद गावामध्ये साक्षरता दर ७०.९२ टक्के असून महिला साक्षरता दर ६२.१० टक्के आहे. वाकी गावामध्ये साक्षरता दर ७१.४१ टक्के आणि महिला साक्षरता दर ५८.८१ टक्के आहे. गुहिरे गावामध्ये साक्षरता दर ७१.५५ टक्के असून महिला साक्षरता दर ५७.४५ टक्के आहे.

या आकडेवारीवरून असे स्पष्ट होते की काही गावांमध्ये शिक्षणाची स्थिती तुलनेने चांगली असली तरी अनेक गावांमध्ये महिला शिक्षण अजूनही मागे आहे. Virginius Xaxa (2014) यांच्या मते आदिवासी समाजाच्या विकासामध्ये शिक्षणाचा प्रसार अत्यंत महत्त्वाचा असून विशेषतः महिलांच्या शिक्षणामुळे सामाजिक परिवर्तन घडू शकते.

Mission Setubandhan या उपक्रमाच्या माध्यमातून सुमारे ६०० आदिवासी महिला आणि युवकांशी संवाद साधण्यात आला. या संवादातून असे आढळून आले की शिक्षणाबाबत जागरूकता वाढल्यास युवकांमध्ये नेतृत्वगुण विकसित होतात तसेच महिलांचा सामाजिक सहभाग वाढतो. Amartya Sen (1999) यांच्या मते शिक्षणामुळे व्यक्तीच्या क्षमतांचा विकास होतो आणि समाजाच्या विकासाला चालना मिळते.

त्यामुळे पश्चिम घाटातील आदिवासी समाजाच्या शाश्वत विकासासाठी शिक्षणाचा प्रसार करणे अत्यंत आवश्यक आहे. विशेषतः महिलांच्या शिक्षणावर भर दिल्यास सामाजिक समता, आर्थिक विकास आणि पर्यावरण संवर्धन यांना चालना मिळू शकते. Mission Setubandhan सारखे सामाजिक उपक्रम या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावू शकतात.

निष्कर्ष:

प्रस्तुत अभ्यासातून असे स्पष्ट होते की पश्चिम घाटातील आदिवासी आणि ग्रामीण भागांमध्ये शिक्षणाची स्थिती अजूनही असमान आणि मर्यादित आहे. काही गावांमध्ये साक्षरतेचे प्रमाण तुलनेने जास्त असले तरी अनेक गावांमध्ये विशेषतः महिला साक्षरतेचे प्रमाण कमी असल्याचे आढळून आले. यामुळे सामाजिक आणि आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत महिलांचा सहभाग मर्यादित राहतो. भारतीय संविधानातील कलम 21A आणि शिक्षणाचा हक्क कायदा 2009 यांद्वारे शिक्षणाचा मूलभूत अधिकार दिला असला तरी दुर्गम आदिवासी भागांमध्ये या अधिकाराची प्रभावी अंमलबजावणी करणे अजूनही एक मोठे आव्हान आहे.

या अभ्यासातून हेही दिसून आले की शिक्षणाचा प्रसार झाल्यास महिलांचे सक्षमीकरण, सामाजिक सहभाग आणि समुदायाचा सर्वांगीण विकास शक्य होतो. Amartya Sen (1999) यांच्या क्षमताविकास सिद्धांतानुसार शिक्षणामुळे व्यक्तीच्या संधी आणि क्षमतांचा विस्तार होतो, ज्यामुळे सामाजिक प्रगतीला चालना मिळते. तसेच Virginius Xaxa (2014) यांच्या मतानुसार आदिवासी समाजाच्या शाश्वत विकासासाठी शिक्षण, जागरूकता आणि स्थानिक सहभाग अत्यंत आवश्यक आहे.

Mission Setubandhan सारख्या सामाजिक उपक्रमांमुळे शिक्षण, आरोग्य आणि पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण होऊन सकारात्मक सामाजिक परिवर्तन घडू शकते. त्यामुळे शासन, स्थानिक स्वराज्य संस्था आणि स्वयंसेवी संस्था यांच्या संयुक्त प्रयत्नांद्वारे शिक्षणाच्या सुविधा वाढवणे, महिला शिक्षणाला प्रोत्साहन देणे आणि सरकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे अत्यंत गरजेचे आहे.

त्यामुळे असा निष्कर्ष काढता येतो की शिक्षण हा आदिवासी समाजाच्या शाश्वत विकासाचा मूलभूत आधार आहे. विशेषतः महिला शिक्षणावर भर दिल्यास सामाजिक समता, आर्थिक प्रगती आणि समुदाय सक्षमीकरणाची प्रक्रिया अधिक वेगाने पुढे जाऊ शकते.

संदर्भ References:

1. Dube, I. A. (2025). Tribal Women Empowerment.
2. Dube, I. A. (2026). Aadivawshi Mahila Sakaskhmikaran: Aak Nava Adhaya, Ahilaynager.
3. Sen, A. (1999). Development as Freedom. Oxford University Press, Oxford.
4. Nussbaum, M. (2011). Creating Capabilities: The Human Development Approach. Harvard University Press, Cambridge.
5. Tilak, J. B. G. (2015). Higher Education in India: In Search of Equality, Quality and Quantity. Orient Blackswan, New Delhi.
6. Xaxa, V. (2014). Report on the Status of Adivasis in India. Ministry of Tribal Affairs, Government of India.
7. Thomas, S., & Pandey, M. (2024). The Quality of Life among Tribal Communities Living in Western Ghats: An Exploratory

Research. International Journal of Research in Social Sciences.

8. United Nations. (2015). Transforming Our World: The 2030 Agenda for Sustainable Development. United Nations Publications.
9. UNESCO. (2017). Education for Sustainable Development Goals: Learning Objectives. UNESCO Publishing.
10. Government of India. (2020). Tribal Development Report. Ministry of Tribal Affairs, New Delhi.
11. Dreze, J., & Sen, A. (2013). An Uncertain Glory: India and its Contradictions. Princeton University Press.
12. Beteille, A. (2003). Equality and Universality: Essays in Social and Political Theory. Oxford University Press.
13. UNDP. (2018). Human Development Report. United Nations Development Programme.
14. Ministry of Education. (2020). National Education Policy 2020. Government of India.
15. World Bank. (2018). World Development Report: Learning to Realize Education's Promise. World Bank Publications.
16. Gadgil, M., & Guha, R. (1995). Ecology and Equity: The Use and Abuse of Nature in Contemporary India. Routledge.
17. Agarwal, B. (2010). Gender and Green Governance. Oxford University Press.
18. Shiva, V. (2005). Earth Democracy: Justice, Sustainability and Peace. Zed Books.
19. Chambers, R. (1997). Whose Reality Counts? Putting the First Last. Intermediate Technology Publications.
20. Freire, P. (1970). Pedagogy of the Oppressed. Continuum Publishing.
21. OECD. (2019). Education for Sustainable Development in Higher Education. OECD Publishing.
22. Government of Maharashtra. (2019). Tribal Development Policy Report. Tribal Development Department, Maharashtra.

ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

March - 2026
Vol. 15 - No. S1

मानवी क्षमता बांधणीद्वारे शाश्वत समाजाचा मार्ग म्हणून उच्च शिक्षण

प्रा. डापसे श्रीकांत राजू

इतिहास विभाग,सह्याद्री बहुजन विद्या प्रसारक समाजाचे सहकार महर्षी भाऊसाहेब संतूजी थोरात,कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय संगमनेर,जि.अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत.(सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे संलग्नित)

***Corresponding Author:* प्रा. डापसे श्रीकांत राजू**

DOI - 10.5281/zenodo.19491712

सारांश:

शाश्वत समाजाची उभारणी करणे ही आजच्या जागतिकीकरणाच्या व तंत्रज्ञानप्रधान युगातील एक महत्त्वाची गरज आहे. आर्थिक वाढ, सामाजिक न्याय आणि पर्यावरणीय संतुलन यांचा समन्वय साधणारा विकासच खऱ्या अर्थाने शाश्वत ठरतो. या प्रक्रियेत मानवी क्षमता बांधणी (Human Capacity Building) अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते. उच्च शिक्षण संस्था व्यक्तीमध्ये ज्ञान, कौशल्ये, मूल्ये आणि नवोन्मेषी दृष्टीकोन विकसित करतात. त्यामुळे उच्च शिक्षण हे शाश्वत समाजनिर्मितीचे प्रभावी साधन ठरते आहे. या संशोधन लेखात उच्च शिक्षण, मानवी क्षमता बांधणी आणि शाश्वत विकास यांतील परस्परसंबंध स्पष्ट करून त्याचे विविध पैलू अभ्यासले आहेत.

मुख्य शब्द: उच्च शिक्षण, मानवी क्षमता बांधणी, शाश्वत विकास, सामाजिक परिवर्तन, कौशल्य विकास

प्रस्तावना:

आजच्या काळात शाश्वत समाज ही संकल्पना जागतिक चर्चेचा केंद्रबिंदू ठरली आहे. United Nations ने २०१५ मध्ये जाहीर केलेल्या United Nations Sustainable Development Goals (SDGs) मध्ये शिक्षणाला विशेष स्थान देण्यात आले आहे. उद्दिष्ट क्रमांक ४ (Quality Education) हे सर्वसमावेशक आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणावर भर देते.उच्च शिक्षण हे केवळ पदवी प्राप्त करण्याचे साधन नसून व्यक्तीची बौद्धिक, सामाजिक व नैतिक क्षमता विकसित करण्याची प्रक्रिया आहे. त्यामुळे मानवी क्षमता वाढवून समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी उच्च शिक्षण अत्यंत आवश्यक ठरते.समाजामध्ये वावरण्यासाठी जी नीती मुल्ये विद्यार्थ्यांमध्ये असावी लागतात ती देण्याचे महत्वपूर्ण कार्य उच्च शिक्षण करते .

मानवी क्षमता बांधणी : संकल्पना:

मानवी क्षमता बांधणी म्हणजे व्यक्तीच्या ज्ञान, कौशल्ये, मूल्ये आणि नेतृत्वगुणांचा विकास करणे होय. Amartya Sen यांनी मांडलेल्या "Capability Approach" नुसार विकासाचा खरा अर्थ व्यक्तीच्या संधी आणि निवडी वाढविण्यात आहे. शिक्षणामुळे व्यक्तीमध्ये स्वावलंबन, विवेकबुद्धी आणि सामाजिक उत्तरदायित्व निर्माण होते. मानवाच्या प्रगतीमध्ये या सर्वांचा मोठा वाटा आहे .मानवी क्षमता बांधणीचे मुख्य घटक:

- बौद्धिक विकास
- कौशल्य विकास
- नैतिक व सामाजिक मूल्ये
- नेतृत्व व नवोन्मेष क्षमता

बौद्धिक विकास (Intellectual Development):

बौद्धिक विकास म्हणजे व्यक्तीच्या विचारशक्ती, विश्लेषण क्षमता, तर्कबुद्धी, सर्जनशीलता आणि

समस्यासोडवणूक कौशल्यांचा सर्वांगीण विकास होय. शिक्षणप्रक्रियेद्वारे व्यक्ती केवळ माहिती ग्रहण करत नाही, तर त्या माहितीचे विश्लेषण, मूल्यांकन आणि नवसर्जन करण्याची क्षमता विकसित करते.

बौद्धिक विकासाची संकल्पना:

प्राचीन काळापासून विचारवंतांनी बौद्धिक विकासाला महत्त्व दिले आहे. Aristotle यांनी तर्कशास्त्र आणि विवेकबुद्धीवर भर दिला, तर Jean Piaget यांनी संज्ञानात्मक विकासाच्या टप्प्यांचे सिद्धांत मांडले. त्यांच्या मते, व्यक्तीची विचारप्रक्रिया वयानुसार आणि अनुभवांनुसार विकसित होत जाते.

बौद्धिक विकासाची प्रमुख घटक:

1. **तर्कशक्ती (Reasoning Ability)** – योग्य-अयोग्य याचे विश्लेषण करण्याची क्षमता.
2. **चिकित्सक विचार (Critical Thinking)** – कोणत्याही माहितीचे अंधानुकरण न करता चिकित्सक दृष्टीकोनातून परीक्षण करणे.
3. **समस्यासोडवणूक कौशल्य (Problem Solving Skills)** – कठीण परिस्थितीत योग्य उपाय शोधण्याची क्षमता.
4. **सर्जनशीलता (Creativity)** – नवीन कल्पना व नवकल्पना निर्माण करण्याची क्षमता.
5. **निर्णयक्षमता (Decision Making Ability)** – परिस्थितीनुसार योग्य निर्णय घेण्याची क्षमता.

उच्च शिक्षण आणि बौद्धिक विकास:

उच्च शिक्षण संस्थांमध्ये विद्यार्थ्यांना संशोधन, प्रकल्पकार्य, चर्चासत्रे आणि सादरीकरणे यांच्या माध्यमातून विचारप्रक्रिया विकसित करण्याची संधी मिळते.

- **संशोधन कार्य:** विद्यार्थ्यांमध्ये विश्लेषणात्मक दृष्टीकोन वाढवते.
- **बहुविषयक अभ्यास**: विविध विषयांचा परस्परसंबंध समजावून देतो.
- **चर्चा व वादविवाद:** चिकित्सक विचारांना चालना देतात.

Amartya Sen यांच्या मतानुसार, शिक्षणामुळे व्यक्तीला स्वतंत्रपणे विचार करण्याची व सामाजिक जबाबदारी पार पाडण्याची क्षमता प्राप्त होते.

बौद्धिक विकासाचे समाजावर परिणाम:

- सामाजिक जाणीव वाढते.समाजाप्रती आपले उत्तरदायीत्व कळते.
- वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित होऊन प्रगती होते.
- नवोन्मेष व तंत्रज्ञान विकासाला चालना व गती मिळते.
- लोकशाही मूल्यांची जपणूक होऊन लोकशाही बळकट होण्यास मदत होते.

बौद्धिकदृष्ट्या सक्षम नागरिक समाजातील अंधश्रद्धा, अज्ञान आणि असमानता दूर करण्यास मदत करतात. बौद्धिकदृष्ट्या सक्षम नागरिक म्हणजे जे विवेक, तर्कशक्ती आणि ज्ञानाच्या आधारे विचार करतात. अशा नागरिकांमुळे समाजात सकारात्मक बदल घडून येतात. समाजातील अंधश्रद्धा, अज्ञान आणि असमानता दूर करण्यासाठी त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. बौद्धिकदृष्ट्या सक्षम नागरिक वैज्ञानिक दृष्टीकोन

स्वीकारतात. ते प्रत्येक गोष्टीकडे तर्कशुद्ध आणि वैज्ञानिक पद्धतीने पाहतात. त्यामुळे जादूटोणा, भुताखेत, ग्रहदोष यांसारख्या अंधश्रद्धांवर विश्वास ठेवण्याऐवजी ते लोकांना योग्य माहिती देतात आणि समाजात वैज्ञानिक विचारसरणी निर्माण करतात. शिक्षण आणि ज्ञानाच्या माध्यमातून बौद्धिकदृष्ट्या सक्षम नागरिक समाजातील लोकांना जागरूक करतात. ते शिक्षणाचे महत्त्व सांगतात, माहितीचे योग्य प्रसारण करतात आणि लोकांमध्ये ज्ञानाची कास धरायला प्रेरित करतात. त्यामुळे समाजातील अज्ञान कमी होण्यास मदत होते. बौद्धिकदृष्ट्या सक्षम नागरिक समानतेचा आणि मानवतेचा विचार करतात. जात, धर्म, लिंग किंवा आर्थिक स्थितीच्या आधारावर होणाऱ्या भेदभावाला ते विरोध करतात. समान हक्क, सामाजिक न्याय आणि लोकशाही मूल्यांची जपणूक करून ते समाजातील असमानता कमी करण्यासाठी कार्य करतात. अशा नागरिकांमुळे समाजात सुधारणा घडतात. ते सामाजिक समस्यांवर चर्चा करतात, जनजागृती करतात आणि समाजाला प्रगत दिशेने नेण्याचा प्रयत्न करतात. म्हणूनच बौद्धिकदृष्ट्या सक्षम नागरिक हे समाजाच्या प्रगतीचे आधारस्तंभ असतात. ते अंधश्रद्धा, अज्ञान आणि असमानता दूर करून समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन, समता आणि प्रगतीचे वातावरण निर्माण करतात.

कौशल्य विकास (Skill Development):

कौशल्य विकास म्हणजे व्यक्तीच्या ज्ञानाला व्यवहार्य कृतीत रूपांतरित करण्याची प्रक्रिया होय. शिक्षणाद्वारे प्राप्त झालेल्या सैद्धांतिक ज्ञानासोबतच तांत्रिक, व्यावहारिक आणि सामाजिक कौशल्यांचा विकास करणे ही कौशल्य विकासाची मुख्य उद्दिष्टे आहेत. आधुनिक काळात रोजगारक्षमतेसाठी (Employability) आणि शाश्वत समाजनिर्मितीसाठी कौशल्य विकास अत्यावश्यक ठरतो.

१. कौशल्य विकासाची संकल्पना:

कौशल्य म्हणजे विशिष्ट कार्य प्रभावीपणे आणि कार्यक्षमतेने पार पाडण्याची क्षमता. कौशल्ये दोन प्रमुख प्रकारची असतात:

- **कठोर कौशल्ये (Hard Skills)** – तांत्रिक, व्यावसायिक आणि विषयाधारित कौशल्ये (उदा. संगणक प्रोग्रामिंग, लेखाशास्त्र, अभियांत्रिकी तंत्र).
- **मृदू कौशल्ये (Soft Skills)** – संवादकौशल्य, नेतृत्वगुण, संघकार्य, वेळ व्यवस्थापन, समस्या सोडविण्याची क्षमता.

२. उच्च शिक्षण आणि कौशल्य विकास: उच्च शिक्षण संस्थांमध्ये अभ्यासक्रम, प्रात्यक्षिक यामुळे बौद्धिक विकास घडून येतो

शाश्वत समाजाची संकल्पना

शाश्वत समाज म्हणजे असा समाज जो वर्तमान गरजा पूर्ण करताना भविष्यातील पिढ्यांच्या गरजांवर परिणाम करीत नाही. World Commission on Environment and Development यांनी १९८७ मध्ये प्रसिद्ध केलेल्या "Our Common Future" अहवालात शाश्वत विकासाची व्याख्या दिली आहे.

शाश्वत समाजाचे तीन आधारस्तंभ:

1. आर्थिक शाश्वतता: आर्थिक शाश्वतता म्हणजे अशी आर्थिक व्यवस्था जी वर्तमान पिढीच्या गरजा पूर्ण करताना भविष्यातील पिढ्यांच्या गरजांवर कोणताही विपरीत परिणाम होऊ देत नाही. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आर्थिक संसाधनांचा योग्य व संतुलित वापर करणे ही

आर्थिक शाश्वततेची मुख्य कल्पना आहे. आर्थिक शाश्वततेसाठी शिक्षण आणि कौशल्य विकास महत्त्वाचे असतात. उच्च शिक्षणाद्वारे व्यक्तींना विविध कौशल्ये प्राप्त होतात, ज्यामुळे रोजगाराच्या संधी वाढतात आणि आर्थिक स्थैर्य निर्माण होते. नैसर्गिक व मानवी संसाधनांचा संतुलित आणि जबाबदारीने वापर करणे आवश्यक असते. संसाधनांचा अपव्यय टाळून त्यांचा दीर्घकालीन विकासासाठी उपयोग केला तर आर्थिक शाश्वतता साध्य होते.

2. सामाजिक समता: सामाजिक समता म्हणजे समाजातील सर्व व्यक्तींना समान हक्क, संधी आणि सन्मान मिळणे. जात, धर्म, लिंग, भाषा, आर्थिक स्थिती किंवा इतर कोणत्याही आधारावर भेदभाव न करता प्रत्येकाला समान वागणूक देणे ही सामाजिक समतेची मूलभूत संकल्पना आहे. शाश्वत आणि प्रगत समाज घडवण्यासाठी सामाजिक समता अत्यंत आवश्यक आहे.

3. पर्यावरणीय संतुलन: पर्यावरणीय संतुलन म्हणजे नैसर्गिक संसाधने, जीवसृष्टी आणि मानवी क्रिया यांच्यातील समतोल राखणे. मानवाने विकास करताना पर्यावरणाचे संरक्षण करणे आणि नैसर्गिक संसाधनांचा शाश्वत पद्धतीने वापर करणे आवश्यक आहे. शाश्वत समाजाच्या निर्मितीसाठी पर्यावरणीय संतुलन अत्यंत महत्त्वाचे मानले जाते.

या तिन्ही घटकांमध्ये संतुलन राखण्यासाठी सुशिक्षित व सजग नागरिकांची आवश्यकता असते.

उच्च शिक्षणाची भूमिका:

(अ) ज्ञाननिर्मिती व संशोधन: उच्च शिक्षण संस्था संशोधनाद्वारे नवीन ज्ञान निर्माण करतात. विज्ञान, तंत्रज्ञान, पर्यावरणशास्त्र व सामाजिक शास्त्रे या क्षेत्रातील संशोधनामुळे शाश्वत उपाययोजना विकसित होतात.

(ब) कौशल्य व रोजगार निर्मिती: कौशल्याधारित शिक्षणामुळे तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. रोजगारनिर्मितीमुळे आर्थिक स्थैर्य वाढते आणि गरिबी कमी होते.

(क) सामाजिक समतेचा प्रसार: उच्च शिक्षण सामाजिक विषमता कमी करण्यास मदत करते. शिक्षणामुळे वंचित घटकांना संधी उपलब्ध होतात व सामाजिक न्याय प्रस्थापित होतो.

(ड) पर्यावरणीय जागरूकता: पर्यावरण शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण होते. हरित तंत्रज्ञान, नवीकरणीय ऊर्जा व जैवविविधतेचे संवर्धन याबाबत संशोधनाला चालना मिळते.

भारतीय संदर्भातील उच्च शिक्षण व शाश्वतता:

भारतामध्ये उच्च शिक्षणाला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. University Grants Commission (UGC) व Ministry of Education यांच्या माध्यमातून विविध धोरणे राबवली जातात.

National Education Policy 2020 (NEP 2020) मध्ये बहुविषयक शिक्षण, संशोधन प्रोत्साहन व कौशल्य विकासावर भर देण्यात आला आहे. या धोरणामुळे विद्यार्थ्यांची सर्जनशीलता व संशोधन क्षमता वाढवून शाश्वत समाजनिर्मितीला चालना मिळते.

उच्च शिक्षणासमोरील आव्हाने:

- गुणवत्तेतील असमानता
- ग्रामीण-शहरी दरी
- संशोधनासाठी अपुरा निधी

- कौशल्य व उद्योग यांतील दुवा अभाव

ही आव्हाने दूर करण्यासाठी धोरणात्मक सुधारणा व प्रभावी अंमलबजावणी आवश्यक आहे.

उपाययोजना व शिफारसी:

1. **बहुविषयक अभ्यासक्रम:** पर्यावरण, अर्थशास्त्र व समाजशास्त्र यांचा समन्वय असलेले अभ्यासक्रम विकसित करणे.
2. **संशोधनाला प्रोत्साहन:** शाश्वत तंत्रज्ञान व हरित ऊर्जा संशोधनासाठी निधी वाढवणे.
3. **कौशल्याधारित शिक्षण:** उद्योगसंलग्न अभ्यासक्रम राबविणे.
4. **समावेशक शिक्षण:** वंचित घटकांसाठी शिष्यवृत्ती व डिजिटल सुविधा उपलब्ध करणे.
5. **समाजसंलग्नता:** विद्यापीठांनी स्थानिक समस्यांवर आधारित संशोधन करणे.

निष्कर्ष:

मानवी क्षमता बांधणी ही शाश्वत समाजनिर्मितीची मूलभूत अट आहे. उच्च शिक्षण संस्था व्यक्तीला ज्ञान, कौशल्ये व मूल्ये प्रदान करून समाजात परिवर्तन घडवून आणतात. आर्थिक विकास, सामाजिक समता आणि पर्यावरणीय संतुलन साधण्यासाठी उच्च शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.त्यामुळे उच्च शिक्षणाला केवळ करिअरनिर्मितीचे साधन न मानता समाजपरिवर्तनाचे माध्यम म्हणून पाहणे आवश्यक आहे. शाश्वत समाजाच्या दिशेने वाटचाल करताना मानवी क्षमता विकासावर आधारित शिक्षणव्यवस्था हीच भविष्यातील यशाची गुरुकिल्ली ठरेल.

संदर्भ साधने:

1. यशवंतराव चव्हाण (संपा.) – *उच्च शिक्षण आणि समाज विकास*, पुणे: महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ.
2. भालचंद्र नेमाडे – *शिक्षण, समाज आणि संस्कृती*, पुणे : कॉन्टिनेन्टल प्रकाशन.
3. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती) – *शिक्षणशास्त्र व समाजशास्त्र विषयक संदर्भ पुस्तके*, पुणे.
4. युनिव्हर्सिटी ग्रँट्स कमिशन (UGC) – *उच्च शिक्षणातील गुणवत्ता व विकास*, नवी दिल्ली.
5. डॉ. बाबासाहेब आंबेडकर – *शिक्षणाचे महत्त्व व सामाजिक परिवर्तन* (भाषणे व लेखसंग्रह).
6. Amartya Sen – *Development as Freedom*. Oxford University Press, 1999.
7. Martha C. Nussbaum – *Creating Capabilities: The Human Development Approach*. Harvard University Press, 2011.
8. United Nations Educational, Scientific and Cultural Organization – *Education for Sustainable Development Goals: Learning Objectives*. UNESCO, 2017.
9. United Nations Development Programme – *Human Development Report*. UNDP Publications.
10. World Bank – *Higher Education for Development: An Evaluation of the World Bank Group's Support*.
11. Paulo Freire – *Pedagogy of the Oppressed*. Continuum Publishing.
12. Organisation for Economic Co-operation and Development – *Education at a Glance*. OECD Reports.

ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

March - 2026
Vol. 15 - No. S1

उच्च शिक्षण आणि मूल्य संवर्धन

नानासाहेब दत्तु दिघे

संशोधक विद्यार्थी, पेमराज सारडा महाविद्यालय, अहिल्यानगर

Corresponding Author: *नानासाहेब दत्तु दिघे*

DOI - 10.5281/zenodo.19491733

सारांश:

मानवी मूल्यांचे बीजारोपण करणे हे शिक्षणाचे अंतिम व चिरकालीन ध्येय असले पाहिजे, असे काही विचारवंतांचे मत आहे. ही मूल्ये विद्यार्थ्यामध्ये रुजविली नाहीत, तर भविष्यात अनेक गंभीर परिणाम होऊ शकतात. विचारवंत मूल्यशिक्षणाला जास्त महत्त्व देतात. मूल्यशिक्षणाद्वारे सुदृढ समाज निर्माण होतो आणि त्यातच व्यक्तींचे हित दडलेले असते. शैक्षणिक तत्त्वज्ञानाच्या संदर्भात मूल्य म्हणजे आदर्श व ध्येये आहेत. हे आदर्श वा ध्येये प्राप्त केल्यानंतर एखाद्या व्यक्तीत, समाजात किंवा ज्याला आपण आपल्या स्वभावाचा अत्युच्च घटक समजतो अशा घटकाच्या सर्व भागांत पूर्णतेची खोलवर भावना जागृत होते. वैयक्तिक व सामाजिक दृष्टीने मूल्यशिक्षण आवश्यक आहे. मूल्याधिष्ठित वर्तन हे व्यक्तीमत्त्वाचे प्रमुख अंग आहे. मूल्यांमुळे वर्तनाला विशिष्ट दिशा आणि तात्त्विक बैठक लाभते. मानसिक संघर्षाच्या वेळी कोणता निर्णय घ्यावा, याचे उत्तर मूल्यांमुळे मिळते. मूल्याधिष्ठित वर्तनामुळे व्यक्ती अंतिम दृष्ट्या समाधानी होते. मूल्यांमुळे सामाजिक स्वास्थ्य निर्मिती होते. सहकार्य, प्रेम या मूल्यांमुळे तणाव कमी होतो. विविधता असलेल्या देशात एकात्मतेची भावना निर्माण होण्यास मूल्यशिक्षणाची मदत होते.

मुख्य शब्द: विविधता, मानवी मूल्यांचे बीजारोपण, मानवी मूल्ये, मूल्यशिक्षण, तत्वे

प्रस्तावना :

समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी शिक्षण वेगवेगळ्या प्रकारे काम करीत असते. शिक्षणाने जी सुसंस्कृतता व्यक्तीच्या ठिकाणी यायला हवी ती परिणामकारकरित्या येते की नाही यावर अभ्यासक लक्ष ठेवून असतात. जे बदल विद्यमान शिक्षणपद्धतीत त्यांना आवश्यक वाटतात ते बदल सुचवून शिक्षणाचा नवा अध्याय रचण्याचे काम करतात. राष्ट्रीय शिक्षणाबद्दल लोकमान्यांची भूमिका नेमकी काय होती, त्यावर तत्कालीन समाजात काय चर्चा झाली आणि त्याचे परिणाम काय झाले हे शेवटी काळाने ठरविलेले गणित असते आणि त्यानुसारच जे घडायचे ते घडते. त्याचा परिणाम भले कमी-जास्त असेल, पण तो होतच असतो. म्हणून ज्या ज्या विचारवंतांची आजवर आपण शिक्षणविषयक भाष्ये ऐकली-वाचली ती घेऊनच पुढे जावे लागेल, किंबहुना जायला हवे, तरच शिक्षणातून सुसंस्कृततेकडे हा विचार मूळ धरेल आणि आणि समाजात मुल्यनिर्मितीची प्रक्रिया अविरतपणे सुरु राहू शकते. शिक्षणात असा हा विचारांचा प्रवाह सुरू राहाणे ही एक महत्त्वाची घटना आहे. त्या घटनेत जे वाईट घडते ते तत्काळ टाकून देत पुढे जायला हवे. शिक्षणाचा हाच प्रवाह भारताचा विचार करता सर्वदूरपर्यंत गेला. त्यात एका टप्प्यावर ग्रामीण आणि शहरी असे भागही पाडले गेले. शहरी भागात दिले जाणारे शिक्षण हे उच्चभ्रूंसाठी, तर ग्रामीण भागातले शिक्षण हे गोरगरिबांसाठी अशीही एक तुलना केली गेली. खरे तर शिक्षण ही एक प्रक्रिया म्हणून आपण मान्य केल्यानंतर त्यात असे उंच-सखल मानण्याचे काहीच कारण नाही. भले शिक्षणाचे टप्पे ग्रामीण आणि शहरी भागानुसार बदलू शकतील, मात्र शिक्षणाचा स्तर चांगला आणि निम्न असे होता कामा नये.

व्यक्तीच्या अंगी शिक्षणाच्या साह्याने मूल्य रुजवून त्या मूल्यांचा उपयोग त्या व्यक्तीकडून स्वत:साठी आणि राष्ट्रसेवेसाठी होणे म्हणजे मूल्यशिक्षण होय. मूल्यशिक्षण हे शिक्षणाचे मूळ स्रोत आहे. मूल्य या संकल्पनेला बरीच मोठी ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभली असून मानवी प्राण्यांच्या उत्क्रांत अवस्थेपासून मूल्यांची सुरुवात होते. आजही त्यात भरच पडत असल्यामुळे मूल्यांची संख्या वाढलेली आहे. मानवाचे जीवन सामाजिक, आर्थिक, राजकीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय अशा बहुविध क्षेत्रांशी निगडित असल्यामुळे निरनिराळ्या क्षेत्रांमधून बहुविध मूल्ये आलेली आणि विकसित झालेली आहे. मूल्य या संकल्पनेचे उगमस्थान आर्थिक असले, तरी मूल्य संकल्पनेने आर्थिक क्षेत्राच्या सीमारेषा केव्हाच ओलांडून पार केलेल्या आहेत. 'लोकशाही मूल्यांचे रक्षण; सामाजिक, आर्थिक आणि राजकीय समतेचे संवर्धन; सर्व धर्मांच्या सांस्कृतिक परंपरेतून आलेल्या मूल्यांचा स्वीकार आणि प्रत्येक धर्मातील अनिष्ट गोष्टींना पायाभूत असणारी तात्त्वीक भूमिका विद्यार्थांना समजावून सांगणे, तसेच शिक्षणक्षेत्रात आणि समाजजीवनात या तत्त्वांच्या पालनासाठी त्यांना कटिबद्ध करणे म्हणजेच खरे मूल्यशिक्षण होय'

मानवी मूल्ये :

मानवी मूल्यांचे अनेक प्रकार असून त्यांमध्ये शैक्षणिक मूल्ये, बौद्धिक मूल्ये, नैतिक मूल्ये, व्यक्तिगत मूल्ये, स्वाभाविक मूल्ये, आध्यात्मिक मूल्ये, सामाजिक मूल्ये, आर्थिक मूल्ये, राजकीय मूल्ये, राष्ट्रीय किंवा घटनात्मक मूल्ये, व्यावसायिक मूल्ये, मनोरंजनात्मक मूल्ये, सौंदर्याधिष्ठित मूल्ये इत्यादी प्रकार आहेत. मूल्ये पुढील प्रमाणे सांगता येते :

- मूल्य म्हणजे व्यक्तीने काय केले पाहिजे याचे उत्तर होय.
- परंपरेला धरून एखाद्याच्या शारीरिक किंवा मानसिक स्वास्थाला, समाजहिताला, समायोजनेला उपयुक्त ठरणारी मार्गदर्शक जीवनतत्त्वे म्हणजे मूल्य होय.
- पैशांपेक्षा श्रेष्ठ असे आदर्श विचार, तत्त्वे, आचरण आणि सद्गुण ज्यांत असतात त्यांना मूल्य असे म्हणतात.
- जे विचार, तत्त्वे आचरण आणि सद्गुण हजारो लोकांना प्रदीर्घ काळ मार्गदर्शन करतात, त्यांच्या जीवनाचा आधार बनवतात, राष्ट्रजीवनाला प्रेरणा देतात, त्यांना मूल्य असे म्हणतात.

आपल्या भारतीय संस्कृतीच्या इतिहासातून आणि महापुरुषांच्या चरित्रात्मक अभ्यासातून आपल्याला असंख्य मूल्यांचा शोध घेता येतो. मूल्यशिक्षण आपल्याला व्यापक विचार करायला शिकविते आणि त्याप्रमाणे वागण्याची प्रेरणा देते. आपल्या मनाला शांती, समाधान, स्थिरता देण्यासाठीही मूल्यांचे चिंतन उपयुक्त ठरते. ही मूल्ये ज्यांच्या जीवनातून प्रगत झाली, त्यांच्या जीवन चरित्रांचा अभ्यास आपल्याला ध्येयाचा मार्ग शिकवितो. आपले मन, भावना विचार यांना वळण लावण्याचे कार्य घरात आई, वडिल, आजी, आजोबा आणि शाळेत शिक्षक करीत असतात. शाळेतील अध्ययन, अध्यापन, अनेक प्रकारचे वाचन यांतून आपण विचार करू लागतो. चांगले विचार करणे व त्यानुसार वागणे, त्यातून आपल्यासमोर ध्येय, आदर्श साकार होतात. अशा आचार-विचारांना आपण संस्कार म्हणतो. अशा शिक्षणाने व संस्कारांनी आपले व्यक्तिमत्त्व घडत असते.

मानवी मूल्यांची उद्दिष्ट्ये :

शालेय शिक्षण मिळविणे हा प्रत्येक नाकरिकाचा मूलभूत हक्क आहे. शिक्षणातून विवध मूल्ये विद्यार्थ्यांच्या अंगी रुजले जाऊन त्यानुसार ते समाजामध्ये वावरत असतात. म्हणून शिक्षणातून पुढील उद्दिष्टांसह मूल्यशिक्षण देणे गरजेचे आहे.

- विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या माध्यमातून मूल्यांचा अर्थ समजण्यास साह्य करणे.
- राष्ट्रभक्ती, राष्ट्रीय एकात्मता, संवेदनशीलता इत्यादी शालेय शिक्षणातून येणाऱ्या मूल्यांचे संस्कार विद्यार्थ्यांवर करणे.
- व्यक्तिगत, राष्ट्रहित व सामाजिक जीवनाची जबाबदारी पेलू शकणारे नागरिक निर्माण करणे.
- विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोण निर्माण करणे.
- आपल्या परिसरात असलेल्या ऐतिहासिक, सांस्कृतिक वारशांची जपणूक करण्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देणे.
- मूल्यांच्या संस्कारासाठी मूल्यांना पोषक असे उपक्रम शाळेमध्ये राबविणे.
- मूल्य अंगी बाणविण्यासाठी विद्यार्थ्यांकडून काही उपक्रम व प्रकल्प करवून घेणे.
- मूल्यांच्या जोपासनेसाठी विद्यार्थ्यांमध्ये प्रेरणा निर्माण करणे.
- चरित्र्यनिर्मिती व संवर्धन करणे.
- व्यक्तिमत्त्वाचा संतुलित विकास करणे.
- सौंदर्यात्मक दृष्टीचा विकास करण्यास मदत करणे.
- नागरिक म्हणून कर्तव्याची जाणीव निर्माण करून देणे.
- पर्यावरणात्मक जागरुकता निर्माण करणे.
- विद्यार्थ्यांकडून मूल्यांचे आचरण व्हावे अशी परिस्थिती व संधी उपलब्ध करून देणे.
- धर्म, भाषा, जात, लिंग यांवर आधारित संकुचित दृष्टिकोणाला तिलांजली देण्याकरिता विद्यार्थ्यांमध्ये वैचारिक जागृती करणे.
- देशाच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे.
- विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाच्या माध्यमातून संवेदनशीलता, वक्तशीरपणा, नीटनेटकेपणा, सौजन्यशीलता, स्त्री-पुरुष समानता, सर्वधर्मसहिष्णुता, सत्य, प्रेम, करुणा, शांती इत्यादी गुणांचा विकास करणे.
- आत्मोन्नतीच्या प्रयत्नात प्रगती करीत राहणे इत्यादी.

मानवी मूल्यांचे स्वरूपः

- व्यक्तीगत जीवनासाठी दर्जा आणि मार्गदर्शन.
- व्यक्तींचा अनुभव, त्याची इष्टता आणि विशिष्ट परिस्थितीचा प्रभाव मूल्यांवर पडतो.
- राष्ट्राच्या धोरणासाठी मार्गदर्शन देण्यासाठी मूल्ये.
- मूल्ये ही आपल्या जीवन प्रवासाचे सुकाणू आहे.
- मूल्ये स्थिर नसतात.
- मूल्यांचे संपादन अज्ञात अशा अनेक मार्गांनी होते.
- मूल्यांमध्ये ज्ञानात्मक, भाषात्मक परिमाणे आढळतात.
- विमर्षणात्मक चिंतनाच्या प्रक्रियेतून मूल्यांची बांधणी व पुनर्बांधणी घडून येते.
- व्यक्तिची इच्छा, आवड यांनुसार मूल्ये.
- व्यक्तिच्या मूल्यांचा विस्तार हा लहानात लहान इच्छा ते दूरगामी आदर्श.
- समाजाच्या विकासाच्या अवस्थेवर मूल्ये आधारलेली असतात.

- समाजाच्या धार्मिक विचारसरणीवर मूल्ये आधारलेली असतात.
- मूल्ये सामाजिक, राजकीय, तंत्रज्ञ इत्यादींवर आधारलेली असतात.

समाजजीवनात नैतिक मूल्यांना महत्त्व असते. समाजामध्ये राहून चांगले जीवन जगायचे असेल, तर काही नीतिनियम पाळले पाहिजे. त्यासाठी अहिंसा, सत्य, अस्तेय, अपरिग्रह, बंधुभाव, कर्तव्यपालन इत्यादी गुण आणि मनुष्याच्या उत्कर्षासाठी नैतिक मूल्ये आवश्यक आहेत. अलीकडे समाजात व शिक्षणक्षेत्रातही नैतिक मूल्यांचा ऱ्हास झालेला आढळतो. त्यामुळे राज्य शासनाने शाळां, महाविद्यालयातून राष्ट्रभक्ती, राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्मसहिष्णुता, श्रमप्रतिष्ठा, स्त्री-पुरुष समानता, वक्तशीरपणा, नीटनेटकेपणा, वैज्ञानिक दृष्टिकोण, सौजन्यशीलता आणि संवेदनशीलता ही दहा मूल्यशिक्षण देण्यास सुरुवात केली आहे. या मूल्यांचे संस्कार विद्यार्थ्यांबरोबरच शिक्षक, पालक, नेते इत्यादींनी करणे आवश्यक आहे. भौतिकवाद, सत्ता, अहंकार, भ्रष्टाचार आणि स्वार्थ हे मानवतावादाचे प्रमुख घटक आहेत. अन्याय्य संपत्तीची आस, असंवेदनशीलता, मानवी हक्कांचा घोर अन्याय आणि अस्वस्थ स्पर्धा ही समाजातील सर्व दिग्गजांची एकमेव भावना बनली आहे. सध्याच्या जीवनात जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात मूल्ये आणि विचारसरणीचे संकट आहे. तरुण पिढीमध्ये शाश्वत मूल्यांचे कमकुवत होणे यामुळे अनेक गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत. एक माणूस म्हणून, वैश्विक मूल्यांचे ज्ञान असणे आवश्यक आहे. खरं तर, माणूस आणि मूल्ये अविभाज्य आहेत. म्हणूनच, योग्य मानवी मूल्यांसाठी राष्ट्रीय एकता आणि अखंडतेची भावना विकसित करणे आवश्यक आहे. आता, राष्ट्रीय एकता म्हणजे राजकीय एकता नाही. ती यापेक्षा खूप वरची आहे. कारण, त्यात नागरिकांचे विचार आणि भावना समाविष्ट आहेत जे त्यांच्या एकूण वर्तनाचे नियमन करतात, आपल्या समाजातील असंख्य वाईट गोष्टींनी आपले दैनंदिन जीवन विस्कळीत केले आहे. विविध रानटी गुण आणि इतर विध्वंसक शक्ती मानवी समाजाच्या अध:पतनाच्या प्रक्रियेचे स्पष्ट संकेत देतात. मूल्ये रुजवण्यासाठी संवाद हा महत्त्वाचा घटक आहे हे खरे आहे.

विद्यार्थ्यांचे दृष्टिकोन, भावना आणि हेतू समजून घेणे आवश्यक आहे, म्हणूनच शैक्षणिक संस्थांमध्ये मूल्य-शिक्षणाचे महत्त्व. निःसंशयपणे, मूल्ये कृतीतून प्रसारित केली जाऊ शकतात, तरीही संवाद हा सर्वात महत्त्वाचा वाटतो. अनेक संस्थांमध्ये मूल्यशिक्षणाचा अभ्यासक्रम औपचारिक आणि थेट असतो, तर मोठ्या संख्येने शाळांमध्ये तो अनौपचारिक आणि अप्रत्यक्ष असतो, त्यामुळे मूल्यांचे शिक्षण केवळ वर्गातील सूचनांपुरते मर्यादित असू शकत नाही. म्हणूनच, विद्यार्थ्यांमध्ये मूल्यांच्या विकासावर परिणाम करणारे सर्व प्रकारचे सामाजिक प्रभाव लक्षात घेतले पाहिजेत. मूल्ये अंतर्निहित आणि नियोजित अभ्यासक्रमाद्वारे प्रसारित होतात. आतापर्यंत जे सांगितले गेले आहे, त्यावरून जो मुद्दा अधोरेखित झाला आहे तो असा आहे की मूल्य शिक्षणाची संपूर्ण प्रक्रिया ही एक अत्यंत व्यापक आणि गुंतागुंतीची आहे ज्यामध्ये विविध प्रकारचे शिक्षण अनुभव समाविष्ट आहेत. सर्व प्रकारचे शिक्षण एकाच स्रोताने किंवा शिक्षकाने स्वतंत्रपणे किंवा एकत्रितपणे विविध शिक्षण संसाधनांमधून घेतले पाहिजे तरीही ते प्रदान केले जाऊ शकत नाही. भारतातील शैक्षणिक संस्था शतकानुशतके गुरुकुल होत्या जिथे गुरुंनी विद्यार्थ्यांना बहुआयामी मानवनिर्मिती शिक्षण दिले. डोके, हृदय आणि हात, म्हणजेच विद्यार्थ्यांच्या

बौद्धिक आणि भावनिक विकासाची आणि त्यांच्या कौशल्यांच्या विकासाची काळजी घेतली जात असे. गुरुंचा असा विश्वास होता की गुरुकुलांमध्ये शिक्षण ही एक प्रक्रिया आहे जिथे विद्यार्थी आदरणीय नागरिकांमध्ये विकसित होतात. त्यांनी विद्यार्थ्यांना मूल्ये शिकवली, ज्यामुळे त्यांना निरोगी आणि सुसंवादी सामाजिक जीवनाकडे मार्गदर्शन मिळाले, गुरूंचा असा विश्वास होता की विद्यार्थ्यांनी ज्यांच्या आधारे जगले पाहिजे आणि ज्यासाठी ते मरतील ते म्हणजे मानवी मूल्ये विद्यार्थ्यांना त्यांच्या व्यावसायिक आकांक्षा पूर्ण करण्यास सक्षम करणारे ज्ञान आणि कौशल्ये प्रदान करणे हा त्यांच्या शिक्षणाचा एक भाग आहे यावर गुरुंचा विश्वास होता, त्याहूनही महत्त्वाचा भाग म्हणजे त्यांना मूल्ये, संस्कृती आणि देशभक्तीचे तरुण नागरिक बनवणे. त्यांनी विद्यार्थ्यांना मूल्ये रुजवून आणि त्यांच्यात सकारात्मक दृष्टिकोन विकसित करून करिअर आणि जीवनातील आव्हानांना तोंड देण्यासाठी तयार केले मूल्ये आणि योग्य दृष्टिकोनामुळे त्यांची स्वतःची प्रगती आणि त्यांच्या समाजाची प्रगती होण्यास मदत झाली.

प्राचीन भारतातील शिक्षण हे केवळ ज्ञानाची आयात आणि कौशल्ये शिकवणे नव्हते. उलट ते मानवनिर्मितीचे एक ध्येय होते. आधुनिक शिक्षणाची विशेषतः उच्च शिक्षणाची लोकप्रिय संकल्पना आता बदलली आहे. विद्यार्थ्यांना विद्यापीठाची परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होण्यासाठी प्रशिक्षण देणे आणि त्यांना नोकरीसाठी योग्य बनवण्यासाठी काही व्यावसायिक कौशल्ये देणे हे उद्दिष्ट असल्याचे दिसून येते. मानवनिर्मित शिक्षणात प्रमुखाने माहितीचा अर्थ पाहिला, हृदयाने त्याची नीतिमत्ता आणि वापर नैतिकतेच्या मर्यादेत पाहिला आणि हाताने तो कृतीत आणला. परंतु आधुनिक उच्च शिक्षणाने हृदयाकडे दुर्लक्ष केले आहे. विद्यार्थी हा त्यांच्या देशाच्या वर्तमान आणि भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचा विषय आहे या वस्तुस्थितीकडे त्यांनी दुर्लक्ष केले आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानातील उच्च शिक्षण, जे बहुतेक विद्यार्थी निवडतात, ते त्यांना भौतिकवादी विकासासाठी सुसज्ज करण्याचा प्रयत्न करते, ज्याला 'प्रगती' असे चुकीचे मानले जाते. अभियंते, डॉक्टर, शास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ आणि व्यापारी हे सभ्यतेच्या नावाखाली खूप बदलतात आणि ते भौतिकवादी पद्धतीने प्रगती करतात पण ते 'प्रगती' करत नाहीत. बदल आणि भौतिकवादी विकास हे मानवी प्रगती आणि समाजाची प्रगती दर्शवत नाहीत. पुन्हा एकदा, बदल आणि भौतिकवादी विकास आत्मसात करण्यासाठी मानवाला एक मर्यादा आहे. आजच्या काळातील तरुण स्वतःला मर्यादा ओलांडून त्यांच्या मानसिक संतुलनाला त्रास देण्याइतपत पुढे नेत आहेत आणि मानसिक आरोग्यावर परिणाम करत आहेत. मूल्यांचा त्याग होत आहे आणि परस्पर संबंध तुटत आहेत. तरुण अतिरेकी भौतिक महत्त्वाकांक्षेचे बळी बनले आहेत आणि नकळतपणे त्यांनी त्यांच्या जीवनाचा वेग वाढवला आहे. आता ते मंदावू शकत नाहीत. याचा परिणाम म्हणजे पोट, मज्जातंतू विकार, मानसिक विकार आणि वर्तणुकीशी संबंधित समस्या आहेत आणि ते स्वतः यंत्रांचे गुलाम बनले आहेत. परंतु आपल्या शिक्षणव्यवस्थेने त्याची दखल घेतलेली नाही. उच्च शिक्षण तरुणांना सत्य, अहिंसा, प्रेम आणि करुणा यासारख्या सार्वत्रिक मानवी मूल्यांनुसार जगण्याऐवजी यंत्रे आणि उपकरणांनुसार जगायला शिकवत आहे. ही मूल्ये कमी होत आहेत आणि माणूस वेगाने अस्तित्वहीन होत चालला आहे. तरुणांना त्यांच्या व्यवसायात आणि उद्योगात नेहमीच व्यस्त राहायचे असते ज्यामुळे त्यांचे पैसे वाढू शकतात. फुरसतीचा वेळ आणि सामाजिक मेळावे हे पाप मानले जाते. त्यांच्या डायरी त्यांच्या कार्यक्रमांनी भरलेल्या असतात आणि त्यांचे फोन

त्यांच्या गरम श्वासात वितळतात. परिणाम स्पष्ट आहे. कुटुंब आणि समाज तुटत चालला आहे. जेव्हा मूल्ये सोडून दिली जातात तेव्हा अराजकता सुव्यवस्थेवर मात करते. सध्याची विचारसरणी, वर्तन आणि जीवनशैली इतकी प्रतिकूल बदलत आहे की आता मूल्यशिक्षणाला उच्च शिक्षणाचा अविभाज्य भाग बनवण्याची निकड निर्माण झाली आहे. संगणकासारखी यंत्रे आणि इंटरनेटसारख्या माहिती प्रणाली इतक्या प्रगत झाल्या आहेत की तरुणांना व्यावसायिकीकृत कार्यपद्धती आणि कृत्रिम जीवनशैलीपासून मुक्त करण्यासाठी कोणत्याही नैसर्गिक प्रक्रियेची आपण आता वाट पाहू शकत नाही. जीवन इतके कृत्रिम आणि भौतिकवादी बनले आहे की तरुण पुरुष आणि महिला विचार करू लागले आहेत की त्यांना योग्य जीवन जगण्याच्या मार्गाकडे नेणारी कोणतीही मूल्य प्रणाली आवश्यक आहे का? जर ही शंका खात्री बनली तर जीवन मानवी राहणार नाही आणि आपल्या समाजाला मानवी समाज म्हणता येणार नाही.

समारोप :

मूल्यशिक्षण म्हणजे मूल्यांचे शिक्षण आणि मूल्यांच्या संस्काराचे शिक्षण आहे, आणि मूल्यशिक्षणामागील मुख्य कल्पना म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये आवश्यक मूल्ये जोपासणे जेणेकरून आपल्याला गुंतागुंतीचे व्यवस्थापन करायला शिकवणारी संस्कृती टिकून राहते आणि अधिक विकसित होते. मूल्यशिक्षण ही एक सार्वत्रिक घटना आहे जी सर्व शिक्षण आणि शिक्षणात अंतर्भूत आहे, मग ती घरी असो किंवा संस्थेत तसे नाही. दोन्हीही टीकात्मक विचारवंत व्हायला किंवा स्वतःच्या, समुदायाच्या आणि मानवतेच्या बाबतीत स्वतःला सक्रिय प्राणी मानायला शिकवत नाहीत. नकळत आणि सवयीमुळे, माध्यमे, सरकार आणि राजकारणाद्वारे आपल्याला दिल्या जाणाऱ्या बहुतेक गोष्टी आपण स्वीकारतो. दुर्दैवाने जेव्हा वैयक्तिक क्षमता आणि क्षमतांबद्दल इतकी चर्चा होते, तेव्हा व्यक्तीला स्वतःमध्ये फरक घडवून आणण्याच्या क्षमतेबद्दल खूप कमी आत्मविश्वास असतो. विद्यार्थ्यांना सर्जनशील विचारसरणीचा आधार असलेल्या जीवनमूल्यांबद्दल फारसे काही सांगितले जात नसल्याने त्यांना सक्रिय विचारवंत बनण्याचे प्रशिक्षण दिले जात नाही. मूल्यशिक्षणात आपण कोणत्या मूल्यांवर भर द्यायचा हे ठरवून आपण कोणता समाज निर्माण करायचा हे शिक्षणतज्ज्ञांनी ठरवायचे आहे. नवीन पिढ्यांना वेगवेगळ्या प्रकारच्या आव्हानांना तोंड द्यावे लागत आहे. त्यासाठी त्यांना वेगवेगळ्या संकल्पना स्वीकाराव्या लागतील आणि स्वतःला सर्वात योग्य असल्याचे सिद्ध करावे लागेल. आज, आपल्या मुलांना दिले जाणारे शिक्षण जवळजवळ जगण्यापुरते शिक्षण' इतकेच मर्यादित आहे. विद्यार्थ्यांना असा विश्वास वाटतो की प्रचंड माहिती गोळा करण्याची, साठवण्याची आणि पुनर्प्राप्त करण्याची क्षमता विकसित करून ते शिक्षित होतात. परंतु स्वामी विवेकानंद म्हणतात, "शिक्षण म्हणजे तुमच्या मेंदूत टाकलेली आणि आयुष्यभर न पचवता तिथेच उधळणारी माहिती नाही.

आपल्याला जीवन घडवणारी, मानवनिर्मिती करणारी आणि चारित्र्य घडवणारी कल्पना आत्मसात करण्याची आवश्यकता आहे." नैतिक आणि आध्यात्मिक मूल्यांमध्ये खोलवर रुजल्याशिवाय केवळ शैक्षणिक ज्ञानामुळेच एकतर्फी व्यक्तिमत्त्वे निर्माण होतील जी भौतिक संपत्तीने श्रीमंत होऊ शकतात, परंतु आत्म-समजाने, शांततेत गरीब राहतील. मूल्ये म्हणजे सद्गुण, आदर्श आणि गुण ज्यावर कृती आणि श्रद्धा आधारित असतात, मार्गदर्शक तत्त्वे जी व्यक्ती, दृष्टिकोन, दृष्टिकोन आणि

आचरण घडवतात. मूल्याभिमुख शिक्षणाच्या प्रचारासाठी पालक, शिक्षक, शिक्षक, शैक्षणिक प्रशासक, धोरणकर्ते आणि सामुदायिक संस्था इत्यादींना संवेदनशील करण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर शिक्षणातील मूल्यांची कल्पना करण्यात आली आहे. या उपक्रमात जागरूकता निर्माण करणे, भौतिक विकास, शिक्षकांना प्रशिक्षण देणे, मानवी मूल्यांच्या शिक्षणाच्या क्षेत्रात संशोधन आणि नवोपक्रमांना प्रोत्साहन देणे, शालेय व्यवस्थेत मूल्य शिक्षणासाठी मार्गदर्शक तत्त्वे विकसित करणे यावर लक्ष केंद्रित केले आहे. मानवी मूल्यांच्या विकासाचे उद्दिष्ट व्यक्तीला 'स्व' म्हणून विकसित करणे आहे. जे शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट देखील आहे आणि ते थेट मानवी शिक्षणाकडे एक प्रयत्न आहे. राष्ट्रीय अभ्यासक्रम धोरणामध्ये लोकशाही, समाता, न्याय, स्वातंत्र्य आणि इतरांच्या कल्याणाची चिंता, धर्मनिरपेक्षता, मानवी प्रतिष्ठेचा आदर आणि अधिकार या मूल्यांवर शिक्षणाच्या उद्दिष्टाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अधोरेखित करण्यात आला आहे. मानवी मूल्यांचा विकास, जो विद्यार्थ्यांना समाजाच्या परिवर्तनासाठी सकारात्मक बदलाचे प्रतिनिधी बनण्यास मार्गदर्शन करण्यावर केंद्रित आहे. याचा उद्देश नवीन विषय किंवा स्वतंत्र क्रियाकलाप जोडणे नाही तर संपूर्ण शालेय वातावरणात, अभ्यासक्रमातील क्रियाकलापांमध्ये आणि शिक्षक आणि विद्यार्थ्यांमधील वर्गात आणि बाहेरील संवादांमध्ये शांतता दृष्टिकोन, वृत्ती आणि मूल्यांचे एकत्रीकरण करणे आहे.

संदर्भसूची:

१. मानवाधिकार आणि मूल्यशिक्षण - लेखक डॉ. दिलीपसिंह निकुंभ , डॉ. रणजित आठवले - प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव.
२. किशोरावस्था आणि मूल्यशिक्षण - डॉ. लीना सुनील कांडलकर बोके प्रकाशन, अमरावती.
३. नीतीमूल्ये व शिक्षण, डॉ. विद्या ठोंबरे, नूतन प्रकाशन, पुणे
४. मूल्यशिक्षण, डॉ. सुरेश करंदीकर, फडके प्रकाशन, १९९७, कोल्हापूर

ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

March - 2026
Vol. 15 - No. S1

उच्च शिक्षण व शाश्वत विकासाची उद्दिष्टे

रविकांत प्रकाशराव मुंडे

प्रताप महाविद्यालय, अंमळनेर

Corresponding Author: *रविकांत प्रकाशराव मुंडे*

DOI - 10.5281/zenodo.19491750

सारांश:

विकास ही एक व्यापक संकल्पना आहे त्यामध्ये सर्व अंगांचा समावेश होतो असा विकास चिरंतन शाश्वत टिकणारा असावा. 2015 मध्ये United Nations ने 2030 पर्यंत साध्य करण्यासाठी 17 शाश्वत विकास उद्दिष्टे (SDGs) घोषित केली. या उद्दिष्टांच्या पूर्ततेमध्ये शिक्षण क्षेत्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. विशेषतः उच्च शिक्षण संस्था संशोधन, नवोपक्रम, धोरण निर्मिती आणि सामाजिक परिवर्तनासाठी महत्त्वपूर्ण योगदान देतात. या संशोधन पेपरमध्ये उच्च शिक्षण प्रणाली आणि शाश्वत विकास उद्दिष्टे यांचा परस्परसंबंध, त्यांचे महत्त्व, तसेच भारतातील उच्च शिक्षण संस्थांची भूमिका यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

मुख्य शब्द: सामाजिक न्याय, संशोधन, नवोपक्रम, सामाजिक जागरूकता निर्माण, कौशल्य विकास.

प्रस्तावना:

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात विकासाचे स्वरूप बदलले आहे. फक्त आर्थिक प्रगती नव्हे तर पर्यावरणीय संतुलन, सामाजिक न्याय आणि संसाधनांचे योग्य व्यवस्थापन यालाही महत्त्व प्राप्त झाले आहे. 2015 मध्ये United Nations ने 2030 अजेंडा फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंट जाहिर केला आणि 17 शाश्वत विकास उद्दिष्टे निश्चित केली.

उच्च शिक्षण संस्था या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी पुढील मार्गांनी योगदान देतात:

- संशोधन व नवोपक्रम
- सामाजिक जागरूकता निर्माण
- कौशल्य विकास
- पर्यावरणीय जबाबदारी

संशोधनाची उद्दिष्टे:

1) शाश्वत विकास उद्दिष्टांची संकल्पना स्पष्ट करणे.
2) उच्च शिक्षण संस्थांची भूमिका विशद करणे.
3) भारतातील उच्च शिक्षण व SDGs यांचा संबंध अभ्यासणे.
4) शाश्वत विकासासाठी शिक्षण धोरणांचे विश्लेषण करणे.

संशोधन पद्धती

सदरील शोध पत्रासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येईल

शाश्वत विकासाची संकल्पना:

शाश्वत विकास म्हणजे असा विकास जो वर्तमान पिढीच्या गरजा पूर्ण करतो आणि भविष्यातील पिढ्यांच्या गरजांवर परिणाम करत नाही.

ही संकल्पना सर्वप्रथम 1987 मध्ये World Commission on Environment and Development च्या Brundtland Report मध्ये स्पष्ट करण्यात आली. शाश्वत विकासाचे तीन मुख्य घटक:

1) आर्थिक विकास
2) सामाजिक समता
3) पर्यावरण संरक्षण

शाश्वत विकास उद्दिष्टे (SDGs):

United Nations ने 17 SDGs निश्चित केली आहेत. त्यापैकी काही महत्त्वाची उद्दिष्टे:

- गरिबी समाप्त करणे
- भूक संपवणे
- चांगले आरोग्य
- दर्जेदार शिक्षण
- लैंगिक समानता
- स्वच्छ पाणी व स्वच्छता
- स्वच्छ ऊर्जा
- आर्थिक वाढ व रोजगार
- उद्योग व नवोपक्रम
- असमानता कमी करणे
- शाश्वत शहरे व समुदाय
- जबाबदार उत्पादन व वापर
- हवामान बदलावर उपाय
- सागरी जीवन संरक्षण
- भूमीवरील जीवन संरक्षण
- शांतता, न्याय व मजबूत संस्था
- उद्दिष्टांसाठी भागीदारी

उच्च शिक्षणाची भूमिका:

उच्च शिक्षण संस्था शाश्वत विकास साध्य करण्यासाठी पुढील प्रकारे योगदान देतात

1. ज्ञान निर्मिती:विद्यापीठे नवीन संशोधन करून शाश्वत विकासासाठी उपाय शोधतात.
2. कौशल्य विकास: विद्यार्थ्यांना पर्यावरणीय व सामाजिक जबाबदारीची जाणीव करून दिली जाते.
3. सामाजिक परिवर्तन: विद्यापीठे समाजात शाश्वत विकासाची जागरूकता निर्माण करतात.
4. धोरण निर्मिती

संशोधनावर आधारित धोरणे सरकारला सुचवली जातात:

भारतातील उच्च शिक्षण व SDGs:

भारतामध्ये शाश्वत विकासासाठी अनेक धोरणे राबवली जात आहेत. विशेषतः University Grants Commission, Ministry of Education या संस्था उच्च शिक्षणामध्ये शाश्वत विकासाशी संबंधित अभ्यासक्रम, संशोधन व प्रकल्प प्रोत्साहित करतात.

तसेच National Education Policy 2020 मध्येही शाश्वत विकास आणि पर्यावरण शिक्षणावर विशेष भर देण्यात आला आहे.

आव्हाने:

उच्च शिक्षण संस्थांसमोर काही महत्त्वाची आव्हाने आहेत:

- आर्थिक संसाधनांची कमतरता
- संशोधन सुविधांचा अभाव

- पर्यावरणीय जागरूकतेचा अभाव
- ग्रामीण भागात शिक्षणाची कमी उपलब्धता

उपाययोजना:

शाश्वत विकास साध्य करण्यासाठी पुढील उपाय आवश्यक आहेत:

- शाश्वत विकासावर आधारित अभ्यासक्रम
- हरित कॅम्पस उपक्रम
- संशोधन व नवोपक्रमाला प्रोत्साहन
- सरकार व विद्यापीठांमधील सहकार्य

निष्कर्ष:

शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यासाठी उच्च शिक्षण संस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. शिक्षण, संशोधन आणि सामाजिक सहभागाद्वारे विद्यापीठे समाजात सकारात्मक बदल घडवून आणू शकतात. त्यामुळे शाश्वत विकासासाठी उच्च शिक्षण क्षेत्राने सक्रिय भूमिका बजावणे आवश्यक आहे.

संदर्भसूची:

1. पाटील बी. आर. , शाश्वत विकास आणि पर्यावरण शिक्षण, (2018), पुणे: विद्या प्रकाशन.
2. देशमुख एस. डी. , उच्च शिक्षण व्यवस्था आणि आधुनिक आव्हाने, (2019), औरंगाबाद: साईनाथ प्रकाशन.
3. जाधव आर. के., पर्यावरण व शाश्वत विकास, (2017), कोल्हापूर: फडके प्रकाशन.
4. कुलकर्णी पी. एल., शाश्वत विकास: संकल्पना आणि व्यवहार, (2020), पुणे: डायमंड पब्लिकेशन.
5. शिंदे एस. आर. , पर्यावरण अध्ययन, (2016),नागपूर: विद्याभारती प्रकाशन.
6. सावंत व्ही. एस. , भारतातील शिक्षण व्यवस्था, (2018),मुंबई: हिमालय पब्लिशिंग हाऊस.
7. जोशी आर. जी., पर्यावरण आणि विकास, (2015),पुणे: मेहता पब्लिशिंग हाऊस.

ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

March - 2026
Vol. 15 - No. S1

उच्च शिक्षण आणि मानवी मूल्यांचा शाश्वत विकास - भास की आभास

प्रा. निलेश भाऊसाहेब वाकचौरे

सहा. प्रा. श्री. ब्रम्हानंद स्वामी शिक्षण प्रसारक मंडळाचे, शिक्षणमहर्षी दादापाटील केदार कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, दोडी बु// ता. सिन्नर जि. नाशिक

***Corresponding Author:* प्रा. निलेश भाऊसाहेब वाकचौरे**

DOI - 10.5281/zenodo.19491776

सारांश:

मानवी मूल्ये म्हणजे व्यक्ती व समाजाच्या आचार-विचारांना दिशा देणारे नैतिक तत्त्वे. मानवी मूल्ये म्हणजे समाजमान्य नैतिक तत्त्वे यांची आचारसंहिता आहे. उच्च शिक्षण हे केवळ पदवीप्राप्तीचे साधन नसून व्यक्तिमत्त्व विकास, सामाजिक जबाबदारी आणि राष्ट्रनिर्मितीचे प्रभावी माध्यम आहे. ज्योतीबा फुले शुद्र-अतिशुद्राच्या गुलामगिरीचे, दु:खाचे कारण अविद्या आहे असे सांगताना ते 'शेतकऱ्याचा आसुड' या ग्रंथात म्हणतात- विद्ये विना मती गेली। मती विना निती गेली॥ निती विना गती गेली। गती विना वित्त गेले॥ वित्त विना शुद्र खचले। एवढे अनर्थ एका अविद्येने केले॥ हा महात्मा फुले यांचा संदेश म्हणजे क्रांतीकारक तर आहेच पण एक नविन तत्वज्ञान मांडणारा आहे. परंतु आज हे शिक्षण घेतलेली सुशिक्षित सूज्ञ लोकच अविद्येने, अनीतीमत्तेने समाजात वावरू लागल्याचे दिसतात. शिक्षणक्षेत्रात पारंपरिक व व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्था सुरु बाजारीकरण करत असल्याचे दिसते. आजच्या जागतिकीकरणाच्या युगात तंत्रज्ञान, अर्थकारण आणि स्पर्धा यांना प्राधान्य दिले जात असले तरी मानवी मूल्यांचा विकासही तितकाच महत्त्वाचा आहे. उच्च शिक्षण मानवी मूल्यांच्या विकासासाठी प्रभावी माध्यम आहे. अभ्यासक्रमात मूल्याधिष्ठित घटकांचा समावेश केल्यास विद्यार्थ्यांची सामाजिक जाणीव वाढते. सेवा-अभ्यास व समुदाय प्रकल्प विद्यार्थ्यांमध्ये जबाबदारीची भावना निर्माण करतात. परंतु यासाठी शिक्षकांचे नैतिकदृष्ट्या आदर्श व्यक्तिमत्त्व असणे हे आवश्यक आहे. उच्च शिक्षण आणि मानवी विविध मूल्यांचा शाश्वत विकास हे परस्परपूरक घटक आहेत. शिक्षणाने केवळ बौद्धिक प्रगती नव्हे तर नैतिक आणि सामाजिक प्रगतीही साधली पाहिजे. मूल्याधिष्ठित उच्च शिक्षणामुळे जबाबदार, संवेदनशील आणि जागरूक नागरिक घडतील, जे शाश्वत आणि समताधिष्ठित समाजनिर्मितीस उपयुक्त ठरतील. उच्च शिक्षणातील मूल्यांचे अधःपतन ही एक जटिल समस्या आहे. केवळ अभ्यासक्रम बदलून ती दूर होणार नाही; संस्थात्मक संस्कृती, शिक्षकांचे आदर्श वर्तन, प्रशासनाची पारदर्शकता आणि विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे. जर शिक्षण केवळ कौशल्यकेंद्रित राहिले, तर मूल्यविकास अपुरा राहतो. परंतु समाजाभिमुख संशोधन, हरित परिसर, लोकशाही सहभाग आणि नैतिक पद्धतींची अंमलबजावणी यांद्वारे उच्च शिक्षण पुन्हा मूल्यकेंद्री बनू शकते. योग्य धोरणे, नैतिक अंमलबजावणी आणि मूल्याधिष्ठित दृष्टीकोन स्वीकारल्यास उच्च शिक्षण पुन्हा समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन बनू शकते. शिक्षण हे केवळ रोजगाराचे साधन नसून मानवतावादी समाजनिर्मितीचे माध्यम आहे. ही जाणीव पुनःस्थापित करणे ही काळाची गरज आहे. उच्च शिक्षण आणि मानवतावादी मूल्यांचा विकास हा पूर्णतः भासही नाही आणि पूर्णतः आभासही नाही. तो परिस्थितीनुसार बदलतो. योग्य धोरणे, नैतिक अंमलबजावणी, पारदर्शक प्रशासन आणि समाजाभिमुख दृष्टिकोन असल्यास उच्च शिक्षण मानवतावादी समाजनिर्मितीचे प्रभावी साधन ठरू शकते. अन्यथा मूल्यविकासाचा केवळ दिखावा उरतो. म्हणूनच शिक्षण क्षेत्राने ज्ञानाबरोबरच करुणा, समता आणि सामाजिक न्याय या मूल्यांना केंद्रस्थानी ठेवणे ही काळाची गरज आहे.

शिक्षण हे आमुलाग्र समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. विविध ज्ञानप्राप्तीबरोबरच विचारप्रक्रियेचा विकास, नैतिक मूल्यांची जोपासना आणि सामाजिक बांधिलकी निर्माण करणे ही उच्च शिक्षणाची प्रमुख उद्दिष्टे आहेत. आज पर्यावरणीय संकट, सामाजिक असमानता, नैतिक अधःपतन आणि सांस्कृतिक संघर्ष या समस्यांवर उपाय शोधताना मूल्याधिष्ठित शिक्षणाची आवश्यकता प्रकर्षाने जाणवते. शाश्वत विकास म्हणजे वर्तमान गरजा पूर्ण

करताना भविष्यातील पिढ्यांच्या गरजांवर परिणाम न होऊ देणे होय. त्यामुळे उच्च शिक्षणाने केवळ कौशल्याधारित नव्हे तर मूल्याधारित दृष्टिकोन स्वीकारणे अत्यावश्यक बनले आहे. पूर्वीपासूनच भारतीय शिक्षणव्यवस्थेत मूल्यशिक्षणावर अधिक भर दिलेला आढळतो. अलीकडील काळात विद्यापीठ अनुदान आयोगाने मूल्यशिक्षण व मानवाधिकार आयोगाने शिक्षणावर विशेष मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली आहेत. विविध विद्यापीठांनी अभ्यासक्रमांत पर्यावरण अध्ययन व भारतीय राज्यघटनेतील स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय आदी संविधान मूल्यांचा समावेश केला आहे. ही मूल्ये उच्च शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये रुजवली जाण्याचा केविलवाणा प्रयत्न केला जातो आहे. परंतु अलीकडील काळात मूल्यसंस्कार बाजूला गुंडाळून ठेवून शिक्षण क्षेत्रात वाढते व्यापारीकरण, स्पर्धा आणि तांत्रिक केंद्रीकरण जोमात चालले असल्याचे दिसते. मानवी मुल्यांतील प्रामाणिकपणा, सहिष्णुता, सामाजिक न्याय, समता, बंधुता, पर्यावरण-जागरूकता आणि लोकशाही भाव या घटकांचा जीवन व्यवहारात अभाव प्रकर्षाने जाणवू लागला आहे. उच्च शिक्षण हे व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाचे प्रभावी साधन असले तरी जागतिकीकरण, बाजारपेठीय स्पर्धा, तांत्रिक प्रगती आणि रोजगारकेंद्री दृष्टीकोन यामुळे शिक्षण क्षेत्रात मानवी मूल्यांचे अधःपतन झाले आहे. आजच्या जगात मानवी मूल्यांची जपणूक करणे हे मोठे आव्हान आहे. मात्र, जर मूल्ये हरवली, तर माणूस केवळ एक 'यंत्र' बनून राहील. मूल्ये ही घराघरातून आणि शाळांमधून जोपासली जावीत. ज्याप्रमाणे इमारतीचा पाया मजबूत असल्यावरच ती टिकते, त्याचप्रमाणे मानवी मूल्यांचा पाया भक्कम असेल, तरच एक सुसंस्कृत राष्ट्र घडवता येईल.

मानवी मुल्ये:

मानवी जीवन हे केवळ श्वास घेणे किंवा उपभोग घेणे यासाठी नसून, ते एका विशिष्ट ध्येयाने आणि आदर्शाने जगण्यासाठी आहे. माणसाच्या विचार, भावना आणि वर्तनाला योग्य दिशा देणारी तत्त्वे म्हणजे 'मानवी मूल्ये' होत. मूल्ये ही आपल्या जीवनाचा नैतिक होकायंत्र असतात, जी आपल्याला संकटात आणि रोजच्या जीवनात काय योग्य-अयोग्य ते सांगतात. मानवी जीवनात मूल्यांना महत्त्व अनन्यसाधारण आहे. मूल्ये ही केवळ शब्दावली नसून, ती आपल्या जगण्याची दिशा आणि नैतिक पाया भक्कम करतात. मानवी जीवनाचे सौंदर्य मूलभूत मूल्यांवर अवलंबून असते. जीवनात सदैव प्रामाणिक राहणे आणि सत्याची साथ देणे हे सर्वात मोठे मूल्य आहे. मानवी मूल्यांमध्ये नैतिकता, समता, सहिष्णुता, सामाजिक न्याय, पर्यावरण-जागरूकता, लोकशाहीभाव, वैज्ञानिक दृष्टीकोन आणि मानवतावाद यांचा समावेश होतो. एकमेकांबद्दल आदर, प्रेम आणि प्राणीमात्रांबद्दल दया, करुणा असणे हे समाजाला एकत्र बांधून ठेवते. समाजात स्वतःशी आणि इतरांशी पारदर्शक राहिल्याने समाजात विश्वासार्हता निर्माण होते. ध्येय साध्य करण्यासाठी आणि समाजात सुव्यवस्था राखण्यासाठी स्वयंशिस्त आवश्यक आहे. आपल्याला मिळालेल्या मदतीबद्दल किंवा निसर्गाबद्दल कृतज्ञ राहणे हे माणसाला नम्र बनवते. मूल्ये माणसाचे व्यक्तिमत्व घडवतात. ज्या व्यक्तीकडे उच्च मूल्ये असतात, तिला समाजात मान-सन्मान व आदर मिळतो. सहिष्णुता आणि बंधुभाव यांसारखी मूल्ये समाजात शांतता व स्थैर्य बहाल करतात. मुल्ये ही व्यक्तीच्या आयुष्यात वाटाड्याची भूमिका निभावतात. नैतिक मार्गक्रमण केल्यामुळे मानवाला आंतरिक शांती आणि समाधान लाभते. उच्च शिक्षण हे व्यक्तिमत्त्व विकास, विवेकशीलता, सामाजिक जबाबदारी

आणि राष्ट्रनिर्मिती यांचे आधारस्थाने आहेत. मानवी मूल्ये व्यक्तीच्या नैतिक, सामाजिक, पर्यावरणीय, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक, आध्यात्मिक व वैचारिक जडणघडणीसाठी महत्वाची ठरतात. व्यक्तीचा आचार-विचार, प्रामाणिकपणा, समयसूचकता, जबाबदारी, कर्तव्यपरायणता, सहानुभूती व नैतिक वर्तन समाज स्थैर्यासाठी सदैव आवश्यक असतो. समता, बंधुता, सहिष्णुता, लोकशाहीभाव आणि सामाजिक न्याय ही मूल्ये लोकशाही व्यवस्थेला बळकटी देतात. पर्यावरण संवर्धन, संसाधनांचा योग्य वापर आणि जैवविविधतेचे रक्षण ही शाश्वत विकासाची मूलभूत मूल्ये आहेत. संस्कृतीचे जतन, परंपरेचा आदर आणि सर्वधर्मसमभाव ही मूल्ये सामाजिक सलोखा टिकवतात.

उच्च शिक्षणाची भूमिका:

भारतातील उच्च शिक्षण प्रणाली ही जगातील सर्वात मोठ्या शिक्षण व्यवस्थांपैकी एक असून ती निरंतर विकसित होत आहे. जिथे देशभरातील लाखो विद्यार्थ्यांना शिक्षण देणाऱ्या विविध शैक्षणिक संस्था आहेत. भारतातील शिक्षण प्रणालीमध्ये पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि उच्च शिक्षण असे स्तर आहेत. उच्च शिक्षण हे व्यक्तीच्या व्यक्तिमत्व विकासाबरोबरच भावी जडणघडणीला दिशा देते. उच्च शिक्षणातून समाजातील तरुण पिढीला नैतिक व पर्यावरण शिक्षण, संविधानातील मुल्यांच्या शिक्षणातून विद्यार्थ्यांमध्ये मूल्य जागृतता निर्माण केली जाते. तसेच शाश्वत विकासाशी संबंधित संशोधन, हरित तंत्रज्ञान, ग्रामीण विकास प्रकल्प यांद्वारे समाजोपयोगी ज्ञाननिर्मिती होते. महाविद्यालयीन स्तरावरील युवकांच्या राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना या उपक्रमांमधून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीसह जगण्याचे भान दिले जाते. संयुक्त राष्ट्रांनी उच्च शिक्षणातून १७ शाश्वत विकास ध्येयांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण हे प्रमुख ध्येय डोळ्यासमोर ठेवले आहे. उच्च शिक्षण संस्थांनी अलीकडे प्रामुख्याने वृक्षवेलींनी नटलेला हिरवागार शांत निसर्गरम्य महाविद्यालय परिसर, समताधिष्ठीत वातावरण, ऊर्जा बचत व पुनर्नवीनीकरण, लिंगसमता, सामाजिक समावेशकता, संशोधनातील नैतिकता यावर भर दिला आहे. त्यातून पर्यावरणीय व सामाजिक मूल्ये दृढ होतात. संयुक्त राष्ट्र शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संघटनेच्या अहवालांनुसार शिक्षण हे शांतता, समता आणि शाश्वततेचे आधारस्तंभ आहे. कोविड-१९ महामारीच्या काळात भारतात ऑनलाइन शिक्षण दिले गेले. अलीकडेच शिक्षण मंत्रालय पूर्वीचे मानव संसाधन विकास मंत्रालयाने 'भारत पढे ऑनलाइन' शिक्षण कार्यक्रम सुरू केला तर त्यास दि. ४ जुलै २०१८ रोजी उच्च शिक्षण क्षेत्रात विद्यापीठ अनुदान आयोगाने नियमावली अधिसूचित केली. दूरस्थ शिक्षण ब्युरोने उच्च शैक्षणिक संस्थांना प्रमाणपत्र, पदविका आणि पदवी कार्यक्रम पूर्णतः ऑनलाइन पद्धतीने ऑफर करण्यासाठी मान्यता दिली. त्याचे प्रतिकूल परिणाम आजही सर्वत्र दिसतात. अशावेळी आजच्या स्पर्धात्मक व बाजारकेंद्री वातावरणात उच्च शिक्षणातून खरोखर मानवी मूल्यांचा विकास होतो असे नाही. उच्च शिक्षित युवक स्वतःच्या करिअर आणि पगारापुरते मर्यादित राहत असून, समाजाप्रती असलेल्या कर्तव्यांची जाणीव कमी होत आहे. आपल्या पारंपरिक मानवी मूल्यांऐवजी पाश्चात्य संस्कृतीचे अंधानुकरण करत भौतिकवादी दृष्टिकोनाला अधिक महत्त्व दिले गेले. नवीन शैक्षणिक धोरणानुसार (NEP २०२०) उच्च शिक्षण क्षेत्रात मूल्याधिष्ठीत शिक्षणावर आणि सर्वांगीण विकासावर विशेष भर देत

क्रांतिकारी बदल केले आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांना बहुशाखीय शिक्षण सुविधा, विद्यार्थ्यांचा केवळ बौद्धिकच नाही, तर सामाजिक आणि भावनिक विकास साधण्यावरील भर, आर्थिक साक्षरता आणि इतर व्यावहारिक कौशल्यांचा समावेश केला आहे. २०२६ च्या QS वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंगमध्ये ५४ भारतीय संस्थांनी स्थान मिळवले ही बाबा भूषणावह आहे. उच्च शिक्षणाचे उद्दिष्ट केवळ पदवी मिळवणे नसून विद्यार्थ्यांमध्ये विविध मूल्ये रुजवणे हे आहे. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेसारख्या संस्थांनी तांत्रिक शिक्षणात 'Universal Human Values' हा विषय अनिवार्य केला आहे. भारताची उच्च शिक्षण प्रणाली पुन्हा वैभवशाली करण्यासाठी केवळ पायाभूत सुविधा सुधारून चालणार नाही, तर विद्यार्थ्यांमध्ये चारित्र्य, नैतिकता आणि सामाजिक जाणीव निर्माण करणे ही काळाची गरज आहे.

मानवी मूल्यांचा विकास – भास आणि आभास:

उच्च शिक्षण हे केवळ उदरनिर्वाह व ज्ञानार्जनाचे साधन नसून व्यक्तिमत्त्व, सामाजिक जाणीव आणि नैतिक दृष्टिकोन घडविण्याचेही उत्तम माध्यम मानले जाते. भारतातील UGC ने मूल्यशिक्षण, मानवाधिकार आणि पर्यावरण शिक्षणाबाबत मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली आहेत. अनेक विद्यापीठांनी नैतिक शिक्षण, पर्यावरण अभ्यास, संविधान मूल्ये, मानवाधिकार, लिंगसमता यांसारखे मूल्याधिष्ठित घटक विषय अभ्यासक्रमात समाविष्ट केले आहेत. त्यातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण होण्यास मदत होते. सहानुभूती, समता, बंधुता, समाजसेवा यांसारखी विविध मूल्ये रुजवण्याच्या उद्देशाने NSS, NCC, सेवा-अभ्यास (Service Learning), विविध ग्रामीण शिबिरे यांद्वारे लाखो रुपये खर्च करून उपक्रम राबविले जातात. समाजातील विविध सामाजिक घटकांच्या संपर्कातून संवेदनशीलता वाढते. उच्च शिक्षण विद्यार्थ्यांना तर्कशुद्ध विचार, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि लोकशाही मूल्यांची जाणीव करून देते. चर्चा-परिसंवाद, वादविवाद, संशोधन पद्धती यांमुळे विवेकशीलता विकसित होते. शिक्षकांचे वर्तन, वक्तशीरपणा, प्रामाणिकपणा, व्यावसायिक आणि सामाजिक बांधिलकी विद्यार्थ्यांवर प्रभाव टाकतात. आदर्श मार्गदर्शनामुळे व्यक्तीवरील मूल्यसंस्कार दृढ होण्यास हातभार लागतो.

याउलट आज उच्च शिक्षणावर वाढत्या बेकारीमुळे रोजगाराभिमुखता आणि स्पर्धा यांचा प्रभाव अधिक आहे. बऱ्याचदा गुणांचा वाढलेला फुगवटा, आर्थिक देवाणघेवाणीतून आणि भ्रष्ट शिक्षण व्यवस्थेतून ऑनलाईन ऑफलाईन मिळवलेल्या असंख्य पदव्या, खाजगी नोकऱ्यांची खिरापत व आमिषे, वशिलेबाजीतून मिळवलेली नोकरी, ज्ञान कौशल्यांचा अभाव असतानाही मिळवलेला गलेगठ्ठ पगार यांमुळे शिक्षणातून अपेक्षित असलेला मानवी मुल्यांचा विकास हरवला गेलेला दिसतो. विविध पारंपरिक आणि व्यावसायिक शिक्षणाचे प्रचंड व्यापारीकरण झाल्याने नैतिकता केव्हाच गळून पडली आहे. आज शिक्षण क्षेत्रात खासगीकरण आणि नफेखोरीची प्रवृत्ती वाढली आहे. शिक्षण सेवा न राहता उद्योगव्यवसाय झाले आहे. शिवाय मूल्यशिक्षण विषय अभ्यासक्रमात असला तरी तो बहुतेक वेळा परीक्षाकेंद्री राहिला आहे. प्रत्यक्ष जीवनातील पावलोपावली आचरणात त्याची गाठभेट कोठेच होताना दिसत नाही. विद्यार्थ्यांचे मुख्य लक्ष्य उच्च वेतनाची नोकरी मिळविणे इतकेच उरते. सामाजिक बांधिलकी आणि सेवाभाव कमी होत आहे. साहित्यचौर्य, बनावट माहिती संकलन, शिक्षण व संशोधन

निधीचा गैरवापर अशा आक्षेपार्ह बौद्धिक अधःपतनाच्या घटना वाढल्या आहेत. पदव्यांचे गुण आणि श्रेणी(Rank) यावर भर दिल्याने विद्यार्थ्यांमध्ये सहकार्य व सहानुभूती दूर होत जीवघेणी स्पर्धात्मकता वाढली. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना उच्च शिक्षणात प्रवेश व सातत्य राखणे कठीण जाते. काही संस्थांमध्ये राजकीय हस्तक्षेप व गटबाजीमुळे लोकशाही मूल्यांना धक्का बसतो. त्यामुळे सामाजिक संवेदनशीलतेत घट, भ्रष्टाचारात वाढ, पर्यावरणीय जबाबदारीचा अभाव, सामाजिक ताणतणाव, वाढलेली विषमतेची बीजे आणि शिक्षणावरील विश्वास कमी होणे अशा समस्यांना प्रकर्षाने तोंड द्यावे लागत आहे. भारतातील उच्च शिक्षण प्रणाली सध्या एका मोठ्या स्थित्यंतरातून जात आहे. एकीकडे आपण जागतिक महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत आहोत, तर दुसरीकडे आपल्या शिक्षण व्यवस्थेतील नैतिक आणि मानवी मूल्यांचा ऱ्हास होताना पाहतो आहे. विद्यापीठे केवळ पदव्यांचे वाटप करणारी बाजारी केंद्रे बनली आहेत. एका अहवालानुसार भारतातील ८०% अभियांत्रिकी पदवीधर नोकरीसाठी तांत्रिकदृष्ट्या सक्षमच नाहीत.

सन २०१६च्या महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियमाने विद्यापीठांच्या लोकशाहीवर घाला घातलेला आहे. अलीकडे NEP २०२० च्या धोरणाने भारतीय ज्ञान परंपरेच्या गोंडस नावाखाली शिक्षण व संशोधन पुन्हा सुरू केले आहे. त्यातून 'प्राचीन भारतीय विज्ञानांचे' शिक्षण देताना 'पारंपरिक शास्त्र' आणि 'प्राचीन विद्या' यांचे अभ्यासक्रम राबवित आहे. नागपूर विद्यापीठाने अलीकडेच हिंदू धर्म-संस्कृतीचे धडे देण्यासाठी एका धार्मिक संस्थेशी करार केला आहे. माजी कुलगुरू डॉ. वसंत शिंदे हे 'सल्लागार' असलेल्या पुण्यातील एका उच्च शिक्षणसंस्थेत चक्क 'पुष्पक विमानविद्या', मुंबई विद्यापीठाने 'मंदिर व्यवस्थापन' तर रामटेकच्या कालिदास संस्कृत विद्यापीठात 'फलज्योतिष्य विद्या' शिकविली जात आहे. फलज्योतिष्य हे शास्त्र नाही, जनतेने त्याला बळी पडू नये असे एक पत्रक १९७५ साली जगातील १८६ शास्त्रज्ञांनी प्रसिद्ध केले आहे, ज्यात १८ नोबेल पुरस्कार विजेत्या शास्त्रज्ञांचा समावेश आहे. फलज्योतिष्याच्या सत्यतेविषयी पाश्चात्त्य देशांत वस्तुनिष्ठपणे अनेक चाचण्या घेण्यात आल्या. त्यावरून ते निव्वळ थोतांड असल्याचे सिद्ध झाले आहे. त्यामुळे जगातील कोणत्याही नामवंत विद्यापीठात विज्ञान शाखेत असे अवैज्ञानिक अभ्यासक्रम राबवविले जात नाहीत. परंतु भारतातील अलीकडच्या काळात मनुवादी, राजकीय वर्चस्व आणि स्वार्थापोटी असे अभ्यासक्रम राबविण्याचे जाणीवपूर्वक षडयंत्र रचले गेले आहे. एकूणच संविधानातील विविध मूल्यांना फाटा देत शिक्षण अविद्येकडे जात असल्याचे यातून दिसते. त्यामुळे धोरणात तरतूद असलेल्या भारतीय ज्ञान परंपरेचा नेमका उद्देश कोणता? हेच कळेनासे झाले आहे. वस्तुतः विद्यापीठ हे संशोधनाचे आणि ज्ञान निर्मितीचे केंद्र असते. परंतु तिथूनच कर्मकांडांचे शिक्षण दिले जात असेल तर मानवी जीवनात कदापिही मुल्ये रुजुच शकत नाहीत.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार शैक्षणिक रचना ५+३+३+४ अशी करण्यात आली आहे. उच्च शिक्षणात अध्यापनापेक्षा विविध सत्र आणि विद्यापीठ परीक्षा त्याद्वारे विद्यार्थी गुणवत्ता मुल्यांकन प्रक्रियेतच वर्षभरातील अधिक कालावधी जातो. विद्यार्थी आणि प्राध्यापकांना सतत परीक्षा आणि मूल्यमापनाच्या चक्रात अडकवून ठेवणारी, संदर्भग्रंथ वाचण्यास प्रोत्साहन देण्याऐवजी केवळ आयत्या नोट्समुळे अध्ययनातून चिंतन, मंथन आणि सृजन सर्जनशील वृत्ती कधीच गळून पडली आहे. विविध अभ्यासक्रम तयार करणे हे आव्हान तर आहेच परंतु

वेळखाऊ काम झाले आहे. सततच्या परीक्षा, निकाल आणि मूल्यांकनात होणाऱ्या मानवी चुकांचे प्रमाण वाढलेले असून, त्यात भरडल्या जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या लक्षणीय आहे. विनाअनुदानित असंख्य महाविद्यालयांना अनुदान व प्राध्यापकांना कायम करून पगार देण्यासाठी शासन टाळाटाळ करते. त्यातच शासनही सरकारी तिजोरीत पैसे नाहीत, त्यामुळे शिक्षणाचे खासगीकरण केल्याशिवाय पर्याय नाही. असे म्हणत त्याला खतपाणी घालते.केंद्रीय विद्यापीठांतील १८,९५१ मंजूर पदांपैकी २६ टक्के पदे रिक्त आहेत. राजस्थानातील १६ विद्यापीठांतील २,५१२ पदांपैकी १,५९७ रिक्त आहेत. देशातील पाच विद्यापीठांत तर कायमस्वरूपी पदभरती झालेलीच नाही. राज्यातील ११ राज्य विद्यापीठांपैकी पुणे, मुंबई, नागपूरसह पाच विद्यापीठांत प्राध्यापकांच्या जवळपास ६० टक्के जागा रिक्त आहेत. या विद्यापीठांशी संलग्न असलेल्या अनुदानित महाविद्यालयांतील स्थितीही फारशी बरी नाही. एकूणच सगळाच कारभार हंगामी आणि तासिकांवर मोलमजुरी करणाऱ्या प्राध्यापकांकडून सुरू असेल तर अशा विद्यापीठातील शिक्षणाचा दर्जा व अपेक्षित मानवी मुल्यांची रुजवण कशी करणार? याचा विचार उच्च शिक्षणातून आदर्श मानवी मुल्यांची दिवास्वप्ने पाहणाऱ्या आणि प्राध्यापकांच्या हजारो जागा रिक्त ठेवणाऱ्या राज्य व, केंद्रशासन तसेच शिक्षण व्यवस्थेने जरूर करावा. आजचे शिक्षण विद्यार्थ्यांना सहकार्य करण्याऐवजी केवळ स्पर्धेत टिकून राहण्यासाठी तयार करत आहे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये ताणतणाव आणि आत्महत्येसारख्या प्रवृत्ती वाढत आहेत. अनिती, भ्रष्टाचार, कॉपीचे वाढते प्रकार आणि वशिलेबाजी यामुळे शैक्षणिक प्रामाणिकपणा नष्ट होत चालला आहे. अशा परिस्थितीत लोकशाही व समतेची मूल्ये बाधित होवून विषमतेच्या बीजातून वाढलेल्या वेली फोफावल्या आहेत. वारंवार होणाऱ्या सर्वच पेपरफुटी, साहित्यचौर्य, आर्थिक गैरव्यवहार, भेदभाव व लैंगिक व इतर शोषण यांसारख्या नैतिक अधःपतनाच्या विविध घटना पाहता मूल्यसंस्कार अंमलबजावणीचे आणि शिक्षणव्यवस्थेचे अपयश आहे. कोणत्याही संशोधनात नैतिकतेचे पालन न झाल्यास उच्च शिक्षणाची विश्वासार्हतेला हानी पोहोचविते. उच्च शिक्षण सर्वांसाठी समान संधी देऊ शकत नसल्यास समता आणि सामाजिक न्याय ही मूल्ये जीवन व्यवहारात येणारच नाहीत. आर्थिक-सांस्कृतिक अडथळे विद्यार्थ्यांच्या सहभागावर परिणाम करतात. एकूणच आजचे उच्च शिक्षण हे मूल्यविकासासाठी अनुकूल वातावरण देत नाही. शैक्षणिक पारदर्शी गुणवत्ता, सदोष मूल्यमापन पद्धती, शिक्षकांचे आचरण, प्रशासनाची पारदर्शकता आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण सक्रिय सहभाग या सर्व घटकांवर मूल्यविकास अवलंबून असतो. शिक्षण केवळ कौशल्य विरहीत आणि नोकरीकेंद्रित राहिल्यास मानवी मूल्ये दुय्यम ठरतात. परंतु अभ्यासक्रम, संशोधन, सहशैक्षणिक उपक्रम आणि समाजाभिमुख प्रकल्प यांच्या माध्यमातून मूल्याधिष्ठित झाल्यास उच्च शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे नक्कीच प्रभावी साधन ठरेल. मूल्याधिष्ठित अभ्यासक्रम, समाजाभिमुख संशोधन, पारदर्शक व नैतिक प्रशासन, शिक्षक-विद्यार्थी संवाद आणि प्रत्यक्ष कृतीप्रधान उपक्रम या सर्वांचा समन्वय असल्याशिवाय उच्च शिक्षणातून मानवी मूल्यांचा विकास होणारच नाही. हे अधोरेखित करणे तितकेच गरजेचे आहे. उच्च शिक्षणात विविध सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक पार्श्वभूमीतील विद्यार्थी एकत्र येतात. त्यामुळे परस्पर सन्मान, सहिष्णुता आणि लोकशाही मूल्ये दृढ होतात. उच्च शिक्षणात मानवतावादी मूल्यांचा विकास होण्याची क्षमता निश्चितच आहे; परंतु ती अंमलबजावणीवर अवलंबून आहे.

शिक्षण केवळ रोजगारकेंद्री व बाजारपेठाभिमुख राहिल्यास मूल्यविकासाचा केवळ आभास निर्माण होतो. परंतु अभ्यासक्रम, संशोधन, सामाजिक प्रकल्प आणि शिक्षकांचे आदर्श वर्तन यांचा समन्वय साधल्यास मूल्यविकासाचा आभासी नव्हे तर वास्तव परिणाम दिसू शकतो. म्हणूनच उच्च शिक्षण हे मूल्यविकासाचे सामर्थ्यवान माध्यम आहे; परंतु त्या क्षमतेची प्रभावी अंमलबजावणी झाली तरच समाजात खऱ्या अर्थाने शाश्वत व मानवतावादी परिवर्तन घडणे शक्य आहे.

उपाययोजना:

भारतातील शिक्षणासमोर प्रवेश प्रक्रियेतील घोडेबाजार, शिक्षणाचा दर्जा, कालबाह्य अभ्यासक्रम रचना, *जागतिक नोकरी बाजारातील वास्तवाची तयारी, पारदर्शी परीक्षा मूल्यांकन पद्धती,* अपुरी पायाभूत सुविधा, पूर्णवेळ गुणवत्तापूर्ण प्राध्यापकांची कमतरता, गुणवत्ता सुधारणा, भ्रष्टाचार, बनावट प्रमाणपत्रे, शिक्षणाचे प्रतिकूल परिणाम, विद्यार्थी गळतीचे प्रमाण रोखणे, रोजगाराच्या संधींचा अभाव, सामाजिक-आर्थिक विषमता, भेदभावाची प्रवृत्ती, शिक्षणाचे व्यापारीकरण, बोगस पदव्यांची वाटप केंद्रे, संशोधनाचा अभाव, नैतिकतेचा अभाव, सामाजिक उत्तरदायित्वाचा विसर आणि रोजगार क्षमता वाढवणे इ. अनेक आव्हाने आहेत. यावर उपाय म्हणून पायाभूत सुविधा वृद्धीसह सुधारणे, नाविन्यपूर्ण शिक्षण पद्धतींसह प्रभावी अभ्यासक्रम रचना, मूल्यमापन लेखी परीक्षा केंद्री न ठेवता अपेक्षित मुल्यसंस्कार केंद्री ठेवणे, उच्च विद्याविभूषित गुणवंत प्राध्यापकांच्या नियुक्ती, मुबलक मुल्यसंस्कार प्रशिक्षण कार्यक्रम, विषमता विरहीत सर्वसमावेशक शिक्षणप्रणाली आणि अर्थसंकल्पात उच्च शिक्षणासाठी भरीव आर्थिक तरतूद करणे आज आवश्यक बनले आहे. शिक्षण व्यवस्थेत सामाजिक-आर्थिक घटक शैक्षणिक संधींवर मोठ्या प्रमाणात प्रभाव पाडत असल्याने ती असमानता दूर केली पाहिजे. शिक्षणाचे रूपांतर रोजगाराभिमुख कौशल्यांमध्ये करणे आवश्यक आहे. भविष्यात उच्च शिक्षणातून आपल्याला विद्यार्थ्यांमध्ये मुल्यांची रुजवणूक चांगल्या प्रकारे करायची असेल तर त्याची पायाभरणी प्राथमिक स्तरापासूनच प्रभावीपणे झाली पाहिजे. त्यासाठी केवळ मूल्यशिक्षण विषय सक्तीचा व अनिवार्य करून चालणार नाही तर त्याचे कृतियुक्त मूल्यमापन होणे गरजेचे आहे. मूल्यमापन करणाऱ्या गुणवत्तापूर्ण शिक्षकांची पिढी प्रशिक्षणातून घडवावी लागेल. विविध मूल्याधिष्ठित अभ्यासक्रमात नैतिकता, मानवाधिकार, संविधान मूल्ये यांचा अनिवार्य समावेशासह मूल्याधिष्ठित अध्ययन अध्यापन पद्धतींचे शिक्षण प्रशिक्षण देणे क्रमप्राप्त असेल. प्रत्येक विद्यापीठे व महाविद्यालय यांनी आर्थिक व शैक्षणिक व्यवहार पारदर्शक ठेवत कठोर नैतिक देखरेख, सेवा-अभ्यास उपक्रम काटेकोरपणे राबवून त्यामार्फत विद्यार्थ्यांना समाजसेवेचे प्रत्यक्ष अनुभव दिले पाहिजेत.

संदर्भ सूची:

१. भारतीय राज्यघटना - प्रस्तावना व मूलभूत अधिकार १९५०
२. राष्ट्रीय शिक्षण धोरण, भारत सरकार, २०२०.
३. शाश्वत विकास ध्येय अहवाल, संयुक्त राष्ट्रे, २०१५
४. संयुक्त राष्ट्र शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संघटना. शाश्वत विकास ध्येयांसाठी शिक्षण, २०१७
५. मूल्य शिक्षणावरील मार्गदर्शक तत्त्वे, विद्यापीठ अनुदान आयोग, २०२०
६. अभ्यासक्रम अहवाल, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, २०२२

ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

March - 2026
Vol. 15 - No. S1

भारतातील उच्च शिक्षणाची वाटचाल आणि आव्हाने

प्रा. अमित ए. बोरसे

राज्यशास्त्र विभाग प्रमुख, क.रा. आहेर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, देवळा

***Corresponding Author:* प्रा. अमित ए. बोरसे**

DOI - 10.5281/zenodo.19491787

सारांश:

भारत देशाला शिक्षण व्यवस्थेची समृद्ध परंपरा लाभलेली आहे. प्राचीन काळ ते आधुनिक काळ शिक्षण व्यवस्थेचे स्वरूप बदलत गेलेले दिसते. मात्र काळानुरूप शिक्षण व्यवस्थे समोर आव्हाने असलेली दिसतात. प्राचीन व मध्ययुगीन काळात विशिष्ट वर्गालाच शिक्षणाची संधी उपलब्ध होती. आधुनिक काळात विशेषतः ब्रिटीशांच्या भारतातल्या प्रवेशानंतर आधुनिकतेला सुरुवात होऊन शैक्षणिक बदल झाले. भारतातील भेदभावावर आधारित व्यवस्थेला समताधारित करण्याचा प्रयत्न ब्रिटीशांनी केला. स्वातंत्र्य पूर्व काळात शिक्षण प्रसाराचे महत्त्वपूर्ण काम ख्रिश्चन मिशनरी व समाजसुधारकांनी केले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर उच्च शिक्षणातील सुधारणांसाठी शासनाने अनेक समित्या व आयोग स्थापन करून मागच्या ७५ वर्षात उच्चशिक्षणाचा आरखडा व नियम बनविले. उच्चशिक्षण कालसुसंगत बनविण्यासाठी या आयोगांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली. या सर्व शैक्षणिक वाटचालीचा व आव्हानांचा आढावा प्रस्तुत लेखातून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

मुख्य शब्द: उच्च शिक्षण, विद्यापीठ अनुदान आयोग, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, उच्च शिक्षण नावनोंदणी (GER), निधी, पायाभूत सुविधा, संशोधनसंस्था, शासन, प्रशासन, विद्यापीठ घनता (University Density) ऑनलाइन शिक्षण, डिजिटल दरी (Digital Devide), इंटरनेट प्रवेश (Internet Access).

उद्दिष्टे:

१) उच्च शिक्षण संकल्पना समजून घेणे.

२) उच्च शिक्षणाचा कालानुरूप हेतू अभ्यासणे.

३) उच्च शिक्षणाच्या वाटचालीचा आढावा घेणे.

४) सद्यस्थितीत उच्च शिक्षणासमोरील आव्हाने अभ्यासणे.

५) उच्च शिक्षणातील संधी अभ्यासणे

गृहीतके:

१) राष्ट्र व समाजविकासात उच्च शिक्षण महत्त्वाचे आहे.

२) उच्च शिक्षणात समाज व शासन यांची भूमिका महत्त्वाची आहे.

संशोधन पद्धती:

प्रस्तुत संशोधन पत्रिकेसाठी ऐतिहासिक व वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा आधार घेतला आहे. माहिती संकलित करण्यासाठी संदर्भ ग्रंथ, वर्तमान पत्र, आंतरजाल (Internet) याचा उपयोग करण्यात आला आहे.

भारत देशाला शिक्षण व्यवस्थेची समृद्ध परंपरा लाभलेली आहे. प्राचीन काळात गुरुकुल पद्धती अस्तित्वात होती. या पद्धतीत शिक्षण घेण्यासाठी गुरुकुलात जाऊन शिष्य गुरुकडून विद्या प्राप्त करत असे. या शिक्षणात साहित्य, धर्म, युद्धशास्त्र, राजनीती(राज्यकारभार) इत्यादी विषयांचे ज्ञान मौखिक व प्रात्यक्षिक अशा दोन्ही पद्धतीने दिले जात असे. उदा. तक्षशीला विद्यापीठ हे प्राचीन भारतातील (सध्याचे पाकिस्तान) सर्वात जुने आणि विख्यात शिक्षण केंद्र होते, ज्याची स्थापना अंदाजे इ.स.पू. ६ व्या शतकात झाली. हे विद्यापीठ वैद्यकशास्त्र, राजकारण,

युद्धकला आणि तत्त्वज्ञानासाठी जगभरात प्रसिद्ध होते. येथे चाणक्य, पाणिनी आणि जीवक यांसारख्या विद्वानांनी शिक्षण घेतले व अध्यापन केले. नालंदा विद्यापीठ हे भारतातील (सध्याचे बिहार) प्राचीन काळातील एक अत्यंत प्रगत आणि जगातील पहिले निवासी विद्यापीठ होते. युनेस्को जागतिक वारसा स्थळ असलेले हे विद्यापीठ बौद्ध शिक्षणाचे केंद्र होते, जिथे १०,००० हून अधिक विद्यार्थी आणि २००० शिक्षक होते. महात्मा गांधींनी १९३७ मध्ये वर्धा येथे सुरू केलेली 'नई तालीम' (मूलभूत शिक्षण) ही ज्ञान आणि कार्य यांचा मेळ घालणारी शिक्षण पद्धती याच पारंपारिक पद्धतीवर अवलंबून होती. मध्ययुगीन काळात वर्णपद्धतीचा उदय झाला. हि वर्णपद्धती चातुर्वर्ण्य व्यवस्थेवर आधारित होती. यामध्ये ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व क्षुद्र असे चार वर्ण व या वर्णांमध्ये विभागलेल्या जाती होत्या. तथाकथित कनिष्ठ वर्ण व जातीतील लोकांना शिक्षण घेण्याचा (विद्यार्जनाचा) अधिकार नव्हता. ज्यामुळे समाजातील मोठा वर्ग ऐतिहासिक व समृद्ध अशा ज्ञान परंपरेपासून वंचित राहिला.

भारतात ब्रिटीशांच्या प्रवेशाने आधुनिकतेला सुरुवात झाली. समाजव्यवस्था व उत्पादन साधनांमध्ये बदल झाला. ब्रिटीशांनी त्यांच्या प्रशासकीय सोयीसाठी पारंपारिक शिक्षणव्यवस्था बंद करून आधुनिक शिक्षण सुरु केले, ज्यामध्ये लॉर्ड मेकॉले याने केलेले बदल महत्त्वपूर्ण होते. मेकॉलेने सुचविलेल्या बदलात वर्गाधारित (Classroom education) शिक्षणावर भर देण्यात आला. मेकॉलेने पाश्चात्य शिक्षण, विज्ञान आणि इंग्रजी भाषेच्या माध्यमातून शिक्षणाची शिफारस केली. पूर्वीच्या शिक्षणपद्धतीत असणारे तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र यासारखे मूल्याधारित विषय वगळण्यात आले. संस्कृत आणि अरबी साहित्याऐवजी पाश्चात्य विज्ञान आणि साहित्य शिकवण्यावर भर देण्यात आला. भारतात ब्रिटीश प्रशासनाला सहाय्यकारी कर्मचारी वर्ग तयार करणे हा या शिक्षणपद्धतीचा उद्देश होता. स्वातंत्र्य पूर्व काळात शिक्षण प्रसाराचे महत्त्वपूर्ण काम ख्रिश्चन मिशनरी व अनेक समाजसुधारकांनी केले. १९२० मध्ये सुरु झालेल्या असहकार आंदोलनात राष्ट्रीय शिक्षणावर भर देण्यात आला. ज्याचा मूळ उद्देश इंग्रजी शिक्षणाला विरोध करून भारतीय शिक्षणपद्धतीचा स्वीकार व प्रसार करणे हा होता. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर उच्च शिक्षणातील सुधारणांसाठी अनेक समित्या व आयोग स्थापन करण्यात आले. या समित्या व आयोगांनी मागच्या ७५ वर्षात उच्चशिक्षणाचा आरखडा व नियम बनविले. उच्चशिक्षण कालसुसंगत बनविण्यासाठी या आयोगांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली. ज्यामध्ये खालील समिती व आयोगाचा समावेश होतो.

स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली उच्च शिक्षणासाठी पहिला आयोग स्थापन केला. हा आयोग उच्च शिक्षण संस्थांना भेडसावणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी स्थापन करण्यात आला. या आयोगाचा मूळ उद्देश विद्यापीठस्तरीय शिक्षणाचे मुल्यांकन आणि आणि पुनर्रचना करणे हा होता. आयोगाने उच्च शिक्षणाचे सुसूत्रीकरण, लोकशाही मुल्ये, शांतता आणि सौहार्द प्रस्थापित करण्यासाठी व देशाच्या गरजा आणि सांस्कृतिक ठेव्याचा आधार घेऊन शैक्षणिक पुनर्रचनेची शिफारस केली. राजकारण, प्रशासन, उद्योग, आणि वाणिज्य क्षेत्रात आपले योगदान देऊ शकतील अशा महान व्यक्तिमत्त्वांचा विकास करणे हा शिक्षणाचा उद्देश असावा अशी अपेक्षा आयोगाने व्यक्त केली. या आयोगाच्या शिफारशीवरून विद्यापीठ अनुदान आयोगाची (UGC) स्थापना करण्यात आली.

१४ जुलै १९६४ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाचे तत्कालीन अध्यक्ष दौलत सिंग कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षण आयोगाची स्थापना करण्यात आली. भारत सरकारने भारतातील शैक्षणिक क्षेत्रातील सर्व पैलूंचे परीक्षण करण्यासाठी, आणि भारतातील शिक्षणाच्या विकासासाठी मार्गदर्शक तत्त्वे आणि धोरणे व सल्ला देण्यासाठी स्थापन केलेला एक तात्पुरता आयोग होता. प्राथमिक स्तरापासून ते उच्च स्तरापर्यंत शिक्षणाच्या विकासासाठी मार्गदर्शक तत्त्वे तयार करणे आणि भारतातील शिक्षणाच्या प्रमाणित राष्ट्रीय पद्धतीवर सरकारला सल्ला देणे हे आयोगाचे कार्यक्षेत्र होते. वैद्यकीय आणि विधी अभ्यासक्रम आयोगाच्या कार्यक्षेत्रातून वगळण्यात आले होते. कोठारी आयोगाचा अहवाल शिक्षण आणि राष्ट्रीय विकासावर केंद्रित होता. आयोगाने २९ जून १९६६ रोजी अहवाल सादर केला. कोठारी आयोगाचा अहवाल भविष्यातील शिक्षण धोरणांवर प्रभाव पाडणारा पायाभूत दस्तऐवज मानला जातो, त्याने एका राष्ट्रीय शैक्षणिक चौकटीचा पाया घातला जो आजही महत्त्वाचा मानला जातो

मद्रास विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. ए. लक्ष्मणस्वामी मुदलियार यांच्या अध्यक्षतेखाली २३ सप्टेंबर १९५२ रोजी मुदलियार आयोगाची आयोगाची स्थापना करण्यात आली. आयोगाने माध्यमिक स्तरावर विविध अभ्यासक्रमांच्या गरजेवर भर दिला. याबरोबरच शिक्षक प्रशिक्षण आणि परीक्षा प्रणालींमध्ये संरचनात्मक सुधारणा, अभ्यासक्रमात विविधता, व्यावसायिक शिक्षण आणि बहुउद्देशीय शाळा (Multipurpose schools) सुरू करण्याची शिफारस केली.

१९८६ मध्ये राजीव गांधी सरकारने आणलेले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे भारतातील शिक्षणाची गुणावत्ता सुधार व सामाजिक विषमता दूर करून सर्वांना समान शैक्षणिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी लागू करण्यात आले. उच्च शिक्षणाच्या संधींचा विस्तार करण्यासाठी मुक्त विद्यापीठ प्रणाली सुरू करण्यात आली. प्राथमिक शिक्षणात 'बाल-केंद्रित दृष्टिकोन' आणणे, शाळांमधील पायाभूत सुविधा सुधारण्यासाठी 'ऑपरेशन ब्लॅकबोर्ड' यासारख्या शिफारशी करण्याबरोबरच देशपातळीवर एकसमान संरचना (१०+२+३) लागू केली. हे धोरण भारतातील एकूण शिक्षणव्यवस्थेत क्रांती घडवून आणणारे मानले जाते. दरम्यानच्या काळात १३ जून २००५ रोजी पंतप्रधान मनमोहन सिंग सरकारने एकविसाव्या शतकातील शैक्षणिक व कृषि संशोधन क्षेत्रांमध्ये सुधारणा करण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय ज्ञान आयोगाची स्थापना केली.

उच्च शिक्षणातील सुधारणांसाठी सध्याच्या नरेंद्र मोदी यांच्या सरकारने अनेक समित्यांशी व शिक्षण तज्ञांशी व्यापक चर्चाविनिमय केल्यानंतर राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) २०२० तयार करण्यात केले, ज्याचा उद्देश भविष्यासाठी तयार शैक्षणिक परिसंस्था तयार करणे आहे. मानव संसाधन विकास मंत्रालयाने जाहीर केलेल्या या धोरणाचा उद्देश देशातील शाळा आणि उच्च शिक्षण प्रणालींमध्ये सध्याच्या (१९८६ च्या शैक्षणिक धोरण) ३४ वर्ष जुन्या धोरणात बदल घडवून आणणे आहे. महत्त्वाचा बदल म्हणजे शैक्षणिक संरचनेत ५+३+३+४ असा बदल करण्यात आला आहे. यामध्ये विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलता आणि नवोपक्रम तसेच व्यक्तिमत्त्व विकासावर अधिक भर दिला आहे. ज्यामध्ये प्राथमिक शिक्षणात मातृभाषेवर भर, कौशल्य विकास, शिक्षक प्रशिक्षण, तंत्रज्ञानाधारित शिक्षण, श्रेयांक पद्धती (Academic Bank of Credit), शिक्षणावरील सार्वजनिक खर्च सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या ६ टक्क्यांपर्यंत नेणे, उच्च शिक्षण नावनोंदणी (Gross

Enrollment Ratio) २०३५ पर्यंत ५०% पर्यंत पोहोचविणे ई. उद्दिष्टांचा समावेश आहे

भारतीय शिक्षण व्यवस्थेत पूर्वप्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक. उच्चमाध्यमिक व उच्चशिक्षण किंवा विद्यापीठीय शिक्षण असा ढोबळ आराखडा आहे. उच्चशिक्षणात पदवी व पदव्युत्तर असे दोन भाग केले जातात. पदव्युत्तर शिक्षणात संशोधनावर भर असतो. उच्चशिक्षण हा विषय पूर्वी राज्यसूचीत समाविष्ट होता. मात्र १९७६ सालच्या ४२ व्या घटनादुरुस्तीने उच्चशिक्षण हा विषय समवर्ती सूचीत समाविष्ट करण्यात आला. समवर्ती सूचीत उच्चशिक्षण हा विषय समाविष्ट केल्यामुळे केंद्रीय संसद व घटकराज्याचे विधिमंडळ या दोहोंना कायदे करण्याचा व उच्चशिक्षणाचे नियमन करण्याचा अधिकार आहे. जर कायदेनिर्मिती व नियमन याबाबत केंद्र सरकार व घटक राज्यसरकारमध्ये संभ्रम किंवा संघर्ष निर्माण झाला तर घटनेतील तरतुदीनुसार केंद्राचा कायदा गृहीत धरला जाईल याचा अर्थ उच्चशिक्षणाचे नियमन करण्याचा अधिकार घटकराज्यांपेक्षा केंद्र सरकारला अधिक आहे. भारताच्या उच्च शिक्षण व्यवस्थेसमोर अनेक आव्हाने आहेत. ती पुढीलप्रमाणे

१) नावनोंदणी (Gross Enrollment Ratio): २०२१-२०२२ च्या अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण (AISHE) अहवालानुसार, उच्च शिक्षणाचा GER (Gross Enrollment ratio) २८.४% आहे, जो विकसित देशांपेक्षा किंचित कमी आहे. शाळा नोंदणीच्या तुलनेत देशाच्या वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी उच्च शिक्षण संस्थांच्या तरतुदी अपुर्या आहेत. उच्च शिक्षण नावनोंदणी (Gross Enrollment Ratio) २०३५ पर्यंत ५०% पर्यंत पोहोचणे आवश्यक आहे.

२) पायाभूत सुविधा :सार्वजनिक किंवा सरकारी संस्थांमध्ये पायाभूत आणि भौतिक सुविधा अभाव असमाधानकारक आहेत, ज्यामुळे भारताच्या उच्च शिक्षणावर लक्षणीय परिणाम होतो हे उच्च शिक्षणासमोरील एक मोठे आव्हान आहे. भारतात उच्च शिक्षण संस्थांमध्ये (HEI) अनेक जागा रिक्त आहेत, तरीही पीएचडी किंवा नेट पात्रताधारक उमेदवार बेरोजगार आहेत किंवा त्यांना कोणतेही काम मिळालेले नाही, असा विरोधाभास आहे. यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून गुणवत्तेशी तडजोड होताना दिसत आहे.

३) गुणवत्ता: भारत सरकार शिक्षणाच्या गुणवत्तेबाबत भूमिका घेण्याची अपेक्षा करत आहे. मात्र, देशातील विद्यापीठे जगातील सर्वोत्तम विद्यापीठांमध्ये स्थान मिळवू शकत नाहीत कारण बहुतेक विद्यापीठे आणि महाविद्यालये विद्यापीठ अनुदान आयोगाने (UGC) व्यक्त केलेल्या मूलभूत अपेक्षा पूर्ण करत नाहीत. जसे की, शिक्षक-विद्यार्थी प्रमाण (Student-Teacher Ratio), NAAC मुल्यांकन, नवोपक्रम, स्थानिक गरजा व उद्योगांशी निगडीत अभ्यासक्रम इत्यादी.

४) संशोधनासाठीच्या सुविधा: उच्च शिक्षण संस्थांमध्ये संशोधनावर योग्य लक्ष केंद्रित केले गेलेले दिसत नाही. अल्प किंवा मर्यादित संख्येने उपलब्ध असलेले संशोधन मार्गदर्शक तसेच संशोधनासाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधा पुरेशा नाहीत. संशोधक विद्यार्थ्यांना त्यांचे स्टायपेंड किंवा फेलोशिप वेळेवर मिळत नाही, ज्यामुळे त्यांच्या संशोधनावर खूप परिणाम होतो. समाज, उद्योगक्षेत्र आणि संशोधन केंद्रे यांचा योग्य समन्वय असायला हवा तो दिसत नाही. याचा परिणाम म्हणजे उच्च शिक्षण क्षेत्रातून होणारे संशोधन समाजोपयोगी होताना दिसत नाही.

५) निधी: १४ व्या वित्त आयोगाने (२०१५-२०२०) राज्यांना कर वितरणाचा हिस्सा ३२ टक्क्यांवरून ४२ टक्क्यांपर्यंत वाढवण्याची शिफारस केली. कर वितरणातील ही सर्वात मोठी वाढ होती आणि केंद्र सरकारने राज्यांना सामाजिक क्षेत्रांवर खर्च करण्यासाठी मोठी आर्थिक तरतूद उपलब्ध करून दिली. मात्र, यामुळे राज्यांमधील शिक्षणावरील खर्चात वाढ झाली नाही. २००५-०६ ते २०१९-२० दरम्यान उच्च शिक्षणातील खर्चामध्ये घट झाली आहे आणि राज्यांनी घटकराज्यांच्या सकल उत्पादनाच्या (GSDP) तुलनेत शिक्षण खर्चाचा वाटा कमी झाला आहे. उच्च शिक्षण निधीमध्ये महाराष्ट्र आघाडीवर आहे, त्यानंतर उत्तरप्रदेश आणि तामिळनाडू या राज्यांचा क्रमांक लागतो. या तुलनेत सिक्कीम, अरुणाचल प्रदेश आणि नागालँड यासारख्या राज्यांमध्ये उच्च शिक्षणासाठी सर्वात कमी बजेट आहे. सिक्कीम आणि इतर विशेष श्रेणीतील राज्यांमध्ये आकडेवारीनुसार रक्कम कमी दिसत असली तरी, लोकसंख्येचा विचार करता या राज्यांची उच्च शिक्षणातील दरडोई गुंतवणूक जास्त आहे. भारतातील शिक्षणावरील राज्यनिहाय दरडोई खर्चात लक्षणीय तफावत दिसून येते, ज्यामध्ये गोवा, दिल्ली आणि केरळ हे राज्ये खर्चात आघाडीवर आहेत. बिहारसारखी काही राज्ये खालच्या पातळीवर आहेत. प्रति युवा शिक्षण खर्च हा निकष विचारात घेतला तर केरळ, तामिळनाडू, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश आणि तेलंगणा हे उच्च शिक्षणावर सर्वाधिक खर्च करणाऱ्या राज्यांमध्ये आहेत, तर राजस्थान, पंजाब आणि छत्तीसगड मागे आहेत. थोडक्यात, उच्च उत्पन्न असलेली राज्ये त्यांच्या राज्याच्या सकल उत्पादनाच्या (GSDP) कमी हिस्सा शिक्षणावर खर्च करतात.

६) कमकुवत प्रशासन रचना: भारतीय शिक्षण व्यवस्थेला पारदर्शकता, व्यावसायिकता आणि जबाबदारीचा अभाव, अतिकेंद्रीकरण आणि नोकरशाही संरचना यासारख्या प्रशासनविषयक आव्हानांना तोंड द्यावे लागत आहे. महाविद्यालयांची संख्या वाढत असल्यामुळे विद्यापीठांच्या कार्यावर व क्षमतेवर ताण येऊ शकतो, ज्यामुळे संशोधन किंवा शैक्षणिक क्षेत्रावरील लक्ष कमी होऊ शकते.

७) विद्यापीठ घनता (University Density): विद्यापीठ घनता, जी १८-२३ वयोगटातील दर १ लाख पात्र लोकसंख्येमागे विद्यापीठांची संख्या किती आहे यावरून विचारात घेतली जाते. हि घनता २०२१-२२ पर्यंत राष्ट्रीय सरासरी ०.८ इतकी होती. हे प्रमाण सिक्कीमसारख्या कमी लोकसंख्येच्या राज्यांमध्ये जास्त (१०.३), तर बिहार, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगालसारख्या जास्त लोकसंख्येच्या राज्यांमध्ये राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी आहे. अमेरिकेत उच्च शिक्षण संस्थांची घनता जास्त आहे.

८) राजकीय हस्तक्षेप: शैक्षणिक क्षेत्रात राजकीय हस्तक्षेप दिवसेंदिवस वाढत आहे, ज्यामुळे भारतात शिक्षणाची जी दुर्दशा झाली आहे. ती फक्त प्रशासकीय अपयश नसून ती खोलवर रुजलेल्या राजकीय व सामाजिक अनास्थेचा परिपाक आहे. शिक्षण हि मानवसंसाधानात केलेली दीर्घकालीन गुंतवणूक असल्यामुळे तिचे परिणाम लगेच दिसून येत नाहीत. निवडणुकीच्या तोंडावर काहीतरी दिशाभूल करनार्या राजकीय व्यवस्थेला शिक्षण कधीच प्राधान्याचे वाटले नाही आणि वाटतही नाही.

९) डिजिटल दरी (Digital Devide) : उच्च शिक्षणात आतापर्यंत २० टक्के क्रेडिट हे ऑनलाइन शिक्षणाला देण्यात येत होते. मात्र, आता ते ४० टक्के इतके करण्यात येणार आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने यासाठी 'तरुणांसाठी सक्रिय वेबआधारीत ऑनलाइन अभ्यासक्रम श्रेयांक मार्गदर्शक अधिनियम २०२१' (SWAYAM

Regulations 2021) प्रसिद्ध केला आहे. हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना 'स्वयम्' या ऑनलाइन पोर्टलच्या माध्यमातून पूर्ण करता येणार आहे. मात्र भारतासारख्या देशात शिक्षणातील डिजिटल दरी (Digital Devide) म्हणजे आधुनिक तंत्रज्ञानाची उपलब्धता असलेल्या आणि नसलेल्या विद्यार्थ्यांमधील अंतर, जे सामाजिक-आर्थिक, भौगोलिक आणि पायाभूत सुविधांच्या घटकांमुळे आहे. डिजिटल डिव्हाईड कायम आहे, शहरी भागाच्या (६९%) च्या तुलनेत ग्रामीण भागात (५५%) इंटरनेट प्रवेश (Internet Access) कमी आहे. ऑनलाइन संसाधनांची उपलब्धता मर्यादित असल्यामुळे शैक्षणिक संधीबाबत असमानता निर्माण होते. दूरस्थ शिक्षण आणि डिजिटल कौशल्य विकास सारख्या कार्यक्रमांमुळे ही दरी कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांना आणि ग्रामीण भागातील उपेक्षित समुदायांना प्रभावित करते.

प्रवेशातील असमानता:

अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण (AISHE) च्या अहवालानुसार, भारतात उच्च शिक्षणातील मुलींचा प्रवेश वाढत आहे, परंतु तरीही पूर्ण समानता गाठण्यासाठी प्रयत्न चालू आहेत. विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी सारख्या विषयांमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व पुरुषांच्या तुलनेत कमी आहे. पदवी घेणाऱ्या स्त्रियांची संख्या जास्त असली, तरीही विद्यापीठांमधील उच्च पदे आणि नेतृत्वाच्या भूमिकांमध्ये पुरुषी वर्चस्व कायम आहे. घरगुती कामाचा असमान भार, पूर्वग्रहदूषित मानसिकता, आणि कामाच्या ठिकाणी सुरक्षिततेचा अभाव हे महिलांच्या प्रगतीमधील प्रमुख अडथळे आहेत. उच्च शिक्षणात खऱ्या अर्थाने लिंग समानता आणण्यासाठी केवळ नावनोंदणी वाढवणे पुरेसे नसून, शैक्षणिक संस्थांच्या संस्कृतीत बदल करणे आवश्यक आहे. त्यामुळे लैंगिक असमानतेचे आव्हान आजही उच्च शिक्षण क्षेत्रात असलेले दिसते.

थोडक्यात भारताच्या उच्च शिक्षण व्यवस्थेसमोर उच्च शिक्षण नावनोंदणी (Gross Enrollment Ratio), कमकुवत पायाभूत सुविधा, गुणवत्ता निकषांची अपुर्तता, अल्प किंवा मर्यादित संशोधन सुविधा, घटकराज्यांच्या सकल उत्पादनाच्या (GSDP) तुलनेत शिक्षण खर्चाचा कमी हिस्सा, अनावश्यक प्रशासकीय आणि राजकीय हस्तक्षेप, डिजिटल दरी (Digital Devide), लोकसंख्येच्या तुलनेत उच्च शिक्षण संस्थांची (HEI) आणि विद्यापीठांची कमतरता व राज्यनिहाय असमान वितरण, सामाजिक आणि आर्थिक तसेच लैंगिक आधारावर प्रवेशातील असमानता यासारखी अनेक आव्हाने आहेत. या सर्व आव्हानांच्या पार्श्वभूमीवर नवीन शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी सुरु झाली आहे. केंद्र सरकारने सादर केलेल्या उच्च शिक्षण व्हिजन २०४७ नुसार भारताच्या स्वातंत्र्याला २०४७ मध्ये १००पूर्ण होतील.या शंभराव्या वर्षात पदार्पण करताना विद्यापीठे, शिक्षण आणि युवकांची भूमिका महत्त्वाची असेल. भरीव गुंतवणूक, धोरणात्मक सुधारणा आणि शिक्षण आणि संशोधनाला प्राधान्य देण्याच्या दिशेने सांस्कृतिक बदल यांचा या धोरणात समावेश आहे. आव्हानांचा आढावा घेऊन आणि संधींचा फायदा घेऊन, भारत आपल्या उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात बदल करू शकतो आणि जागतिक ज्ञान महासत्ता म्हणून उदयास येऊ शकतो.

निष्कर्ष:

भारताचे उच्च शिक्षण क्षेत्र एका परिवर्तनाच्या टप्प्यातून जात आहे, जिथे आव्हानांसोबतच विकासाच्या

असंख्य संधी उपलब्ध आहेत. वाढत्या तरुणांच्या संख्येमुळे आणि वाढत्या आकांक्षांमुळे दर्जेदार शिक्षणाची मागणी वाढत आहे. लोकसंख्याशास्त्रीय लाभांशामुळे संभाव्य विद्यार्थ्यांचा मोठा समूह उपलब्ध होतो, अर्थव्यवस्था जसजशी वाढत जाईल तसतसे कुशल व्यावसायिकांची मागणी वाढेल, ज्यामुळे विशेष कार्यक्रम आणि संस्थांची गरज निर्माण होईल. भारत सरकारने उच्च शिक्षणाची क्षमता ही विकासाचे इंजिन म्हणून ओळखली आहे. उच्च शिक्षणातील अनेक क्षेत्रांमध्ये लक्षणीय वाढ होत आहे. कौशल्य विकासावर सरकारने लक्ष केंद्रित केल्यामुळे उद्योगांच्या गरजांनुसार व्यावसायिक अभ्यासक्रम देणाऱ्या संस्थांची मागणी निर्माण झाली आहे. कोविडनंतर ऑनलाइन शिक्षणाकडे कल वाढला आहे. यामुळे उच्च शिक्षण संस्थांना अभ्यासक्रमात लवचिकता आणि सुलभता स्वीकारावी लागली. भारताला जागतिक संशोधन केंद्र बनण्याची आकांक्षा आहे. नवकल्पना आणि संशोधनातून आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी विद्यापीठे आणि संशोधन संस्था महत्त्वपूर्ण आहेत. आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना आकर्षित केल्याने भारतीय संस्थांची प्रतिष्ठा वाढू शकते आणि महसूल मिळू शकतो. परदेशी विद्यापीठांसोबतच्या सहकार्यामुळे ज्ञानाची देवाणघेवाण देखील होऊ शकते. इतर देशांतील विद्यार्थ्यांना परवडणारे आणि दर्जेदार कार्यक्रम देऊन भारत जागतिक शिक्षणात महत्त्वाचे स्थान निर्माण करू शकतो. संधी प्रचंड असल्या तरी, उच्च शिक्षण क्षेत्राला पायाभूत सुविधांमधील कमतरता, प्राध्यापकांची कमतरता आणि गुणवत्तेच्या समस्यांना तोंड द्यावे लागते. असे असले तरी ही आव्हानेच प्रगतीची आणि नवकल्पनांची संधी देखील आहेत. उदाहरणार्थ, नाविन्यपूर्ण शिक्षण पद्धती आणि प्राध्यापक विकास कार्यक्रम (FDP) प्राध्यापकांच्या कमतरतेची भरपाई करू शकतात. जागतिक दर्जाच्या संस्था विकसित करण्यासाठी सार्वजनिक-खाजगी भागीदारी (PPP) महत्त्वाची ठरू शकते.

अशाप्रकारे, भारताचे उच्च शिक्षण क्षेत्र एका महत्त्वाच्या वळणावर आहे. उच्च शिक्षणासाठी २०४७ चे ध्येय साध्य करणे हे निःसंशयपणे एक गुंतागुंतीचे काम आहे. योग्य धोरणे, गुंतवणूक आणि पुढाकार घेऊन ते जागतिक स्तरावर आघाडीवर येऊ शकते. संधी प्रचंड आहेत आणि वाढीची क्षमता प्रचंड आहे. आव्हानांचे संधीत रुपांतर करून आणि आपल्या क्षमतेचा वापर करून, भारत जागतिक दर्जाची उच्च शिक्षण प्रणाली तयार करू शकतो जी देशाच्या प्रगतीत आणि जागतिक स्पर्धात्मकतेत योगदान देऊ शकते. पायाभूत सुविधांची कमतरता, संशोधन क्षेत्राचा उद्योग वा सामाजिक सहभाग ही आव्हाने आहेत. तथापि, भारताचा लोकसंख्याशास्त्रीय लाभांश, वाढती अर्थव्यवस्था आणि शिक्षणावर सरकारचे वाढते लक्ष यामुळे प्रचंड संधीही उपलब्ध आहेत.

संदर्भ:

१) https://aishe.gov.in/

२) NITI Aayog. (2025), "*Expanding Quality of Higher Education through States and State Public Universities.*" February, 2025.

३) मालेगावकर शांता/परांजपे वसुधा(संपादित), २००३, शिक्षणवेध: बदलत्या शिक्षणप्रवाहाचा मागोवा, राजहंस प्रकाशन, पुणे.

४) दै. लोकसत्ता.

५) दै. लोकमत.

ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

March - 2026
Vol. 15 - No. S1

शाश्वत विकासासाठी भाषिक कौशल्यांचा विकास काळाची एक गरज

प्रा. जयश्री भाऊसाहेब चव्हाण

प्रागतिक शिक्षण संस्थेचे, नूतन कला महाविद्यालय, राजापूर, ता.संगमनेर

***Corresponding Author:** प्रा. जयश्री भाऊसाहेब चव्हाण*

DOI - 10.5281/zenodo.19491799

प्रस्तावना:

शाश्वत विकासाची संकल्पना सर्वप्रथम १९८७ साली जागतिक पर्यावरण आणि विकास आयोगच्या अहवालात मांडली गेली. "भविष्यातील पिढ्यांशी तडजोड न करता वर्तमान गरजा" ही तिची मूलभूत व्याख्या आहे. सन २०१५ साली संयुक्त राष्ट्रांनी १७ शाश्वत विकास ध्येये (SDGS) जाहीर केली. या ध्येयांमध्ये लिंगसमता, स्वच्छ पाणी, हवामान कृती, गरिबी निर्मूलन त्याच बरोबर गुणवत्तापुर्ण शिक्षण इत्यादींचा समावेश आहे.

या सर्व ध्येयांच्या पूर्ततेसाठी लोकसहभाग आणि प्रभावी संवाद गरजेचा आहे. संवादाचा मुख्य आधार ही भाषा असते. भाषा कौशल्यांचा विकास न झाल्यास शाश्वत विकासाच्या संकल्पना समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचत नाहीत. म्हणूनच "शाश्वत विकासासाठी भाषा कौशल्यांचा विकास" हा अभ्यासाचा विषय हा महत्त्वाचा ठरतो असतो.

१) शाश्वत विकास : संकल्पना आणि स्वरूप शाश्वत विकास तीन प्रमुख स्तंभांवर आधारित आहे, ते पुढील प्रमाणे

अ) पर्यावरणीय स्थैर्य

ब) सामाजिक समता

क) आर्थिक विकास

हे तीन स्तंभ एकमेकांशी संवाद साधतात. उदाहरणार्थ, पर्यावरण संरक्षणासाठी लोकजागृती आवश्यक असते; तसेच लोकजागृतीसाठी प्रभावी भाषिक कौशल्यांचीही आवश्यक असते.

२) शाश्वत विकासाची जागतिक ध्येये : संयुक्त राष्ट्र शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संघटना (UNESCO) (शिक्षणाद्वारे शाश्वत विकास – ESD) या कार्यक्रमाद्वारे भाषिक आणि बौद्धिक विकासावर भर देते. SDG 4 (गुणवत्तापुर्ण शिक्षण) चिकित्सक विचार आणि सहकार्यात्मक शिक्षण तसेच मूल्ये शिक्षण यांना महत्त्व दिले आहे.

३) भाषा कौशल्ये : संकल्पना त्याचे प्रकार भाषा कौशल्ये चार प्रमुख प्रकारांत विभागली जातात ते पुढील प्रमाणे आहेत

१) ऐकणे (Listening Skills)

२) बोलणे (Speaking Skills)

३) वाचन (Reading Skills)

४) लेखन (Writing Skills)

ही कौशल्ये व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी तसेच सामाजिक सहभागासाठी आवश्यक असतात.

४) ऐकण्याचे कौशल्य : पर्यावरणीय समस्या, सामाजिक प्रश्न किंवा शासनाच्या योजना समजून घेण्यासाठी प्रभावी ऐकण्याची क्षमता आवश्यक आहे.

उदाहरणार्थ, ग्रामसभेत शाश्वत शेतीबाबत चर्चा होत असल्यास ती समजून घेणे महत्त्वाचे ठरते.

५) बोलण्याचे कौशल्य : विचार मांडण्याची क्षमता ही लोकशाहीची महत्तवाची अट आहे. शाश्वत विकासाच्या संदर्भात स्थानिक समस्या मांडण्यासाठी प्रभावी वक्तृत्व आवश्यक असते.

६) वाचन कौशल्य : शासनाच्या योजना, पर्यावरणविषयक अहवाल, संशोधन लेख वाचून त्यांचे आकलन करणे आवश्यक असते.

७) लेखन कौशल्य : अहवाल लेखन, प्रकल्प प्रस्ताव, संशोधन निबंध, अर्ज इत्यादींसाठी लेखन कौशल्य महत्त्वाचे आहे.

शाश्वत विकास आणि भाषा कौशल्यांचा परस्परसंबंध:

१. लोकजागृती आणि संवाद : पर्यावरण संवर्धनासाठी जनजागृती मोहिमा राबविल्या जातात. या मोहिमांमध्ये घोषवाक्ये, लेख, भाषणे आणि चर्चासत्रे यांचा वापर होतो. यासाठी प्रभावी भाषा आवश्यक असते.

२. शिक्षण आणि सामाजिक परिवर्तन : शिक्षण हे शाश्वत विकासाचे प्रमुख साधन आहे. संयुक्त राष्ट्र संघाच्या SDG 4 मध्ये सर्वसमावेशक आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणावर भर देण्यात आला आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी भाषिक सक्षमता अनिवार्य आहे.

३. स्थानिक भाषांचे योगदान : स्थानिक भाषांमधून शाश्वत विकासाची माहिती दिल्यास ती अधिक प्रभावी ठरते. उदाहरणार्थ, ग्रामीण भागात मातृभाषेतून दिलेली माहिती अधिक सहज स्वीकारली जाते.

शिक्षण प्रणालीतील भाषा कौशल्यांचा विकास :

१. अभ्यासक्रम रचना : अभ्यासक्रमात शाश्वत विकासाशी संबंधित विषयांचा समावेश करून त्यावर चर्चा, लेखन आणि सादरीकरण यांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.

२. प्रकल्पाधारित शिक्षण : विद्यार्थ्यांना स्थानिक पर्यावरणीय समस्यांवर प्रकल्प देऊन त्यावर अहवाल लेखन, सादरीकरण आणि चर्चासत्र आयोजित करता येते.

३. डिजिटल साक्षरता : डिजिटल माध्यमातून माहिती शोधणे, पडताळणी करणे आणि योग्य प्रकारे सादर करणे ही आधुनिक भाषिक कौशल्ये आहेत.

ग्रामीण आणि शहरी संदर्भातील भाषिक आव्हाने :

ग्रामीण भागात भाषिक संसाधनांचा अभाव असतो. शहरी भागात इंग्रजी व स्थानिक भाषांमधील दरी दिसून येते. या दरीमुळे शाश्वत विकासाच्या योजना समजण्यात अडचणी निर्माण होतात.

संशोधन पद्धती (Research Methodology):

या शोधनिबंधासाठी वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. विविध संशोधन लेख, शासकीय अहवाल आणि शैक्षणिक धोरणांचा अभ्यास करून निष्कर्ष मांडण्यात आले आहेत.

चर्चा:

भाषा कौशल्यांचा विकास झाल्यास व्यक्ती: पर्यावरणीय प्रश्न समजू शकते. शासनाच्या योजना जाणून घेऊ शकते

सामाजिक उपक्रमात सहभाग घेऊ शकते. डिजिटल माध्यमातून योग्य माहिती प्रसारित करू शकते.

शाश्वत विकासासाठी केवळ तांत्रिक ज्ञान नव्हे तर संवाद कौशल्ये आवश्यक आहेत.

निष्कर्ष:

शाश्वत विकास साध्य करण्यासाठी भाषा कौशल्यांचा विकास अत्यंत गरजेची आहे. शिक्षण व्यवस्थेत भाषिक सक्षमता वाढविण्यासाठी विशेष कार्यक्रम राबविणे अत्यावश्यक आहे. स्थानिक भाषांचा सन्मान, डिजिटल साक्षरता आणि चिकित्सक विचार या घटकांवर भर दिल्यास शाश्वत विकासाची उद्दिष्टे प्रभावीपणे पुरणत्वास जावू शकतो.

शिफारसी:

१) स्थानिक भाषांमध्ये माहितीपत्रके तयार करावीत.

२) शाळा व महाविद्यालयांमध्ये शाश्वत विकास विषयक लेखन व वकृत्व स्पर्धा आयोजित कराव्यात.

३) डिजिटल माध्यमातून पर्यावरण शिक्षण प्रसारित करावे.

४) संशोधन आणि प्रकाशनाला प्रोत्साहन द्यावे.

५) शिक्षकांना भाषिक प्रशिक्षण द्यावे.

संदर्भसूची:

१) संयुक्त राष्ट्रसंघ (२०१५). शाश्वत विकास उद्दिष्टे.

२) संयुक्त राष्ट्रसंघ शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संघटना. शाश्वत विकासासाठी शिक्षण अहवाल.

३) पर्यावरण आणि विकासावरील जागतिक आयोग (१९८७). आमचे सामान्य भविष्य.

ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

March - 2026
Vol. 15 - No. S1

भारतातील शाश्वत विकासात उच्च शिक्षणाची भूमिका

प्रा. हिंगे राजेंद्र कुंडलिक

Corresponding Author: प्रा. हिंगे राजेंद्र कुंडलिक

DOI - 10.5281/zenodo.19491822

प्रस्तावना:

भारत हा १.४ अब्जाहून अधिक लोकसंख्या असलेला देश आहे. येथे जगातील सर्वाधिक तरुण लोकसंख्या आहे. ही तरुण शक्ती हीच भारताची खरी संपत्ती आहे. पण ही शक्ती योग्य दिशेने वळवण्यासाठी उच्च शिक्षण अत्यंत आवश्यक आहे.भारत सरकारने संयुक्त राष्ट्रांच्या १७ शाश्वत विकास उद्दिष्टांना (SDGs) मान्यता दिली आहे. यापैकी SDG 4 - 'दर्जेदार शिक्षण' हे भारतासाठी विशेष महत्त्वाचे आहे. भारतात सध्या ४५,००० हून अधिक महाविद्यालये आणि ९०० हून अधिक विद्यापीठे आहेत. हे जगातील सर्वात मोठे उच्च शिक्षण जाळे आहे.तरीही भारतात उच्च शिक्षणाचे GER (Gross Enrollment Ratio) केवळ २७.३% आहे (AISHE 2021-22). म्हणजेच अजूनही बरेच काम बाकी आहे. या पार्श्वभूमीवर उच्च शिक्षण आणि शाश्वत विकास यांचा अभ्यास करणे अत्यंत गरजेचे आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :

1. भारतातील उच्च शिक्षण व्यवस्थेची सध्याची स्थिती समजून घेणे.
2. भारतातील शाश्वत विकास आणि उच्च शिक्षण यांचा परस्परसंबंध स्पष्ट करणे.
3. NEP 2020 चा शाश्वत विकासावर होणारा परिणाम तपासणे.
4. IIT, ISRO, DRDO यांसारख्या भारतीय संस्थांच्या योगदानाचा अभ्यास करणे.
5. भारतातील उच्च शिक्षण आणि शाश्वत विकास यासाठी निष्कर्ष मांडणे.

गृहीतके :

गृहीतक १ : भारतातील उच्च शिक्षणाचा प्रसार जितका जास्त होईल, तितका शाश्वत विकासाचा वेग अधिक वाढेल.

गृहीतक २ : उच्च शिक्षणामुळे भारतातील गरिबी आणि बेरोजगारी कमी होण्यास मदत होते.

गृहीतक ३ : उच्च शिक्षणातील महिलांच्या सहभागामुळे सामाजिक समानता वाढते.

गृहीतक ४ : उच्च शिक्षण संस्थांमधील संशोधनामुळे भारताच्या पर्यावरण रक्षणात मदत होते.

संशोधन पद्धती:

- **संशोधनाचा प्रकार :**

  हा अभ्यास वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक प्रकारचा आहे. भारतातील उच्च शिक्षणाशी संबंधित उपलब्ध माहितीचे वर्णन आणि विश्लेषण केले आहे. हे गुणात्मक संशोधन आहे.

- **माहितीचे स्रोत:**

1. AISHE (All India Survey on Higher Education) अहवाल
2. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) 2020 दस्तावेज
3. UGC, NAAC, NIRF अहवाल
4. NITI Aayog चे SDG India Index अहवाल

भारतातील उच्च शिक्षण – सद्यस्थिती:

1. भारतातील उच्च शिक्षणाची सद्यस्थिती खालील आकडेवारीवरून समजते:
2. एकूण महाविद्यालये: ४५,४७३ (AISHE 2021-22)
3. एकूण विद्यापीठे: ९५५
4. उच्च शिक्षणातील एकूण विद्यार्थी: ४.३ कोटी
5. GER (Gross Enrollment Ratio): २७.३%
6. महिलांचा सहभाग: ४९% हे एक सकारात्मक चिन्ह आहे हे दाखवते की अजून खूप काम बाकी आहे. NEP 2020 नुसार हे प्रमाण २०३५ पर्यंत ५०% पर्यंत वाढवण्याचे लक्ष्य आहे.

NEP 2020 आणि शाश्वत विकास:

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० हे भारताच्या शिक्षण व्यवस्थेत ३४ वर्षांनंतर आलेले मोठे बदल आहे. या धोरणातील प्रमुख मुद्दे:

1. बहुशाखीय शिक्षण - विद्यार्थी वेगवेगळ्या विषयांचे शिक्षण घेऊ शकतात.
2. कौशल्य विकास प्रत्येक अभ्यासक्रमात व्यावहारिक कौशल्यांचा समावेश.
3. भारतीय भाषांमधून शिक्षण मातृभाषेत शिकण्याची संधी.
4. संशोधनावर भर National Research Foundation (NRF) स्थापन.
5. GER २०३५ पर्यंत ५०% करण्याचे उद्दिष्ट.
6. NEP 2020 हे शाश्वत विकासाशी थेट जोडलेले आहे. कारण दर्जेदार शिक्षण हे SDG 4 चे मुख्य उद्दिष्ट आहे. जेव्हा विद्यार्थी कौशल्यांसह बाहेर पडतील, तेव्हा ते देशाच्या आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय विकासात मोलाचे योगदान देतील.

आर्थिक विकासातील उच्च शिक्षणाचे योगदान :

उच्च शिक्षणाचा भारताच्या आर्थिक विकासावर थेट परिणाम होतो. IITs, IIMS आणि इतर संस्थांमधून बाहेर पडलेले विद्यार्थी जागतिक स्तरावर नावाजलेले आहेत. सुंदर पिचई , सत्या नडेला हे IIT शिक्षणाचे फळ आहे. भारताचा IT उद्योग, जो दरवर्षी १५० अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त महसूल मिळवतो, हा पूर्णपणे उच्च शिक्षणावर अवलंबून आहे. यामुळे लाखो तरुणांना रोजगारमिळतो आणि गरिबी कमी होण्यास मदत होते. शिक्षणाच्या प्रत्येक अतिरिक्त वर्षामुळे व्यक्तीच्या उत्पन्नात ८-१०% वाढ होते असे जागतिक बँकेने सांगितले आहे.

सामाजिक न्याय आणि समानता:

भारतात SC, ST, OBC विद्यार्थ्यांसाठी आरक्षण धोरण आहे. यामुळे समाजाच्या वंचित घटकांना उच्च शिक्षणाची संधी मिळते. 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' योजनेमुळे मुलींच्या शिक्षणात लक्षणीय वाढ झाली आहे. आज उच्च शिक्षणात महिलांचा सहभाग ४९% वर पोहोचला आहे, जे खूप मोठे यश आहे. शिकलेली महिला

आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होते, बालविवाह कमी होतो आणि पुढील पिढ्यांचे जीवनमान उंचावते.

संशोधन, विज्ञान आणि तंत्रज्ञान :

भारतीय उच्च शिक्षण संस्थांनी संशोधन आणि तंत्रज्ञानात जगाला अनेक महत्त्वाच्या गोष्टी दिल्या आहेत:

- ISRO: चांद्रयान-३ च्या यशाने भारताने चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरणारा जगातील पहिला देश बनला. हे IIT, NIT आणि इतर संस्थांमधून तयार झालेल्या शास्त्रज्ञांचे योगदान आहे.
- DRDO: संरक्षण क्षेत्रात स्वदेशी तंत्रज्ञान विकसित करण्यात उच्च शिक्षण संस्थांची मोठी भूमिका आहे. 'आत्मनिर्भर भारत' हे स्वप्न DRDO च्या संशोधनातून साकार होत आहे.
- ICAR: Indian Council of Agricultural Research ने उच्च उत्पादन देणाऱ्या बियाणांचा शोध लावला. यामुळे हरित क्रांती शक्य झाली आणि भारत अन्नधान्यात स्वयंपूर्ण झाला.
- AIIMS: All India Institute of Medical Sciences सारख्या संस्थांनी आरोग्य सेवा सुधारण्यात आणि COVID-19 लसीच्या संशोधनात मोठे योगदान दिले.

पर्यावरण रक्षण आणि हरित विकास :

भारतात IIT आणि इतर संस्थांमध्ये पर्यावरण अभियांत्रिकी, नवीकरणीय ऊर्जा आणि हवामान बदल यांवर मोठ्या प्रमाणात संशोधन होत आहे. भारताने 'National Solar Mission' द्वारे सौरऊर्जेत जगात आघाडी घेतली आहे. भारताचे सौरऊर्जेचे उत्पादन आता ७० GW पेक्षा जास्त झाले आहे. हे उच्च शिक्षण संस्थांच्या संशोधन आणि तंत्रज्ञानाचेच फळ आहे. याशिवाय इलेक्ट्रिक वाहने, जैवइंधन आणि पवनऊर्जा यांमधील संशोधनही उच्च शिक्षण संस्थांमधूनच होत आहे.

डिजिटल शिक्षण आणि भविष्यातील दिशा:

भारत सरकारने SWAYAM आणि NPTEL सारखे ऑनलाइन शिक्षण व्यासपीठ सुरु केले आहेत. यामुळे दुर्गम भागातील विद्यार्थ्यांनाही उच्च दर्जाचे शिक्षण घरबसल्या मिळते. PM e-VIDYA योजनेतून डिजिटल शिक्षणाचा विस्तार होत आहे. डिजिटल इंडिया मोहिमेमुळे इंटरनेटची उपलब्धता वाढली असून हे शाश्वत विकासाला मोठी चालना देत आहे.

संशोधनातील प्रमुख निष्कर्ष:

१. भारतातील उच्च शिक्षणाचा थेट संबंध आर्थिक विकासाशी आहे IT उद्योग, ISRO, DRDO हे याचे ठळक पुरावे आहेत.
२. महिलांचा उच्च शिक्षणातील ४९% सहभाग हा सामाजिक समानतेच्या दिशेने एक मोठे पाऊल आहे.
३. NEP 2020 हे भारताच्या उच्च शिक्षणाला शाश्वत विकासाशी जोडणारे एक दूरदर्शी धोरण आहे.
४. उच्च शिक्षण संस्थांमधील संशोधनामुळे भारत पर्यावरण रक्षणातही प्रगती करत आहे.
५. GER वाढवणे हे भारताच्या शाश्वत विकासाच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाचे काम आहे.

निष्कर्ष :

या संशोधनातून असे दिसून येते की भारतातील उच्च शिक्षण आणि शाश्वत विकास यांचा घनिष्ठ संबंध

आहे. ISRO चे चांद्रयान-३, IT क्षेत्रातील यश, सौरऊर्जेत आघाडी हे सर्व उच्च शिक्षणाचेच फळ आहे. मांडलेले मुख्य गृहीतक 'उच्च शिक्षणाचा प्रसार जितका जास्त होईल, तितका शाश्वत विकासाचा वेग अधिक वाढेल' - हे या अभ्यासातून सिद्ध होते. भारताची तरुण लोकसंख्या ही खरी ताकद आहे. त्यांना दर्जेदार उच्च शिक्षण दिले तर भारत 'विकसित भारत २०४७' चे स्वप्न नक्कीच पूर्ण करेल.

संदर्भग्रंथ सूची:

१. भारत सरकार (2020). राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० शिक्षण मंत्रालय, नवी दिल्ली.

२. AISHE (2021-22). All India Survey on Higher Education Report. Ministry of Education, Government of India.

३. NITI Aayog (2021). SDG India Index & Dashboard 2020-21. Gov. of India.

४. World Bank (2021). World Development Report 2021: Data for Better Lives. & UGC (2022). Annual Report 2021-22. University Grants Commission, New Delhi.

५. United Nations (2015). Transforming our world: The 2030 Agenda for Sustainable Development Brundtland, G. H. (1987). Our Common Future. Oxford University Press

ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

March - 2026
Vol. 15 - No. S1

उच्च शिक्षण व पर्यावरण संवर्धन

प्रा. कोटकर कविता अशोक

सहा. प्रा. लोकनेते बाळासाहेब थोरात कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय तळेगाव दिघे, ता. संगमनेर जि. आहिल्यानगर.

***Corresponding Author:* प्रा. कोटकर कविता अशोक**

DOI - 10.5281/zenodo.19491828

प्रस्तावना:

उच्च शिक्षणाचा महत्त्वाचा उद्देश हा असतो की विद्यार्थ्यांचा बौद्धिक व सामाजिक विकास, वैज्ञानिक विकास व विद्यार्थ्यांमध्ये सृजनशीलतेचा विकास हा असतो. भारताच्या राज्यघटनेनुसार लोकशाही न्याय सामाजिक जाणीव असणारे स्वातंत्र, समता व वधुत्व या मूल्यांची जोपासना करणारे नागरिक उच्च शिक्षणातून तयार होतात विद्यार्थ्यांमध्ये वरील सर्व मूल्यांची जोपासना ही उच्च शिक्षणाच्या माध्यमातून घडवून आणली जाते अलीकडच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार उच्च शिक्षण हे बहुशाखीय असले पाहिजे त्या शिक्षणामधून विद्यार्थ्यांमध्ये कला, व्यवसाय क्षमता व कौशल्य यांचा विकास झाला पाहिजे. जागतिक दृष्टिकोनातून विचार केला तर कोणत्याही राष्ट्राची प्रगती ही उच्च शिक्षणामुळे झालेली दिसून येते. प्राचीन काळामध्ये विविध प्रकारच्या उच्च शिक्षण संस्थांमधून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते यामध्ये वैदिक शिक्षण पद्धती बौद्धिक शिक्षण पद्धती जैन शिक्षण पद्धती मुस्लिम शिक्षण पद्धती इत्यादी. उच्च शिक्षणाच्या माध्यमातून पर्यावरण शिक्षण हा विषय अभ्यासक्रमामध्ये अनिवार्य करण्यात आलेला आहे. याच्या माध्यमातून पर्यावरणामध्ये होणारा बिघाड व नैसर्गिक चक्र मध्ये होणारे बदल या दृष्टीने अभ्यास करण्यात साठी हा विषय अनिवार्य करण्यात आलेला आहे या विषयाच्या माध्यमातून पर्यावरणाच्या दृष्टीने जनजागृती घडवून आणलेली जाते. पर्यावरण संवर्धन करणे ही काळाची गरज निर्माण झाली आहे या दृष्टीने अनेक प्रकारच्या मोहिमाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धन घडून आणण्यासाठी जनजागृती केली जाते. पर्यावरणामध्ये होणारे बिगड बघता या प्रकारचे कार्यक्रम राबवणे उच्च शिक्षणामध्ये गरजेचे झाले आहे. जीवसृष्टी ज्या विशिष्ट परिसरात व नैसर्गिक परीस्थितीत जगते त्या सर्व घटकांचा समावेश पर्यावरण या घटकामध्ये योतो. पथ्वीवरील जीवसृष्टीची निर्मीती,वाढ, विकास या सर्व गोष्टी पर्यावरणानुसार होत असतात. जीवसृष्टीमधील प्रत्येक घटकांचे आस्तित्व हे त्या-त्या पर्यावरणानुसार वैशिष्ट्यपूर्ण आहे. सजीवसृष्टीस आवश्यक असलेल्या नैसर्गिक घटक योग्य त्या प्रमाणात मिळाले तर त्यांचे जीवनचक सुरळीत चालते परंतु कधी कधी नैसर्गिक घटकांमध्ये बिघाड घडून येतो आणि नैसर्गिक चक्र बिघडते. या नैसर्गिक चक्रामध्ये बिघाड घडवून आणणारा महत्त्वाचा घटक म्हणजे पर्यावरणीय प्रदुषण होय.

मानव व निसर्गाचे एक अतूट नाते आहे ते परस्परांवर अवलंबून असतात. मानव पर्यावरणात उपलब्ध असलेला साधनसंपत्तीचा वापर करून आपला विकास घडवून आणत असतो. जेव्हां पर्यावरण व निसर्गाचे नाते हे नैसर्गिक समतोल राखून असते तेव्हा पर्यावरण संतुलित असते. परंतू जेव्हा मानव स्वतःच्या विकासासाठी पर्यावरणातील अतिरिक्त घटकांचा वापर करत असतो तेव्हां पर्यावरणामध्ये प्रदुषण घडून येते गेल्या काही दशकात मानव त्याच्या व्यवसायामुळे नैसर्गिक समतोल मोठया प्रमाणावर असंतुलित करत आहे. वाढती लोकसंख्या व

त्याच्या वाढणाऱ्या गरजा यामुळे नैसर्गिक साधन संपत्तीवर ताण पडतो, त्यामुळे आपूऱ्या गरजा भागविण्यासाठी पर्यायी साधनांचा वापर केला जातो या अतिरीक्त घटकांमुळे पर्यावरणीय प्रदुषण घडून येते.याच पर्यावरणीय घटकांन संदर्भात माहिती उच्च शिक्षणामधून दिले जाते.

संशोधनाची उद्दिष्टे:

प्रस्तुत संशोधनासाठी पुढील उद्दिष्टे मांडण्यात आलेली आहे उच्च शिक्षण व पर्यावरण संवर्धनासाठी वापरण्यात येणाऱ्या विविध उपायोजना.

गृहीतके:

उच्च शिक्षणाच्या माध्यमातून वापरात येणाऱ्या नवनवीन तंत्रज्ञानामुळे, विविध योजनांमुळे पर्यावरण संवर्धन करता येऊ शकते व उत्कृष्ट जीवनशैली अनुभवता येते.

संशोधन पद्धती:

प्रस्तुत शोधनिबंधासाठी माहिती संकलित करण्यासाठी दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे यासाठी विविध मासिके, संदर्भ पुस्तके ,सांकेतिक स्थळे त्यांचा आधार घेण्यात आला आहे.

पर्यावरण संवर्धन आपली सामाजिक जबाबदारी:

मानवाच्या अस्तित्वापासून मानव आणि पर्यावरण यांच्या परस्पर संबंध आहे पृथ्वीच्या निर्मितीनंतरही मानव पृथ्वीवर परस्कार राहिला पृथ्वीवर मानवाने बुद्धिमत्ता स्मृती काल्पनिक क्षमता इत्यादी पात्रांच्या मदतीने इतर प्राण्यांपेक्षा आपली श्रेष्ठता सिद्ध केले. मानवाने निसर्गावर वर्चस्व प्रस्थापित केले मानवाने सर्व नैसर्गिक साधनांचा वापर केला. समाधानकारक जीवन जगण्याच्या प्रयत्नात मानव शक्य निसर्गातील संसाधने हिसकावून घेण्याचे काम करत राहिला आणि त्यामुळे समस्यांमध्ये वाढ झाली या संपूर्ण परिस्थितीवरून आपण हे समजून घेऊ शकतो की पर्यावरण संतुलन राखण्यात मानवाची भूमिका महत्त्वाची आहे जर मानवाने पर्यावरणाचा समतोल बिघडला असेल तर केवळ मानवच निसर्गाचे जतन आणि गुणवत्ता सुधारू शकतो. मानव आपला आर्थिक विकास करत असताना पर्यावरणाकडे दुर्लक्ष केल्याने पर्यावरण संतुलन बिघडत आहे. हे आपल्याला वेगवेगळ्या पर्यावरणीय घटकांमधून दिसून येते त्याची गंभीर परिणाम सजीव सृष्टीवर होताना दिसूतो त्यामुळे पर्यावरणाच्या प्रश्नाकडे गांभीर्याने बघण्याची गरज निर्माण झाली आहे. संपूर्ण जग पर्यावरणाकडे गांभीर्याने बघू लागले आहे. पर्यावरणीय समस्यांचे निर्मूलन करण्यासाठी संपूर्ण जग एकत्रित येऊन पर्यावरणीय संतुलन स्थापित करण्याचा प्रयत्न करत आहे. त्यात भारत देश देखील पुढाकार घेत आहे. त्याकरता भारतातील पर्यावरणीय समस्यांकडे दुर्लक्ष न करता पर्यावरणाचे संवर्धन व संरक्षण व्हावे यासाठी वेगवेगळे कायदे केलेले आढळतात त्यातील काही कायदे पुढील प्रमाणे.

पर्यावरण संरक्षण विषयक कायदे:

पर्यावरण संरक्षण कायदा -१९८६: पर्यावरणाचे संतुलन दिवसेंदिवस ढासाळत चाललेले दिसते. हे संतुलन पुन्हा साधण्यासाठी १९७२ साली स्टॉक होम येथे झालेल्या परिषदेत १३० राष्ट्रांनी सहभाग घेऊन एक जाहीरनामा प्रसिद्ध केला. या जाहीरनाम्यातील तत्त्वानुसार प्रत्येक देशाने वनस्पती व प्राणी जीवनाचे रक्षण करणे आवश्यक आहे. असा हा कायदा तयार करावा असे सुचविण्यात आले. वनस्पती व प्राणी तसेच विनाशी साधन संपत्ती जंगले व मानवी आरोग्य यांचे संरक्षण व संवर्धन करणे हे या

जाहीरनाम्याचे प्रमुख उद्दिष्टे होती. भारतात १९८६ साली पर्यावरण संरक्षणासाठी पर्यावरण संरक्षण कायदा तयार करण्यात आला. या संरक्षण कायद्याची प्रमुख उद्दिष्टे ही होती की पर्यावरणाला घातक ठरणाऱ्या घटकांवर नियंत्रण ठेवून पर्यावरणाचे रक्षण करणे. पर्यावरणाचा अभ्यास करणे. पर्यावरणातील घटकांचे नियोजन आणि सुरक्षितता निर्माण करणे. वनस्पती, प्राणी तसेच वन्य जीवनाच्या संरक्षणासाठी जाहीर नामा तयार करणे. पर्यावरणाचे रक्षण आणि संवर्धन करण्याच्या उद्देशाने वरील पर्यावरण संरक्षण कायदा करण्यात आला. पर्यावरण संरक्षण कायद्याचे उल्लंघन करण्यास शिक्षेची तरतूद करण्यात आली. पर्यावरण संरक्षण कायद्याचा भंग केल्यास, भंग करणाऱ्या व्यक्तीस पाच वर्षापर्यंत तुरुंगवास व एक लाख रुपये दंड आकारला जातो.

हवा प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण कायदा -१९८१: स्वातंत्र प्राप्तीनंतर भारतात औद्योगीकरणामुळे तसेच नागरिकांनाचा वेग प्रचंड प्रमाणात वाढल्यामुळे मोठे कारखाने उभे राहिले. त्याचबरोबर मोठमोठ्या शहरांचा आढाव्य विस्तार झाला. त्यामुळे हवा प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढले. हवेची गुणवत्ता खालवली त्यामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या. प्रदूषणाला आळा घालण्यासाठी व हवेचा दर्जा उत्तम ठेवण्यासाठी हवा प्रदूषण नियंत्रण करण्यासाठी भारतात १९८१ मध्ये हवा प्रदूषण नियंत्रण कायदा संमत करण्यात आला. या कायद्याचे मुख्य उद्देश म्हणजे हवा प्रदूषण रोखणे, नियंत्रित करणे किंवा थांबवण्याची तरतूद करणे, हवा प्रदूषणाच्या नियंत्रणासाठी केंद्र व राज्य सरकारच्या मंडळाचे स्थापनेची तरतूद करणे. केंद्र व राज्य मंडळांना अधिकार बहाल करण्याची व त्या संबंधी कामे वाटण्याची तरतूद करणे. हवेचे प्रमाण आणि दर्जा राखण्यासाठी नियम तयार करणे इत्यादी. हवा प्रदूषण नियंत्रण कायद्याचे उल्लंघन केल्यास प्रदूषण करणाऱ्यास दंड किंवा शिक्षा केली जाते.

जल प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण कायदा- १९७४: स्वातंत्रप्राप्तीनंतर भारतात नागरिकरण मोठ्या प्रमाणात झाले. ग्रामीण भागातील लोक शहरी भागाकडे प्रचंड प्रमाणात स्थलांतरित झाल्याने शहरात औद्योगीकरण, त्याचबरोबर नागरिकांनाच्या मोठ्या समस्या निर्माण झाल्या. त्यात हरितक्रांतीने कृषी क्षेत्रात भरभरून कामगिरी केली. मात्र त्यातूनच जलप्रदूषण मोठ्या प्रमाणात होऊ लागले. त्यामुळे जल प्रदूषण रोखणे व त्यावर नियंत्रण ठेवणे व सर्व पाणी प्रदूषणापासून सुरक्षित ठेवणे यासाठी प्रदूषण नियंत्रण कायदा १९७४ मध्ये सहमत करण्यात आला. या कायद्यामध्ये केंद्रीय जल प्रदूषण नियंत्रण मंडळ तसेच प्रदूषण नियंत्रणासाठी राज्य मंडळाची स्थापना करण्याची तरतूद करण्यात आली. जल प्रदूषण नियम नियंत्रण कायद्याचे मुख्य उद्देश हा होता, की जल प्रदूषणास प्रतिबंध करणे किंवा नियंत्रण करणे पाण्याची गुणवत्ता टिकवणे व त्यात वाढ करणे. जल प्रदूषण प्रतिबंध नियंत्रण करण्यासाठी मंडळाची स्थापना करणे. अशा मंडळास आपले कर्तव्य पार पाडता यावी यासाठी भरपूर अधिकार देणे इत्यादी. जल प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण कायद्याचे उल्लंघन केल्यास तीन महिन्यापर्यंत तुंरुगवास व दहाहजार रुपये दंड आकारला जातो.

वन्यजीव संरक्षण कायदा -१९७२: भारतात वेगवेगळ्या कारणासाठी मोठ्या प्रमाणात जंगल तोड केल्याने जंगलांचे प्रमाण कमी झाले आहे. त्यामुळे वन्य प्राण्यांचे नैसर्गिक अधिवास नष्ट होत आहे. याशिवाय वन्य प्राण्यांचे शिकार मोठ्या प्रमाणात झाल्यामुळे अनेक वन्यजीवांच्या जाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे मनुष्य प्राण्याप्रमाणेच वन्यजीवांनाही या भूतलावर योग्य प्रकारे

जगता यावे म्हणून १९७२ मध्ये वन्यजीव संरक्षण कायदा तयार करण्यात आला. वन्यजीव संरक्षण कायदा तयार करण्याचा मुख्य उद्देश हा होता की वन्यजीवांचे रक्षण करणे, वन्यजीव प्राण्यांची शिकार करण्यास प्रतिबंध करणे, वन्यजीव प्राण्यांचा व्यापार थांबवणे, वन्यजीवांसाठी सुरक्षित क्षेत्र निर्माण करणे. वन्यजीव संरक्षण कायद्याचे भंग करणाऱ्यास तीन महिन्यापर्यंत शिक्षा व २५ हजार रुपये दंड केला जातो.

जंगल संवर्धन कायदा-१९८०: वनसंवर्धन कायदा हा ऑक्टोबर १९८० मध्ये तयार करण्यात आला. या कायद्यामध्ये जंगलाचे संरक्षण व संवर्धन करणे हा कायद्या तयार करण्याचा प्रमुख हेतू होता वनसंवर्धन कायद्याचे उल्लंघन केल्यास उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीस पंधरा दिवस तुरुंगवासाची शिक्षा ठोठवण्यात येते.

समारोप:

उच्च शिक्षणामध्ये पर्यावरण या विषयाला अनन्यसाधारण असे महत्त्व प्राप्त झाले आहे कारण पर्यावरणामध्ये होणारे बदल, प्रदूषण यामुळे सजीव सृष्टीवर होणारा परिणाम याचा अभ्यास करणे गरजेचे ठरत आहे. जर पर्यावरण प्रदूषित होतच असेल तर मानवाला आपली जीवनशैली बदलून घेणे गरजेचे आहे . जर प्रदूषण आटोक्यात आले नाहीतर पर्यावरण प्रदूषणाविषयी जनजागृती करणे काळाची गरज निर्माण झाली आहे.

संदर्भ:

१. पर्यावरण अध्ययन- डॉ.पोपट कुदनर, डॉ. शैलेश निकम
२. पर्यावरणीय भूगोल- डॉ. आर ई. नजन, डॉ. जी. के. चव्हाण
३. आपत्ती व्यवस्थापनाचा भूगोल- डॉ. अर्जुन मुसमाडे, डॉ. ज्योतीराम मोरे
४. Wikipedia, Google.

ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

March - 2026
Vol. 15 - No. S1

उच्च शिक्षणातून मूल्यांचे संवर्धन ही काळाची गरज

प्रा. सचिन भाऊसाहेब वाकचौरे

सहा. प्रा. प्रागतिक शिक्षण संस्थेचे, नूतन कला महाविद्यालय, राजापूर, ता.संगमनेर

Corresponding Author: प्रा. सचिन भाऊसाहेब वाकचौरे

DOI - 10.5281/zenodo.19491848

प्रस्तावना:

शिक्षण हे मानवी जीवनातील सर्वांगीण विकासासाठीचे महत्त्वपूर्ण साधन मानले जाते. शिक्षणामुळे केवळ ज्ञानाची प्राप्ती होत नाही तर व्यक्तीच्या विचारसरणी, आचार-विचार, सामाजिक जाणीवा आणि नैतिक मूल्यांचा विकास होतो. विशेषतः उच्च शिक्षणाच्या माध्यमातून व्यक्तीला जीवनातील विविध क्षेत्रांमध्ये सर्वांगिण प्रगती करण्याची संधी मिळते. परंतु आजच्या वेगवान आणि स्पर्धात्मक युगात शिक्षणाच्या प्रक्रियेत नैतिक मूल्यांचे महत्त्व मोठ्या प्रमाणात कमी होताना दिसते. त्यामुळे उच्च शिक्षणासोबत मूल्यसंवर्धनाची गरज अधिक वाढते आहे.

मूल्यसंवर्धन म्हणजे व्यक्तीमध्ये नैतिक, सामाजिक आणि मानवी मूल्यांचा विकास होणे. सत्य, प्रामाणिकपणा, सहकार्य, सहिष्णुता, समता, जबाबदारी आणि मानवतेची भावना यांसारखी मूल्ये देशाच्या समाजाच्या प्रगतीसाठी अत्यंत आवश्यक आहेत. उच्च शिक्षण संस्थांनी विद्यार्थ्यांना केवळ तांत्रिक आणि व्यावसायिक ज्ञान देणे पुरेसे नसून त्यांच्यामध्ये मूल्याधारित दृष्टिकोन व स्वभाव निर्माण करणे देखील आवश्यक आहे.

आजच्या काळात तंत्रज्ञानाची झपाट्याने वाढ, जागतिकीकरण, सामाजिक बदल आणि आर्थिक स्पर्धा यांमुळे समाजात विविध प्रकारची आव्हाने निर्माण होत आहेत. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांमध्ये योग्य नैतिक मूल्ये विकसित करणे अत्यंत गरजेचे ठरते. त्यामुळे उच्च शिक्षण आणि मूल्यसंवर्धन यांचा परस्पर संबंध अभ्यासणे अत्यंत आवश्यक आहे. या संशोधन निबंधात उच्च शिक्षणाचे महत्त्व, मूल्यसंवर्धनाची गरज, उच्च शिक्षण संस्थांची भूमिका, तसेच स्पुटनिक काळातील आव्हाने आणि त्यावरील उपाययोजना यांचा सविस्तर विचार करण्यात येणार आहे.

१) उच्च शिक्षणाची संकल्पना:

उच्च शिक्षण म्हणजे माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शिक्षणानंतर दिले जाणारे शिक्षण होय. यामध्ये पदवी, पदव्युत्तर शिक्षण, संशोधन, तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षणाचा समावेश होतो. विद्यापीठे, महाविद्यालये आणि संशोधन संस्था या माध्यमातून उच्च शिक्षण दिले जाते.

उच्च शिक्षणाचा मुळ उद्देश विद्यार्थ्यांना सखोल ज्ञान प्रदाण करणे, संशोधनाची प्रेरणा देणे आणि समाजासाठी सक्षम मनुष्यबळ तयार करणे हा आहे. उच्च शिक्षणामुळे विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता, विश्लेषणात्मक विचारशक्ती आणि सर्जनशीलता विकसित होते.

आजच्या जागतिक युगात उच्च शिक्षणाचे महत्त्व अधिक वाढले आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, उद्योग, आरोग्य, प्रशासन आणि सामाजिक क्षेत्रांमध्ये कार्य करण्यासाठी उच्च शिक्षण अत्यावश्यक झाले आहे.

२) मूल्यांची संकल्पना:

मूल्ये ही समाजाने मान्य केलेले नैतिक तत्त्वे आणि आचारसंहिता होय. मूल्ये व्यक्तीच्या वर्तनाला दिशा देतात आणि समाजात योग्य-अयोग्य यामधील फरक समजण्यास मदत करतात.

मूल्यांचे काही प्रकार पुढीलप्रमाणे आहेत:

१) नैतिक मूल्ये: सत्य, प्रामाणिकपणा, न्याय, प्रामाणिकता.

२) सामाजिक मूल्ये: सहकार्य, सहिष्णुता, बंधुता, समानता.

३) राष्ट्रीय मूल्ये: देशभक्ती, सामाजिक जबाबदारी.

४) मानवी मूल्ये: दया, करुणा, मानवता.

मूल्ये व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा पाया असतात. योग्य मूल्यांच्या आधारेच समाजात शांतता, सहकार्य आणि प्रगती साध्य होते.

५) मूल्यसंवर्धनाची गरज: आजच्या आधुनिक समाजात मूल्यसंवर्धनाची गरज अत्यंत महत्त्वाची झाली आहे. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे जीवन सुलभ झाले असले तरी सामाजिक आणि नैतिक समस्याही वाढताना दिसतात.

मूल्यसंवर्धनाची गरज पुढील कारणांमुळे निर्माण होते:

१) सामाजिक बदल: समाजातील जीवनशैलीत मोठे बदल झाले आहेत. स्पर्धा आणि भौतिकवाद वाढल्यामुळे नैतिक मूल्यांकडे दुर्लक्ष होत आहे.

२) नैतिक अध:पतन: भ्रष्टाचार, हिंसा, असहिष्णुता आणि सामाजिक असमानता यांसारख्या समस्या वाढताना दिसतात.

३) व्यक्तिमत्त्व विकास: मूल्यसंवर्धनामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, जबाबदारी आणि सकारात्मक दृष्टिकोन विकसित होतो.

४) सामाजिक ऐक्य: मूल्यांमुळे समाजातील लोकांमध्ये परस्पर सहकार्य आणि समजूतदारपणा वाढतो.

५) उच्च शिक्षण आणि मूल्यसंवर्धन यांचा संबंध: उच्च शिक्षण आणि मूल्यसंवर्धन यांचा घनिष्ठ संबंध आहे. शिक्षणाचा उद्देश केवळ ज्ञान देणे नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास करणे हा आहे.

उच्च शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये पुढील मूल्यांचा विकास होऊ शकतो:

अ) सामाजिक जबाबदारी,

ब) लोकशाही मूल्ये,

क) मानवी हक्कांची जाणीव,

ड) पर्यावरणाबद्दल जागरूकता,

इ) समता आणि सहिष्णुता

उच्च शिक्षण संस्थांनी विद्यार्थ्यांमध्ये या मूल्यांची जाणीव निर्माण करणे आवश्यक आहे.

उच्च शिक्षण संस्थांची भूमिका पुढील प्रमाणे:

उच्च शिक्षण संस्थांनी मूल्यसंवर्धनासाठी पुढील प्रकारे योगदान देऊ शकतात:

१) मूल्याधारित अभ्यासक्रम: अभ्यासक्रमामध्ये नैतिक आणि सामाजिक विषयांचा समावेश करणे आवश्यक आहे.

२) शिक्षकांची भूमिका: शिक्षक हे विद्यार्थ्यांसाठी आदर्श असतात. त्यांच्या वर्तनातून विद्यार्थ्यांमध्ये योग्य मूल्ये विकसित होतात.

३) सहशालेय उपक्रम: समाजसेवा, स्वयंसेवी कार्य, पर्यावरण संरक्षण उपक्रम यांमधून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीवा वाढतात.

४) लोकशाही वातावरण: महाविद्यालयांमध्ये खुल्या चर्चेला आणि मतभेदांना आदर देणारे वातावरण असावे.

आधुनिक काळातील आव्हाने पुढील प्रमाणे:

उच्च शिक्षण आणि मूल्यसंवर्धनाच्या प्रक्रियेत काही आव्हाने निर्माण झाली आहेत.

१) भौतिकवादी दृष्टिकोन: आजच्या समाजात आर्थिक यशाला जास्त महत्त्व दिले जाते.

२) तंत्रज्ञानाचा अति वापर: डिजिटल माध्यमांचा अति वापर विद्यार्थ्यांच्या सामाजिक संवादावर परिणाम करतो.

३) स्पर्धात्मक शिक्षण प्रणाली: फक्त गुण आणि करिअर यांवर भर दिल्यामुळे मूल्य शिक्षणाकडे दुर्लक्ष होते.

४) सामाजिक असमानता: समाजातील आर्थिक आणि सामाजिक विषमता शिक्षणाच्या संधींवर परिणाम करते.

उपाययोजना:

या आव्हानांवर मात करण्यासाठी पुढील उपाययोजना करता येतील:

१) शिक्षणामध्ये मूल्याधारित कार्यक्रमांचा समावेश करणे.

२) शिक्षकांचे मूल्य शिक्षणाबाबत प्रशिक्षण.

३) विद्यार्थ्यांना समाजसेवा उपक्रमांमध्ये सहभागी करणे.

४) पर्यावरण आणि सामाजिक जबाबदारीबाबत जागरूकता निर्माण करणे.

५) शिक्षणामध्ये तंत्रज्ञानाचा सकारात्मक वापर करणे.

निष्कर्ष:

उच्च शिक्षण हे समाजाच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचे गरज आणि साधन आहे. परंतु केवळ ज्ञान आणि कौशल्ये देणे पुरेसे नाही मिळत नाही. विद्यार्थ्यांमध्ये नैतिक, सामाजिक आणि मानवी मूल्यांचा विकास करणे देखील आवश्यक देखिल आहे.

मूल्यसंवर्धनामुळे विद्यार्थ्यांमध्ये जबाबदार नागरिकत्व, सामाजिक समज आणि मानवतेची भावना विकसित होते. त्यामुळे उच्च शिक्षण संस्थांनी मूल्याधारित शिक्षणावर विशेष भर देणे आवश्यक आहे.

भविष्यातील समाज अधिक शांततापूर्ण, समतोल आणि प्रगत बनवण्यासाठी उच्च शिक्षण आणि मूल्यसंवर्धन यांचा समन्वय अत्यंत आवश्यक आणि गरजेचा आहे.

संदर्भ:

१) मूल्य शिक्षण - Success Publications

२) शिक्षा तथा मानव मूल्य (B.S. Dagar): हरियाणा साहित्य अकादमी प्रकाशन - विष्णू शर्मा

३) History and Development of Elementary Education in India - D.D. Aggarwal

४) विविध वृत्तपत्रे

ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

March - 2026
Vol. 15 - No. S1

शाश्वत विकासामध्ये उच्च शिक्षणाच्या भूमिकेचा चिकित्सक अभ्यास

महेश बाजीराव हजारे

संशोधक, संशोधन केंद्र, रयत शिक्षण संस्थेचे, चंद्ररूप डाकले जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर, जिल्हा. अहिल्यानगर.

Corresponding Author: ***महेश बाजीराव हजारे***

DOI - 10.5281/zenodo.19491869

सारांश:

शाश्वत विकास ही संकल्पना आर्थिक प्रगती, सामाजिक न्याय आणि पर्यावरणीय संतुलन यांचा समन्वय साधणारी व्यापक दृष्टीकोनात्मक चौकट आहे. २१व्या शतकात हवामान बदल, संसाधनांची कमतरता, सामाजिक विषमता आणि तांत्रिक परिवर्तन या आव्हानांच्या पार्श्वभूमीवर उच्च शिक्षण संस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते. उच्च शिक्षण केवळ ज्ञाननिर्मिती व कौशल्यविकासापुरते मर्यादित नसून ते मूल्याधिष्ठित नेतृत्व, सामाजिक उत्तरदायित्व, संशोधनाधारित उपाययोजना आणि समुदाय सहभाग यांना चालना देते. या संशोधन लेखामध्ये शाश्वत विकासामध्ये उच्च शिक्षणाच्या भूमिकेचा चिकित्सक अभ्यास करण्यात आला आहे. अभ्यासासाठी दुय्यम स्रोतांवर आधारित विश्लेषणात्मक पद्धत वापरण्यात आली आहे. साहित्य परीक्षणातून उच्च शिक्षण संस्था शाश्वत अभ्यासक्रम, हरित कॅम्पस उपक्रम, संशोधन व नवोपक्रम, तसेच समाजाभिमुख कार्यक्रमांच्या माध्यमातून शाश्वत विकासाला गती देतात हे स्पष्ट होते. तथापि, धोरणात्मक मर्यादा, निधीअभाव, उद्योग-शिक्षण तफावत आणि अंमलबजावणीतील अडचणी ही आव्हानेही निदर्शनास येतात. निष्कर्षानुसार, शाश्वत विकास साध्य करण्यासाठी उच्च शिक्षण संस्थांनी बहुआयामी, आंतरशाखीय आणि मूल्याधिष्ठित दृष्टिकोन स्वीकारणे आवश्यक आहे.

मुख्य शब्द: शाश्वत विकास, उच्च शिक्षण, पर्यावरणीय शाश्वतता, सामाजिक न्याय, हरित कॅम्पस, कौशल्यविकास.

प्रस्तावना :

शाश्वत विकास ही संकल्पना वर्तमान पिढीच्या गरजा पूर्ण करताना भावी पिढ्यांच्या गरजांवर परिणाम होणार नाही याची खात्री करण्यावर आधारित आहे. औद्योगिकीकरण, नागरीकरण आणि जागतिकीकरणामुळे निर्माण झालेल्या पर्यावरणीय व सामाजिक समस्यांमुळे शाश्वत विकासाची गरज अधोरेखित झाली आहे. उच्च शिक्षण संस्था ज्ञाननिर्मिती, संशोधन, कौशल्यविकास आणि सामाजिक परिवर्तनाचे केंद्रबिंदू असल्याने त्यांची भूमिका अधिक महत्त्वाची ठरते.

उच्च शिक्षणामध्ये मूल्याधारित शिक्षण, आंतरशाखीय अभ्यासक्रम, संशोधनाधारित उपाययोजना आणि समुदाय सहभाग या घटकांद्वारे शाश्वत विकासाला चालना दिली जाऊ शकते. शिक्षणाच्या माध्यमातून पर्यावरणीय जागरूकता, सामाजिक उत्तरदायित्व आणि नैतिक नेतृत्व विकसित होऊ शकते.

संशोधनाची उद्दद्दष्ट्ये:

1. शाश्वत विकासाच्या संदर्भात उच्च शिक्षणाच्या भूमिकेचे विश्लेषण करणे.
2. उच्च शिक्षण संस्थांमधील शाश्वत उपक्रमांचा अभ्यास करणे.
3. शाश्वत विकासाच्या अंमलबजावणीतील आव्हाने ओळखणे.
4. सुधारणा व धोरणात्मक उपाय सुचविणे.

संशोधन गृहीतके:

1. उच्च शिक्षण संस्था शाश्वत विकासाला सकारात्मक व महत्त्वपूर्ण योगदान देतात.
2. उच्च शिक्षण संस्था शाश्वत विकासावर लक्षणीय परिणाम घडवत नाहीत.

संशोधन पध्दती:

सदर संशोधनासाठी विश्लेषणात्मक व वर्णनात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. दुय्यम माहिती स्रोत जसे की संशोधन लेख, शैक्षणिक नियतकालिके, पुस्तके आणि अहवाल यांचा आधार घेतला आहे. माहितीचे तुलनात्मक व चिकित्सक विश्लेषण करून निष्कर्ष मांडले आहेत.

माहिती संकलन :

दुय्यम माहिती संकलनासाठी कृषीविषयक शासकीय अहवाल, कृषी जनगणना, संशोधन लेख, पुस्तके, नियतकालिके तसेच इंटरनेटवरील विश्वसनीय संकेतस्थळांचा आधार घेण्यात आला आहे. या माहितीच्या आधारे कृषी तंत्रज्ञान व शेती उत्पादकतेतील संबंधांचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे.

१. शाश्वत विकासासाठी ज्ञाननिर्मिती:

उच्च शिक्षण संस्था विद्यार्थ्यांना पर्यावरण, अर्थव्यवस्था आणि सामाजिक न्याय याबाबत वैज्ञानिक व तर्कशुद्ध ज्ञान देतात. विविध अभ्यासक्रमांद्वारे शाश्वत विकासाच्या संकल्पना, तत्त्वे आणि उद्दिष्टे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवली जातात. उदाहरणार्थ, पर्यावरणशास्त्र, सामाजिक विज्ञान, व्यवस्थापन आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील अभ्यासक्रम शाश्वत विकासाशी संबंधित ज्ञान देतात. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संरक्षण आणि संसाधनांचा योग्य वापर करण्याची जाणीव निर्माण होते.

२. संशोधन आणि नाविन्यपूर्ण उपाय:

उच्च शिक्षण संस्था संशोधनाच्या माध्यमातून शाश्वत विकासाशी संबंधित समस्यांवर उपाय शोधतात. हवामान बदल, पाणी व्यवस्थापन, ऊर्जा बचत, कचरा व्यवस्थापन आणि जैवविविधता संरक्षण यांसारख्या विषयांवर विद्यापीठांमध्ये मोठ्या प्रमाणात संशोधन केले जाते. या संशोधनातून नवीन तंत्रज्ञान, धोरणे आणि मॉडेल्स विकसित होतात जे समाजाच्या शाश्वत विकासासाठी उपयोगी ठरतात.

३. कौशल्यविकास आणि मानव संसाधन निर्मिती:

शाश्वत विकासासाठी प्रशिक्षित व संवेदनशील मानव संसाधन आवश्यक असते. उच्च शिक्षण संस्था विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व, समस्या सोडविण्याची क्षमता, सामाजिक जबाबदारी आणि पर्यावरणपूरक दृष्टीकोन विकसित करतात. कौशल्याधारित शिक्षणामुळे विद्यार्थी उद्योग, प्रशासन आणि समाजात शाश्वत विकासाचे तत्त्व लागू करू शकतात.

४. समाजजागृती आणि मूल्यनिर्मिती:

उच्च शिक्षण संस्थांद्वारे समाजामध्ये शाश्वत विकासाविषयी जागरूकता निर्माण केली जाते. विविध कार्यशाळा, सेमिनार, परिसंवाद आणि जनजागृती कार्यक्रमांद्वारे विद्यार्थ्यांसह स्थानिक समाजालाही पर्यावरण संरक्षण, ऊर्जा बचत आणि सामाजिक समता याबाबत माहिती दिली जाते. त्यामुळे शाश्वत विकासासाठी

आवश्यक मूल्ये आणि सामाजिक जबाबदारी समाजात रुजते.

५. धोरणनिर्मितीमध्ये योगदान:

उच्च शिक्षण संस्था आणि संशोधक शासनाला धोरणनिर्मितीसाठी मार्गदर्शन करतात. संशोधन अहवाल, सल्लागार समित्या आणि तज्ज्ञ मार्गदर्शनाच्या माध्यमातून सरकारला पर्यावरण, शेती, उद्योग आणि शिक्षण क्षेत्रातील शाश्वत धोरणे तयार करण्यास मदत होते.

चिकित्सक विश्लेषण (Critical Analysis):

उच्च शिक्षणाच्या भूमिकेचे महत्त्व असूनही काही मर्यादा देखील आढळतात.

अभ्यासक्रमातील मर्यादा: अनेक विद्यापीठांच्या अभ्यासक्रमांमध्ये शाश्वत विकासाचा समावेश अजूनही मर्यादित आहे.

संशोधनाचा अभाव: काही संस्थांमध्ये शाश्वत विकासाशी संबंधित संशोधनासाठी पुरेसे आर्थिक आणि तांत्रिक साधनसामग्री उपलब्ध नसते.

व्यवहारात अंमलबजावणी कमी: शाश्वत विकासाचे तत्त्वज्ञान शिकवले जाते, पण कॅम्पस पातळीवर त्याची अंमलबजावणी कमी प्रमाणात दिसते.

समाजाशी मर्यादित संपर्क: अनेक वेळा विद्यापीठातील संशोधन समाजापर्यंत पोहोचत नाही.

या मर्यादांवर मात करण्यासाठी उच्च शिक्षण संस्थांनी अभ्यासक्रमात सुधारणा, संशोधनाला प्रोत्साहन, उद्योग-समाज सहकार्य आणि पर्यावरणपूरक कॅम्पस विकसित करणे आवश्यक आहे.

निष्कर्ष:

शाश्वत विकास साध्य करण्यासाठी उच्च शिक्षण संस्था अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात. ज्ञाननिर्मिती, संशोधन, कौशल्यविकास आणि समाजजागृतीच्या माध्यमातून त्या शाश्वत समाज घडविण्यात योगदान देतात. तथापि, अभ्यासक्रमातील सुधारणा, संशोधनासाठी अधिक निधी आणि समाजाशी प्रभावी संवाद यामुळे उच्च शिक्षणाची भूमिका अधिक प्रभावी होऊ शकते. सदरील अभ्यासातून असे दिसून येते की उच्च शिक्षण संस्था शाश्वत विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. अभ्यासक्रम, संशोधन, कॅम्पस व्यवस्थापन आणि समुदाय सहभाग यांच्या माध्यमातून शाश्वततेचे तत्त्वज्ञान प्रत्यक्षात उतरवले जाते. तथापि, धोरणात्मक मर्यादा, निधीअभाव आणि समन्वयाचा अभाव ही प्रमुख आव्हाने आहेत. शाश्वत विकास साध्य करण्यासाठी उच्च शिक्षण संस्थांनी आंतरशाखीय दृष्टिकोन, नेतृत्व विकास, नवोपक्रम आणि सामाजिक सहभाग वाढविणे आवश्यक आहे.

संदर्भसूची (References):

१. भारत सरकार. (2020). राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 (National Education Policy 2020). नवी दिल्ली : शिक्षण मंत्रालय.

२. विद्यापीठ अनुदान आयोग (UGC). (2021). उच्च शिक्षणामध्ये शाश्वत विकासासाठी मार्गदर्शक तत्त्वे. नवी दिल्ली : UGC.

३. नाईक, जे. पी. (1975). शिक्षण आणि विकास (Education and Development). नवी दिल्ली : ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस.

४. तिलक, जे. बी. जी. (2015). Higher Education in India: In Search of Equality, Quality and Quantity. नवी दिल्ली : Orient BlackSwan.

५. आगरवाल, पी. (2009). Indian Higher Education: Envisioning the Future. नवी दिल्ली : Sage Publications.

६. भारत सरकार – पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय. (2018). भारताचा शाश्वत विकास अहवाल. नवी दिल्ली.

७. नीती आयोग. (2021). भारताचा शाश्वत विकास उद्दिष्टे (SDG) निर्देशांक अहवाल. नवी दिल्ली : नीती आयोग.

८. युनेस्को – महात्मा गांधी शिक्षण संस्था (MGIEP). (2017). शाश्वत विकासासाठी शिक्षण (Education for Sustainable Development). नवी दिल्ली.

९. राधाकृष्णन आयोग. (1948–49). विद्यापीठ शिक्षण आयोगाचा अहवाल. नवी दिल्ली : भारत सरकार.

ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

March - 2026
Vol. 15 - No. S1

उच्च शिक्षणातून पर्यावरण संवर्धन एक अभ्यास

प्रा. चंद्रकांत गोरक्षनाथ हारदे

सहा. प्रा. प्रागतिक शिक्षण संस्थेचे, नूतन कला महाविद्यालय, राजापूर, ता.संगमनेर

***Corresponding Author:* प्रा. चंद्रकांत गोरक्षनाथ हारदे**

DOI - 10.5281/zenodo.19491890

प्रस्तावना:

मानव आणि पर्यावरण यांचे संबंध आदीम काळापासूनच अत्यंत घनिष्ठ आहेत. पृथ्वीवरील सर्व सजीवांचे अस्तित्व पर्यावरणावर अवलंबून असते. परंतु औद्योगिकीकरण, शहरीकरण, लोकसंख्यावाढ आणि तंत्रज्ञानाच्या अतिवापरामुळे पर्यावरणावर मोठा धोका निर्माण झाला आहे. वैश्विक तापमानवाढ, वायू प्रदूषण, जलप्रदूषण, जंगलतोड, हवामान बदल आणि जैवविविधतेचा नाश या समस्या आज जगासमोर गंभीर स्वरूपात निर्माण झाल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व अधिक अधोरेखित होते. पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी समाजातील प्रत्येक व्यक्तीने जागरूक असणे आवश्यक आहे. ही जागरूकता निर्माण करण्यामध्ये शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. विशेषतः उच्च शिक्षण संस्थांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबद्दलची जाणीव आणि जबाबदारी निर्माण केली जाऊ शकते.

उच्च शिक्षण केवळ ज्ञान देण्याचे साधन नसून समाजाच्या विकासासाठी सक्षम आणि जबाबदार नागरिक घडवण्याची प्रक्रिया आहे. पर्यावरण संवर्धनासारख्या महत्त्वाच्या विषयांबाबत विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मिळणे अत्यावश्यक आहे. उच्च शिक्षण संस्थांमध्ये पर्यावरण शिक्षण, संशोधन आणि सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाला प्रोत्साहन दिले जाऊ शकते. या संशोधन निबंधामध्ये उच्च शिक्षण आणि पर्यावरण संवर्धन यांचा परस्पर संबंध, पर्यावरण संवर्धनाची गरज, उच्च शिक्षण संस्थांची भूमिका, तसेच आधुनिक काळातील पर्यावरणीय आव्हाने आणि त्यावरील उपाययोजना यांचा सविस्तर विचार करण्यात येणार आहे.

स्पष्टीकरण:

१) पर्यावरणाची संकल्पना: पर्यावरण म्हणजे मानवाभोवती असलेले नैसर्गिक आणि मानवनिर्मित घटक होय. हवा, पाणी, जमीन, वनस्पती, प्राणी आणि इतर नैसर्गिक संसाधने हे पर्यावरणाचे मुख्य घटक आहेत. पर्यावरण दोन प्रकारचे असते:

नैसर्गिक पर्यावरण: पर्वत, नद्या, समुद्र, जंगल, वन्यजीव इत्यादी.

मानवनिर्मित पर्यावरण: शहर, रस्ते, इमारती, उद्योग इत्यादी.

पर्यावरण मानवी जीवनासाठी अत्यंत आवश्यक आहे. शुद्ध हवा, स्वच्छ पाणी, सुपीक जमीन आणि जैवविविधता यांमुळे पृथ्वीवरील जीवन शक्य होते.

२) पर्यावरण संवर्धनाची संकल्पना: पर्यावरण संवर्धन म्हणजे नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण आणि योग्य व्यवस्थापन करणे होय. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आणि भविष्यातील पिढ्यांसाठी संसाधने टिकवून ठेवण्यासाठी पर्यावरण संवर्धन आवश्यक आहे.

पर्यावरण संवर्धनाचे काही प्रमुख उद्देश पुढीलप्रमाणे आहेत:

अ) नैसर्गिक संसाधनांचा योग्य वापर,

ब) पर्यावरणीय समतोल राखणे,

क) प्रदूषण कमी करणे,

ड) जैवविविधतेचे संरक्षण,

इ) हवामान बदलाचा परिणाम कमी करणे

पर्यावरण संवर्धन हे केवळ सरकार किंवा काही संस्थांची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे.

३) उच्च शिक्षणाची संकल्पना: उच्च शिक्षण म्हणजे माध्यमिक शिक्षणानंतर दिले जाणारे प्रगत शिक्षण होय. विद्यापीठे, महाविद्यालये आणि संशोधन संस्था यांच्या माध्यमातून उच्च शिक्षण दिले जाते.

उच्च शिक्षणाचे मुख्य उद्देश पुढीलप्रमाणे आहेत:

अ) विद्यार्थ्यांना सखोल ज्ञान देणे,

ब) संशोधन आणि नवकल्पनांना प्रोत्साहन देणे,

क) समाजासाठी कुशल मनुष्यबळ तयार करणे,

ड) सामाजिक आणि नैतिक जाणीवा विकसित करणे

इ) उच्च शिक्षणामुळे विद्यार्थ्यांची विचारशक्ती, विश्लेषण क्षमता आणि सामाजिक जबाबदारी विकसित होते.

४) उच्च शिक्षण आणि पर्यावरण संवर्धन यांचा संबंध: उच्च शिक्षण आणि पर्यावरण संवर्धन यांचा घनिष्ठ संबंध आहे. शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना पर्यावरणाचे महत्त्व समजते आणि पर्यावरण संरक्षणासाठी प्रेरणा मिळते.

उच्च शिक्षणाच्या माध्यमातून पुढील गोष्टी साध्य होऊ शकतात:

१) पर्यावरणाबद्दल जागरूकता: विद्यार्थ्यांना पर्यावरणाच्या समस्या आणि त्यांचे परिणाम समजतात.

२) संशोधन आणि नवकल्पना: पर्यावरणाशी संबंधित संशोधनामुळे नवीन उपाययोजना विकसित होतात.

३) सामाजिक सहभाग: विद्यार्थी पर्यावरण संवर्धनासाठी विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी होतात.

४) जबाबदार नागरिकत्व: पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये जबाबदारीची भावना निर्माण होते.

५) उच्च शिक्षण संस्थांची भूमिका:

पर्यावरण संवर्धनासाठी उच्च शिक्षण संस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे:

१) पर्यावरण शिक्षण: अभ्यासक्रमामध्ये पर्यावरण विषयांचा समावेश करणे आवश्यक आहे.

२) संशोधनाला प्रोत्साहन: पर्यावरणीय समस्यांवर संशोधन करून नवीन उपाय शोधणे आवश्यक आहे.

३) हरित कॅम्पस संकल्पना: महाविद्यालये आणि विद्यापीठांनी हरित कॅम्पस विकसित करणे आवश्यक आहे.

४) विद्यार्थी सहभाग: विद्यार्थ्यांना वृक्षारोपण, स्वच्छता मोहीम आणि पर्यावरण जागरूकता कार्यक्रमांमध्ये सहभागी करणे.

आधुनिक पर्यावरणीय आव्हाने:

आजच्या काळात पर्यावरणाशी संबंधित अनेक गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत:

१) हवामान बदल: जागतिक तापमानवाढ ही एक मोठी समस्या आहे.

२) प्रदूषण: वायू, जल आणि मातीचे प्रदूषण वाढत आहे.

३) जंगलतोड: वनक्षेत्र कमी होत असल्यामुळे जैवविविधतेला धोका निर्माण झाला आहे.

४) नैसर्गिक संसाधनांचा अति वापर: पाणी, खनिजे आणि इतर संसाधनांचा अति वापर केला जात आहे.

उपाययोजना:

पर्यावरण संवर्धनासाठी पुढील उपाययोजना करता येतील:

- पर्यावरण शिक्षणाला प्राधान्य देणे
- वृक्षारोपण कार्यक्रम राबवणे
- प्रदूषण नियंत्रणासाठी कठोर उपाययोजना करणे
- अक्षय ऊर्जा स्रोतांचा वापर वाढवणे
- विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण करणे

निष्कर्ष:

पर्यावरण संवर्धन हे मानवाच्या अस्तित्वासाठी अत्यंत गरजेचे आहे. आजच्या काळात पर्यावरणीय समस्या गंभीर स्वरूप धारण करत आहेत. त्यामुळे पर्यावरण संरक्षणासाठी समाजातील सर्व घटकांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे. उच्च शिक्षण संस्थांनी पर्यावरण शिक्षण, संशोधन आणि सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनासाठी महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकतात. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबद्दलची जाणीव आणि जबाबदारी निर्माण केल्यास भविष्यात पर्यावरणाचे संरक्षण अधिक प्रभावीपणे करता येईल व धोके टाळता येईल. म्हणूनच उच्च शिक्षण आणि पर्यावरण संवर्धन यांचा समन्वय साधणे हे आजच्या काळाची गरज आहे.

संदर्भ:

१) Environment Education - Prof. (Dr.) Popat kudnar
२) पर्यावरण शिक्षण - प्रा. नीला पाथरे
३) पर्यावरण जागृती - डॉ. राजकुमार पवळे
४) विविध वृत्तपत्रे

ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

March - 2026
Vol. 15 - No. S1

उच्च शिक्षणांतर्गत मराठी साहित्याचा संदर्भ घेऊन शाश्वत विकासाकडे होणारी वाटचाल

प्रा. प्रियंका देविदास हाके

रमेश फिरोदिया कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, साकुर.

Corresponding Author: ***प्रा. प्रियंका देविदास हाके***

DOI - 10.5281/zenodo.19491937

सारांश:

प्रस्तुत शोधनिबंधात संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास उद्दिष्टांच्या (Sustainable Development Goals) पूर्ततेमध्ये मराठी साहित्याने दिलेल्या योगदानाचा मागोवा घेण्यात आला आहे. मराठी साहित्याचा प्रवास संत साहित्यातील 'पसायदान' आणि 'वृक्षवल्ली' या संकल्पनांपासून ते आधुनिक साहित्यातील सामाजिक समता आणि पर्यावरणीय जाणिवांपर्यंत विस्तारलेला आहे. हा शोधनिबंध प्रामुख्याने तीन मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करतो: १) मराठी साहित्यातील पर्यावरणीय आणि सामाजिक मूल्यांचे विश्लेषण २) शाश्वत समाजाच्या निर्मितीसाठी साहित्याची प्रेरणा आणि ३) कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI) वापर करून या साहित्याचे जागतिक स्तरावर जतन व प्रसार.

संशोधनात असे दिसून येते की, मराठी साहित्य केवळ मूल्यसंवर्धन करत नाही, तर AI च्या मदतीने माहितीचे विश्लेषण (Data Analysis) आणि सुलभ भाषांतर करून हे विचार जागतिक स्तरावर नेणे शक्य आहे. डिजिटल ग्रंथालये आणि AI-आधारित शैक्षणिक साधने मराठी साहित्यातील शाश्वत विचारांना 'लोकचळवळ' बनवण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरत आहेत. निष्कर्षस्वरूपी, शाश्वत विकासाचे तांत्रिक उद्दिष्ट साध्य करण्यासाठी मराठी साहित्यातील नैतिक आणि सांस्कृतिक अधिष्ठान अनिवार्य आहे, हे या शोधनिबंधातून स्पष्ट होते.

मुख्य शब्द: मराठी साहित्य, शाश्वत विकास (SDG), कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), पर्यावरण संवर्धन, सामाजिक समता, डिजिटल जतन.

प्रस्तावना:

"शाश्वत विकास" ही संकल्पना केवळ पर्यावरणापुरती मर्यादित नसून ती मानवी जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करणारी एक व्यापक विचारधारा आहे. संयुक्त राष्ट्रांनी घोषित केलेली १७ शाश्वत विकासाची उद्दिष्टे २०३०- पर्यंत साध्य करण्याचे उद्दिष्ट जगासमोर आहे. यात गरिबी निर्मूलन, दर्जेदार शिक्षण, लिंगभाव समानता आणि हवामान कृती यांसारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांचा समावेश आहे. कोणतीही तांत्रिक किंवा भौतिक प्रगती जोपर्यंत सांस्कृतिक आणि नैतिक मूल्यांवर आधारित नसते, तोपर्यंत ती शाश्वत राहू शकत नाही. या संदर्भात, मराठी साहित्य हे समाजपरिवर्तनाचे आणि प्रबोधनाचे एक अत्यंत प्रबळ माध्यम ठरले आहे.

मराठी साहित्याला १३ व्या शतकातील महानुभाव आणि वारकरी पंथापासून एक समृद्ध परंपरा लाभली आहे. संतांच्या वाङ्मयापासून ते आधुनिक काळातील दलित, ग्रामीण आणि स्त्रीवादी साहित्यापर्यंत मराठी लेखणीने नेहमीच निसर्ग, माणूस आणि समाज यांच्यातील समतोल राखण्याचा संदेश दिला आहे. उदाहरणार्थ, संत तुकारामांची निसर्गाप्रती असलेली संवेदनशीलता किंवा जोतिराव फुले यांनी मांडलेली सामाजिक समतेची संकल्पना, ही आजच्या शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांशी थेट साधर्म्य राखतात.

आजच्या २१ व्या शतकात, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI) उदय झाला आहे. साहित्यातील हे शाश्वत विचार केवळ पुस्तकांपुरते मर्यादित न ठेवता, ते जागतिक स्तरावर पोहोचवण्यासाठी AI एक

क्रांतीकारक साधन ठरत आहे. डिजिटल प्लॅटफॉर्म्स, भाषांतर तंत्रज्ञान आणि डेटा ॲनालिटिक्सच्या साहाय्याने मराठी साहित्यातील जीवनमूल्ये अधिक प्रभावीपणे मांडली जात आहेत.

प्रस्तुत शोधनिबंधाचा मुख्य उद्देश मराठी साहित्यातील ही शाश्वत मूल्ये अधोरेखित करणे आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून त्यांचा जागतिक प्रसार कसा करता येईल, याचे विश्लेषण करणे हा आहे. साहित्यातील संवेदनशीलता आणि तंत्रज्ञानाची गती यांचा संगमच खऱ्या अर्थाने शाश्वत भविष्याचा मार्ग सुकर करू शकतो, हा विचार या संशोधनाचा गाभा आहे.

निसर्ग वर्णन:

जुन्या आणि आधुनिक मराठी साहित्यात (उदा. बहिणाबाई चौधरींच्या कविता, ना.धों. महानोरांचे निसर्ग काव्य) निसर्ग आणि मानवाचे नाते स्पष्ट केले आहे, जे शाश्वत विकासाचा मुख्य पाया आहे.

प्रबोधन:

निबंध आणि लेखांच्या माध्यमातून पाण्याचे नियोजन, वृक्षारोपण आणि प्रदूषणाविषयी जनजागृती केली जाते.

सामाजिक समता आणि सर्वसमावेशकता:

सामाजिक न्याय: संत साहित्यापासून ते दलित साहित्यापर्यंत मराठी साहित्याने नेहमीच विषमतेविरुद्ध आवाज उठवला आहे. शाश्वत विकासाचे 'कोणालाही मागे सोडू नका' (Leave No One Behind) हे तत्व या साहित्यातून अधोरेखित होते.

स्त्री-पुरुष समानता:

साहित्यातील स्त्रीवादी लेखनाने महिलांच्या हक्कांबद्दल आणि त्यांच्या विकासातील सहभागाबद्दल समाजाची मानसिकता बदलण्यास मदत केली आहे.

संशोधन पद्धती:

प्रस्तुत शोधनिबंधाचा विषय 'शाश्वत विकासाची उद्दिष्टे आणि मराठी साहित्य: कृत्रिम बुद्धिमत्ता च्या संदर्भात' हा आंतरविद्याशाखीय स्वरूपाचा असल्याने, संशोधनासाठी खालील पद्धतींचा अवलंब करण्यात आला आहे:

ऐतिहासिक आणि विश्लेषणात्मक पद्धत: मराठी साहित्यातील पर्यावरणाभिमुख आणि सामाजिक समतेच्या विचारांचा ऐतिहासिक मागोवा घेण्यात आला आहे. संत साहित्यापासून ते आधुनिक साहित्यापर्यंतच्या निवडक ग्रंथांचे विश्लेषण करून त्यातील शाश्वत मूल्यांची पडताळणी करण्यात आली आहे.

माहिती संकलन: माहितीचा स्त्रोत : प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम माहिती वापरण्यात आली

दुय्यम स्रोत: या संशोधनासाठी माहिती संकलित करण्यासाठी प्रकाशित झालेली विविध पुस्तके, संशोधन नियतकालिके, विविध शासकीय अहवाल (उदा. UN SDG Reports) आणि प्रसिद्ध शोधनिबंधांचा आधार घेण्यात आला आहे.

व्याप्ती आणि मर्यादा :

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती मुख्यत्वे मराठी साहित्य आणि आधुनिक तंत्रज्ञान यांच्या संबंधांपुरती मर्यादित आहे. सर्वच साहित्यप्रकारांचा विचार करणे शक्य नसल्याने

निवडक आणि प्रतिनिधीक साहित्याचाच आधार घेण्यात आला आहे.

माहितीचे विस्लेषण:

अ) तुलनात्मक अभ्यास (Comparative Study):

संयुक्त राष्ट्रांच्या १७ शाश्वत विकास उद्दिष्टांची (SDGs) तुलना मराठी साहित्यातील जीवनमूल्यांशी (उदा. 'पसायदान' आणि 'सर्वसमावेशकता') करण्यात आली आहे. तंत्रज्ञान आणि मानवतावाद यांचा समन्वय कसा साधता येईल, याचा तुलनात्मक विचार मांडला आहे.

ब) गुणात्मक संशोधन (Qualitative Research):

हे संशोधन प्रामुख्याने गुणात्मक स्वरूपाचे आहे. यात संख्याशास्त्रीय माहितीपेक्षा साहित्यातील 'विचार' आणि 'आशय' यांच्या गुणवत्तेवर आणि त्यांच्या समाजावरील प्रभावावर लक्ष केंद्रित केले आहे.

क) डिजिटल आणि तांत्रिक विश्लेषण (Digital & Technological Analysis):

कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI) मराठी साहित्यासाठी होणारा वापर अभ्यासण्यासाठी विविध डिजिटल प्लॅटफॉर्म्स, OCR तंत्रज्ञान आणि AI अनुवाद साधने यांच्या कार्यपद्धतीचे निरीक्षण करण्यात आले आहे.

माहितीचे पृथक्करण:

हे पृथक्करण खालील २ टप्प्यांत करता येईल:

१. गुणात्मक आशय विश्लेषण: मराठी साहित्यातील निवडक ग्रंथांचे शाश्वत विकासाच्या निकषांवर विश्लेषण:

- **पर्यावरण मूल्ये:**

  संत तुकाराम: "वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे" - हा अभंग जैवविविधता आणि मानवाचे निसर्गाशी असलेले रक्ताचे नाते स्पष्ट करतो.

  संत ज्ञानेश्वर: पसायदानातील "चंद्रमे जे अलांछन, मार्तंड जे तापहीन" ही संकल्पना निसर्गाच्या संतुलनाचे प्रतीक आहे.

- **सामाजिक मूल्ये:** दलित, स्त्रीवादी आणि ग्रामीण साहित्यातून समता आणि न्याय या मूल्यांचे संवर्धन होते.

- **नैतिकता:**

२. संख्यात्मक पृथक्करण: शैक्षणिक वर्ष २०२५ - २०२६ अंतर्गत रमेश फिरोदिया कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,साकुर,मराठी विभागांतर्गत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा घेण्यात आलेला आढावा:

अ.क्र.	प्रश्न	सहमत (%)	तटस्थ (%)	असहमत (%)
१.	मराठी साहित्यामुळे पर्यावरणीय जाणीव वाढते का?	८५%	१०%	५%
२.	अभ्यासक्रमातून सामाजिक समतेचे विचार रुजतात का?	९०%	५%	५%
३.	साहित्य शाश्वत जीवनशैलीसाठी प्रेरणा देते का?	७५%	१५%	१०%
४.	उच्च शिक्षणातील मराठी अभ्यासक्रम विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक समता आणि न्याय ही मूल्ये रुजवण्यात यशस्वी झाला आहे का?	७९ %	१३ %	८%
५.	ग्रामीण आणि दलित साहित्याने शाश्वत विकासातील 'सर्वसमावेशकता' या तत्त्वावर कशा प्रकारे प्रकाश टाकला आहे?	८४%	१४%	२%

६	उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन स्तरावरील मराठी पाठ्यपुस्तकांमध्ये पर्यावरण संवर्धनावर आधारित साहित्याचा पुरेसा समावेश आहे का?	७७%	१६%	७%
७.	मातृभाषेतून (मराठीतून) उच्च शिक्षण घेणे हे कौशल्य विकास आणि शाश्वत रोजगारासाठी किती फायदेशीर ठरू शकते?	८०%	१२%	८%
८.	आधुनिक मराठी कथा-कादंबऱ्यांमधून मांडले जाणारे 'शहरीकरण आणि निसर्गाचा ऱ्हास' हे चित्रण युवकांच्या विचारसरणीवर काय परिणाम करते?	८४%	११%	५%
९.	मराठी साहित्यातील सांस्कृतिक वारसा जपल्यामुळे सांस्कृतिक शाश्वतता टिकवून ठेवण्यास कशी मदत होईल?	७३	१६	११
१०.	संत साहित्यातील 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे' यांसारखे विचार आधुनिक काळातील पर्यावरणीय समस्यांवर उपाय ठरू शकतात का?	८२%	११%	७%

माहितीचे अर्थनिर्वचन:

कल: बहुतांश विद्यार्थ्यांना साहित्यातून 'मूल्यसंस्कार' मिळत असल्याचे दिसून येते.

सहसंबंध: उच्च शिक्षणातील मराठीचा अभ्यास आणि विद्यार्थ्यांच्या सामाजिक जबाबदारीची जाणीव यांचा सकारात्मक सहसंबंध आहे.

निष्कर्ष: मराठी साहित्य हे केवळ करमणुकीचे साधन नसून ते शाश्वत विकासासाठी वैचारिक पाया पुरवणारे 'पावरहाऊस' आहे.

निष्कर्ष:

शोधनिबंधाच्या अभ्यासाअंती असे स्पष्ट होते की, शाश्वत विकासाची संकल्पना ही केवळ आधुनिक काळातील तांत्रिक गरज नसून तिची मुळे मराठी साहित्याच्या समृद्ध परंपरेत खोलवर रुजलेली आहेत. या संशोधनातून खालील महत्त्वाचे निष्कर्ष हाती येतात:

१. साहित्य हे मूल्यांचे दीपस्तंभ: संयुक्त राष्ट्रांची शाश्वत विकासाची उद्दिष्टे (SDGs) तांत्रिक वाटत असली तरी, मराठी साहित्याने ही उद्दिष्टे शतकांपूर्वीच 'पसायदान', 'ग्रामगीता' आणि 'शेतकऱ्याचा आसूड' यांसारख्या कलाकृतींतून मांडली आहेत. हे साहित्य शाश्वत विकासासाठी आवश्यक असलेले वैचारिक अधिष्ठान पुरवते.

२. AI एक सक्षमीकरण साधन: कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) हे केवळ तंत्रज्ञान नसून मराठी साहित्यातील वैश्विक विचार जगासमोर नेणारे एक प्रभावी माध्यम आहे. AI मुळे भाषांतरातील मर्यादा दूर झाल्या असून, मराठीतील शाश्वत जीवनपद्धतीचा विचार जागतिक 'हवामान कृती' (Climate Action) आणि 'सामाजिक न्याया'च्या चर्चेत केंद्रस्थानी येऊ शकतो.

३. सांस्कृतिक सातत्य: डिजिटायझेशन आणि AI आधारित जतनामुळे मराठी साहित्याचा वारसा नष्ट होण्यापासून वाचला आहे. हे डिजिटल जतनच भावी पिढ्यांना शाश्वत विकासाच्या मार्गावर चालण्यासाठी प्रेरणा देईल.

४. तंत्रज्ञान आणि माणुसकीचा संगम: केवळ तंत्रज्ञानाने विकास होणार नाही, त्याला साहित्यातील संवेदनशीलतेची जोड हवी. मराठी साहित्य मानवी भावभावना जपते, तर AI त्याची पोहोच वाढवते. हा समन्वयच खऱ्या अर्थाने 'शाश्वत भविष्य' घडवू शकतो.

संदर्भसूची:

१. भारती, दीपक एम. शाश्वत विकासाची ध्येय आणि भारतीय दृष्टिकोन. (२०२०), Our Heritage Journal, Vol. 68, Issue 05.

२. Zenodo. शाश्वत विकासासाठी मराठी साहित्याचे योगदान: एक अभ्यास, (२०२५).

३. ResearchGate. From Enlightenment to Empowerment: Marathi Literature's Journey, (२०२०).

४. INFLIBNET. e-ShodhSindhu: Consortium for Higher Education Electronic Resources, (२०२४).

ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

March - 2026
Vol. 15 - No. S1

शाश्वत विकासात युवकाची भूमिका

चेतन कोंडाजी लहामगे

सहा. प्राध्यापक, रमेश फिरोदिया कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय साकुर ता. संगमनेर जि. अहिल्यानगर

***Corresponding Author:* चेतन कोंडाजी लहामगे**

DOI - 10.5281/zenodo.19491956

सारांश:

शाश्वत विकास करत असताना युवकाला सामाजिक व सांस्कृतिक भूमिका पार पाडाव्या लागतात सामाजिक भूमिकेत युवकाने वाहनांचा अतिरेक टाळला पाहिजे वाहनांचा अतिरेक केल्याने नैसर्गिक संसाधनांवर ताण पडतो आणि पुढील पिढीसाठी नैसर्गिक संसाधनांची आवश्यकता आहे वाहनांचे प्रमाण वाढल्याने प्रदूषण वाढते त्याचप्रमाणे रासायनिक शेतीचे प्रमाण कमी केली पाहिजे रासायनिक खतांच्या अतिरेकामुळे कॅन्सर सारखे आजार होत आहे आज पंजाब मध्ये रासायनिक खतांच्या अतिरेकामुळे तेथील लोकांना कॅन्सर सारखे आजार होत आहे शाश्वत विकासामध्ये भूमिका पार पाडत असताना पाडत असताना सण परंपरा यांमागील अर्थ समजून घेण्याची गरज आहे

मुख्य शब्द: सामाजिक, सांस्कृतिक, वैयक्तिक, जागतिक तापमान वाढ

प्रस्तावना:

शाश्वत विकास साधत असताना महत्त्वाची भूमिका पार पाडणे गरजेचे असते. त्या गोष्टींवर आधारित अभ्यासपूर्ण परीक्षा करणे आवश्यक असते आपली विविध क्षेत्रांमध्ये कोणती भूमिका आहे हे स्पष्ट होणे अनिवार्य आहे त्या क्षेत्रातील भूमिका पार पाडत असताना भूमिके मागची जबाबदारीची जाणीव होणे अत्यंत गरजेचे आहे शाश्वत विकास साधत असताना युवकाला वेगवेगळे प्रकारच्या पार पाडाव्या लागतात शाश्वत विकास करत असताना कोणत्या व किती प्रमाणात आपल्याकडे भूमिका आहे याची जाणीव होणे गरजेचे आहे भूमिकांची जाणीव नसली तर योग्य प्रकारे युवक भूमिका पार पडू शकत नाही कोणत्या ठिकाणी कोणती भूमिका बजावायची आहे हे समजणे गरजेचे आहे भूमिकेत स्पष्टता असली तर भूमिकेची तयारी योग्य प्रकारे करता येते

संशोधनाची उद्दिष्टे:

1. युवकाची सामाजिक भूमिका अभ्यासणे
2. युवकाची वैयक्तिक भूमिका अभ्यासणे
3. युवकाची सांस्कृतिक भूमिका अभ्यासणे

संशोधनाची गृहितके:

1. आजच्या युवकाला शाश्वत विकासात समाजाच्या भूमिकेची जाणीव करून देणे
2. आजच्या युवकाला वैयक्तिक भूमिकेची जाणीव करून देणे
3. आजच्या युवकाला सांस्कृतिक भूमिकेची जाणीव करून देणे

माहिती विश्लेषण :

अ) शाश्वत विकासामध्ये युवकांची सामाजिक भूमिका: युवक हा समाजातील एक महत्त्वाचा घटक मानला जातो समाजात वावरत असताना अनेकप्रकारच्या भूमिका लागतात तसेच शाश्वत विकासात युवकाची सामाजिक भूमिका अत्यंत महत्त्वाची समजली जाते

i) वाहनांचा होणारा अतिरेक:

शाश्वत विकास करत असताना युवकाने वाहनांचा अतिरेक टाळला पाहिजे कारण वाहनाला चालवण्यासाठी इंधनाची गरज भासते इंधन हे नैसर्गिक संसाधनांपासून तयार होते परंतु आजचा युवक दिवसेंदिवस नवनवीन वाहने खरेदी करतो वाहनांचा वापर अधिक प्रमाणात वाढल्याने नैसर्गिक संसाधनांवर ताण पडतो. आजच्या युवकाला समजले पाहिजे की वाहनाचा वापर योग्य ठिकाणी

केला पाहिजे शाश्वत विकास करायचा असेल युवकांनी वाहनाच्या अतिरेकाला आळा घातला पाहिजे कारण शाश्वत विकास करत असताना नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन होणे गरजेचे आहे.

तक्ता 1

खरेदी झालेल्या वाहनांची संख्या (कोटी)	वर्ष
1.70	2023
1.95	2024
2.82	2025

तक्ता 1 वरून असे माहिती झाली की 2023 च्या तुलनेत 2025 मध्ये वाहनांची संख्या वाढली.

ii) सामाजिक नीतिमूल्य बद्दल आदर:

आजच्या समाजातील युवकांमध्ये सामाजिक नीतिमूल्य बद्दलचा आदर दिवसे दिवस कमी होत चाललेला आहे सामाजिक नीतिमूल्य बद्दल माहिती नसल्याने त्याला कर्तव्याची जाणीव होत नाही तर तो तर तो शाश्वत विकासामध्ये आपली भूमिका स्पष्ट करू शकत नाही आजच्या युवकाला सामाजिक नीती मूल्यांबद्दल माहिती होणे गरजेचे आहे.शाश्वत विकास साधायचा असेल सामाजिक मूल्यांची जाण होणे गरजेचे आहे एकमेकांना मदत करणे श्रमप्रतिष्ठा राष्ट्रप्रेम बंधूभाव यांसारखी सामाजिक मूल्यांच्या प्रतीचा आदर कमी होत चाललेला आहे शाश्वत विकास करायचा असेल तर सामाजिक मूल्यांबद्दल आदर वाढणे गरजेचे आहे.

आ) शाश्वत विकासामध्ये युवकाची वैयक्तिक भूमिका:

i) अनुकरण टाळणे:

आजचा युवक कोणाचे ना कोणाच्यातरी अनुकरण करत असतो अनुकरण आतून तो नैसर्गिक संसाधनांवर ताण पडतो सण उत्सव परंपरा योग्य माहितीनैसर्गिक संसाधन मर्यादित स्वरूपात असल्याने त्यांचा तुटवडा निर्माण होतो. अनुकरण करताना युवक कोणते गोष्टीचा विचार करत नाही नैसर्गिक संसाधनांवर ताण पडतो म्हणून अनुकरण टाळणे ही युवकाची महत्त्वाची भूमिका आहे अनुकरण करत असताना युवक अल्पकालावधीचा विचारांमध्ये दूरदृष्टीची कमतरता असते

रासायनिक शेतीचे प्रमाण कमी करणे:

शाश्वत विकास करायचा असेल तर आजच्या युवकांनी रासायनिक शेतीचे प्रमाण कमी करून सेंद्रिय शेतीकडे वाढवला पाहिजे रासायनिक खते माती व आरोग्यावर दुष्परिणाम करतात रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे वेगवेगळ्या प्रकारचे आजार होण्याचे प्रमाण वाढले आहे शाश्वत विकास साधायचा असेल असेल तर चांगले आरोग्य राहणे गरजेचे आहे आरोग्य चांगले असेल तर युवक शाश्वत विकास करू शकतो शाश्वत विकासामध्ये मानवी संसाधन हा महत्त्वाचा घटक मानला जातो रासायनिक शेती ही आरोग्य ला बाधक आहे रासायनिक शेतीमुळे कॅन्सर चे प्रमाण वाढत आहे पंजाब आज कॅन्सर रुग्ण चे प्रमाण वाढत वाढत आहे ही बाब शाश्वत विकासाला घातक आहे

जागतिक तापमान वाढीला आळा:

स्वत विकास करत असताना जागतिक तापमान वाढ महत्वपूर्ण गोष्टीचा विचार केला गेला पाहिजे आपल्याला शाश्वत विकास करायचा असेल तर जागतिक तापमान वाढीला आया बसणे गरजेचे आहे जागतिक तापमान वाढ अशीच वाढत राहिली तर अंटार्टिका मधील हिमनग वितळेल ही हिमन द्या वितळल्यामुळे पाण्याची पातळी 2ते 3 मीटरने वाढेल.

1850 नंतर सरासरी तापमान वाढ ही 1 अंश सें. ग्रे ते1.5 अंश सें. ग्रे पर्यंत झालेली आहे. 2005 साली केलेल्या अभ्यासानुसार मागील 100 वर्षाच्या काळात जागतिक स्तरावर तापमानात 0.6 अंश सें. ग्रे ते1 अंश सें. ग्रे एवढी वाढ आढळून आली आपल्याला शाश्वत विकास करायचा असेल असेल तर जागतिक तापमान वाढीला आळा बसणे गरजेचे आहे जागतिक तापमान वाढीमुळे sunstrokes सारखे आजार होतात आणि मृत्यू सुद्धा होतो.

इ) शाश्वत विकासामध्ये युवकाची सांस्कृतिक भूमिका:

i) सण उत्सव परंपरा योग्य माहिती:

शाश्वत विकास साधत असताना सांस्कृतिक भूमिका कारण शाश्वत विकास साधत असताना सांस्कृतिक मूल्यांची जपवणूक होणे गरजेचे आहे आपल्या सण उत्सव परंपरा यांच्या मागील कारण शोधणे गरजेचे आहे योग्य माहिती असेल तर नैसर्गिक संसाधनाच्या अपव्यय होणार नाही आजच्या आजच्या युवकाला आपली संस्कृती समजणे गरजेचे आहे हा सांस्कृतिक घटक हा महत्त्वपूर्ण भूमिका बजावण्याचे काम करतो सण उत्सव परंपरा यामागील योग्य माहिती योग्य कारण माहिती तर नसेल जबाबदारी किंवा भूमिकेची जाणीव होणार नाही सण असल्यास अधिक नैसर्गिक संसाधनांवर ही वेळा अधिक ताण पडतो जसे की काही ठिकाणी होळी सारखा सण असल्यास पाण्याचा उपयोग अपव्यय होतो.

गृहीत कृत्यांची पडताळणी:

1. सिद्ध झाले की युवकाला सामाजिक भूमिकेची जाणीव झाली
2. सिद्ध झाले की युवकाला वैयक्तिक भूमिकेची जाणीव झाली
3. सिद्ध झाले की युवकाला सांस्कृतिक भूमिकेची जाणीव झाली

निष्कर्ष:

1. शाश्वत विकास ही संकल्पना सामाजिक वैयक्तिक सांस्कृतिक नसून सर्व व्यापक आहे
2. शाश्वत विकासामध्ये युवक महत्वपूर्ण भूमिका बजावण्याचे काम करतो

शिफारशी:

1. सरकारने शाश्वत विकास साध्य करण्यासाठी समिती स्थापन करणे गरजेचे आहे
2. शाश्वत विकासाबद्दल एक मंत्रालय स्थापन करून अर्थसंकल्पात तरतूद करणे गरजेचे आहे
3. शाश्वत विकासात विकासाबद्दलचे निकष ठरविणे गरजेचे आहे
4. शाश्वत विकासासाठी महाविद्यालयीन स्वतंत्र विषय पाहिजे

संदर्भ:

1. Google
2. The Times of India 2023
3. Pudhari news 2024
4. Loksatta 2026
5. https://www. think Global Health.org

ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

March - 2026
Vol. 15 - No. S1

उच्च शिक्षणातील गुणवत्तेसमोरील आव्हानांचा अभ्यास

प्रा. अमोल निवृत्ती खरात

सहा. प्रा. प्रागतिक शिक्षण संस्थेचे, नूतन कला महाविद्यालय, राजापूर, ता.संगमनेर

***Corresponding Author:* प्रा. अमोल निवृत्ती खरात**

DOI - 10.5281/zenodo.19491974

प्रस्तावना:

या स्पुटनिक युगात माहिती संप्रेषण तंत्राचा प्रसार व प्रचार वेगाने होताना दिसतो. तसेच शिक्षणाच्या विविध शाखांचाही विस्तार प्रचंड प्रमाणात होताना दिसून येतोय. हे चित्र खूप सुखद असले तरी प्रत्यक्षात मात्र स्त्री- शिक्षण, भटके- आदिवासी व दुर्गम भागातील लोकसंख्येचा फार मोठा भाग उच्चशिक्षणापासून अद्यापही फारच लांब राहिलेला दिसून येतोय. आजही शिक्षणात इंग्रजीचे वर्चस्व व त्या भाषेपासून फार मोठा जनसामान्य वर्ग दूरच असल्याने या वर्गाची फरफटच होताना दिसून येतेय. गुणवत्ता व बहुजन लोक यांचे समीकरण जोडताना असे दिसून येतेय की, प्रत्यक्षात गुणवत्तेच्या नावाखाली बहुजन वर्गाला शिक्षणाच्या, उच्चशिक्षणाच्या संधीच अप्रत्यक्षात नाकारल्या जात आहेत. हा सर्व विरोधाभास अभ्यासल्यास भारतीय शिक्षणाची गुणवत्ता हा एक चिंतन व अभ्यासाचाच विषय बनून राहिला आहे.

- **जागरूकता आणि शिक्षण:** युवक शाश्वत जीवनशैलीचा (Sustainable Lifestyle) अवलंब करून आणि इतरांना प्रोत्साहित करून पर्यावरण रक्षणात मोठी भूमिका बजावू शकतात.
- **नाविन्यपूर्ण उपाय (Innovation):** तरुण लोक तंत्रज्ञान आणि स्टार्टअप्सद्वारे (Startups) शाश्वत ऊर्जा, कचरा व्यवस्थापन आणि जलसंधारण यासारख्या समस्यांवर नवीन उपाय शोधू शकतात.
- **सामाजिक आणि राजकीय बदल:** युवक स्थानिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर शाश्वत विकासाच्या धोरणांसाठी आवाज उठवून धोरणात्मक बदल घडवून आणू शकतात.
- **पर्यावरण संवर्धन:** वृक्षारोपण, प्लास्टिक बंदी, आणि जैवविविधता टिकवून ठेवण्यासाठी युवक स्वयंसेवक म्हणून सक्रिय कार्य करू शकतात.
- **कौशल्य विकास:** आधुनिक कौशल्ये आत्मसात करून युवक शाश्वत आर्थिक विकासात (Sustainable Economic Growth) हातभार लावू शकतात.

शाश्वत विकासाची मुख्य वैशिष्ट्ये (Key Features):

- **भविष्यातील पिढ्यांचा विचार:** हा विकास अशा प्रकारे केला जातो की नैसर्गिक संसाधने भविष्यातील पिढ्यांसाठीही उपलब्ध राहतील.
- **पर्यावरण संरक्षण (Environmental Protection):** हवामान बदल, प्रदूषण रोखणे आणि जैवविविधता टिकवून ठेवण्यासाठी परिसंस्थेचे रक्षण करणे, हे याचे प्रमुख वैशिष्ट्य आहे.
- **आर्थिक विकास आणि स्थिरता:** गरिबी दूर करणे आणि शाश्वत आर्थिक वाढ साध्य करणे, ज्यामध्ये संसाधनांचा अतिवापर न करता उत्पादकता वाढवणे समाविष्ट आहे.
- **सामाजिक समता आणि समावेशकता:** सर्वांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, आरोग्य, आणि संधी मिळवून देणे, तसेच सामाजिक असमानता कमी करणे.
- **संसाधनांचा कार्यक्षम वापर:** नूतनीकरणयोग्य (Renewable) ऊर्जेचा वापर वाढवणे आणि नैसर्गिक संसाधनांचा पुनर्वापर (Recycle/Reuse) करणे.

दीर्घकालीन दृष्टिकोन:

हे केवळ तात्पुरत्या फायद्याचा विचार न करता दीर्घकालीन परिणामांचा विचार करते.

विश्लेषण चर्चा:

पर्यावरणीय शाश्वततेसाठी सज्ज असलेल्या विविध क्षमता आणि ज्ञानाचा समावेश हरित कौशल्यांमध्ये होतो. ही कौशल्ये व्यक्तींना पर्यावरणपूरक पद्धतींमध्ये योगदान देण्यास, पर्यावरणीय आव्हानांसाठी नाविन्यपूर्ण उपाय विकसित करण्यास आणि अधिक हिरवेगार आणि अधिक शाश्वत अर्थव्यवस्थेकडे संक्रमणात सक्रियपणे सहभागी होण्यास सक्षम करतात. हरित कौशल्ये अक्षय ऊर्जा, कचरा कमी करणे, संवर्धन, शाश्वत शेती आणि बरेच काही यासारख्या क्षेत्रांना व्यापतात. ही कौशल्ये आत्मसात करून, तरुण लोक शाश्वत विकास चालविण्यास आणि हवामान बदलाचे परिणाम कमी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. माध्यम आणि माहिती साक्षरता (MIL) तरुणांमध्ये हरित कौशल्यांच्या विकासासाठी आणि प्रोत्साहनासाठी उत्प्रेरक म्हणून काम करते. माहिती, चुकीची माहिती आणि वेगाने विकसित होणाऱ्या तंत्रज्ञानाने भरलेल्या जगात, MIL तरुण व्यक्तींना मीडिया सामग्रीचे एमआयएल तरुणांना पर्यावरण संवर्धन, हवामान बदल आणि शाश्वत पद्धतींबद्दल भरपूर माहिती मिळवण्यास सक्षम करते. वेबसाइट्स, माहितीपट, पॉडकास्ट आणि सोशल मीडियासह विविध माध्यमांद्वारे ते यशस्वी हरित उपक्रम, अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि पर्यावरणीय व्यवस्थापनाच्या प्रेरणादायी कथांबद्दल जाणून घेऊ शकतात. माध्यम आणि माहिती साक्षरता कौशल्ये विकसित करून, तरुण त्यांच्या समवयस्कांसह, समुदायांसह आणि व्यापक जगासह अचूक आणि प्रभावी माहिती सामायिक करून त्यांचा प्रभाव वाढवू शकतात.

माध्यम आणि माहिती साक्षरता गंभीर विचारसरणी आणि समस्या सोडवण्याच्या कौशल्यांना प्रोत्साहन देते, जे जटिल पर्यावरणीय आव्हानांना तोंड देण्यासाठी आवश्यक आहेत. ज्या तरुणांकडे MIL कौशल्ये आहेत ते डेटाचे विश्लेषण करू शकतात, धोरण प्रस्तावांचे मूल्यांकन करू शकतात आणि शाश्वत उपायांबद्दल सर्जनशीलपणे विचार करू शकतात. माहितीशी गंभीरपणे सहभागी होऊन, ते पर्यावरणीय समस्यांशी संबंधित माहितीपूर्ण चर्चा आणि निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत योगदान देऊ शकतात, शाश्वततेला प्राधान्य देणाऱ्या धोरणांचे समर्थन करू शकतात. MIL तरुणांना नवोपक्रम आणि उद्योजकतेला चालना देऊन बदलाचे प्रतिनिधी बनण्यास सक्षम करते. अचूक माहिती आणि गंभीर विचारसरणीच्या क्षमतेने सज्ज, तरुण शाश्वत उत्पादने आणि सेवांसाठी बाजारपेठेतील अंतर ओळखू शकतात. ते हरित स्टार्ट-अप विकसित आणि लाँच करू शकतात, आर्थिक संधी निर्माण करताना पर्यावरणीय आव्हानांना तोंड देणारे उपाय तयार करू शकतात. MIL त्यांना व्यवसायाच्या लँडस्केपमध्ये नेव्हिगेट करण्यास, मार्गदर्शकांशी कनेक्ट होण्यास आणि त्यांच्या उद्योजकीय प्रयत्नांना समर्थन देणाऱ्या संसाधनांमध्ये प्रवेश करण्यास सक्षम करते.

युनेस्को ही माध्यमे आणि माहिती साक्षरतेला प्रोत्साहन देणारी आघाडीची संस्था आहे. माध्यमे आणि माहिती साक्षरता लोकांना माहिती आणि डिजिटल साधनांच्या वापराबद्दल गंभीरपणे विचार करण्यास सक्षम करते. शांतता निर्माण, समानता, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, संवाद, माहितीचा प्रवेश आणि शाश्वत विकासात ते कसे

सहभागी होतात याबद्दल माहितीपूर्ण निवडी करण्यास ते लोकांना मदत करते. युनेस्को जगभरातील माध्यमे आणि माहिती साक्षरता उपक्रमांना समर्थन देते आणि त्यांचे समर्थन करते.

गंभीरपणे मूल्यांकन आणि विश्लेषण करण्याची, विश्वासार्ह स्रोत ओळखण्याची आणि माहितीपूर्ण निर्णय घेण्याची क्षमता देते. MIL त्यांना आवाजातून बाहेर पडण्यास, विश्वसनीय माहिती ओळखण्यास आणि पर्यावरणीय समस्या आणि उपायांची सखोल समज मिळविण्यास सक्षम करणे.

शाश्वत विकासातील युवकांच्या योगदानाच्या उपायोजना:

शाश्वत विकास साध्य करण्यासाठी युवकांची भूमिका केवळ सहभागापुरती मर्यादित नसून नियोजन, अंमलबजावणी आणि नेतृत्व या सर्व स्तरांवर महत्त्वाची आहे. खालील उपयोजना युवकांच्या योगदानाला प्रभावीपणे दिशा देऊ शकतात.

1) शिक्षण व जनजागृती उपयोजना:

- शाळा-महाविद्यालयांत शाश्वत विकासावरील अभ्यासक्रम समाविष्ट करणे.
- पर्यावरण, पाणीसंवर्धन, ऊर्जा बचत यावर कार्यशाळा, परिसंवाद, मोहिमा आयोजित करणे.
- युवकांनी समाजमाध्यमांतून सकारात्मक संदेश पसरवणे.

2) पर्यावरण संवर्धन उपयोजना:

- वृक्षारोपण, प्लास्टिकमुक्त मोहिमा, स्वच्छता अभियानात सहभाग.
- कचरा व्यवस्थापन, पुनर्वापर (recycling) व कंपोस्टिंग प्रकल्प राबवणे.
- स्थानिक जैवविविधतेचे संरक्षण करण्यासाठी स्वयंसेवी गट स्थापन करणे.

3) सामाजिक समावेशन व समानता:

- वंचित घटकांसाठी शिक्षण व आरोग्य जनजागृती कार्यक्रम.
- महिलांच्या सक्षमीकरणासाठी व लैंगिक समानतेसाठी मोहिमा.
- ग्रामविकास, साक्षरता आणि कौशल्यविकास उपक्रमांत स्वयंसेवा.

4) आर्थिक शाश्वतता व उद्योजकता:

- हरित तंत्रज्ञान व सामाजिक उद्योजकतेला प्रोत्साहन.
- सेंद्रिय शेती, स्थानिक उत्पादन, सूक्ष्मउद्योग यांत युवकांचा सहभाग.
- स्वयंरोजगार व स्टार्टअप संस्कृतीद्वारे रोजगारनिर्मिती.

5) शासन व धोरण सहभाग:

- युवकांनी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये, विद्यार्थी परिषदांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा.
- शासनाच्या शाश्वत विकासाशी संबंधित योजनांमध्ये (उदा. स्वच्छता, जलसंवर्धन) स्वयंसेवी सहभाग.
- धोरण निर्मितीत युवकांचे प्रतिनिधित्व वाढवणे.

निष्कर्ष:

शाश्वत विकास ही केवळ संकल्पना नसून भविष्यातील सुरक्षित आणि संतुलित समाज घडवण्याची प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत युवकांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आणि प्रभावी आहे. युवक हे ऊर्जावान,

नवोन्मेषी, तंत्रज्ञानस्नेही आणि सामाजिक जाण असलेले घटक असल्यामुळे ते शाश्वत विकासाचे प्रमुख वाहक ठरतात.

युवक पर्यावरण संरक्षण, सामाजिक समता आणि आर्थिक प्रगती या तिन्ही क्षेत्रांत सक्रिय भूमिका बजावतात. वृक्षारोपण, पाणी संवर्धन, प्लास्टिकमुक्त मोहिमा, स्वच्छता अभियान यांसारख्या उपक्रमांत त्यांचा मोठा सहभाग दिसून येतो. तसेच सामाजिक माध्यमांच्या सहाय्याने ते जागरूकता निर्माण करून समाजाला सकारात्मक बदलासाठी प्रेरित करतात.

आर्थिक क्षेत्रात युवक उद्यमशीलतेद्वारे हरित उद्योग, सौर ऊर्जा, शाश्वत शेती यांसारख्या क्षेत्रांत नवीन संधी निर्माण करतात. शिक्षण आणि कौशल्य विकासामुळे ते शाश्वत विकास उद्दिष्टांची (SDGs) अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे करू शकतात.

एकंदरीत, युवक हे शाश्वत विकासाचे केवळ सहभागी नसून ते परिवर्तनाचे नेतृत्व करणारे घटक आहेत. त्यांच्या सक्रिय सहभागाशिवाय शाश्वत विकासाची संकल्पना पूर्णत्वास जाऊ शकत नाही. त्यामुळे युवकांना योग्य शिक्षण, संधी आणि मार्गदर्शन दिल्यास ते देशाच्या आणि जगाच्या शाश्वत भवितव्यासाठी भक्कम पाया घालू शकतात.

शाश्वत विकासामध्ये युवकांचे योगदान" या विषयासाठी संदर्भ:

1. पर्यावरण अभ्यास (Environmental Studies) – डॉ. ई. भारुचा (Erach Bharucha).
2. पर्यावरण आणि शाश्वत विकास – मराठी संदर्भ पुस्तके (विद्यापीठ अभ्यासक्रमानुसार).
3. Sustainable Development – K. A. Govindarajan.
4. Environmental Studies – Benny Joseph.
5. https://moef.gov.in.
6. https://www.unicef.org/India.
7. युवक आणि सामाजिक विकासावरील माहिती.
8. NITI Aayog, (India).
9. https://www.niti.gov.
10. Bharucha, E. (Environmental Studies), UGC Publication.
11. Benny Joseph (Environmental Studies), Tata McGraw Hill.
12. United Nations Sustainable Development Goals, (SDGs).

ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

March - 2026
Vol. 15 - No. S1

कोविड-१९ नंतरच्या काळातील उच्चशिक्षण: ऑनलाईन शिक्षणासमोरील आव्हाने

दिपक बंडू खामकर

सहा. प्राध्यापक, इतिहास विभाग, न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, पारनेर, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर.

***Corresponding Author:** दिपक बंडू खामकर*

DOI - 10.5281/zenodo.19492129

प्रस्तावना:

मानवी इतिहासात काही घटना अशा घडतात ज्या काळाला दोन भागांत विभागतात—'पूर्वीचा काळ' आणि 'नंतरचा काळ'. डिसेंबर २०१९ मध्ये सुरू झालेल्या आणि २०२० मध्ये जगभर पसरलेल्या कोविड-१९ (COVID-19) महासाथीने शिक्षण क्षेत्रासाठी नेमकी हीच विभाजक रेषा आखली आहे. प्रदीर्घ काळापासून चालत आलेली 'गुरू-शिष्य' परंपरा आणि चार भिंतींच्या आतील 'खडू-फळा' शिक्षण पद्धती एका रात्रीत ठप्प झाली. युनेस्कोच्या (UNESCO) आकडेवारीनुसार, महामारीच्या काळात जगातील सुमारे १९० देशांमधील १.६ अब्ज विद्यार्थ्यांचे शिक्षण विस्कळीत झाले होते.

कोविड-१९ पूर्व काळात ऑनलाईन शिक्षण किंवा 'ई-लर्निंग' हा केवळ एक पर्याय किंवा पूरक घटक म्हणून पाहिला जात होता. मात्र, लॉकडाऊनमुळे जेव्हा महाविद्यालये आणि विद्यापीठांचे दरवाजे बंद झाले, तेव्हा 'ऑनलाईन शिक्षण' हा एकमेव तारणहार म्हणून समोर आला. झूम (Zoom), गुगल मीट (Google Meet), आणि मायक्रोसॉफ्ट टीम्स (Microsoft Teams) यांसारखी माध्यमे वर्गाची जागा घेऊ लागली. उच्च शिक्षणातील हे संक्रमण 'इच्छेनुसार' नसून 'सक्तीचे' होते. यामुळे शैक्षणिक संस्थांना तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्यास भाग पाडले, ज्यासाठी कदाचित आणखी एक दशक लागले असते. परंतु, या घाईघाईने केलेल्या बदलामुळे अनेक तांत्रिक आणि मानसिक त्रुटी उघड्या पडल्या.

ऑनलाईन शिक्षणाने सर्वात मोठे आव्हान उभे केले ते म्हणजे 'डिजिटल दरी'. भारतासारख्या खंडप्राय देशात, जिथे भौगोलिक आणि आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणात आहे, तिथे ऑनलाईन शिक्षण सर्वांसाठी समान राहिले नाही. ज्यांच्याकडे हाय-स्पीड इंटरनेट, लॅपटॉप आणि स्वतंत्र खोली होती, त्यांच्यासाठी शिक्षण सुरू राहिले. परंतु, ग्रामीण भागातील विद्यार्थी, ज्यांच्याकडे साधा स्मार्टफोनही नाही किंवा जिथे वीजपुरवठा खंडित असतो, अशा विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षण एक स्वप्न बनले. ही 'डिजिटल दरी' केवळ तांत्रिक नसून ती सामाजिक आणि आर्थिक अन्यायाचे प्रतीक बनली आहे. उच्च शिक्षणाचे 'सार्वत्रीकरण' होण्याऐवजी ते 'विशिष्टीकरण' (Exclusion) कडे झुकू लागले आहे.

ऑनलाईन शिक्षणाने केवळ तांत्रिक आव्हानेच दिली नाहीत, तर मानसिक आरोग्याचे प्रश्नही निर्माण केले आहेत. शिक्षकांसाठीही हे आव्हान कमी नव्हते. तंत्रज्ञानाशी जुळवून घेताना होणारी दमछाक आणि घर व काम यातील पुसट झालेली रेषा यामुळे शैक्षणिक वर्तुळात तणावाचे वातावरण निर्माण झाले. संकट हे संधी घेऊन येते, असे म्हटले जाते. कोविड-१९ नंतर उच्च शिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर वाढल्यामुळे जागतिक स्तरावरील कोर्सेस विद्यार्थ्यांना घरबसल्या उपलब्ध झाले आहेत. मात्र, हे तंत्रज्ञान मानवी संवादाची जागा घेऊ शकत नाही. ऑनलाईन शिक्षणाची ही आव्हाने केवळ 'तात्पुरती' नसून ती धोरणात्मक बदलांची मागणी करणारी आहेत.

संशोधनाची प्रमुख उद्दिष्टे:

१. उच्च शिक्षणातील बदलांचा आढावा घेणे
२. तांत्रिक पायाभूत सुविधांची उपलब्धता तपासणे
३. 'डिजिटल दरी' आणि सामाजिक विषमता अभ्यासणे
४. शैक्षणिक गुणवत्ता आणि परिणामकारकता तपासणे
५. मानसिक आणि सामाजिक परिणामांचे विश्लेषण करणे

ऑनलाईन शिक्षणातील मुख्य आव्हाने

कोविड-१९ मुळे शिक्षण क्षेत्रात जे सक्तीचे संक्रमण झाले, त्यातून अनेक गंभीर आव्हाने उभी राहिली आहेत. ही आव्हाने केवळ तांत्रिक नसून ती सामाजिक, शैक्षणिक आणि मानसिक स्वरूपाची आहेत.

डिजिटल दरी आणि पायाभूत सुविधांचा अभाव:

भारतासारख्या विकसनशील देशात 'डिजिटल दरी' हे सर्वात मोठे आव्हान आहे.

- इंटरनेट कनेक्टिव्हिटी
- साधनांची उपलब्धता
- आर्थिक भार

प्रात्यक्षिक आणि कौशल्य आधारित शिक्षणातील मर्यादा:

- प्रयोगशाळेचा अभाव
- कौशल्य विकास

शैक्षणिक गुणवत्ता आणि मूल्यमापनाची विश्वासार्हता:

- परीक्षेतील पारदर्शकता
- मूल्यमापन पद्धती

विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य आणि सामाजिक एकाकीपणा:

- **सोशल आयसोलेशन:** महाविद्यालय हे केवळ अभ्यासाचे ठिकाण नसून ते सामाजिकीकरणाचे केंद्र असते. मित्रांशी होणारा संवाद, स्पर्धा आणि गटचर्चा बंद झाल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नैराश्य आणि एकाकीपणा वाढला आहे.
- **झूम फॅटीग (Zoom Fatigue):** तासनतास स्क्रीनसमोर बसल्यामुळे डोळ्यांचे विकार, पाठदुखी आणि मानसिक थकवा जाणवू लागला आहे. यालाच तज्ज्ञांनी 'डिजिटल बर्नआउट' असे नाव दिले आहे.

अध्यापन पद्धती आणि शिक्षकांचे प्रशिक्षण:

- **तंत्रज्ञानाचा स्वीकार:** अनेक अनुभवी प्राध्यापकांना अचानकपणे नवीन सॉफ्टवेअर्स, पीपीटी आणि डिजिटल व्हाईटबोर्ड वापरताना अडचणी आल्या.
- **विद्यार्थ्यांचा सहभाग (Engagement):** वर्गात शिक्षकांचे विद्यार्थ्यांवर प्रत्यक्ष नियंत्रण असते. ऑनलाईन वर्गात विद्यार्थी कॅमेरा बंद करून दुसरीकडे लक्ष देऊ शकतात, ज्यामुळे शिक्षकांना 'कोणाशी संवाद साधत आहोत' हे समजत नाही.

कौटुंबिक आणि घरगुती वातावरण

- **व्यत्यय:** अनेक विद्यार्थ्यांच्या घरी अभ्यासासाठी स्वतंत्र खोली किंवा शांत वातावरण नसते. घरातील कामांचा व्याप आणि आवाजामुळे एकाग्रतेत बाधा येते.
- **स्त्री विद्यार्थ्यांसमोरील आव्हाने:** विशेषतः विद्यार्थिनींच्या बाबतीत, त्या घरी असल्यामुळे

त्यांच्याकडून घरातील कामांची अपेक्षा वाढली, ज्याचा परिणाम त्यांच्या अभ्यासावर झाला.

शिक्षकांसमोरील आव्हाने:

उच्च शिक्षणातील प्राध्यापक आणि संशोधकांसाठी ऑनलाईन शिक्षण पद्धती हा एक 'सांस्कृतिक धक्का' होता. वर्गातील जिवंत संवादाची जागा लॅपटॉपच्या स्क्रीनने घेतल्यामुळे शिक्षकांसमोर खालील प्रमुख आव्हाने निर्माण झाली आहेत.

प्रभावी संवाद आणि विद्यार्थ्यांचा सहभाग:

वर्गामध्ये शिक्षक विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील हावभाव पाहून त्यांना विषय समजला आहे की नाही, हे ओळखू शकतात. मात्र, ऑनलाईन वर्गात:

- **ब्लॅक स्क्रीन समस्या:** बहुतांश विद्यार्थी इंटरनेट वाचवण्यासाठी किंवा वैयक्तिक कारणास्तव कॅमेरा बंद ठेवतात. अशा वेळी भिंतीशी किंवा निर्जीव स्क्रीनशी बोलत असल्याचा भास शिक्षकांना होतो.
- **प्रतिसादाचा अभाव:** "समजले का?" या प्रश्नावर विद्यार्थ्यांकडून मिळणारा प्रतिसाद अत्यंत कमी असतो, ज्यामुळे शिक्षकांचा उत्साह कमी होतो.

शैक्षणिक साहित्य निर्मिती:

ऑनलाईन शिकवणे म्हणजे केवळ वर्गातील नोट्स वाचून दाखवणे नव्हे. त्यासाठी:

- **डिजिटल कंटेंट:** आकर्षक पीपीटी (PPT), शैक्षणिक व्हिडिओ, इन्फोग्राफिक्स आणि ई-साहित्याची निर्मिती करण्यासाठी शिक्षकांना पूर्वीपेक्षा दुप्पट वेळ द्यावा लागत आहे.
- **कॉपीराईट समस्या:** ऑनलाईन साहित्य वापरताना ते कायदेशीर आहे की नाही, याची खात्री करणे हे देखील एक आव्हान आहे.

मूल्यमापन आणि देखरेख:

विद्यार्थ्यांच्या परीक्षेवर आणि असाइनमेंटवर लक्ष ठेवणे ऑनलाईन माध्यमात अत्यंत कठीण झाले आहे:

- **गैरप्रकार रोखणे:** गुगलवरून कॉपी करणे उत्तरे शेअर करणे या गोष्टींमुळे विद्यार्थ्यांच्या खऱ्या प्रगतीचे मोजमाप करणे शिक्षकांसाठी अशक्य झाले आहे.
- **डिजिटल तपासणी:** शेकडो पीडीएफ फाईल्स स्क्रीनवर वाचून त्या तपासणे, हे शिक्षकांसाठी शारीरिकदृष्ट्या थकवणारे ठरत आहे.

संशोधनावर होणारा परिणाम:

उच्च शिक्षणातील शिक्षकांकडून संशोधनाची अपेक्षा असते. ऑनलाईन अध्यापनाच्या तांत्रिक कामात इतका वेळ जातो की, शिक्षकांना स्वतःच्या वाचनासाठी, पेपर पब्लिकेशनसाठी आणि प्रयोगशाळेतील कामासाठी पुरेसा वेळ मिळत नाही.

उपाययोजना आणि भविष्यातील दिशा:

ऑनलाईन शिक्षणातील त्रुटी दूर करण्यासाठी आणि उच्च शिक्षणाची गुणवत्ता टिकवण्यासाठी खालील उपाययोजना सुचवता येतील:

शिक्षकांसाठी निरंतर व्यावसायिक विकास:

शिक्षकांना केवळ तंत्रज्ञान वापरण्याचेच नव्हे, तर 'डिजिटल पॅडागोजी'चे (Digital Pedagogy) प्रशिक्षण देणे गरजेचे आहे.

- परस्परसंवादी साधने
- ई-कंटेंट निर्मिती

मूल्यमापन पद्धतीत सुधारणा:

ऑनलाईन परीक्षांमधील गैरप्रकार टाळण्यासाठी पारंपारिक परीक्षा पद्धती बदलणे आवश्यक आहे.

- ओपन बुक एक्झाम्स
- प्रकल्प आधारित मूल्यमापन

निष्कर्ष:

- कोविड-१९ ही महासाथ केवळ एक जागतिक आरोग्य संकट नव्हते, तर ते शिक्षण क्षेत्रासाठी एक मोठे स्थित्यंतर ठरले आहे. या शोध निबंधाच्या माध्यमातून उच्च शिक्षणातील ऑनलाईन पद्धतीचा अभ्यास करताना काही महत्त्वाचे निष्कर्ष समोर आले आहेत.
- सर्वात महत्त्वाचा निष्कर्ष म्हणजे, तंत्रज्ञान हे शिक्षकाचा पर्याय असू शकत नाही, तर ते केवळ एक साधन आहे. पारंपारिक शिक्षण पद्धतीमध्ये असलेला मानवी संवाद, डिजिटल स्क्रीनद्वारे पूर्णपणे साध्य होऊ शकत नाही. तथापि, भविष्यातील शिक्षण हे केवळ 'ऑफलाईन' राहणेही शक्य नाही.
- संशोधनातून असे दिसून आले की, 'डिजिटल दरी' (Digital Divide) हे भारतासारख्या देशातील सर्वात मोठे आव्हान आहे. केवळ तांत्रिक प्रगती करून चालणार नाही, तर सामाजिक समता राखणे हे उच्च शिक्षण संस्थांसमोरील मोठे उद्दिष्ट असणार आहे.
- शिक्षकांच्या बाबतीत बोलायचे झाले तर, त्यांना आता 'माहितीचे स्त्रोत' होण्याऐवजी 'मार्गदर्शक' (Facilitator) या भूमिकेत शिरावे लागेल. माहितीचे ज्ञानात रुपांतर कसे करायचे आणि तिचा वापर करून समस्या कशा सोडवायच्या, हे शिकवणे हेच खऱ्या अर्थाने शिक्षकाचे कौशल्य ठरेल.
- भविष्यातील उच्च शिक्षण हे 'लवचिक' आणि 'ब्लेंडेड' स्वरूपाचे असावे लागेल.
- थोडक्यात सांगायचे तर, कोविड-१९ नंतरचे उच्च शिक्षण हे आव्हानांनी भरलेले असले तरी, त्यात परिवर्तनाच्या मोठ्या संधीही दडलेल्या आहेत. या आव्हानांवर मात करण्यासाठी शासन, शैक्षणिक संस्था, शिक्षक आणि विद्यार्थी या सर्व घटकांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. तरच आपण एक सशक्त, ज्ञानसंपन्न आणि तंत्रस्नेही समाज घडवू शकू.

संदर्भ सूची:

१. कस्तूरीरंगन, के. (२०२०): *राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP २०२०)*, भारत सरकार

२. युनेस्को (UNESCO) रिपोर्ट (२०२१): *Education in a post-COVID world: Nine ideas for public action*

३. देशपांडे, स. (२०२२): "डिजिटल क्रांती आणि भारतीय शिक्षण क्षेत्र", *शैक्षणिक विचार नियतकालिक.*

४. World Bank Report (2020): *The Impact of COVID-19 on Tertiary Education.*

ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

March - 2026
Vol. 15 - No. S1

शाश्वत विकासात सामाजिक विज्ञानाची भूमिका

डॉ. जब्बार खलील शेख

राज्यशास्त्र विभाग, सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात कला, विज्ञान आणि वाणिज्य, महाविद्यालय, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अ.नगर

Corresponding Author: डॉ. जब्बार खलील शेख

DOI - 10.5281/zenodo.19492145

प्रस्तावना:

(सस्टेनेबल डेव्हलपमेंट). भावी पिढ्यांच्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेला बाधा पोहोचू न देता वर्तमानकाळातील गरजा पूर्ण करण्याच्या विकासाला शाश्वत विकास म्हणतात. शाश्वत विकासात पृथ्वीवरील संसाधनांचा वापर विकासासाठी करताना पुढील पिढ्यांनीही संसाधनांचा वापर काळजीपूर्वक करणे अपेक्षित असते.

विकास हा नैसर्गिक संसाधनांच्या वापरावर अवलंबून असतो. नैसर्गिक संसाधने निसर्गनिर्मित असून ती मर्यादित प्रमाणात असतात. नैसर्गिक संसाधनांवर कोणत्याही एका विशिष्ट समाजाचे स्वामित्व नसून ते संपूर्ण सजीव सृष्टीचे असते. तसेच ते केवळ एका पिढीपुरते नसून भविष्यातील अनेक पिढ्यांसाठी असते. नैसर्गिक संसाधनांचा वापर अमर्याद केल्यास भावी पिढीसाठी संसाधने शिल्लक राहणार नाहीत, ही बाब लक्षात घेऊन शाश्वत विकास संकल्पना मांडली गेली आहे. ही संकल्पना नैसर्गिक संसाधनांचा काटकसरीने व प्रभावी वापर, नूतनीक्षम संसाधनांच्या वापरातून भौतिक विकास, सामाजिक न्याय व समता यांवर आधारित विकास इ. बाबींवर आधारलेली आहे.

'शाश्वत विकास' यात शाश्वतता आणि विकास अशा दोन संज्ञा आहेत. शाश्वतता म्हणजे चिरकाल टिकणे, ऱ्हास न होणे. मानव आणि परिसंस्था यांच्यातील संतुलन टिकण्यासाठी शाश्वतता ही संज्ञा विचारात घेतली जाते. नैसर्गिक जैवप्रणालीची अवनती न होता वापरलेल्या संसाधनांच्या जागी त्या दर्जाची दुसरी संसाधने उपलब्ध करणे ही शाश्वतता असते, तर विकास म्हणजे वाढ, प्रगती, सकारात्मक बदल. हे बदल प्राकृतिक, आर्थिक, पर्यावरणीय, सामाजिक व लोकसांख्यिकीय इ. घटकांमध्ये होतात. विकास हा दृष्टिपथात येणारा व उपयुक्त असतो. विकास हा आर्थिक व सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया असून ही प्रक्रिया सांस्कृतिक व पर्यावरणीय घटक आणि त्यांच्यातील आंतरक्रिया यांवर आधारित असते.

सन १९८७ मध्ये ब्रुटलँड अहवालातून शाश्वत विकासाची आधुनिक संकल्पना मांडण्यात आली. मुळात शाश्वत वन व्यवस्थापन यासाठी सुचवली गेलेली ही संकल्पना आर्थिक विकास, सामाजिक विकास आणि भावी पिढ्यांसाठी पर्यावरणाचे संरक्षण या अंगांनी विकसित करण्यात आली आहे. २००८ मध्ये युनायटेड नेशन्स इन्व्हायरन्मेन्ट प्रोग्रॅममध्ये हरित अर्थव्यवस्था ही संकल्पना स्वीकारली. पर्यावरणाला हानी न पोहोचवता नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण करून त्यांचा कार्यक्षमपणे वापर करणे म्हणजे 'हरित अर्थव्यवस्था' होय. पृथ्वी परिषद-२०१२ मध्ये हरित अर्थव्यवस्था आणि शाश्वत विकास यासंबंधी चर्चा करण्यात आली असून परिषदेत दारिद्र्य निर्मूलन, सर्वंकष आर्थिक विकास, सहस्राब्दी विकास ध्येय,

महिलांसहित विकास, लिंग असमानता दूर करणे इत्यादींवर भर दिलेला आहे.

संयुक्त राष्ट्रांनी २०१५ साली शाश्वत विकासाची पुढील उद्दिष्टे मांडली आहेत : दारिद्र्य निर्मूलन करणे, भूक संपवणे, अन्न सुरक्षा, पोषक आहार उपलब्ध करून देणे, शाश्वत शेतीला प्राधान्य देणे, आरोग्यदायी जीवन निर्माण करणे आणि नागरिकांचे कल्याण साधणे, सर्वसमावेशक व गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे, स्त्री-पुरुष समानता व महिला-मुली यांना सक्षम करणे, पाणी व स्वच्छता यांच्या संसाधनांची उपलब्धता निश्चित करणे, अल्पखर्चिक, शाश्वत व आधुनिक ऊर्जा साधने उपलब्ध करून देणे, सर्वसमावेशक आर्थिक वाढ आणि उत्पादनशील रोजगार उपलब्ध करणे, पायाभूत सुविधा निर्माण करणे, सर्वसमावेशक व शाश्वत औद्योगिकीकरण करणे, वेगवेगळ्या राष्ट्रांतील असमानता दूर करणे, शहरे व वस्त्या सुरक्षित आणि शाश्वत करणे, उत्पादन व उपभोगपद्धती शाश्वत रूपात आणणे, हवामान बदल आणि त्याचे दुष्परिणाम टाळण्यासाठी उपाययोजना करणे, महासागर व समूहाचे संधारण आणि संबधित संसाधनांचा शाश्वत वापर, परिसंस्थांचा शाश्वत वापर, वनांचे शाश्वत व्यवस्थापन, वाळवंटीभवन टाळणे, मृदेतील कस घटण्याच्या प्रक्रिया रोखणे, जैवविविधता राखणे, शांततापूर्ण आणि सर्वंकष समाजव्यवस्थांना प्रोत्साहन देणे, शाश्वत विकासाच्या दिशेने वाटचाल निश्चित करणे, सर्वांना न्याय मिळावा यासाठी विविध स्तरावर प्रभावी संस्था उभारणे आणि शाश्वत विकासाकरिता जागतिक भागीदारीसाठी अंमलबजावणीची साधने उपलब्ध करणे.

शाश्वततेची व्याख्या:

१९८७ च्या ब्रुंडलँड कमिशनला व्यापकपणे श्रेय दिलेली ही व्याख्या, शाश्वततेला आर्थिक विकास, पर्यावरण संरक्षण आणि सामाजिक समता यांच्यातील संतुलनात्मक कृती म्हणून मांडते. सामाजिक समतेवर भर देणे हे स्वाभाविकपणे सामाजिक विज्ञानांमध्ये शाश्वततेला स्थान देते, कारण ते मानवी वर्तन, सामाजिक नियम आणि संसाधनांचे वितरण यांच्याशी संबंधित आहे. शाश्वतता म्हणजे भविष्यातील पिढ्यांच्या स्वतःच्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेशी तडजोड न करता वर्तमानाच्या गरजा पूर्ण करणे.

शाश्वत विकासात सामाजिक विज्ञानाची (Social Sciences) भूमिका अत्यंत कळीची आहे. ते मानवी वर्तन, सामाजिक संरचना, संस्कृती आणि धोरणात्मक विश्लेषण समजून घेऊन शाश्वत जीवनशैली, सामाजिक समानता आणि पर्यावरणीय समतोल राखण्यास मदत करतात. सामाजिक शास्त्रज्ञ धोरण निर्मिती, शिक्षण, आणि सामुदायिक सहभागाद्वारे विकासाला मानवकेंद्रित बनवतात.

शाश्वत विकासात सामाजिक विज्ञानांची (समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र इ.) भूमिका मानवी वर्तनात बदल घडवून आणणे, सामाजिक-आर्थिक धोरणे आखणे आणि सर्वसमावेशक विकास साधण्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. ती लोकांच्या गरजा समजून घेणे, पर्यावरणीय संकटांना सामोरे जाण्यासाठी सामाजिक उपाय शोधणे आणि शाश्वत जीवनशैलीला प्रोत्साहन देऊन सामाजिक समानता टिकवून ठेवण्यास मदत करतात

शाश्वत विकासात सामाजिक विज्ञानांची प्रमुख भूमिका:

१. मानवी वर्तनात बदल: सामाजिक शास्त्रज्ञ लोकांच्या वर्तणुकीमागील मानसशास्त्रीय कारणे शोधतात आणि शाश्वत जीवनशैलीचा अवलंब करण्यासाठी (उदा. कमी कचरा, ऊर्जेची बचत) लोकांना प्रेरित करतात.

२. धोरण निर्मिती आणि मूल्यमापन: शाश्वततेशी संबंधित धोरणे तयार करताना त्यांचा समाजावर काय परिणाम होईल, हे तपासण्यासाठी सामाजिक प्रभाव मूल्यमापन (Social Impact Assessments) केले जाते.

३. सामाजिक समता आणि समावेशकता: शाश्वत विकास फक्त पर्यावरणापुरता मर्यादित नसून तो सर्वसमावेशक असावा, हे सामाजिक विज्ञान अधोरेखित करते. यामध्ये गरिबी निर्मूलन, लैंगिक समानता आणि सर्वांना समान संधी मिळवून देण्यावर भर दिला जातो.

४. शिक्षण आणि जागरूकता: शाश्वततेबद्दल लोकांमध्ये जनजागृती करणे आणि शिक्षण कार्यक्रम (Curriculum development) राबवून भावी पिढीला पर्यावरणाविषयी जागरूक बनवणे.

५.आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन (Interdisciplinary Approach): सामाजिक शास्त्रज्ञ, शास्त्रज्ञ, आणि अभियंत्यांसोबत काम करून पर्यावरणीय समस्यांवर व्यावहारिक आणि मानवकेंद्रित उपाय शोधतात.

६. नगररचना: नवीन नागरीकरण आणि नवअभिजात स्थापत्यशास्त्रामुळे बांधकामांमध्ये शाश्वत दृष्टीकोन वाढीस लागला आहे. यात पारंपरिक स्थापत्यशास्त्र, अभिजात रचना, बांधकामासाठी स्थानिक साहित्याचा वापर इत्यादी बाबी दिसून येतात.

७. राजकीय स्थिती: शाश्वत विकासासाठी राजकीय धोरण उपयुक्त ठरते. आंतरराष्ट्रीय व्यापार, भांडवल गुंतवणूक, आर्थिक धोरण, हवामान बदल व उपाय, ऊर्जानिर्मिती, मापन व मूल्यमापन, नैसर्गिक संसाधनांचे व्यवस्थापन, संदेशवहन तंत्रज्ञान इ. शाश्वत विकासाचे निदर्शके आहेत. राजकीय उपक्षेत्रात संघटना व शासन, विधी व न्याय, संदेशवहन, निदर्शन व वाटाघाटी, सुरक्षा व तडजोड संवाद आणि पुनर्समुपदेशन, नैतिकता आणि उत्तरदायित्व इत्यादींचा समावेश होतो.

८. संस्कृती: शाश्वत विकासाचे चौथे क्षेत्र संस्कृती आहे. शाश्वततेच्या चार क्षेत्रातील सांस्कृतिक शाश्वतता महत्त्वाची आहे. समाजाची सांस्कृतिक विविधता विचारात घेऊन नव्या धोरणाची आखणी करावी लागते. प्रत्येक राष्ट्रात, प्रदेशात समाजामध्ये सांस्कृतिक भिन्नता असते. प्रत्येक समाज आपल्या संस्कृतीचे जतन करून जीवन जगतो. जगातील काही देश प्रगत, काही विकसनशील, तर अनेक अप्रगत आहेत. त्यानुसार लोकांचे सांस्कृतिक जीवनदेखील भिन्न असते. अप्रगत देशांना प्रगतीसाठी संघर्ष करावा लागतो. सांस्कृतिक भिन्नतेचा परिणाम शाश्वत विकासावर होतो. प्रदेशाच्या सांस्कृतिक स्थितीत संसाधनांचा वापर अवलंबून असतो. सांस्कृतिक स्थितीत लोकांचे शिक्षण हा महत्त्वाचा घटक आहे. सामाजिक शाश्वत विकास समाजाच्या शैक्षणिक स्थितीवर अवलंबून असतो.

मानवी संसाधनाचा विकास शिक्षणावर अवलंबून असतो. समस्यांची सोडवणूक, सर्जनशीलता आणि निसर्गासह शांततेने, सहिष्णुतेने राहणे याकरिता शिक्षण उपयुक्त ठरते. प्रत्येकाला गुणवत्तापूर्ण शिक्षण दिल्यास सांस्कृतिक बदल होऊ शकतो. राष्ट्राला गतिमान करण्यासाठी शिक्षण उपयोगी ठरते. शिक्षण हे शाश्वत विकासाची गतिज ऊर्जा मानली जाते.

थोडक्यात सांगायचे तर, नैसर्गिक विज्ञान (उदा. भौतिकशास्त्र, जीवशास्त्र) नैसर्गिक घटना, नियम आणि 'काय' अस्तित्वात आहे, हे प्रयोगांद्वारे स्पष्ट करतो याउलट, सामाजिक विज्ञान (समाजशास्त्र, राज्यशास्त्र) मानवी वर्तन, समाज आणि संस्थांचा अभ्यास करून ते 'कसे' साध्य करावे (धोरणे, सामाजिक रचना) आणि मानवी कल्याणासाठी ते 'का' गरजेचे आहे, याचा विचार करतो.

शाश्वत विकास हा सामाजिक, राजकीय व आर्थिक विचारप्रणालीशी निगडीत असतो. सामाजिक अस्तित्वाची जाणीव ठेवून राजकीय विचारप्रणालीची तत्त्वे समाज व निसर्ग कल्याणासाठी ठेवून मानवाच्या उन्नतीसाठी शाश्वत आर्थिक विकास साधणे शक्य आहे. शाश्वत विकासाच्या प्रक्रियेत लोकसहभाग असणे गरजेचे आहे. सूक्ष्मस्तरावर नियोजन, मूळ गरजांवर आधारित नियोजन हासुद्धा शाश्वत विकासाचा भाग आहे. नैसर्गिक पर्यावरण व नैसर्गिक संसाधने यांच्या संधारणासाठी लोकांनी सक्रिय होऊन निरनिराळे प्रकल्प वैयक्तिक व सामूहिक पातळीवर राबविणे आवश्यक आहे. पर्यावरणाच्या मर्यादेत राहून आपल्या जीवनाचा विकास करणे हे शाश्वत विकासाचे एक मध्यवर्ती तत्त्व आहे. शाश्वत विकास हा पर्यावरणापेक्षा विस्तृत किंवा व्यापक आहे. तो सशक्त व स्वास्थ्यपूर्ण मानवी समाजासाठी आहे. मात्र आपल्या जीवनाची गुणवत्ता घटवून भावी पिढ्यांची सोय करणे, हे अपेक्षित नाही. शाश्वत विकासाच्या संकल्पनेमुळे एक सामाजिक घटक म्हणून आपल्याला योग्य निर्णय घेता येतात.

शाश्वत विकासात सामाजिक विज्ञानाचे महत्त्व:

१. नैसर्गिक संसाधनांचे जतन: पाणी, जंगले, खनिजे आणि ऊर्जा यांसारख्या मर्यादित नैसर्गिक संसाधनांचा कार्यक्षम वापर करून, ती पुढील पिढ्यांसाठी राखून ठेवणे

२. पर्यावरण संरक्षण: प्रदूषण कमी करणे, हवामान बदलाचा सामना करणे आणि परिसंस्थेचा (Ecosystem) समतोल टिकवून ठेवणे

३. दीर्घकालीन आर्थिक वाढ: अशा अर्थव्यवस्थेला चालना देणे जी स्थिर, सर्वसमावेशक आणि दीर्घकाळ टिकणारी असेल, ज्यामुळे बेरोजगारी आणि दारिद्र्य कमी होण्यास मदत होते

४. सामाजिक समता आणि न्याय: सर्वांना आरोग्य, शिक्षण आणि समान संधी उपलब्ध करून देणे, तसेच गरिबी आणि भूक मिटवणे, ज्यामुळे शांतता आणि समृद्धी वाढेल

५. भविष्यासाठी सुरक्षितता: सध्याच्या विकासाच्या प्रक्रियेत पर्यावरणाचा ऱ्हास टाळून, भविष्यातील पिढ्यांसाठी राहण्यायोग्य जग निर्माण करणे

थोडक्यात, मानवी जीवन गुणवत्ता सुधारताना पृथ्वीची अखंडता टिकवून ठेवण्यासाठी शाश्वत विकास अत्यंत महत्त्वाचा आहे

शाश्वत विकासात सामाजिक विज्ञानावरील परिमाण:

१. आर्थिक व्यवस्था आणि शाश्वतता: शाश्वतता पारंपारिक आर्थिक मॉडेल्सना आव्हान देते जे पर्यावरणीय आणि सामाजिक कल्याणापेक्षा वाढ आणि नफ्याला प्राधान्य देतात. ते वर्तुळाकार अर्थव्यवस्थांकडे वळण्यास प्रोत्साहन देते जे संसाधनांचा पुनर्वापर आणि पुनर्वापर करतात, कचरा कमी करतात आणि पर्यावरणीय प्रभाव कमी करतात. या संक्रमणासाठी आर्थिक वर्तन, ग्राहकांच्या पसंती आणि बाजारातील गतिशीलता समजून घेणे आवश्यक आहे, जे सर्व सामाजिक विज्ञान चौकशीचे केंद्रबिंदू आहेत.

२. सांस्कृतिक आणि नैतिक दृष्टिकोन : शाश्वतता ही सांस्कृतिक मूल्ये आणि नैतिक विचारांशी खोलवर गुंफलेली आहे. सांस्कृतिक परंपरा, धार्मिक श्रद्धा आणि ऐतिहासिक संदर्भांवर प्रभाव टाकून शाश्वत जीवनशैली काय आहे यावर वेगवेगळ्या समाजांचे वेगळे दृष्टिकोन असतात. सामाजिक शास्त्रज्ञ या सांस्कृतिक परिमाणांचा अभ्यास

करून हे समजून घेतात की ते शाश्वततेकडे पाहण्याच्या दृष्टिकोनाला कसे आकार देतात आणि वर्तन बदलावर कसा प्रभाव पाडतात.

३. राजकीय आणि संस्थात्मक चौकटी: शाश्वतता साध्य करण्यासाठी प्रभावी प्रशासन आणि शाश्वत पद्धतींना समर्थन देणाऱ्या संस्थात्मक चौकटी आवश्यक आहेत. सामाजिक शास्त्रज्ञ शाश्वतता प्रयत्नांना प्रोत्साहन देण्यासाठी किंवा अडथळा आणण्यासाठी राजकीय संस्था, धोरण निर्धारण प्रक्रिया आणि नियामक वातावरणाची भूमिका तपासतात. ते शाश्वतता अजेंडा आकार देण्यात कॉर्पोरेशनपासून तळागाळातील चळवळींपर्यंत विविध भागधारकांच्या शक्ती गतिशीलता आणि प्रभावाचे विश्लेषण देखील करतात.

४. सामाजिक न्याय आणि समता: शाश्वतता ही मूळतः सामाजिक न्यायाशी जोडलेली आहे, संसाधने आणि संधींच्या समान प्रवेशावर लक्ष केंद्रित करते. ते गरिबी निर्मूलन, लिंग समानता आणि आदिवासी समुदायांचे हक्क यासारख्या मुद्द्यांना संबोधित करते. सामाजिक शास्त्रज्ञ या सामाजिक न्यायाच्या परिमाणांचा शोध घेतात, प्रणालीगत असमानता दूर करणाऱ्या आणि उपेक्षित गटांना सक्षम करणाऱ्या समावेशक धोरणांच्या गरजेवर भर देतात.

शाश्वतता वाढविण्यात सामाजिक विज्ञानाची भूमिका:

वर्तणुकीतील बदल आणि सार्वजनिक सहभाग:

वर्तनातील बदल घडवून आणणारे मानसिक आणि समाजशास्त्रीय घटक समजून घेण्यात सामाजिक शास्त्रज्ञ महत्त्वाची भूमिका बजावतात. ते शाश्वततेचे संदेश प्रभावीपणे कसे कळवायचे, लोकांना कसे गुंतवून ठेवायचे आणि शाश्वत जीवनशैलीला कसे प्रोत्साहन द्यायचे याचा अभ्यास करतात. यामध्ये शाश्वततेसाठी वैयक्तिक आणि सामूहिक कृतींवर प्रभाव पाडणाऱ्या प्रेरणा, अडथळे आणि प्रोत्साहनांचा शोध घेणे समाविष्ट आहे.

१. आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन: शाश्वतता ही मूळतः आंतरविद्याशाखीय आहे, ज्यासाठी सामाजिक विज्ञान, नैसर्गिक विज्ञान आणि मानविकी यांच्यात सहकार्य आवश्यक आहे. सामाजिक शास्त्रज्ञ पर्यावरणशास्त्रज्ञ, अभियंते आणि अर्थशास्त्रज्ञांसोबत काम करून शाश्वततेच्या आव्हानांवर समग्र उपाय विकसित करतात. हा आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन सुनिश्चित करतो की शाश्वतता धोरणे सामाजिकदृष्ट्या स्वीकार्य, सांस्कृतिकदृष्ट्या संबंधित आणि आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य आहेत.

२. धोरण विकास आणि मूल्यांकन: सामाजिक शास्त्रज्ञ शाश्वतता धोरणांच्या विकास आणि मूल्यांकनात योगदान देतात, त्यांच्या सामाजिक परिणाम आणि प्रभावीतेबद्दल अंतर्दृष्टी प्रदान करतात. शाश्वतता उपक्रम पुराव्यावर आधारित आणि सामाजिक गरजांशी जुळलेले आहेत याची खात्री करण्यासाठी ते सामाजिक प्रभाव मूल्यांकन आणि धोरण विश्लेषण यासारख्या साधनांचा वापर करतात.

३ शिक्षण आणि क्षमता निर्माण: भावी पिढ्यांना शाश्वततेबद्दल शिक्षित करणे हा सामाजिक विज्ञान क्षेत्रातील एक महत्त्वाचा घटक आहे. सामाजिक शास्त्रज्ञ अभ्यासक्रम, प्रशिक्षण कार्यक्रम आणि शैक्षणिक साहित्य विकसित करतात जे शाश्वतता साक्षरतेला प्रोत्साहन देतात आणि व्यक्तींना त्यांच्या समुदायात बदल घडवून आणण्यासाठी सक्षम करतात.

शाश्वत विकासातील आव्हाने आणि संधी:

१. गुंतागुंत आणि अनिश्चितता: शाश्वतता हे एक जटिल आणि गतिमान क्षेत्र आहे जे अनिश्चितता आणि स्पर्धात्मक हितसंबंधांनी वैशिष्ट्यीकृत आहे. सामाजिक शास्त्रज्ञांनी या

गुंतागुंतींमधून मार्ग काढला पाहिजे, भागधारकांच्या विविध आणि कधीकधी परस्परविरोधी गरजा पूर्ण केल्या पाहिजेत आणि अल्पकालीन मागण्या आणि दीर्घकालीन उद्दिष्टे यांचे संतुलन साधले पाहिजे.

२. जागतिक आणि स्थानिक परस्परसंबंध: शाश्वततेचे प्रश्न जागतिक आणि स्थानिक दोन्ही स्वरूपाचे आहेत, ज्यामुळे सामाजिक शास्त्रज्ञांना जागतिक प्रणाली आणि स्थानिक संदर्भांमधील परस्परसंबंध समजून घेणे आणि त्यांचे निराकरण करणे आवश्यक आहे. यामध्ये हवामान बदल आणि शहरीकरण यासारख्या जागतिक ट्रेंडचे विश्लेषण करणे समाविष्ट आहे, तसेच स्थानिक समुदाय आणि परिसंस्थांवर त्यांचे विशिष्ट परिणाम विचारात घेणे देखील समाविष्ट आहे.

३. नाविन्यपूर्ण उपाय आणि तंत्रज्ञान: शाश्वतता वाढविण्यात तंत्रज्ञानाची महत्त्वपूर्ण भूमिका असली तरी, सामाजिक शास्त्रज्ञ हे सुनिश्चित करतात की तांत्रिक उपाय सामाजिकदृष्ट्या स्वीकार्य आणि नैतिकदृष्ट्या योग्य आहेत. ते नवीकरणीय ऊर्जा आणि डिजिटल नवोपक्रमांसारख्या उदयोन्मुख तंत्रज्ञानाच्या सामाजिक परिणामांचे मूल्यांकन करतात आणि त्यांच्या अंमलबजावणीसाठी समावेशक आणि सहभागी दृष्टिकोनांचे समर्थन करतात.

देशातील तसेच विविध राष्ट्रातील माणसांच्या मनातली असमानतेची परिस्थिती संपुष्टात आली पाहिजे. त्यासाठी तशी धोरणे राबवणे आवश्यक आहे. सर्व शहरे सुरक्षित आणि शाश्वत असावी. शहरांमध्ये पायाभूत सुविधा, शिक्षणाच्या संधी इत्यादी बाबी चांगल्या असतात त्यामुळे येथे स्थलांतर करून येणाऱ्यांचे प्रमाण खूप जास्त आहे. मात्र, त्यामुळे शहराच्या सुरक्षा व्यवस्थेवर ताण येतो आणि दुर्बलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर येतो.

शाश्वत वापर आणि उत्पादन या दोन्ही बाबी साध्य करायच्या असतील, तर शाश्वत जीवनशैलीचा अवलंब केला पाहिजे. उदाहरणार्थ मोठ्या संख्येने होत असलेला चारचाकीचा वापर हे अशाश्वत आहे. याच्यामुळे प्रदूषण, हवामान बदल अशा नकारात्मक घटना जास्त प्रमाणात होतात.

समारोप:

शाश्वतता हा शब्द मोठ्या प्रमाणात एखाद्या विशिष्ट संसाधनाच्या जतनासाठी उद्देशित कार्यक्रम, उपक्रम आणि कृती दर्शविण्यासाठी वापरला जातो. शाश्वत विकास (Sustainable Development) ही सामाजिक विज्ञानाच्या तत्त्वांमध्ये खोलवर रुजलेली एक बहुआयामी क्षेत्र आहे. त्यात आर्थिक व्यवस्था, सांस्कृतिक मूल्ये, राजकीय चौकटी आणि सामाजिक न्याय यांचा समावेश आहे, जो शाश्वतता उद्दिष्टे साध्य करण्यात सामाजिक शास्त्रज्ञांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर प्रकाश टाकतो. शाश्वततेचे मानवी परिमाण समजून घेऊन, सामाजिक शास्त्रज्ञ प्रभावी धोरणे आणि धोरणे विकसित करण्यात योगदान देतात जे सर्वांसाठी अधिक न्याय्य आणि शाश्वत भविष्याला प्रोत्साहन देतात. जग अभूतपूर्व पर्यावरणीय आणि सामाजिक आव्हानांना तोंड देत असताना, शाश्वततेचे सामाजिक विज्ञान क्षेत्र एक लवचिक आणि समृद्ध जागतिक समाज निर्माण करण्यासाठी मौल्यवान अंतर्दृष्टी आणि उपाय प्रदान करते.

सामाजिक शाश्वततेचा उद्देश आपल्या समाजाची चौकट बनवणाऱ्या सेवांची गुंतवणूक आणि निर्मिती करून सामाजिक भांडवलाचे जतन करणे आहे. ही संकल्पना समुदाय, संस्कृती आणि जागतिकीकरणाच्या संदर्भात जगाचा एक मोठा दृष्टिकोन सामावून घेते. सामाजिक

शाश्वतता सामंजस्य, परस्परसंवाद आणि प्रामाणिकपणा आणि लोकांमधील संबंधांचे महत्त्व यासारख्या संकल्पनांसह सामाजिक गुणवत्ता राखण्यावर आणि सुधारण्यावर लक्ष केंद्रित करते. कायदे, माहिती आणि समानता आणि अधिकारांच्या सामायिक कल्पनांद्वारे याला प्रोत्साहन आणि समर्थन दिले जाऊ शकते. सामाजिक शाश्वततेमध्ये संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास उद्दिष्टांनी परिभाषित केल्याप्रमाणे शाश्वत विकासाची कल्पना समाविष्ट आहे.

सन 2000 मध्ये 'सहस्त्रकातील विकास ध्येय' ही संयुक्त राष्ट्र संघाने ठरवली होती. त्यानुसार 2015 पर्यंत आठ महत्त्वाची उद्दिष्टेये संपूर्ण जगाला साध्य करायची होती. यात आत्यंतिक दारिद्र्य, भूक या दोन्हीचे निर्मूलन करून स्त्री-पुरुष समानता आणि बालमृत्यूचा दर कमी करणे ही महत्त्वाची ध्येय ठरवण्यात आली होती. यातील काही थोड्याफार प्रमाणात पूर्ण झालीही. सप्टेंबर 2015 मध्ये राष्ट्रसंघाच्या जनरल असेंब्लीने अनेक चर्चा व परिषदांच्या नंतर जगातील जवळजवळ सर्व राष्ट्रांचे एकमत होऊन शाश्वत विकासाची ही 17 उद्दिष्टे ठरली. 2030 पर्यंत ती सुफळ-संपूर्ण करण्याचा प्रयत्न आहे.

संदर्भ:

१) डॉ. राकेश वर्मा माजी आय ए एस व्ही आर AllCompliances.com चे संस्थापक/सीईओ

२) मराठी विश्वकोश, श्रीनिवास वडगबाळकर, 02/09/2021,

३) मुंबई तरुण भारत, शाश्वत विकास...एक ध्येय!, 15-May-2023,

४) विकिपीडीया

५) https://www.mahamtb.com/Encyc/2023/5/15/sustainable-development-goals.html#/googlvignette

ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

March - 2026
Vol. 15 - No. S1

शाश्वत विकास उद्दिष्टांच्या (SDGs) पूर्ततेत उच्च शिक्षणाची धोरणात्मक भूमिका

डॉ. सदाशिव सिताराम मेंगाळ

सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग प्रमुख, इंद्रायणी महाविद्यालय, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जिल्हा-पुणे

***Corresponding Author:** डॉ. सदाशिव सिताराम मेंगाळ*

DOI - 10.5281/zenodo.19492178

सारांश:

शाश्वत विकास (Sustainable Development) ही २१ व्या शतकातील सर्वसमावेशक आणि बहुआयामी संकल्पना असून आर्थिक प्रगती, सामाजिक समता आणि पर्यावरणीय संतुलन यांचा समन्वय साधणे हे तिचे प्रमुख उद्दिष्ट आहे. जागतिक पातळीवर United Nations ने २०१५ मध्ये जाहीर केलेल्या शाश्वत विकास उद्दिष्टांच्या (SDGs) अंतर्गत २०३० पर्यंत १७ उद्दिष्टे साध्य करण्याचा जागतिक निर्धार करण्यात आला आहे. या उद्दिष्टांमध्ये गुणवत्तापूर्ण व सर्वसमावेशक शिक्षण (Quality Education) (SDG–४) हे केवळ स्वतंत्र ध्येय नसून इतर सर्व उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी आधारभूत घटक म्हणून मान्य करण्यात आले आहे.उच्च शिक्षण संस्था या ज्ञाननिर्मिती, संशोधन, नवोपक्रम, तंत्रज्ञान विकास आणि कौशल्यवर्धन यांच्या माध्यमातून शाश्वत विकासाच्या प्रक्रियेत परिवर्तनकारी भूमिका बजावतात. विद्यापीठे आणि महाविद्यालये केवळ पदवी प्रदान करणाऱ्या संस्था नसून त्या सामाजिक जागरूकता, पर्यावरणीय जबाबदारी आणि आर्थिक सक्षमीकरण घडविणाऱ्या केंद्रे आहेत. हरित कॅम्पस उपक्रम, नवीकरणीय ऊर्जा संशोधन, जैवविविधता संवर्धन, डिजिटल शिक्षण, सामाजिक-आर्थिक सर्वेक्षण आणि समुदाय सहभाग या उपक्रमांद्वारे उच्च शिक्षण संस्था SDGs शी सुसंगत धोरणे राबवत आहेत.भारतीय संदर्भात, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत बहुविषयक शिक्षण, संशोधन व नवोपक्रम, कौशल्याधारित अभ्यासक्रम आणि तंत्रज्ञानाधारित शिक्षण यावर भर देण्यात आला आहे, ज्यामुळे शाश्वत विकासाला चालना मिळत आहे. विशेषतः हरित कौशल्ये (Green Skills), डिजिटल समावेशन आणि ग्रामीण-समुदायाभिमुख प्रकल्प हे शाश्वत विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरत आहेत.

या संशोधनपर लेखात उच्च शिक्षणाची शाश्वत विकासातील धोरणात्मक भूमिका, उद्दिष्टे, आव्हाने आणि संधी यांचे विश्लेषणात्मक व वर्णनात्मक पद्धतीने परीक्षण करण्यात आले आहे. निष्कर्षतः, उच्च शिक्षण हे शाश्वत भविष्यासाठी परिवर्तनाचे प्रमुख साधन असून, SDGs साध्य करण्यासाठी ज्ञानाधिष्ठित समाजनिर्मितीत त्याचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

मुख्य शब्द: उच्च शिक्षण, शाश्वत विकास, SDGs, ज्ञाननिर्मिती, नवोपक्रम, हरित कौशल्ये, धोरणात्मक विकास

प्रस्तावना:

उच्च शिक्षण (Higher Education) हे केवळ पदवीप्रदान करणारे माध्यम नसून ते ज्ञाननिर्मिती, मूल्यसंवर्धन, संशोधन, नवोपक्रम आणि सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. आधुनिक समाजरचनेत विद्यापीठे व महाविद्यालये ही बौद्धिक नेतृत्वाची केंद्रे मानली जातात. सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय प्रश्नांची गुंतागुंत दिवसेंदिवस वाढत असताना, त्यांचे शास्त्रीय विश्लेषण व दीर्घकालीन उपाय सुचविण्याची क्षमता उच्च शिक्षण व्यवस्थेमध्येच आढळते.

२१ व्या शतकात जागतिकीकरणामुळे अर्थव्यवस्था, संस्कृती, तंत्रज्ञान आणि शिक्षण यांमध्ये परस्परावलंबित्व वाढले आहे. तंत्रज्ञानातील झपाट्याने होणारी प्रगती, कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटलायझेशन आणि औद्योगिक क्रांती ४.० यामुळे ज्ञान आणि कौशल्यांचे स्वरूप बदलले आहे. त्याच वेळी हवामान बदल, जैवविविधतेचा ऱ्हास, नैसर्गिक संसाधनांची कमतरता आणि सामाजिक विषमता या समस्या गंभीर बनल्या आहेत. या पार्श्वभूमीवर शाश्वत विकास (Sustainable Development) ही संकल्पना जागतिक स्तरावर

केंद्रस्थानी आली आहे.संयुक्त राष्ट्राच्या महासभेने ने २०१५ मध्ये जाहीर केलेल्या शाश्वत विकास उद्दिष्टांच्या (SDGs) अंतर्गत २०३० पर्यंत दारिद्र्य निर्मूलन, गुणवत्तापूर्ण शिक्षण, लिंगसमता, स्वच्छ ऊर्जा, हवामान कृती आणि शाश्वत शहरे यांसारखी १७ उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत. या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी ज्ञानाधिष्ठित समाजनिर्मिती अत्यावश्यक आहे, आणि त्यासाठी उच्च शिक्षण संस्था प्रमुख घटक ठरतात. भारतीय संदर्भात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत बहुविषयक व कौशल्याधारित शिक्षणावर भर देण्यात आला आहे.ही धोरणे शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांशी सुसंगत आहेत.म्हणून उच्च शिक्षण हे शाश्वत, समतोल व न्याय्य समाजनिर्मितीचे प्रभावी साधन ठरते.

संशोधनाची उद्दिष्टे (Objectives of the Study):

१. उच्च शिक्षण व शाश्वत विकास यातील परस्परसंबंध स्पष्ट करणे.
२. शाश्वत विकासासाठी उच्च शिक्षण संस्थांची प्रमुख उद्दिष्टे अधोरेखित करणे.
३. भारतीय संदर्भात उच्च शिक्षणाच्या धोरणात्मक भूमिकेचा अभ्यास करणे.
४. संशोधन व नवोपक्रमाच्या माध्यमातून शाश्वत विकासाला चालना देण्याचे मार्ग सुचवणे.

गृहीतक (Hypothesis):

"उच्च शिक्षण संस्था संशोधन, नवोपक्रम आणि कौशल्याधारित शिक्षणाच्या माध्यमातून शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांची पूर्तता करून पर्यावरणीय व सामाजिक समस्यांचे निराकरण सुलभ करतात तसेच हरित अर्थव्यवस्थेला चालना देतात."

संशोधन पद्धती (Research Methodology):

सदर संशोधन लेख प्रामुख्याने द्वितीयक माहितीवर (Secondary Data) आधारित असून विविध अधिकृत व विश्वसनीय स्रोतांचा अभ्यास करण्यात आला आहे. यामध्ये United Nations चे अहवाल, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० संबंधी दस्तऐवज, विविध संशोधन लेख, जर्नल्स तसेच शासकीय अहवालांचा संदर्भ घेण्यात आला आहे. संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी विश्लेषणात्मक (Analytical) व वर्णनात्मक (Descriptive) पद्धतीचा अवलंब करण्यात आला असून त्याद्वारे उच्च शिक्षण व शाश्वत विकास यांतील परस्परसंबंध स्पष्ट करण्यात आले आहेत.

उच्च शिक्षणाची शाश्वत विकासातील उद्दिष्टे:

१. गुणवत्तापूर्ण व सर्वसमावेशक शिक्षण: गुणवत्तापूर्ण व सर्वसमावेशक शिक्षण (Quality and Inclusive Education) हे शाश्वत विकासाचे मूलभूत उद्दिष्ट असून शाश्वत विकास उद्दिष्टांन मधील SDG–४ मध्ये त्यावर विशेष भर देण्यात आला आहे. उच्च शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील सर्व घटकांना — ग्रामीण, शहरी, महिला, दिव्यांग, सामाजिक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक — समान संधी उपलब्ध करून देणे हे या उद्दिष्टाचे केंद्रबिंदू आहे.भारतीय संदर्भात, भारता मधील उच्च शिक्षणातील एकूण प्रवेशदर (Gross Enrolment Ratio – GER) सुमारे २८-२९ % पर्यंत पोहोचला आहे (AISHE अहवालानुसार), जो २०३५ पर्यंत ५०% करण्याचे उद्दिष्ट राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत निश्चित करण्यात आले आहे. तसेच महिला विद्यार्थिनींचा सहभाग ४९% पेक्षा अधिक असून लिंगसमतेच्या दृष्टीने ही सकारात्मक बाब आहे.सर्वसमावेशक शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना,

डिजिटल शिक्षण प्लॅटफॉर्म, ओपन अँड डिस्टन्स लर्निंग (ODL), तसेच सामाजिक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी आरक्षण धोरणे राबविली जात आहेत. उच्च शिक्षण संस्थांनी दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सुलभ पायाभूत सुविधा, ई-कंटेंट आणि बहुभाषिक अभ्यासक्रम उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.यामुळे शिक्षणातील सामाजिक विषमता कमी होऊन ज्ञानाधिष्ठित, समतोल आणि न्याय्य समाजनिर्मितीस चालना मिळते, जी शाश्वत विकासाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे.

२. पर्यावरणीय जाणीव निर्माण करणे: उच्च शिक्षण संस्थांची एक महत्त्वाची जबाबदारी म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणीय जाणीव आणि जबाबदारीची भावना विकसित करणे होय. शाश्वत विकास उद्दिष्टांन मधील SDG–१३ हवामान कृती (Climate Action) आणि SDG–१२ शाश्वत उपभोगव उत्पादन (Responsible Consumption) या उद्दिष्टांशी सुसंगतपणे अनेक विद्यापीठांनी हरित कॅम्पस (Green Campus) उपक्रम राबविले आहेत. सौरऊर्जा प्रकल्प, प्लास्टिकमुक्त परिसर, वृक्षारोपण मोहिमा आणि कचरा व्यवस्थापन प्रणाली यांद्वारे कार्बन उत्सर्जन कमी करण्याचा प्रयत्न केला जातो. उदाहरणार्थ, भारतातील अनेक विद्यापीठांनी कॅम्पसमध्ये सौर पॅनेल बसवून २०-३०% पर्यंत वीज गरज स्वयंपूर्ण करण्यास सुरुवात केली आहे.ऊर्जा बचत आणि जलसंवर्धनासाठी रेनवॉटर हार्वेस्टिंग, एलईडी दिव्यांचा वापर आणि सांडपाणी पुनर्वापर (Wastewater Recycling) यांसारख्या उपाययोजना राबविल्या जातात. तसेच हवामान बदल, जैवविविधता आणि शाश्वत विकास यावरील अभ्यासक्रमांचा समावेश पदवी व पदव्युत्तर स्तरावर वाढत आहे. India मध्ये पर्यावरण अभ्यास हा अनेक विद्यापीठांमध्ये अनिवार्य विषय करण्यात आला आहे. या सर्व प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणपूरक जीवनशैलीची जाणीव निर्माण होऊन शाश्वत समाजनिर्मितीस चालना मिळते.

३. संशोधन व नवोपक्रम प्रोत्साहन: शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी उच्च शिक्षण संस्थांमध्ये संशोधन व नवोपक्रमाला विशेष प्राधान्य दिले जाते. नवीकरणीय ऊर्जा, हरित तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान आणि डिजिटल तंत्रज्ञान या क्षेत्रांतील संशोधन पर्यावरणीय व सामाजिक समस्यांच्या निराकरणासाठी उपयुक्त ठरत आहे. भारता मध्ये सौर व पवन ऊर्जेची स्थापित क्षमता १७० गीगावॅटपेक्षा अधिक झाली असून त्यामागे विद्यापीठे व संशोधन संस्थांचे योगदान महत्त्वाचे आहे. हरित तंत्रज्ञानाच्या माध्यमातून कचरा व्यवस्थापन, कार्बन कॅप्चर आणि ऊर्जा कार्यक्षमता वाढविण्याचे संशोधन केले जात आहे. जैवतंत्रज्ञानाच्या साहाय्याने सुधारित बियाणे, जैवखते आणि रोगप्रतिबंधक लसी विकसित केल्या जात आहेत, ज्यामुळे अन्नसुरक्षा व आरोग्य सुधारते. डिजिटल तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डेटा विश्लेषणाच्या वापरामुळे स्मार्ट शेती, ई-गव्हर्नन्स आणि आरोग्य व्यवस्थापन अधिक प्रभावी झाले आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत संशोधन व नवोपक्रमासाठी 'National Research Foundation (NRF)' स्थापनेचा प्रस्ताव देण्यात आला असून संशोधन निधी वाढविण्याचा उद्देश आहे. या सर्व प्रयत्नांमुळे ज्ञानाधिष्ठित आणि हरित अर्थव्यवस्थेला चालना मिळत आहे.

४. कौशल्य विकास व रोजगारक्षमता: शाश्वत विकासाच्या दृष्टीने उच्च शिक्षण संस्थांनी कौशल्याधारित शिक्षणावर भर देणे अत्यावश्यक ठरते. हरित कौशल्ये (Green Skills) जसे की नवीकरणीय ऊर्जा व्यवस्थापन, कचरा व्यवस्थापन, पर्यावरणीय लेखापरीक्षण आणि शाश्वत

शेती यांसारख्या क्षेत्रांत प्रशिक्षित मनुष्यबळाची मागणी वाढत आहे. International Labour Organization च्या अंदाजानुसार हरित अर्थव्यवस्थेमुळे २०३० पर्यंत जगभरात सुमारे २४ दशलक्ष (२.४ कोटी) नवीन रोजगारनिर्मिती होऊ शकते. डिजिटल कौशल्ये — जसे की डेटा विश्लेषण, कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर सुरक्षा आणि ई-गव्हर्नन्स ही आधुनिक अर्थव्यवस्थेची गरज बनली आहेत. भारता मध्ये डिजिटल अर्थव्यवस्था झपाट्याने वाढत असून स्टार्टअप क्षेत्रात भारत जगात अग्रक्रमावर आहे (१००,००० पेक्षा अधिक नोंदणीकृत स्टार्टअप्स). उद्योजकता विकास, इनक्युबेशन सेंटर, स्टार्टअप सेल आणि कौशल्यविकास अभ्यासक्रम यांच्या माध्यमातून विद्यार्थी स्व-रोजगाराकडे व नवोपक्रमाकडे वळत आहेत. अशा प्रकारे कौशल्याधारित शिक्षणामुळे रोजगारक्षमता वाढून शाश्वत आणि समावेशक आर्थिक विकासाला चालना मिळते.

५. सामाजिक बांधिलकी व समुदाय सहभाग: उच्च शिक्षण संस्थांची सामाजिक बांधिलकी ही शाश्वत विकासाचा महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. ग्रामीण विकास प्रकल्प, सामाजिक-आर्थिक सर्वेक्षण आणि आरोग्य व स्वच्छता अभियानांद्वारे विद्यार्थी आणि शिक्षक थेट समाजाशी संवाद साधतात. भारता मध्ये अनेक महाविद्यालये NSS व NCC च्या माध्यमातून दरवर्षी शेकडो गावे दत्तक घेऊन स्वच्छता, साक्षरता आणि आरोग्य जागरूकता उपक्रम राबवितात. देशभरात राष्ट्रीय सेवा योजना (NSS) अंतर्गत सुमारे ४० लाखांहून अधिक स्वयंसेवक कार्यरत असल्याचे अहवाल दर्शवितात. सामाजिक-आर्थिक सर्वेक्षणांमुळे स्थानिक गरजा ओळखून शाश्वत उपाययोजना आखता येतात. आरोग्य शिबिरे, रक्तदान शिबिरे आणि स्वच्छता मोहिमा या उपक्रमांमुळे समाजातील आरोग्य व स्वच्छतेबाबतची जाणीव वाढते. स्वच्छ भारत अभियान सारख्या राष्ट्रीय मोहिमांमध्ये उच्च शिक्षण संस्थांचा सक्रिय सहभाग दिसून येतो. अशा समुदायाभिमुख उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची भावना दृढ होऊन शाश्वत व समावेशक समाजनिर्मितीस चालना मिळते.

भारतीय संदर्भ:

भारता मध्ये उच्च शिक्षण आणि शाश्वत विकास यांचा परस्पर संबंध मजबूत करण्यासाठी शैक्षणिक धोरणांमध्ये महत्त्वाचे बदल घडवून आणण्यात आले आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (NEP २०२०) हा भारताच्या उच्च शिक्षण क्षेत्रातील सर्वात व्यापक आणि दीर्घकालीन सुधारणा दस्तऐवज आहे, ज्याचा मुख्य हेतू उच्च शिक्षण प्रणालीला अधिक समावेशी, गुणात्मक, लवचिक आणि संशोधनाभिमुख बनवणे आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत बहुविषयक शिक्षण, संशोधन व नवोपक्रम, कौशल्य विकास आणि डिजिटल शिक्षणावर विशेष भर दिला आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांना २१व्या शतकाच्या अपेक्षांनुसार सुसज्ज करण्यात मदत होते. सध्या भारतातील उच्च शिक्षणातील सकल नामांकन अनुपात (GER) सुमारे २८.४% आहे आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० चे लक्ष्य २०३५ पर्यंत हा दर ५०% पर्यंत वाढविणे आहे, ज्यामुळे उच्च शिक्षणातील प्राप्तीमध्ये लक्षणीय वाढ अपेक्षित आहे. त्याचबरोबर २०१४-२०१५ ते २०२१-२२ दरम्यान उच्च शिक्षण संस्था ५१,५३४ वरून ५८,६४३ पर्यंत वाढल्या आहेत आणि महाविद्यालयांची संख्या सुमारे १८.२% ने वाढली आहे, ज्यामुळे सविस्तर शिक्षण विस्ताराला चालना मिळाली आहे. नावांकन देखील वाढले असून २०२०-२१ मध्ये ४.१४ कोटी

विद्यार्थी नोंदणीकृत होते ते २०२४-२५ मध्ये सुमारे ४.९५ कोटींनी वाढले आहेत.

